
भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे

त्रैमासिक

शक १८९८ खंड ५७ अंक १–४

श्रीज्ञानदेव विशेषांक



इंद्रायणीकाठी देवाची आळंदी ।
लागली समाधी ज्ञानेशाची ॥

१४३५

॥ श्री ॥

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

श्रीज्ञानदेव विशेषांक

(शक १८९८, खंड ५७, अंक १-४)

विशेषांक संपादन समिती

प्रा. ग. ह. खरे
श्री. वि. त्र्यं. शेटे
डॉ. मु. श्री. कानडे
डॉ. चिं. ना. परचुरे

मूल्य दहा रुपये

संपादन समिति

डॉ. म. श्री. माटे (कार्यकारी संपादक)
प्रा. ग. ह. खरे
डॉ. चिं. ना. परचुरे
डॉ. मु. श्री. कानडे
डॉ. वसंत स. जोशी

श्रीज्ञानदेव विशेष अंकाच्या संपादन-प्रकाशनाची जबाबदारी श्रीज्ञानदेवचरित्र चर्चासत्र समितीकडे सोपविली होती.

प्रकाशक : डॉ. चिं. ना. परचुरे, चिटणीस, भा. इ. सं. मंडळ;
१३२१ सदाशिव पेठ, पुणे-३०
मुद्रक : म. बा. जोशी, बी. ए. ज्ञानविलास छापखाना,
२७, बुधवार पेठ, पुणे २
प्रकाशन : राजवाडे पुण्यतिथी, शक १८९८ मार्गशीर्ष वद्य १२
(इ. १९७६ डिसें. १८)
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाच्या पुरस्काराने प्रकाशित.
महाराष्ट्र शासनाने उपलब्ध केलेल्या कागदावर हा अंक छापला आहे.

भारत इतिहास संशोधक मंडळ

श्रीज्ञानदेव चरित्र चर्चासत्र (दि. २६, २७, २८ मे १९७६)

चर्चासत्र-समितीचे निवेदन

महान् संत श्रीज्ञानदेवांच्या सप्तम जन्मशताब्दीचा सोहळा गेल्या वर्षापासून सर्व महाराष्ट्रात सुरू झाला, तेव्हाच भारत इतिहास संशोधक मंडळाने काही विधायक स्वरूपाचा कार्यक्रम घडवून आणावा असा विचार कारभारी मंडळात सुरू होता; त्या सुमारास मंडळाचे एक हितचिंतक, सल्लागार आणि एक माजी चिटणीस श्री. वि. त्र्यं. ऊर्फ दादासाहेब शेटे यांनी कारभारी मंडळाला एक पत्र पाठवून, अन्य ठिकाणी न झालेली अशी ज्ञानदेव-चरित्रविषयक चर्चा घडवून आणावी अशी सूचना केली. कारभारी मंडळाने या सूचनेचा सहर्ष स्वीकार करून तीन दिवसांचे श्रीज्ञानदेव चरित्र-चर्चासत्र भरविण्याचे ठरविले व त्यासाठी एका चर्चा-सत्र समिती नियुक्त केली. ह्या समितीने चर्चासत्राची जबाबदारी उचलावी, आखणी करावी व आलेल्या निबंधांचे प्रकाशनही करावे असे ठरविले.

समितीने प्रथम ज्ञानदेव चरित्रातून जे विवाद्य स्वरूपाचे भिन्नभिन्न प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांची टिपणी केली. ह्या टिपणीतील विषय, प्राचीन मराठी वाङ्मयाचे आणि विशेषतः श्रीज्ञानदेवांच्या चरित्राचे व वाङ्मयाचे जे अभ्यासक आहेत त्यांच्याकडे पाठविले. अभ्यासकांनी आपापल्या आवडीनुसार विषय निवडून त्यावर निबंध लिहून पाठवावा अशी त्यांना समितीने विनंती केली. विनंतीनुसार महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरच्या सुमारे पंचवीस अभ्यासकांनी निबंध लिहून पाठविण्यास संमती दर्शविली, त्याप्रमाणे बहुतेक अभ्यासकांनी प्रथम निबंध सारांश व नंतर निबंध लिहून पाठविले.

चर्चासत्रात भाग घेणारे बरेच अभ्यासक परगावाहून येणारे होते. तेव्हा अभ्यासकांच्या जाण्यायेण्याचा खर्च, त्यांच्या निवास-भोजनाची व्यवस्था, निबंधांच्या सारांशाची छपाई किंवा पत्रव्यवहार इ. कार्यासाठी द्रव्याची आवश्यकता होती. मंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेऊन या कार्यासाठी पुण्यातील व पुण्याबाहे-रील ज्ञानदेवप्रेमी धनिकांना समितीने याबाबत आवाहन केले. समितीच्या सदस्यांनी सुमारे दोन आठवडे अक्षरशः पदयात्रा काढून पुण्यातील अनेक धनिकांची समक्ष भेट घेतली व या कार्यासाठी पुरेसा निधी जमविला. या कामी ज्यांनी उदार देणग्या दिल्या त्यांची यादी इतरत्र जोडली आहे. पुण्यातील एक दानशूर

व्यापारी श्रीमान् बन्सीलाल आगरवाल यांनी चर्चासत्रासाठी उपस्थित झालेल्या सर्वांना तीनही दिवस भोजन दिले आणि अखेरच्या दिवशी उपस्थित विद्वान आणि संबधितांचा दक्षिणा देऊन सन्मान केला.

समितीच्या योजनेप्रमाणे बुधवार दिनांक २६ मे १९७६ रोजी सकाळी ९ वाजता मंडळाचे उपाध्यक्ष मा. म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या हस्ते मंडळ सभागृहात, प्रसन्न वातावरणात श्रीज्ञानदेव यांच्या समाधीच्या प्रतिमेस पुष्पहार समर्पण करून या सत्राचे उद्‌घाटन झाले. नंतर तीन दिवस, दररोज सकाळ-दुपार दोन बैठकी घेऊन चर्चासत्रातील निबंधवाचन आणि त्यानंतर तत्संबंधी चर्चा असा कार्यक्रम आखला होता. सर्व उपस्थितांच्या सहकार्यामुळे तो अतिशय उत्कृष्ट तऱ्हेने पार पडला. या सत्राच्या निमित्ताने पूर्वीच्या अभ्यासकांचे मंडळाबरोबरचे संबंध अधिक दृढ झाले तर अनेक नवीन अभ्यासकांचे संबंध नव्यानेच प्रस्थापित झाले. कोल्हापूरच्या मा. खुपेरकरशास्त्री यांच्यासारख्या काही अभ्यासकांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही, तरी चर्चासत्राला त्यांचे आशीर्वाद लाभले होते. मंडळाच्या विविध उपक्रमात या अभ्यासकांनी नेहमी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे, ही भावी काळाच्या दृष्टीने मोठीच आशादायक घटना म्हणावी लागेल.

तीन दिवसांच्या चर्चासत्रातील एक बैठक आळंदी येथील 'श्रीज्ञानेश्वर विद्यापीठा'त घ्यावी असे त्या संस्थेचे संचालक मान्यवर श्री. द. दा. देशपांडे यांनी सुचविले होते. त्याप्रमाणे गुरुवार दि. २७ मे १९७६ रोजी दुपारच्या बैठकीचा कार्यक्रम आळंदीच्या श्रीज्ञानेश्वर विद्यापीठात घेतला होता. पुण्यात जमलेल्या अभ्यासकांच्या नेण्या-आणण्याची व तेथील भोजनादी सर्व व्यवस्था श्री. भाऊसाहेब देशपांडे यांनी उत्कृष्ट रीतीने केली होती. या दिवशी सर्व अभ्यासकांनी श्रीज्ञानदेव मंदिरात जाऊन ज्ञानदेवांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यावेळी संस्थानचे एक पंच ह. भ. प. श्री. किसनमहाराज साखरे यांनी संस्थानच्या वतीने सर्व अभ्यासकांचा सत्कार केला. भोरचे राजेसाहेब आणि त्यांचे चिरंजीव पुण्यातील कार्यक्रमाप्रमाणेच आळंदीच्या कार्यक्रमासाठीही मुद्दाम आले होते.

सत्रातील उपस्थित अभ्यासकांमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, वारकरी संप्रदायाचे धुरीण, सनातनी पंडित, नवे आणि बुद्धिवादी समीक्षक असे विविध प्रकृतीचे ज्ञानदेवभक्त एकाच व्यासपीठावर येऊन तीन दिवसपर्यंत मोठ्या उत्साहाने विचारांची देवाण-घेवाण करीत होते. उत्तर-प्रत्युत्तरांच्या, खंडन-मंडनाच्या चकमकी अनेक झाल्या; पण कटुता निर्माण होण्यासारखा प्रसंग मात्र एकदाही निर्माण झाला नाही. याचे श्रेय विशुद्ध जिज्ञासेने चर्चा करणारे विद्वान आणि चर्चासत्राचे अत्यंत कुशलतेने संयोजन करणारे म. म. दत्तो वामन पोतदार व प्रा. गणेश हरी खरे या सर्वांना देणे अवश्य आहे.

चर्चासत्रातील निबंधांची अभ्यासकांना आगावू कल्पना यावी या हेतूने निबंधांचा सारांश छापून त्यांची पुस्तिका छापली होती. ती सत्रापूर्वी सत्रात भाग घेणाऱ्या विद्वानांच्या हाती दिली होती. या पुस्तिकेच्या मुद्रणास साहाय्य म्हणून काही संस्थांनी जाहिराती देऊन मंडळास उपकृत केले आहे.

शुक्रवार दिनांक २८ मे १९७६ रोजी म्हणजेच चर्चासत्राच्या समारोपाच्या वेळी श्रीमान् बन्सीलाल आगरवाल आणि चर्चासत्रात भाग घेणाऱ्या सर्व विद्वानांचा उपाध्यक्ष मा. म. म. पोतदार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

चर्चासत्राचा पसारा वेळेवर उरकला जावा यासाठी काही हंगामी सेवक नियुक्त केले होते. त्यांनी व मंडळातील नित्याच्या सेवकांनी अत्यंत उत्साहाने सर्व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मनःपूर्वक सहकार्य दिले. ज्ञानविलास छापखान्याचे श्री. जोशी यांनी छपाईच्या कामात महत्त्वाचे सहकार्य केले; त्यामुळे हा ज्ञानदेव-विषयक अंकही योग्य वेळी प्रकाशित करता आला.

अशा प्रकारे हे श्रीज्ञानदेवचरित्र चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी ज्या ज्या व्यक्तींनी आणि संस्थांनी विविध प्रकारचे सहकार्य दिले त्यांच्याबद्दल चर्चासत्र समिती मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहे. ह्या अंकात चर्चासत्रातील विषयाहून अधिक भर पडली आहे. अंकाच्या प्रकाशनप्रसंगी निबंध–लेखकांचेही आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या सहकार्यामुळेच हा अंक अभ्यासकांच्या हाती देणे शक्य झाले.

प्रा. ग. ह. खरे
श्री. वि. त्र्यं. शेटे
डॉ. मु. श्री. कानडे
डॉ. चिं. ना. परचुरे
श्रीज्ञानदेव चरित्र चर्चासत्र समिती

राजवाडे स्मृतिदिन
शके १८९८ मार्गशीर्ष व. १२

श्रीज्ञानदेव चरित्र चर्चासत्र–देणगीदार

१. चितळे बंधू (मिठाईवाले) बाजीराव पथ, पुणे	रु. ५०१
२. श्रीमंत युवराज नागनाथ सदाशिवराव पंतसचिव, पुणे	रु. ५००
३. ट्रस्टी, इचलकरंजी एज्युकेशन अॅन्ड चॅरिटी ट्रस्ट, इचलकरंजी	रु. ५००
४. डॉ. ह. वि. सरदेसाई, पुणे	रु. ५००
५. श्री. म. स. ऊर्फ बाबुरावजी पारखे (पेपर अॅन्ड पल्प), पुणे	रु. २५१
६. श्री. पु. ना. गाडगीळ–सराफ, कुंटे चौक पुणे	रु. २०१
७. श्री. सूर्यकांत शंकर निरगुडकर, पुणे	रु. २००
८. डॉ. मनोहर ज. जोशी, घोले पथ, पुणे	रु. १५०
९. श्री. द. दा. देशपांडे, श्रीज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी	रु. १५०
१०. मा. कुलसचिव, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद	रु १२५
११. डॉ. ल. ना. देशमुख, सौ. शोभना देशमुख, घोले पथ पुणे	रु. १०१
१२. डॉ. शालिनीबाई टिळक, बाजीराव पथ, पुणे	रु. १०१
१३. आळंदी देवस्थानतर्फे–डॉ. वाय. व्ही. फाटक	रु. १०१
१४. शुक्ल यजुर्वेदी महाराष्ट्र माध्यंदिन ब्राह्मण मध्यवर्ति मंडळ, पुणे	रु. १०१
१५. श्री. गोविंद नरहर जोशी, कॉन्ट्रॅक्टर, पुणे	रु. १०१
१६. श्री. भोपटकर, इंडिया वुलन एम्पोरियम, पुणे ३०	रु १०१
१७. श्री. द. दा. देशपांडे, श्री ज्ञानेश्वर विद्यापीठ, आळंदी	रु. १०१
१८. श्री. अनिरुद्ध अनंत कुलकर्णी–कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे	रु. १०१
१९. श्री. सु. दे. ऊर्फ बापुराव जोशी (गायत्री मुद्रणालय), पुणे	रु. १०१
२०. रजिस्ट्रार, पुणे विद्यापीठ, पुणे	रु. १०१
२१. श्री. मधुकाका कुलकर्णी (विद्या प्रकाशन) पुणे	रु. ५१
२२. श्री. वि. ग. माटे (विश्वकर्मा मुद्रणालय) पुणे	रु. ५१
२३. श्री. स. कृ. पाध्ये (व्हीनस प्रकाशन) पुणे	रु ५१
२४. श्री. गो. भा. पानसे, अॅडव्होकेट, पुणे	रु. ५१
२५. श्री. गो. य. राणे प्रकाशन, टिळक पथ, पुणे	रु. ५१
२६. गणेश पेपर कंपनी, शनिवार पेठ, पुणे	रु. ५१
२७. श्री. म. बा. जोशी (ज्ञानविलास छापखाना) पुणे	रु. ५१
२८. सकाळ पेपर्स प्रायव्हेट लि., पुणे	रु. ५१
२९. श्री. आर. एस्. वझे, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, पुणे	रु. २५
३०. श्री. भास्कर वायु, पुणे	रु. २५

३१. श्री. श्री. रा. टिकेकर, मुंबई	रु. २५
३२. डॉ. एस्. टी. वाघमारे, पुणे	रु. २०
३३. ले. क. (रिटा.) हे. वि. दीक्षित, पुणे	रु. ११
३४. श्री. दि. शं. जोशी, पुणे	रु. ११
३५. श्री. मुरलीधर गणेश लडकत, पुणे	रु. १०
३६. श्री. प्रा. दे. द. वाडेकर	रु. ५
३७. श्री. आर. एस्. दुधाळ, पुणे	रु. ५

श्रीज्ञानदेवचरित्र चर्चासत्र : निबंध सारांश पुस्तिका

जाहिरातदार

(१) बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव पथ, पुणे	रु. २००
(२) होमी आणि कंपनी, लक्ष्मी पथ, पुणे	रु. १००
(३) बँक ऑफ इंडिया, बेलबाग चौक, पुणे	रु. ५०
(४) जनता सहकारीं बँक लि., पुणे	रु. ५०
(५) बन्सीलाल क्लॉथ मार्केट, पुणे	
(६) महालक्ष्मी कटपीस भंडार, पुणे	

श्रीज्ञानदेव-विशेषांक

लेखानुक्रम

श्रीज्ञानदेवांचा जन्मशक व जन्मग्राम

श्री. धों. ए. गोंदकर, इचलकरंजी

श्रीज्ञानदेवांचा जन्मशक व जन्मग्राम या दोन गोष्टींच्या संबंधात हे निवेदन आहे. माझे मते शके ११९७ चे कृष्णाष्टमीस मध्यरात्री जन्म व आळंदी हे जन्मग्राम नक्की आहे. आधारासाठी प्रामुख्याने "सकल संत-गाथा" (आवृत्ती दुसरी प्रकाशनकाल सन १९६७) घेतली आहे. त्यातले अभंग क्रमांक नोंदले आहेत. जन्मशक दर्शविणारे उल्लेख असे;

(१) अधिक सत्त्याण्णव शके अकराशति ।
श्रावण मास तिथी कृष्णाष्टमी ॥ १ ॥
वर्षाऋतु युवानाम संवत्सर।
उगवे निशाकर रात्रीमाजी ॥ २ ॥
पंचमहापातकी तारावया जन ।
आले नारायण मृत्युलोकी ॥ ३ ॥
नामा म्हणे पूर्ण ब्रह्म ज्ञानेश्वर ।
घेतसे अवतार अलंकापुरी ॥ ४ ॥

सकल संत-गाथेत हा अभंग नाही. परंतु ज्ञानदेवांचे सर्व जीवन कथन करणारे आदिपासून समाधीपर्यंतचे श्री नामदेवांचे सर्व अभंग आहेत आणि जन्मकाळाचाच तेवढा नाही, असे घडणे अशक्य आहे. शिवाय नामदेवांनी स्वतःचा जन्मकाल सांगणारा

अधिक ब्याण्णव गणित अकराशते ।
उगवता आदित्य रोहिणीसी ॥ १ ॥

असा जो अभंग लिहिला आहे, त्याच्याशी या अभंगाचे आत्यंतिक भाषासाधर्म्य आहे. तसेच अभंग क्र. ९१३, कडवे ६ व ७:–

संसारी आसक्त मायामोहरत ।
तापत्रे संतप्त झाले जीव ॥ ६ ॥
ऐसिया पतिताचा करावा उद्धार ।
यालागी अवतार तुमचा जगी ॥ ७ ॥ (नामदेव)

याचा आशय वरील अभंगाशी तंतोतंत जुळणारा आहे. म्हणून नंतर उपलब्ध झालेला हा अभंग क्षेपक म्हणणे योग्य होणार नाही.

(२) कार्तिक वद्य १३ शके १२१८ साली श्रीज्ञानदेवांनी समाधी घेतली. हे सर्वानुमते सिद्ध आहे. श्रीज्ञानदेवाचे अभंग क्रमांक ७२७ बाळछंद हा अभंग श्वास समाधी भूमिकेचे प्रकटन करणारा आहे. याच्या शेवटच्या कडव्यात आपला जीवनक्रम २२ वर्षांचा असल्याचे ते सांगतात.

बाळछंदी बावीस जन्मे । तोडीली भवाधीची कर्मे ।
चंद्रार्क तारांगणे रश्मे । दान घेतला हरी ॥

तेव्हा १२१८ मधून हा बावीस वर्षांचा कालावधी वजा केला तर जन्मशक ११९७ येतो.

(३) श्रीनामदेव अभंग क्र. १००८, कडवे आठवे यातही श्रीज्ञानदेवांचा कालखंड २२ वर्षांचा असल्याचे नामदेव सांगतात. " ऐसे ऐकोनि श्रीहरी । म्हणे धन्य धन्य तुमची वैखरी । जगदोद्धार केला संसारी । बावीस वरुषे असता पै । " यावरूनही ११९७ चे जन्मशकास बळकटी येते.

(४) श्रीनामदेव अभंग क्रमांक ९०९, कडवे ३ रे 'उपजताची ज्ञानी हे वर्म जाणोनि । आले लोटांगणी चांगदेव ॥' असा ज्ञानदेव महिमा गायिला आहे. त्यातून श्रीज्ञानेश्वरी लिहिली गेल्याचा भाव व्यक्त होतो. श्रीज्ञानेश्वरीचा लेखनकाल समाप्त झाल्याचा शक शके १२१२ असल्याचे प्रमाण मानले जाते. " शके बाराशते बारोत्तरें । तै टीका केली ज्ञानेश्वरें । सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकु झाला ॥ " असा श्रीज्ञानेश्वरीचा समारोप आहे. " उपजताची ज्ञानी " या शब्दांत अल्पवयातील ज्ञानसंपन्नता व्यक्त केली गेली आहे. जर ११९३ मध्ये जन्म गृहित धरला तर ज्ञानेश्वरी लेखनकाल वयाच्या १९ व्या वर्षी येतो. १९ वयाच्या व्यक्तीला अल्पवयातील ज्ञानसंपन्नता असे गौरविणे कठीण आहे. तसेच संप्रदायात १६ व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली असे परंपरेने सांगण्यात येते. या अनुमानावरूनही शके १८९७ हा जन्मशक ठरतो.

(५) श्रीनामदेव अभंग क्र. ९०८, कडवे २ रे यात श्रीनामदेव म्हणतात, " मागोनिया म्हैशा नेवास्याशी आले । प्राकृत पै केले गीते लागी ॥ " याचा अर्थ पैठणहून परतताना ज्ञानेश्वरी लिहिली असा स्पष्ट आहे. पैठणमध्ये मौंजीबंधनासाठी पत्र आणण्यास ज्ञानदेवादि भावंडे आली होती. मौंजीबंधनाचे वय ८ ते १० अधिकाधिक १२ असणे व्यवहाराला धरून आहे. अभंग क्र ९०७ मध्ये पैठणात " अध्यात्म ग्रंथ पाहती पैठणी । गीता संबोधनी जवळी असे ॥ ८ ॥ सांगती पुराण

रात्री हरीकीर्तन । पैठणीचे जन वेधीयेंले ॥ ११ ॥" असे नामदेव वर्णितात. म्हणजे काही काळ पैठणात वास्तव्य झाले हे स्पष्ट होते. तेथून आपेगावी त्यांचे वास्तव्य झाले असावे व नंतर परत आळंदीस येताना नेवाश्यास ज्ञानेश्वरी रचना झाली. ज्ञानेश्वरीचे रचनेसाठीही काही कालखंड व्यतीत झाला असणार. रचनेच्या समाप्तीचा काल १२१२ असल्याने त्याच्यापूर्वी ६।७ वर्षे मौंजीबंधनाचे वय धरणे योग्य होईल. म्हणजे पर्यायाने ११९७ जन्मशक सूचित होतो.

वरील सर्व कारणांवरून श्री ज्ञानदेवांचा जन्म ११९७ साली झाला असावा असे माझे निश्चित मत आहे.

नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन होते. नामदेवांचा उल्लेख ज्ञानदेवांनी आपल्या अभंगातून केला काहे. निवृत्तिनाथांनी तर नामदेवाच्या जोडीला गोणाई, नारा, विठा, विसोबा खेचर, सावंता, परीसा भागवत, नरहरी, जगमित्र नागा, आदि अनेकांचा अनेकवार उल्लेख आपल्या अभंगांत केला. याचा अर्थ गोणाई, नारा, विठा, परीसा भागवत वगैरेंशी संबंधित असे नामदेव हे ज्ञानदेवांच्या समकालीन होते. ज्ञानदेवादि चारी भावंडांना पंढरीची वारी पूर्वापार ज्ञात होती. त्या सर्वांच्या अभंगांत पंढरीचे व वारीचे उल्लेख आहेत. या वारीतच या भावंडांची व नामदेवांची जवळीक दृढ झाली असावी. नामदेवांना या भावंडांच्या समवेत तीर्थयात्रेचा प्रदीर्घकाळ सहवास लाभला होता. या तीर्थयात्रेचे उल्लेख वरील समकालीन संतांच्या अभंगातही आलेले आहेत. यावरून नामदेवांना ज्ञानदेवादि भावंडांच्या पूर्वइतिहासाची व पूर्वचरित्राची या सहवासकालात माहिती झाली असली पाहिजे, हे उघड आहे. यामुळे ज्ञानदेवादि भावंडांचा जीवनपथ प्रामुख्याने नामदेवांच्या आदी, तीर्थावळी, समाधी महिमा व समाधी सोहळा वगैरे अभंगांचा शोध घेऊन निश्चित करणे योग्य ठरणार आहे. प्रस्तुत माझ्या विषयातील या भावंडांच्या जन्मग्रामाचा शोध पुढीलप्रमाणे–

(१) वर जन्मशकाचे निश्चितीसाठी दिलेल्या पहिल्या अभंगात ४ थ्या कडव्यात नामदेव म्हणतात, " नामा म्हणे पूर्णब्रह्म ज्ञानेश्वर । घेतसे अवतार अलंकापुरी ॥ "

(२) श्री नामदेव अभंग क्रमांक १०२१, कडवे ५ वे–

" हे शिवपीठ शिवाचे, हेचि पूर्वस्थान अगस्तीचे, जाणोनि जन्म झाले चौघांचे, सर्व क्षेत्राची आदि भूमी ॥" हा सर्व अभंग आळंदीमाहात्म्य वर्णन करतानाचा आहे. याच्या दुसऱ्या कडव्यात 'धन्य जन्मले भूमंडळी' असे म्हटले आहे. याचाही ध्वनितार्थ आळंदीत या सर्वांचे जन्म झाले असा होतो.

(३) श्री नामदेव अभंग क्रमांक ९०८, कडवे ७ वे.

"करूनि तया पूजन, सेंदुर तेले लेपुन । अलंकावती निजस्थान प्रवेशिली ।।"
ज्ञानदेवादिक चौघांचा जन्माचा काल इतरत्र असता व शुद्धिपत्रानंतरच पैठणहून ज्ञानेश्वरीचा लेखनकाल झाल्यानंतर म्हणजे ज्ञानदेवांच्या १६ व्या वयानंतर त्यांचे आळंदीस आगमन झाले असता, आळंदीला निजस्थान असे संबोधण्याचा क्रम सुसंगत ठरत नाही.

(४) श्रीनामदेव अभंग क्रमांक ९०५ कडवे ५ वे–

" पत्र वाचुनिया सकळा झाले श्रृत । संन्याशाचे पुत्र कळो आले ।।"

याचा अर्थ पैठणमधील ब्रह्मवृंदांना ज्ञानदेवांनी आळंदीहून आणलेले पत्र वाचल्यानंतर ते संन्याशाचे पुत्र आहेत हे कळले. जर आपेगावी या चौघांचे जन्म झाले असते तर या चौघांच्या जन्मातील एकूण काल १० वर्षांचा उल्लेखलेला आहे. तो काल पैठणपासून केवळ ७ मैलांवर असलेल्या आपेगावात त्यांचे वास्तव्य होते हे मान्य करावे लागेल. त्या काळची वर्णाश्रमधर्माची चौकट लक्षात घेता एका संन्याशाने गृहस्थाश्रम स्वीकारला आणि त्याला चार अपत्ये झाली याचा प्रचंड गवगवा झाला असता आणि सात मैलांवरील पैठणसारख्या धर्मपीठात केवढे तरी काहूर आधीच माजले असते आणि म्हणून पत्र वाचेपर्यंत ज्या अर्थी पैठणच्या ब्रह्मवृंदांना ही घटना माहिती नव्हती त्या अर्थी आपेगावात जन्म होणे हे अशक्य आहे.

(५) श्री नामदेव अभंग क्र. ९०१ कडवे ३ रे–

यात नामदेव म्हणतात, " द्विजी वाळीयेले, जगी सांडियेले । शेखी उपेक्षिले आप्तवर्गी ।।" ज्ञानदेवांच्या वडिलांना, विठ्ठलपंतांना माता-पित्यांशिवाय अन्य कोणी कौटुंबिक व्यक्ती नव्हती. माता-पितर विठ्ठलपंत आळंदीस येण्यापूर्वी निर्वतले होते. यामुळे आळंदीचे सिद्धोपंत हेच केवळ आप्तवर्गीय ठरतात. म्हणून वाळीत टाकण्याची क्रिया आळंदीत घडली हे उघड होय. तसेच सातशे वर्षांपूर्वीच्या जुन्या काळात असे वाळीत टाकलेले, बहिष्कृत कुटुंब गावात राहणे कठीण. परंपरेने आळंदीतील त्यांच्यावरील बहिष्कार किती तीव्र होता याच्या अनेक कथा प्रचलित आहेत. कुंभाराकडून खापर न मिळाल्याने ज्ञानदेवांनी जठराग्नि प्रदीप्त करून मांडे भाजल्याची कथा सर्वश्रुत आहे. मुक्ताईचे ताटीचे अभंगही या बहिष्काराची तीव्रता दर्शवितात. आळंदी येथे सिद्बेटाचे माहात्म्य, ज्ञानदेवांचे जन्मस्थान म्हणून वारकरी संप्रदायात परंपरेने आजतागायत मानले जाते. सिद्बेट गावाबाहेर दूर आहे. आपेगाव येथे असे गावाबाहेर वास्तव्याचे स्थान दर्शविले जात नाही. ज्ञानदेवांचे पूर्वज इतकेच नव्हे तर विठ्ठलपंतही मातापित्यांचे निर्वाण होईपर्यंत आपेगावास होते. यामुळे आपेगावात त्यांचे घर असणे स्वाभाविक आहे. परंतु ते घर बहिष्कृत कुटुंबाचे वास्तव्याचे दर्शक ठरत नाही.

(६) श्रीनामदेव अभंग क्रमांक ८९४, कडवे ६ वे–

सिद्धोपंतांचे उद्‌गार नामदेव लिहितात, " दया करूनि मज आता सांभाळावे । अळंकापुरी रहावे सुखरूप ॥" व त्याप्रमाणे विठ्ठलपंत आळंदीस येऊन राहिल्याचा उल्लेख अभंग क्रमांक ८९५, कडवे १ ले " येऊनि अळंकापुरी केला क्षेत्रवास । देऊनि चित्तास समाधान ॥" यात आला आहे. तसेच विठ्ठलपंत आळंदीतूनच संन्यास ग्रहण करण्यास गेले याचा उल्लेख अभंग क्रमांक ८९६, यात आला आहे. पहिल्याच कडव्यात हे स्पष्ट झाले आहे " रखुमाई म्हणे ऐकाजि ताता । संन्यास घ्यावा आता म्हणताति ।" तदनंतर रामानंद वा श्रीपाद यांचे आळंदीतच रखुमाईंना दर्शन झाले व त्यांनी सिद्धोपंतांना रखुमाईंना घेऊन काशीस येण्यास सांगितले. अभंग क्र. ८९८ कडवे ६ वे– " आता फिरोनिया जावे वाराणसी । घेऊन रखुमाईसि तुम्ही यावे ॥" म्हणजे काशीस सिद्धोपंत मुलीसह गेले होते. यामुळे काशीहून परतल्यानंतर सिद्धोपंत मुलीला व जावयाला उतारवयात आळंदीपासून दूर ठेवतील हे अशक्य आहे. बहिष्कृत अवस्थेत निदान सिद्धोपंतांच्या सहानुभूतीचा आधार विठ्ठलपंतही सोडतील हे कठीण आहे.

(७) अभंग क्र. ९०२ कडवे १ ले– " म्हणति सकळ द्विज जावे प्रतिष्ठाना । तेथुनि पत्र आणा ते वंद्य करू ॥ " अभंग क्र. ९०५ कडवे १ ले– " देऊनिया पत्र निघाले सत्वर । करूनि नमस्कार सकळासि ॥ जाऊनि राहिले भोगावती तीरी तीर्थयात्रा विधी संपादिली ॥ " वरील अवतरण व अभंग क्रमांक ९०० चा आशय लक्षात घेता पहिली ब्रह्मसभा आळंदीला झाली ते स्पष्ट आहे. जर आपेगावी जन्म झाले असते तर पैठणसारखे ७ मैलांवरील धर्मपीठ सोडून मौंजीबंधनासाठी आळंदीसारख्या दूर गावी लहान लहान पोरे घेऊन ब्रह्मसभा भरविली हे सुसंगत ठरत नाही. ब्रह्मसभेचा सर्व वृत्तान्त आळंदी जन्मग्राम निश्चित करतो.

(८) श्री ज्ञानेश्वर समाधी महिमा हे संपूर्ण प्रकरण भावार्थाने (शब्दार्थाने नव्हे) आळंदी जन्मस्थान सूचित करते.

(९) रुक्मिणीबाईंनी ज्या अश्वत्थाला प्रदक्षिणा घातल्या तो आळंदी येथेच आहे. तेव्हा त्या तपस्येचे फळ-स्वरूप म्हणून सर्वांचे जन्म तेथेच होणे उचित होय.

(१०) पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरीचे दास जन्म घेती ॥

अशी वारकरी सांप्रदायिकांची धारणा आहे. असे असूनसुद्धा नामदेवाखेरीज वारकरी सांप्रदायातील समकालीन वा उत्तरकालीन कोणाही संतांनी आपेगाव हा शब्दसुद्धा गाथ्यात वा भागवतात उच्चारलेला नाही. सर्वांचे अभंग नीट पारखून हे विधान केले आहे. नामदेवांनीसुद्धा फक्त ज्ञानदेवांच्या आदिमध्ये व मुक्ताईचे

समाधीप्रसंगी ११७३ व ११७४ या दोनच अभंगांत आपेगाव शब्द वापरला आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

(११) महाराष्ट्रीय सर्व संतांची समाधी-स्थाने सामान्यतः त्यांच्या जन्म-गावीच आहेत असे दिसून येते. नामदेव, नरहरी, चोखोबा, यांची पंढरपुरात गोरोबा–तेर, सावंता–अरण, नाथ–पैठण, दामाजी–मंगळवेढा, सेना न्हावी–बहादुर-गड; तुकोबा–देहू, असा क्रम दिसून येतो. याच क्रमाने ज्ञानदेवांची समाधी त्यांच्या जन्मगावी असणे स्वाभाविक आहे. निवृत्तीनाथ हे महादेवाचे अवतार असल्याने त्यांची बारा जोतिर्लिंगापैकी त्र्यंबकेश्वर येथे व सोपानदेव हे ब्रह्मदेवाचे अवतार असल्याने ब्रह्मदेवाचे स्थान म्हणून सासवड येथे आणि मुक्ताई या चित्‌शक्ती असल्याने चित्‌शक्तीत विलय पावल्याचे दिसून येते.

(१२) नामदेवांच्या लगतच्या काळात किंवा समकालीन असा संत सेना न्हावी यांचा काळ गणला जातो. सेना अभंग क्र. ११७ मध्ये त्यांनी ज्ञानदेवादिकांचे जन्म आळंदी येथेच झाल्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. अभंग ११८ व १२० मध्येही ती गोष्ट आणखी दोन वार सांगितली आहे. संत सेनांचा जन्म विक्रम संवत १३५७ म्हणजे शके १२३२ मध्ये झाल्याचे प्राध्यापक रा. ब. सूर्यकर यांनी 'सेना महाराज, जीवन आणि वाङ्मय' यात नोंदले आहे. यावरून संत सेनांच्या प्रतिपादनाचे मोल अधिक आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

(१३) श्रीनाथ महाराज खुद्द पैठणचे. म्हणजे आपेगावापासून सात मैलां-वरचे. शिवाय त्यांनी ज्ञानेश्वरी पाठ शुद्धीकरणाचे कार्य केले. ज्ञानदेवांचा गुरू, सद्‌गुरू असा गौरव नाथांनी पुष्कळ अभंगांत केला आहे निदान त्यांनी तरी आपे-गावाचा साधा नामनिर्देश करावयास हवा होता. उलट ते म्हणतात, (श्रीनाथ-कृत अभंग क्र ३५२१, कडवे ३ रे) "तोचि अवतार धरी अलंकापुरी । ज्ञानाबाई सुंदरी तारावया ॥" नाथांच्या मताचे मोलही विशेष मानणे उचित आहे.

(१४) नामदेव अभंग क्र. ११७४ यात आपेगावचा निर्देश आहे. अभंग क्र. ११७४ कडवे ५ वे यात, "नामा म्हणे आम्हा दाविले नारायणे । झाली चौघी जणे याची क्षेत्रे ॥" यातसुद्धा प्रत्यक्षात आपेगावी त्यांचे जन्म झाले असे स्पष्ट म्हटले नाही. आपेगावात त्यांचे काही काल वास्तव्य झाले असासुद्धा याचा अर्थ होतो. अगदीच म्हणावयाचे झाले तर एवढे एकमेव विधान संशयास्पद आहे. या अभंगातील मायभूमी हा शब्द जन्मभूमी या अर्थाने घेणे बरोबर नाही. आजसुद्धा आपण आपला जन्म कुठेही असला व नोकरी वगैरेंचे वास्तव्य कुठेही असले तरी आपले वाडवडील जेथे राहात असतील तिथले आपण असल्याचा (इचलकरंजी, पुणे, सोलापूर वगैरे) उल्लेख करतो. त्याच अर्थाने इथे मायभूमी हा शब्द वापरला आहे हे अभंगावरून स्पष्ट होते. अभंग क्र. १०७५ मध्ये कडवे दुसरे "तात आणि

मात गेलीसे येथून । तेव्हा मी लहान पांडुरंगा ।। "असे मुक्ताईचे उद्‌गार आहेत. आळंदी येथील ब्रह्मसभा झाल्यानंतर पैठणास जाताना विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई हे या लहान मुलांबरोबर आपेगावी येणे संभवनीय आहे. या मुलांना आळंदी ते पैठणचा मार्गही त्यांच्या द्वाराच कळला असणार आणि येथून ते त्रिवेणी संगमाकडे गेले असले पाहिजेत असा या उद्‌गाराचा अर्थ होतो. अभंग क्र. ११७६ कडवे पहिले "पाहिली गे माय पूर्व भूमी आपुली" असे मुक्ताई म्हणतात यावरून वरील विधानास बळकटी येते. त्यांना आलेला उमाळाही आईवडिलांच्या वियोगाचा आहे असे त्यांनीच स्पष्ट सूचित केले आहे.

(१५) अवतार शब्दाचा अर्थ शब्दकोशात जन्म असाच आहे. श्रीकृष्णाचा जन्म मथुरेत व अवतार गोकुळात याचा आधार आपेगावपक्षीय घेताना दिसतात. परंतु श्रीकृष्णांना मथुरेत बंदीवासात प्रगट होणे सोयीचे नव्हते. म्हणून आपद्‌धर्मासाठी त्यांना गोकुळात प्रगट व्हावे लागले. तसा प्रकार करण्याचे ज्ञानदेवांच्या जन्मासंबंधात काहीच कारण नाही.

(१६) वारकरी संप्रदायात अग्रपूजेचा मान असणारे वासकर, आजरेकर, आदि फडकरी, साखरे व जोग महाराज यांचे अनुयायी पर्यायाने बहुसंख्य वारकरी मंडळी आळंदी जन्मस्थान मानतात. परंपरेत लवमात्र फरक न करणारी वारकऱ्यांची निष्ठा असते. ती लक्षात घेता आळंदी हेच जन्मग्राम असल्याचे उघड होते.

(१७) एकनाथ समकालीन उद्‌बोधनाथ यांच्या "प्रतिष्ठान आपेगावी ज्यांचा जन्म" या वचनाचा आधार आपेगावपक्षीय घेतात. उद्‌बोधनाथ हे वारकरी सांप्रदायिक नाहीत. सकलसंतगाथेत त्यांना स्थान नाही. आजचे अनेक विद्वान नामदेवांच्या आपेगाव उल्लेखाच्या दोन अभंगांचा आधार घेऊन जसे आपेगावी जन्म म्हणतात तीच प्रतिक्रिया नामदेवांचे वरील अभंग वाचून उद्‌बोधनाथांची झाली असणे संभवनीय आहे.

वरील सर्व विवेचनाचा मागोवा घेता आपेगाव जन्मग्राम म्हणणारे आधार अत्यंत तोटके आहेत आणि आळंदी हेच जन्मग्राम असणे वस्तुस्थिती व तर्काला धरून आहे हे सिद्ध होते आणि तेच प्रमाण मानले जावे.

卐 卐 卐

श्रीज्ञानेशांचा जन्मकाल आणि जन्मग्राम

श्री. कृष्णा गुरव, कोल्हापूर

श्रीज्ञानेशांच्या चरित्राचा वेध घेताना त्यांच्या जन्मकाल-ग्रामाबाबत मोठाच गुंता पडलेला दिसतो. संशोधक व सांप्रदायिक यांच्यामध्ये जन्मशकाबाबत कसा मतामतांचा गलबला आहे हे प्रथम पाहू. श्रीज्ञानेशांच्या जन्मकालसंदर्भात दोन शक दिले जातात. शके ११९३ आणि शके ११९७. हे दोन्ही शक सांगणारे श्रीज्ञानेश-समकालीन संतांचे अभंग आहेत. यातून निश्चित जन्मशक कोणता हे शोधणे फार महत्त्वाचे आहे.

संत जनाबाई यांचा शके ११९३ या पक्षाची पाठराखण करणारा, चारही भावंडांचे जन्मशक सांगणारा 'शालिवाहन शके अकराशे नव्वद' या चरणाने आरंभणारा हा फक्त एकच अभंग आहे. हा अभंग घेऊन ११९३ जन्मशक मानणारे वारकरी सांप्रदायिक आणि असांप्रदायिक अभ्यासूही आहेत. वै. प्राचार्य शं. वा. दांडेकर, आवटे, कुंटे, नानासाहेब मिरीकर, वि. ल. भावे इत्यादि या पक्षाचे आहेत. 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथात वि. ल. भावे एके ठिकाणी जन्मशक ११९३ मानतात आणि त्याच ग्रंथात दुसऱ्या ठिकाणी, श्रीज्ञानेशांनी पंधराव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली असे म्हणतात. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरीचे लेखन पूर्ण झाल्याचा उल्लेख ज्ञानेश्वरीच्या अखेरीस आहेच. शके १२१२ मधून यावेळचे ज्ञानेशांचे १५ वर्षांचे वय वजा करता जन्मशक ११९७ च येतो. त्यामुळे भावे यांनी मानलेला जन्मशक ११९३ त्यांच्याच विधानातून सहजच खंडित होतो. वै. प्राचार्य दांडेकर ज्ञाने-श्वरीच्या प्रस्तावनेत जन्मशक ११९३ मानतात. प्रा. दांडेकर यांची अडचण कशी झाली आहे हे पाहाण्यासारखे आहे. जन्मग्राम संदर्भात 'घेतसे अवतार अलंकापुरी' या चरणाने समाप्त होणारा श्रीनामदेवरायांचा अभंग प्रा. दांडेकर प्रमाण मानतात; पण त्याच अभंगात 'अधिक सत्त्याणव शके अकराशती । श्रावणमास तिथी कृष्णा-ष्टमी' या पहिल्याच चरणात उल्लेखिलेला ११९७ हा जन्मशक मात्र ते मान्य करीत नाहीत. शिवाय जन्मशक ११९३ मानल्यास ज्ञानेश्वरी लेखनकाली श्रीज्ञानेशांचे वय १५।१६ वर्षांचे होते असे जे सर्वमान्य आहे, त्या ऐवजी ते एकोणीस वर्षांचे होते, आणि ते तर जाणत्यांना मान्य नाही. शिवाय जन्मशक ११९३ मानल्याने समाधी शक १२१५

मानावा लागतो. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरीचे लेखन समाप्त झाले आणि यानंतर श्रीज्ञानेशांच्या जीवनातील अन्य घटना व श्रीसंत नामदेवरायांसोबत उत्तर भारताची तीर्थयात्रा घडली. एवढा जीवनविस्तार प्रकार केवळ अडीच-तीन वर्षांत घडणे अगदीच असंभवनीय आहे आणि समाधी शक १२१८ मानावा तर श्रीज्ञानेशांचे समाधीकाली वय २१ वर्षे ३ महिने ५ दिवस होते; ते २५ वर्षे होईल. स्वतः ज्ञानेशांनीच आपल्या 'बाळछंदो बावीस जन्मे । तोडिली भवाब्धिची कर्मे' या अभंग-चरणातून आपला एकूण बावीस वर्षे जीवनपटाचा स्पष्ट उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणे श्रीज्ञानदेव समाधीमहिमापर श्रीनामदेवरायांचे जे अभंग आहेत; त्यातील ३०८ क्रमांकाच्या (चित्रशाळा प्रकाशन गाथा) अभंगात श्रीविठ्ठल हे श्रीज्ञानेशांच्या एकूण बावीस वर्षांच्या जीवनकार्याचा उल्लेख करतात तो असा, "ऐसे ऐकोनी श्रीहरी । मग म्हणे धन्य धन्य तुमची वैखरी । जगदोद्धार केला संसारी । बावीस वर्षे असता पै ॥" एकंदरीत जन्मशक, ज्ञानेश्वरी लेखन शक, यानंतरचे तीर्थयात्रेसारखे प्रसंग, समाधी शक व श्रीज्ञानेशांचे बावीस वर्षांचे आयुर्मान यांची संगती जन्मशक ११९३ मानणाऱ्या पक्षामध्ये लागत नाही. शिवाय केवळ जनाबाईंचाच एक अभंग या पक्षास आधार आहे. तो अभंगच वरील सांगोपांग विवेचनाच्या पार्श्वभूमीवर आणि इतर समकालीन संतांच्या – श्रीनामदेवराय, श्रीविसोबा, श्रीसच्चिदानंदबाबा यांच्या–११९७ जन्मशक सांगणाऱ्या अभंगाच्या पार्श्वभूमीवर क्षेपक मानावा लागतो. तसेच जनाबाईंचाच 'धन्य सर्वकाळ धन्य तो सुदिन' या चरणाने प्रारंभ होणाऱ्या अभंगात समाधीशक १२१८ सांगितला आहे; तो असा – 'बारा शते अठरा दुर्मुख संवत्सर । तिथी गुरुवासर त्रयोदशी' (पांगारकरकृत श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र पृष्ठ १३४) जनाबाईंच्या अभंगातील समाधी शक १२१८ मधून बावीस वर्षांचा श्रीज्ञानेशांचा जीवनकाळ वजा करता जन्मशक ११९७ च सिद्ध होतो. तसेंच जनाबाईंचाच 'शके अकराशतें पंचाणव वत्सरीं' या चरणाने प्रारंभ होणाऱ्या अभंगात 'सत्त्याणव साली ज्ञानदेव झाले' असाही उल्लेख आहे. या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की श्रीज्ञानेशांचा जन्मशक ११९३ नसून ११९७ च आहे. यामुळे ११९३ जन्मशक मानणाऱ्या सांप्रदायिक व असांप्रदायिक पक्षाची बाजू चुकीची ठरते.

शके ११९७ च्या पक्षास श्रीज्ञानेशसमकालीन संत श्रीनामदेवराय, श्रीविसोबा, श्रीसच्चिदानंदबाबा, जनाबाई यांचे अभंग आधारास आहेत. (पांगारकरकृत श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र पृष्ठ ४६) हा जन्मशक मानणाऱ्या काही असांप्रदायिक व सांप्रदायिकांची नावे अशी – श्री. र. भिंगारकर, ल. रा. पांगारकर, ज. स. करंदीकर, प्रा. न. र. फाटक, डॉ. रा. द. रानडे, डॉ. शं. गो. तुळपुळे, पंडित पांडुरंग शर्मा, बा. अ. भिडे, प्राचार्य नि. ना. रेळेकर, श्री. वि. त्र्यं. शेटे, ह. भ. प. विष्णू

महाराज कोल्हापूरकर, ह. भ. प. शंकर महाराज खंदारकर, ह. भ. प. किसन महाराज साखरे इ. होत. महाराष्ट्र शासनानेही शासनद्वारा प्रकाशित पाठ्यपुस्तकांतून हाच जन्मशक मानला आहे. श्री. व्यं. केतकर संपादित 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशा'त (खंड १६, १८) जन्मशक ११९७ च मानला आहे. विसोबा खेचर, जनाबाई, जनमित्र, चोखोबा या श्रीज्ञानेशसमकालीन संतांच्या अभंगात, तसेच श्रीज्ञानेशांच्या 'स्वात्मपत्रा'त समाधीशक १२१८ दुर्मुखनाम संवत्सर कार्तिक वद्य त्रयोदशी गुरुवार सांगण्यात एकवाक्यता आहे. (पांगारकरकृत श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र पृष्ठ १३३-१३४) या समाधीशकातून श्रीज्ञानेशांचे बावीस वर्षांचे आयुर्मान वजा केले असता जन्मशक ११९७ च सिद्ध होतो. हा सप्रमाण सिद्ध होणारा जन्मशक महाराष्ट्र शासनाने मान्य करून श्रीज्ञानेशांच्या सप्तशताब्दिजन्मोत्सव सोहळ्याचा प्रारंभ जन्मग्राम आपेगावी व ज्ञानेश्वरी लेखनस्थान नेवासे गावी केला आहे.

श्रीज्ञानेशांच्या जीवनचरित्राचा शोध घेताना त्यांच्या जन्मग्रामाबाबत अतिरथी-महारथींनी निष्कारण गैरसमज पसरविले आहेत. श्रीज्ञानेश सप्तशताब्दि-जन्मोत्सव काळात तर या जन्मग्रामाबाबत तोंडीच पोकळ चर्चा झाली. फुटकळ संशोधन विरहित सांप्रदायिक प्रयत्नांखेरीज फारसे कुणी लेखनही केले नाही. मराठी जाणकारांनी इथेही पद्धतशीर दुर्लक्ष केले. प्रस्तुत लेखकाने महाराष्ट्र शासनासर्फे होणाऱ्या सप्तशताब्दिजन्मोत्सवाचा प्रारंभ आळंदीत न होता जन्मगावीच व्हावा म्हणून २४।२।७४ च्या रविवार केसरीत श्रीज्ञानेशांचे जन्मग्राम आपेगावच असल्याचे साधार व सविस्तर लेखन केले होते. वैखरीसारख्या त्रैमासिकातही (जुऑस / ऑनोडि ७४) ही चर्चा केली व त्याप्रमाणे मुख्यमंत्री ना. शंकरराव चव्हाण यांच्या शुभहस्ते आपेगावी जन्मोत्सव आरंभ सोहळ्याचा कार्यक्रमही पार पडला.

या जन्मग्रामसंदर्भातही दोन पक्ष आहेत. एक आळंदी मानणारा व दुसरा आपेगाव मानणारा. यातून जन्मग्रामाचा निर्णय करताना श्रीज्ञानेशसमकालीन श्रीनामदेवरायांचे गाथेतील आदि–तीर्थावळी–समाधी प्रकरण आणि अन्य तिन्ही भावंडांच्या समाधीप्रसंगीचे अभंग प्रमाण मानावयाचे आहेत. (या अभंगांच्या समकालीनत्वाबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत.) उत्तरकालीन संतांच्या अभंगांचाही विचार करूच. श्रीनामदेवरायांच्या वरील अभंग प्रकरणातून श्रीमाउलीच्या जन्मग्रामाचा शोध घेणारे आळंदीपक्षीय तसेच आपेगावपक्षीयही आहेत.

आळंदीपक्षाचे पुरस्कर्ते श्री. र. भिंगारकर, बा. अ. भिडे, डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ. पेठे, प्राचार्य शं. वा. दांडेकर, ह. भ. प. किसनमहाराज साखरे इत्यादि होत. तर आपेगावपक्षाचे पुरस्कर्ते महाराष्ट्र सरकार, राष्ट्रीय पंडित श्री. बाळाचार्य खुपेरकरशास्त्री, पंडित पांडुरंग शर्मा, ल. रा. पांगारकर, इतिहासज्ञ चांदोरकर,

डॉ. शं. गो. तुळपुळे, आचार्य विनोबा भावे, प्राचार्य नि. ना. रेळेकर, डॉ. रा. द. रानडे, प्रा. न. र. फाटक, श्री. वि. त्र्यं. शेटे, पंडित धारुरकरशास्त्री, पंडित राजराजेश्वरशास्त्री द्रवीड, वे. शा. सं. भगवानशास्त्री सोनपेठकर, ह. भ. प. विष्णूमहाराज कोल्हापूरकर, ह भ. प. शंकरमहाराज खंदारकर इत्यादि होत. आळंदी पक्षातील प्राचार्य दांडेकर यांचे सविस्तर विवरण खंडित केले म्हणजे इतरांचा त्यामध्ये समावेश झाल्यासारखाच आहे.

प्रारंभीच हे ध्यानी घ्यावे की प्राचार्य दांडेकर यांनी 'ज्ञानेश्वर चरित्र ग्रंथ व तत्त्वज्ञान' (१९३२) या आपल्या ग्रंथात 'ज्ञानदेव आपेगावी जन्मले' असे म्हटले आहे. परंतु काही कालानंतर 'अधिक विचारांती' त्यांनी सार्थ श्रीज्ञानेश्वरीच्या (१९५३) प्रस्तावनेत 'ज्ञानदेवादि भावंडांचा जन्म आळंदीस झाला असला पाहिजे, असे विवरणसहित मत मांडले. यातील काही विचारांना यथायोग्य उत्तरे देता येतात पण काही विचार तर पूर्णतः कपोलकल्पित आहेत, हे प्रत्यक्ष प्रमाणाने सिद्ध करता येते. पंडित पांडुरंग शर्मा यांनी तर त्यांचे सप्टेंबर १९४९ च्या 'प्रसाद' मासिकातील तर्कविवरण पाहून ज्ञानेश्वर त्रैमासिकात (नोव्हेंबर १९४९) स्पष्ट म्हटले आहे, "प्राचार्यांच्या पूर्वपक्षात तर्काचेच सारे स्तोम व वर्चस्व झाल्याने बिचारे 'शब्दप्रमाण' अगदीच सांदडीत सापडून साकडले गेले आहे."

आता प्राचार्य दांडेकरांच्या विवरणाचा विचार करू. ते म्हणतात, "'आदि'त नामदेव, ज्ञानदेवादिक चारी भावंडांचा जन्म आळंदीस झाला अगर आपेगावी झाला असे स्पष्ट विधान कोठेच करीत नाहीत." आदि–तीर्थावळी–समाधी या त्रिप्रकरणात जरी तसा स्पष्ट उल्लेख नसला तरी याच नामदेवरायांच्या, मुक्ताबाईंच्या समाधीवरील 'मायभूमी पाहू यांची आम्ही डोळां' या अभंगात जन्मभूमी आपेगावचा 'स्पष्ट' उल्लेख आहे. चर्चासत्रातील निबंधवाचक श्री. गोंदकर यांना 'मायभूमी पाहू यांची आम्ही डोळा' या चरणातील 'मायभूमी' शब्द जन्मदर्शक वाटत नाही. तर दुसरे निबंधवाचक श्री. रामचंद्र जोशी यांनी याच अभंगातील 'झाली चौघीजणे याचि क्षेत्री' या चरणातील 'झाली' शब्दामागे 'जन्म' शब्द नाही अशी शंका उपस्थित केली होती. तर तिसरे निबंधवाचक ह. भ. प. किसन महाराज साखरे 'स्वस्तिश्री'च्या नोव्हेंबर ७५ च्या अंकात म्हणतात, 'झाली चौघीजणे याचि क्षेत्री' याचा अभिप्रायार्थ चौघेजण या क्षेत्रात जन्मली असा सांगण्यात नसून ज्या पवित्र कुळात ही चौघेजण जन्मली त्या पवित्र कुळाचे हेच क्षेत्र आपेगाव होय." या सर्वांना असे उत्तर देता येईल की, 'मायभूमी' या शब्दाचा अर्थच मुळी जन्मभूमी असा आहे आणि हाच ठोस अर्थ इथे असल्याने 'झाली चौघीजणे याचि क्षेत्री' या चरणात 'झाली' या शब्दामागे 'जन्म' शब्द असण्याची आवश्यकता नाही. शिवाय अभंग हे एक काव्य आहे. काव्य हे सहजस्फूर्त, अंतर्यामीच्या भावगर्भातून अंकुरलेले असते. तिथे व्याकरणाच्या फूटपट्टया कुचकामाच्या

ठरत असतात. काव्यनिर्मितीचा अनुभव असल्याशिवाय हे कळणारच नाही. शिवाय या अभंगातील ' मायभूमी ', ' याचि क्षेत्री ' या शब्दार्थातील ' यथार्थ बळ ' ध्यानी येईल तर ओढून ताणून केलेले आळंदी जन्मग्रामाचे सारे तर्क सहजच कोसळतील.

मुक्ताबाईच्या समाधीवरील अभंगात आपेगावी चारी भावंडे जन्मल्याचा ' स्पष्ट ' व स्वतंत्र उल्लेख असताना केवळ आदि–तीर्थावळी–समाधी या प्रकरणात तसा ' स्पष्ट ' उल्लेख नाही म्हणताना आजच्या विसाव्या शतकातील चरित्र-काराची भूमिका श्रीनामदेवरायांच्यावर आपण लादतो आहोत हे प्रा. दांडेकरांनी विसरायला नको होते.

आपले हे आपेगावचे जन्मस्थळ पाहून मुक्ताईची हृदयार्द्र स्थिती झाली. ' निवृत्ती मुक्ताईने पाहूनि स्थळ डोळा । आलासे उमाळा ओसंडोनि ' या चरणात निवृत्ती मुक्ताईची भावस्थिती दिसून येते. श्री. गोंदकर यांना वाटते की, आपली जन्मभूमी पाहून हा उमाळा आलेला नाही. आईवडील इथे टाकून गेले म्हणून हा उमाळा आला आहे. पण मला वाटते की, ज्या घरात ही मुले जन्मली, वाढली, कटू अनुभव घेतले त्या सर्व स्मृती जन्मभूमी पाहून सजीव झाल्या आणि निवृत्ती-मुक्ताईस उमाळा फुटला.

जन्मग्राम आळंदी समर्थन करीत असताना प्रा. दांडेकरांची लेखणी गतिमान होऊन ' तर्क उभारण्यात ' दोन-अडीच पाने खर्ची पडली. परंतु आपेगाव जन्मभूमी स्पष्ट उल्लेखणाऱ्या या अभंगावर लिहिताना मात्र केवळ एकदोन वाक्ये लिहून प्रा. दांडेकरांची लेखणी थांबली. इतकी तर्कपूर्ण मांडणी करूनही शेवटी प्रा. दांडे-करांनी ' हा प्रश्न दिसतो तितका सोपा नाही ' असेच म्हटले. यावरून त्यांची निर्णायक भूमिका राहिली नाही हे दिसून येते. पांगारकरकृत श्रीज्ञानेश्वर महा-राजांच्या चरित्रातील ' घेतसे अवतार अलंकापुरी ' या चरणाने समाप्त होणारा नामदेवरायांचा अभंग प्रा. दांडेकर यांनी आधारास देऊनही शेवटी ते म्हणतात, ' नामदेवांच्या वर्णनातच विसंगती दिसते. ' खरे तर अन्य अभंग विचारात न घेतल्याने व केवळ या एकाच अभंगाला चिकटून बसल्याने प्रा. दांडेकरांना विसंगतीच्या चक्रात अडकून पडावे लागले.

' घेतसे अवतार अलंकापुरी ' यातील ' अवतार ' या शब्दाचा अर्थ श्री. गोंदकर यांना ' जन्म ' असाच वाटतो. ' विशेष कार्यार्थ प्रकट होणे ' हा अर्थ त्यांना मान्य नाही. कारण विशेष कार्य एक–दोन वर्षे केली म्हणून तिथे अवतार झाला असे म्हणता येणार नाही, हा त्यांचा भावार्थ. पण कोणत्याही प्रकारचे विशेष कार्य मग ते वाङ्मयीन, दार्शनिक, सामाजिक इत्यादी कोणतेही असो–एक–दोन वर्षे केले तरी त्या भूमीत त्या विशेष कार्यार्थ त्या व्यक्तीचा अवतार झाला असे म्हटले

जाते. कुरुक्षेत्रावर श्रीकृष्णाने गीता किती दिवस सांगितली हे पाहाता केवळ अल्पावधीतल्या या विशेष कार्य करण्यालाही कृष्णाचा तेथे अवतार झाला असे संत श्री एकनाथांनी म्हटले आहे ते पुढे पाहूच. श्रीज्ञानेशांच्या लोकसन्मुख लोकोद्धारक दार्शनिक वाङ्मयनिर्मितीची परिपूर्णता आळंदीच्या परिसरात झाली, या अर्थाने श्री ज्ञानेशांनी आळंदीत अवतार धारण केला– विशेष कार्य केले. अवतार घेतला म्हणजे जन्म घेतला असे नव्हे. याबाबत पं. पांडुरंग शर्माही म्हणतात, "ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगावचा असला तरी जगदुद्धाराच्या कार्याकरिता ते आळंदीत काम करीत राहिलेत. या अर्थाने 'घेतसे अवतार अलंकापुरी' हे उद्‌गार वरील संतसमयास अनुसरून आले आहेत." (ज्ञानेश्वर त्रैमासिक नोव्हेंबर १९४९.) या संदर्भात 'गोकुळीचा कान्हा । अवतरला तान्हा' (संत एकनाथराय) 'अवतार गोकुळी हो जन तारावयासी' (संत तुकोबाराय), 'अवतरले हरी नंदाचे मंदिरी' (संत नामदेवराय) हे संत वाङ्मयातील 'अवतार' शब्द चिंतनीय आहेत. संतवाङ्मयातील या 'अवतार' शब्दाची अर्थमीमांसा करताना ह. भ. प. शंकरमहाराज खंदारकर, स्वसंपादित 'श्रीज्ञानेश्वरी भावदर्शन' (१९७४) ग्रंथाच्या विस्तृत प्रस्तावनेत पृष्ठ ११ वर म्हणतात, "वरील विवेचनात कृष्णाचा गोकुळात अवतार झाला असे नामदेव महाराज, एकनाथ महाराज, तुकाराम महाराज आदी सर्व संतांनी म्हटले आहे. पण मथुरेत कृष्णाचा जन्म झाला हे श्रीमद्‌भागवतात प्रसिद्ध असलेले वचन सर्वच संतांना मान्य आहे, म्हणून 'अवतार' या शब्दाचा अर्थ 'विशेष कार्य करण्याकरता प्रगट होणे' असाच लाक्षणिक अर्थ घ्यावा लागतो. या संदर्भात ह. भ. प. किसन महाराज साखरे म्हणतात, 'जसा भगवंताचा जन्म मथुरेत झाला व अवतारप्राकटच मात्र गोकुळात झाले; त्या अवतार-प्राकटचास उद्देशून संतांनी बाळक्रीडेत गोकुळात श्रीकृष्णाचा अवतार झाला असल्याचे सांगितले आहे. पण महाकैवल्य तेजोनिधी श्रीज्ञानेशांचा जन्म एके ठिकाणी व प्राकटच एका ठिकाणी असा काही प्रकार घडला नाही. परंपरेने ऐकिवातही नाही.' (स्वस्तिश्री नोव्हेम्बर ७५) याला उत्तर हे की कृष्णाच्या बाबतीत जे घडले ते कृष्णावतारी श्रीज्ञानेशांच्या बाबतीतही घडले. म्हणजे जन्म एकीकडे आपेगावी व अवतारकार्य दुसरीकडे आळंदीत. शिवाय ही वस्तुस्थिती परंपरेने ऐकिवातही आहे. 'अवतार' शब्दाचा अर्थ विशेष कार्य करण्याकरिता प्रकट होणे असा होत असून तशा अर्थानेच संत एकनाथांनी आपल्या अभंगात तो शब्द वापरला आहे. तो अभंग असा :

> संतांचा महिमा वर्णावा किती । अलक्ष मूर्ती ज्ञानोबा तो ॥ १ ॥
> अर्जुना संकट पडता जडभारी । गीता सांगे हरी कुरुक्षेत्री ॥ २ ॥
> तोचि अवतार धरी अलंकापुरी । ज्ञानाबाई सुंदरी तारावया ॥ ३ ॥

या अभंगातील आशय यथार्थ नजरेने पाहिल्यास 'अवतार' शब्दाचा अर्थ विशेष कार्यार्थ प्रकटणे असाच दिसेल. प्रा. दांडेकरादिकांनी 'अवतार' शब्दाचा अर्थ 'जन्म' असा घेतला तो पूर्णत: चुकीचा आहे.

श्री. गोंदकर म्हणतात, "श्रीनामदेवरायांव्यतिरिक्त अन्य कोणत्याच संताने आपेगावचा उल्लेख केलेला नाही." पण समजुतीच्या दृष्टीने पावले टाकली तर असे दिसून येईल की, थोर व्यक्तीच्या जीवनातील जन्मभूमीपेक्षा कर्मभूमीचेच सबळ रूप लोकमानसात रुजलेले असते. यासाठी जन्मभूमीचे उल्लेख नामदेवाव्यतिरिक्त संतवाङ्मयात नाहीत; म्हणून आळंदी जन्मभूमी म्हणता येणार नाही. प्रा. दांडेकरांनी जन्मग्रामसंदर्भात उत्तरकालीन संत एकनाथांचा अभंग आधारास घेतला; पण उत्तरकालीन संतांचे जर पुरावे घ्यायचे असतील तर एकनाथसमकालीनच ज्ञाननाथांच्याच परंपरेतले पैठणचे उद्‌बोधनाथ यांनी तर 'प्रतिष्ठान आपेगावी ज्यांचा जन्म। समाधी अलंके उद्‌बोधात' असे जे आपल्या अभंगात म्हटले आहे, तिकडे (श्री. गोंदकरांनीही) का दुर्लक्ष करावे ? आळंदीपक्ष अर्थशून्य ठरतो म्हणूनच ना ? प्रा. दांडेकर म्हणतात, '(लोक) आज आळंदीस जन्माची जागा दाखवितात.' परंतु परंपरागत इतिहासाने आपेगावीही जन्माची जागा दाखवितात हे विसरू नये.

ज्ञानेश्वरी प्रस्तावनेतील पृष्ठ २१ वरील प्रा. दांडेकरांच्या विवरणाचा सारांश हा की, विठ्ठलपंत हे संन्यासोत्तर आळंदीतच राहिले. त्यांनी आपेगावी जाण्याचे नावही काढले नाही. जावई-कन्येची जगाकडून निंदा होत असताना सिधोपंत त्यांना दूर लोटणे अशक्य. तात्पर्य ते आळंदीतच राहिले. या विचारसरणीवर उत्तरादाखल अशी विचारसरणी आहे की, आळंदीत ब्राह्मण लोकवस्ती जास्त. दररोज दिवसभर या कुटील, निंदक ब्राह्मणांची तोंडे पाहाणे व अभद्र वाणी ऐकणे यापेक्षा आपेगावीच गेलेले बरे; कारण आपेगावी हाताच्या बोटावर मोजण्याइतपत ब्राह्मण लोकवस्ती. इथे आल्यामुळे आळंदीतील पढतमूर्ख ब्राह्मणांची विटाळलेली वाणी तरी अनुभवावी लागणार नाही म्हणून ते आळंदीत न राहाता आपेगावीच राहिले. पृष्ठ २१ वर प्रा. दांडेकर पुन्हा म्हणतात, "आपेगावी जर विठ्ठलपंत राहात तर मग पैठणासच ब्रह्मसभा होऊन त्यांना तेथेच शास्त्रार्थ मिळाला असता. कारण आपेगाव हे पैठणापासून पुरे आठ मैलसुद्धा नाही." यावर उत्तर हे की, विठ्ठलपंत आपेगावी रहात असले तरी त्यांची प्रारंभीची बरीच वर्षे आळंदीतच गेली आहेत. शिवाय त्यांचे अत्यंत निकटचे आप्त श्वशुर हे आळंदीचेच. असे निकटवर्ती आप्त पैठणला नव्हते. शिवाय आळंदीत त्यांचे श्वशुरच आळंदी व त्या परिसरातील २४ गावांची कुलकर्णीपणाची वृत्ती सांभाळून होते. त्यामुळे श्वशुराकडूनच आळंदीत नातेवाईक गोतावळा अधिक होता आणि याच नात्यागोत्यातल्या

लोकांनी संन्यासोत्तर गृहस्थी जीवनाला स्वसमाजात सामावून घ्यायचे की नाही ते ठरवावयाचे असते. म्हणून ही ब्रह्मसभा पैठणऐवजी आळंदीतच झाली.

पैठणला जाताना श्रीज्ञानेशादि भावंडांनी आळंदीकर ब्राह्मणांचे पत्र नेले होते. ते पत्र वाचून पैठणकर ब्राह्मणांना हे सर्व 'संन्याशाचे पुत्र कळो आले.' यावरून श्री. गोंदकर म्हणतात की, 'ही मुले आपेगावी जन्मली असती तर पत्र वाचून ही संन्याशाची मुले असे पैठणकर ब्राह्मणांना कळण्याचे कारणच नव्हते. पण ज्याअर्थी पत्रावरून त्यांना असे कळले त्याअर्थी ती आळंदीतच जन्मली.' या मुद्द्यावर उत्तर हे की 'पत्र वाचुनिया सकळा झाले श्रुत । संन्याशाचे पुत्र कळो आले' यातून हा अर्थ काढता येणार नाही की त्यांना ही 'संन्याशाची मुले' हे माहीतच नव्हते. पण सर्वसाधारण बोलण्याची रीत 'पत्रावरून असे दिसते की ही संन्याशाची मुले.' शिवाय विठ्ठलपंत जर प्रथमच पैठणकर ब्राह्मणांकडे शुद्धिपत्र मागण्यासाठी गेले नाहीत तर त्याबद्दल तेथील ब्राह्मणांना तरी अधिक चौकशी करण्याचे कारण तरी काय ? विचारायला आल्यावर पैठणकर ब्राह्मण खोलात शिरलेत एवढेच.

श्री. गोंदकरांचा आणखी एक विचार असा की पैठणहून ही मुले आळे येथे रेड्याला समाधी देऊन 'अलंकावती निजस्थान प्रवेशली.' येथे निजस्थान म्हणजे जन्मभूमी असे गोंदकर म्हणतात. पण माझे मत असे आहे की, जिथे ब्रह्मसभा भरली तिथेच पैठणकर ब्राह्मणांचा वृत्तान्त कळविणे भाग होते म्हणून आळंदीस निजस्थानी म्हणजे जिथे ब्रह्मसभा भरली तिथे परतली. श्री. गोंदकर असेही म्हणतात की नामदेवरायांच्या 'ज्ञानेश्वर समाधी महिमा' या प्रकरणातील आळंदीचा उल्लेख भावार्थाने जन्मस्थान दर्शवितो. परंतु हे सर्व प्रकरण पाहिले असता गोंदकर म्हणतात तसा भावार्थ त्यामध्ये मुळीच नाही.

श्री. गोंदकर यांनी असाही एक मुद्दा मांडला आहे की, नरहरी, चोखोबा, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, तुकोबाराय, नाथराय आदींची समाधीस्थाने त्यांच्या जन्मग्रामीच आहेत. यावरून ज्ञानेशांचेही समाधीस्थान जे आळंदी तेच त्यांचे जन्मग्रामही होय. या मुद्द्यावर असे सांगता येईल की, श्री. गोंदकरांचा हा विचार सार्वदेशिक व सार्वकालिक होऊच शकत नाही. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील सर्व संतांना हे विधान लागू पडत नाही. वारकरी संप्रदायातीलच नामदेवराय, निवृत्ती, मुक्ताबाई आदी भावंडांची जन्मस्थाने व समाधीस्थाने भिन्नभिन्न आहेत.

प्रा. दांडेकर पृष्ठ २३ वर म्हणतात, 'आपेगावला साधे क्षेत्रसुद्धा कोणी समजत नाही.' पण या संदर्भात पं. महादेवशास्त्री जोशी संपादित 'भारतीय

संस्कृती कोशा'त (१९६२) पृष्ठ ४५० वर आपेगावची माहिती देताना म्हटले आहे; "आपेगाव हे मराठवाड्यातील एक गाव. या गावात महाराष्ट्राचे संतशिरोमणी श्रीज्ञानेश्वर यांचा जन्म झाल्यामुळे ते एक तीर्थस्थान समजले जाते." आता प्रा. दांडेकरांच्या विधानाला काही अर्थ आहे का हे जाणत्यांनीच ठरवावे.

प्रा. दांडेकरांचा आणखी एक विचार पाहू. ते म्हणतात, "जर आपेगावी ज्ञानदेवांचा जन्म झाला हे सर्वमान्य असते तर हजारो वारकरी पैठणला एकनाथ-षष्ठीला जमल्यानंतर ज्ञानेश्वरीच्या लेखनाच्या गावी 'नेवाशी' जसे जमतात तसे आपेगावी उभ्या उभ्या तरी गेले असते; पण तसा काही एक प्रकार होत नाही." प्रा. दांडेकर यावरही कळस करून म्हणतात की नाथषष्ठीच्या वेळी जमलेल्या लाखो भक्तगणांतून अवघे पाचपन्नास तरी आपेगावी जात असतील की नाही कोणास ठाऊक. सत्य परिस्थिती अशी आहे की, प्रा. दांडेकरांच्या पूर्वीपासून ते आजतागायत नाथषष्ठीच्या वेळी हजारो वारकरी जन्मग्राम आपेगावी येत असतात; हे प्रस्तुत लेखकाने आपेगावच्या सलग सव्वा वर्षांच्या वास्तव्यात पाहिले आहे. हे हजारो वारकरी दरवर्षी नाथषष्ठीच्या वेळी आपेगावी येत असल्याची कागदपत्रेही आहेत. पण स्वतःच आपेगावला जाऊन प्रत्यक्ष वस्तुस्थिती पाहिली नसल्याने प्रा. दांडेकरांच्या हातून दिशाभूल करणारी अशी विधाने लिहिली गेली आहेत समस्त आपेगावकर औदार्यवृत्ती बाळगून नाथषष्ठीच्या वेळी आपेगावी येणाऱ्या हजारो वारकऱ्यांना अन्नदान करतातच; पण विशेष म्हणजे आपेगावचे प्रख्यात दानशूर कै. ह. भ. प. देवराव पाटील यांच्या घराण्यात कित्येक वर्षांपासून आजपर्यंत अक्षरशः हजारो वारकऱ्यांना नाथषष्ठीच्या वेळी आपेगावी खंडीच्या खंडीने पीठ अन्नदान केले जाते. हे अन्नदान सातआठ दिवसही चालते. वारकऱ्यां-साठी अन्नदान व्यवस्था व्हावी म्हणून दिंडीचालकांच्या सह्यांची पत्रे अगोदरच, पूर्वी कै. देवराव पाटील यांचेकडे आणि आज त्यांचे चिरंजीव भाऊसाहेब पाटील यांच्याकडे येत असतात. त्यांपैकी नमुन्यादाखल एक पत्र असे–

"श्री. ह. भ. प. रा. भाऊसाहेब पाटील आपेगाव यासी जयहरी वि. वि. दरवर्षीप्रमाणे या वर्षी आपले येथील दिंडी श्री पैठणचे यात्रेस मिती फाल्गुन वद्य १०, रोजी बुधवार, शके १८९१ रोजी आपले गावी, वेळ दुपार, येणार आहे. बरोबर मंडळी अंदाजे ९०० व बैलगाड्या ४० राहतील. तरी सूचनार्थ कळविले आहे. दरवर्षीप्रमाणे व्यवस्था ठेवावी ही विनंती.

आपला
लक्ष्मणबुवा रत्नपारखी, पुरुषोत्तमपुरीकर"



श्रीज्ञानदेवांचे पणजोबा त्र्यंबकपंत यांची आपेगाव येथील समाधी



आपेगाव येथील श्रीज्ञानदेव मंदिर

अशी विविध दिंडीप्रमुखांची पत्रे पूर्वीपासूनच आपेगावी येत आली आहेत. हे कागदपत्र पाहण्याचे किंवा नाथषष्ठीच्या वेळी आपेगावी जाण्याचे कष्ट प्रा. दांडेकरांनी घेतले असते तर पाचपन्नास भक्तगणही आपेगावी जात नाहीत म्हणण्याचे धाडस प्रा. दांडेकरांनी केले नसते.

प्रा. दांडेकर ज्या गुरुबंधूंच्या मेळाव्यात आध्यात्मिक उंची घेऊन उभे राहिले, त्यातील खास बंकटस्वामींच्याच पालखीस बीड जिल्ह्यातील निनगूरहून येणारे वारकरी कित्येक वर्षांपासून नाथषष्ठीच्या वेळी आपेगावी येत असतात. आपेगाव येथील कै. देवराव पाटील यांच्या घराण्यातील कागदपत्र पाहून नाथषष्ठींच्या वेळी आपेगावी येणाऱ्या काही दिंड्यांची इथे नोंद करतो. सोमठाणा विठ्ठलमंदिर, अकोला संस्थानची दिंडी, लक्ष्मणबुवा पुरुषोत्तमपुरीकरांची दिंडी, उस्मानाबाद जिल्ह्यातील देवकरगावकरांची दिंडी, नारायणगडकर संस्थानची दिंडी इ. होत. या सर्व वस्तुस्थितीवरून व कागदपत्रांवरून आपेगावी दर नाथषष्ठीस हजारो-हजारो वारकरी येत असतात; या सूर्यप्रकाशासारख्या प्रखर सत्यापुढे प्रा. दांडेकरांचा विचार ही एक केवळ कपोलकल्पित वार्ता आहे हे सुजाण संशोधकांना सहजच कळेल. एकंदरीत वरील सर्व विवेचनावरून ज्ञानेशांचे जन्मग्राम आळंदी व जन्मशक ११९३ हे दोन्ही चुकीचे आहेत हे सिद्ध होते.

जन्मग्राम आळंदीच्या बाजूने एक अभंगवचन सादर करून आळंदी जन्मभूमी ठरविणारे काही लोक आहेत. ते अभंगप्रमाण नामदेवकृत ‘ ज्ञानदेव-समाधीमहिमा ’ प्रकरणात पुढीलप्रमाणे आहे–

हे शिवपीठ शिवाचे । हेचि पूर्वस्थान अगस्तीचे ।
जाणोनि जन्म झाले चौघांचे । सर्व क्षेत्राची आदिभूमि ॥ ५ ॥

(नामदेवगाथा–चित्रशाळा प्रकाशन अ. क्र. ३२१)

या अभंगवचनात ‘ जन्म झाले ’ हे दोन शब्द आल्याने, तेवढ्या शब्दांवरून आळंदी जन्मभूमी मानली जाते. परंतु वरील अभंगातील अंतरंगाकडे पाहिल्यास ज्ञानेशांच्या जन्मभूमीबाबत काही सांगावे असा तो विषयच नाही; तर त्या अभंगात श्री विठ्ठल हे आळंदीचा प्राचीन महिमा गात आहेत. प्राचीन ऋषीमुनींनी तपश्चर्या व कार्य केलेल्या आळंदीत श्रीज्ञानेशादि भावंडांनीही अलौकिक कार्य केले. एकंदरीत त्या अभंगाचा संदर्भ पाहाता त्या अभंगातील ‘ जन्म झाले ’ या शब्दांचा वाच्यार्थ न घेता अभंगातील आशयाला धरून ‘ कार्य केले ’ असा लक्ष्यार्थच घेतला पाहिजे. संतवाङ्मयात ‘ जन्मले ’ या शब्दाचा वाच्यार्थ सोडून अभंग आशयानुसार लक्ष्यार्थच घ्यावा लागतो; याचे उदाहरण म्हणजे श्री तुकोबारायांचा पुढील

अभंग–

'कृष्ण गोकुळी जन्मला। दुष्टा चळकाप सुटला॥'

कृष्ण मथुरेत जन्मल्याचे तुकोबारायांना पूर्णतः माहीत आहे. त्यामुळे इथल्या अभंगचरणातील 'जन्मला' या शब्दाचा लक्ष्यार्थच घ्यावा लागतो. एकंदरीत वेगळ्या संदर्भातील फक्त एकच उल्लेख पाहाताना खास जन्मभूमी संदर्भात नामदेवरायांनी दोन–तीन अभंगातून आपेगाव जन्मभूमीचा केलेला उल्लेख विसरू नये. तात्पर्य हे की 'हे शिवपीठ शिवाचे। हेचि स्थान अगस्तीचे। जाणोनि जन्म झाले चौघांचे। सर्व क्षेत्राची आदिभूमि॥' यातून आळंदी जन्मभूमी सिद्ध होत नाही.

डॉ. शं. दा. पेंडसे यांनी १९३१ साली 'त्यांचा जन्म आळंदीस झाला की, आपेगावी झाला हे निश्चित कळत नाही' असे लिहिले आहे. तर नंतर काही वर्षांनी ते 'त्यांचा जन्म बहुधा आपेगावी झाला' असेही लिहितात. नंतर १९५४ मध्ये 'ज्ञानेश्वरीचा अभ्यास' या ग्रंथात 'ज्ञानदेवांचा जन्म आळंदीस झाला असावा' असेही लिहितात. तसेच 'ज्ञानेश्वरांचे जन्मस्थळ आळंदी होते याला नामदेवांचा पांगारकरांनी ज्ञानेश्वरचरित्रात दिलेला अभंग व एकनाथांचा अभंग हे मुख्य आधार आहेत' असेही डॉ. पेंडसे म्हणतात. या मताचा परामर्श सविस्तरपणे वर येऊन गेलाच आहे. ह. भ. प. किसनमहाराज साखरे यांनीही प्राचार्य दांडेकरांनी स्वीकारलेला अभंग घेऊन विवेचन केले आहे. त्यामुळे त्यांचा स्वतंत्र विचार करण्याचे कारणच नाही. 'श्रीज्ञानदेव वाग्यज्ञ दर्शन' (१९७३) या अभ्यासपूर्ण ग्रंथात पृष्ठ १४४ वर डॉ. पेठे म्हणतात, "आदि"तील संदर्भावरून आळंदी येथेच जन्म झाला असावा असे सुसंगत अनुमान बांधता येते' खरे तर श्रीनामदेवरायांच्या मुक्ताबाईंच्या समाधीवरील अभंगातील 'मायभूमी' आपेगावच्या स्पष्ट उल्लेखाने हे त्यांचे 'अनुमान' निर्जीव ठरते.

आळंदी जन्मग्रामपक्ष अर्थशून्य ठरल्यानंतर आपेगाव जन्मग्राम मानणाऱ्या पक्षाचा विचार करायला हवा. आपेगाव पक्षाला श्रीनामदेवरायांचे अभंग आधारभूत आहेत, हे आतापर्यंत आळंदी पक्षाचे खंडण करताना दर्शविले आहेच. आता आपेगाव पक्षीय असांप्रदायिक व सांप्रदायिक अभ्यासूंच्या मतांची नोंद करू. प्रारंभीच हे नमूद करावेसे वाटते की, महाराष्ट्र सरकारने जी शालेय पाठचपुस्तके प्रसिद्ध केली आहेत त्यात जन्मग्राम आपेगाव मानले आहे. भारत सरकारने 'राष्ट्रीय-पंडित' ही बहुमानाची पदवी देऊन भूषविलेले महामहोपाध्याय, संशोधक, पंडित बाळाचार्य खुपेरकरशास्त्री 'स्वानंदजीवन' (१९६९) ग्रंथात लिहिलेल्या 'श्रीज्ञानेश्वर तत्त्वज्ञान' या निबंधात म्हणतात, 'आपेगाव येथील कुलकर्णी यांच्या

घराण्यात या चारही भावंडांचा जन्म झाला ' पं. पांडुरंग शर्मा यांनी ज्ञानेश्वर त्रैमासिकात (नोव्हेंबर ४९ व ऑगस्ट ५३) आळंदीमत खंडणपूर्वक साधार आपेगाव पक्ष सिद्ध केला आहे. डॉ. रा. द. रानडे 'ज्ञानेश्वर वचनामृत' या ग्रंथात पृष्ठ ५ वर 'चार मुले आपेगाव येथे झाली' म्हणतात. वि. ल. भावे 'महाराष्ट्रसारस्वत' (दुसरी आवृत्ती) या ग्रंथात 'ही चारी भावंडे आपेगावास जन्मली' (पृ. १३७) म्हणतात. इतिहासतज्ज्ञ चांदोरकरांनी स्वसंपादित 'संतकाव्यसूचि'त (१९१५) श्रीज्ञानेश आपेगावी जन्मल्याचे नोंदले आहे. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी 'पाच संतकवी' (१९६२) या ग्रंथात पृष्ठ ४ वर श्रीज्ञानेशादि चारी भावंडाचे जन्म समाधी काल व स्थाने देताना श्रीज्ञानेश आपेगावी जन्मल्याचे नोंदले आहे. प्रा. न. र. फाटक 'श्रीज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य' (१९५२) या ग्रंथात आपेगावीच ही सर्व मुले जन्मल्याचे सांगतात (पृष्ठ ३१२–३१३) ल. रा. पांगारकर 'मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड पहिला' (१९३२) या आपल्या ग्रंथात पृष्ठ ५५१ वर लिहितात, "संतमंडळाचे आचार्य, अध्यक्ष व गुरू ज्ञानेश्वर हेच आहेत. सर्वांनी एकमुखाने त्यांना तसे मानले आहे...ते आपेगावी जन्मले, नेवाशास ज्ञानेश्वरी रचिली, पंढरपुरास जाऊन सर्व संतमेळा भजनी लावला, सर्वांना अद्वयानंदामृत पाजून व सर्वांच्या आधी आळंदीस जाऊन समाधी घेऊन सर्वांना चटका लावला. सारा खेळ सहा वर्षांचा."

श्री. व्यं. केतकर संपादित 'महाराष्ट्रीय ज्ञानकोशात' ही (विभाग १६, १९) आपेगाव जन्मभूमीच लिहिले आहे. पं. महादेवशास्त्री जोशी संपादित 'भारतीय-संस्कृती कोश खंड १' मध्ये (१९६२) पृष्ठ ४५० वर म्हटले आहे, "आपेगावात महाराष्ट्राचे संतशिरोमणी श्रीज्ञानेश्वर यांचा जन्म झाल्यामुळे ते एक तीर्थस्थान समजले जाते." 'ज्ञानेश्वर' त्रैमासिकाचे माजी संपादक, संतवाङ्मयाचे डोळस अभ्यासू श्री. वि. त्र्यं. शेटे मे १९५२ च्या 'ज्ञानेश्वर अंकात आपल्या 'मुक्ताबाई' या लेखात म्हणतात, 'गोदातीरावरील आपेगावच्या वत्सगोत्री कुलकर्णी घराण्यात विठ्ठलपंत व रुक्मिणी या परमेश्वरभक्तिपरायण मातापितरांच्या पोटी शके १२०१ प्रमाथि नाम संवत्सर आश्विन शुद्ध १ (सन १२७९) यादिवशी मध्यान्हसमयी मुक्ताबाईचा जन्म झाला.' या विधानातून श्रीज्ञानेशांची जन्मभूमी आपेगाव असल्याचे त्यांना मान्य आहे हे दिसून येते. १९५२–५३ च्या दरम्यान आपेगाव येथील ज्ञानेशमंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी गावोगावी हिंडून आर्थिक साहाय्य गोळा केले गेले. त्यावेळी जे 'जीर्णोद्धार विनंती पत्रक' प्रसिद्ध केले आहे त्यात माऊलीचे जन्मस्थान आपेगाव असा स्पष्ट उल्लेख आहे. विनंतिपत्रकाच्या शेवटी माऊलीमंदिराच्या जीर्णोद्धारास मनःपूर्वक सर्वांगीण प्रोत्साहन देत असल्याबाबत जी काही नावे छापली आहेत त्यामध्ये पहिले नाव म. म. द. वा. पोतदार यांचे आहे.

या संदर्भात त्यावेळचे विनंतिपत्रक प्रसिद्ध करणारे प्रमुख रामराव आबाजी औटे यांनी प्रस्तुत निबंधवाचनाचेवेळीही म. म. पोतदार यांच्याकडून स्वत: सही घेऊन गेल्याचे समस्त श्रोत्यांसमोर सांगितले. पण सध्या तर म. म. द. वा. पोतदार यांनी महाराष्ट्र शासनास आपण आळंदीपक्षाचे असल्याचे कळविले आहे.

वारकरी संप्रदायातील विख्यात चिकित्सक अध्वर्यूंचेही जन्मभूमी आपेगाव हेच मत आहे, याची दखल येथे घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ह. भ. प. शंकरमहाराज खंदारकर स्वसंपादित ' ज्ञानेश्वरी भावदर्शन ' (१९७४) ग्रंथाच्या प्रस्तावनेत जन्मग्रामाची सतर्क व सप्रमाण चर्चा करून पृष्ठ ११ वर निर्णायक विधान करतात, ' श्री ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म आपेगाव क्षेत्री श. ११९७ श्रावण वद्य अष्टमी मध्यरात्रीस झाला हे निश्चित. ' आपेगाव येथील प्रसिद्ध श्रीज्ञानेश अध्यात्म विद्या संस्थेचे संस्थापक व संचालक ह. भ. प. विष्णूमहाराज कोल्हापूरकर यांनी २।१।७४ च्या ' पंढरीसंदेश साप्ताहिकात जाहीर आव्हानच दिले होते की,' श्रीज्ञानेश्वर महाराजांचे जन्मस्थान आपेगाव आहे हे संत पुराव्यानिशी सिद्ध करून देतो. कुणास वादविवाद करायचा असेल त्यांनी अवश्य करावा. वारकरी संप्रदायातील विख्यात साखरे घराण्यातील ह. भ. प. ब्रह्मीभूत श्री. रंगनाथ गुरुजी परभणीकर यांची प्रवचने (भाग दुसरा-१९७४) ह. भ. प. हरिभाऊ आनंदा पाटील यांनी प्रकाशित केली आहेत; त्यात पृष्ठ ८ वर रंगनाथ गुरुजींनी श्रीनामदेवरायांचे आपेगाव जन्मग्राम उल्लेखणारे अभंग देऊन म्हटले आहे, ' याप्रमाणे वैष्णवमंडळासह भगवान आले पण माउलीचे जन्मस्थान असलेले आपेगाव पाहाताक्षणीच निवृत्तीनाथांना फार दु:ख झाले. ' वारकरी संप्रदायातील मान्यवर वे. शा. सं. भगवानशास्त्री सोनपेठकर आपल्या प्रवचन-कीर्तनातून आपेगाव जन्मभूमी सांगतातच पण त्यांचा लेखीपुरावा म्हणजे त्यांनी ह. भ. प. विष्णू महाराज कोल्हापूरकर यांनी आपेगावी संस्थापिलेल्या व चालविलेल्या श्रीज्ञानेश अध्यात्म विद्या संस्थेच्या कार्याचा गौरव करताना ७।१।७५ च्या गौरवपत्रात आपेगाव जन्मभूमीचा पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख केला आहे. ' श्रीमतां संत शिरोमणि श्रीज्ञानेश्वर महाराजानां जन्मस्थानमिदं आपेगाव नाम्ना प्रसिद्धं । ' वाराणसीचे शास्त्ररत्नाकर पंडित राजराजेश्वरशास्त्री द्रवीड यांनी ह. भ. प. शंकर महाराज खंदारकर यांना ' ज्ञानेश्वरी भावदर्शन ' ग्रंथ प्रकाशन प्रसंगी २०।१२।७४ च्या पत्रातून जे शुभाशीर्वाद पाठविले त्यामध्ये त्यांनी जन्मक्षेत्र आपेगावचा उल्लेख केला आहे; तो असा- ' पवित्र पैठणक्षेत्र समीपस्थ आपेगाव स्थाने श्री माउली जन्मक्षेत्रे प्रचलिता श्रीज्ञानेश अध्यात्म विद्या संस्था ' श्रीज्ञानेश्वरी भावदर्शनम् ' प्रकाशयितुं सो ऽत्साहा प्रवृत्तेति विज्ञाय महानानन्दीऽनुभूयते । "

ही वारकरी व अ–वारकरी अभ्यासू विद्वानांची मते साधार असल्याने श्री ज्ञानेशमाउलीची जन्मभूमी पैठणजवळील गोदावरीच्या तीरावर वसलेले आपेगावच होय हे सिद्ध होते.

शेवटी ओझरते एक-दोन उल्लेख महत्त्वाचे वाटतात म्हणून करतो. श्रीज्ञानेशचरित्रावर अधिक प्रकाश पडण्याच्या संदर्भात बाळाबोवाकृत ' भक्तितत्त्वामृत ' ग्रंथावर डॉ. रा. ग. हर्षे (संस्कृती सुगंध १९७०) आणि डॉ. रा. चिं. ढेरे (विविधा) यांनी भर दिला आहे. परंतु या ग्रंथाच्या सातव्या उल्हासात विठ्ठलपंतांचे गुरू रामानंद यांनी विठ्ठलपंतांना गृहस्थाश्रम स्वीकारण्यास सांगितला व त्याचवेळी भविष्यकाळात जन्माला येणाऱ्या चारही मुलांच्या नेमक्या जन्मतिथी व नावेही सांगून ठेवली आहेत, हे चोखंदळ वाचकाला खटकून जाते. आणि मग या ग्रंथावर श्रीज्ञानेशचरित्राबाबत कितपत विसंबून राहावे ही शंका येऊन जाते आणि म्हणूनच सद्‌गुरू श्रीकृष्णानंदांच्याकडून बाळाबोवांना लाभलेला सच्चिदानंदबाबा कृत श्रीज्ञानेशचरित्रपर ' मानसपूजा ' हा मूळ ग्रंथ आणि सोपानशिष्य प्रकाशनाथाने द्रवीड भाषेत जे ज्ञानेशचरित्र लिहिले व गुरुमुखाने बाळाबोवांनी ऐकले ते मूळ द्रवीड भाषेतले चरित्र; असे हे दोन्ही ग्रंथ हाती आल्याशिवाय केवळ ' भक्तितत्त्वामृत ' ग्रंथावर अधिक भर देणेही योग्य वाटत नाही. त्याचप्रमाणे नगरचे श्री. सुरेश जोशी यांना मुक्ताबाईकृत ' ज्ञानप्रबोध ' ग्रंथ उपलब्ध झाला आहे. या ग्रंथाची नक्कल ह. ना. स्वामी (इ. स. १७२५) यांच्या शिष्याने केली. तीन प्रकरणांच्या या प्रश्नोत्तरात्मक ग्रंथात ज्ञानेश्वर भावंडांविषयीही माहिती आहे. अशी वार्ता १।४।७४ च्या दैनिक केसरीच्या अंकात होती. तात्पर्य हे की, या ग्रंथाचाही या दिशेने अभ्यास व्हायला हवा.

एकंदरीत या निबंधात श्रीज्ञानेशांचा जन्मशक ११९७ आणि जन्मग्राम आपेगाव हे साधार व सविस्तर सिद्ध करून दाखविले.

卐 卐 卐

श्री ज्ञानेश्वर महाराज व प्रायश्चित्त

पं. रामचंद्रशास्त्री जोशी, पुणे

भगवान ज्ञानेशांच्या चरित्रासंबंधी विचार करीत असताना त्यांच्या जन्मात व चरित्रात काही विशेष दिव्यता आहे, हे ध्यानात घेतले पाहिजे. तसा विचार ध्यानात न घेता त्यांच्या चरित्राचे ग्रथन केले गेले तर ते पूर्णांशाने लिहिले गेलेले चरित्र आहे असे म्हणता येणार नाही. ज्ञानेश्वर माउलीच्या चरित्राचे साधन म्हणजे श्री संत नामदेवराय आदिंचे अभंग हेच मुख्य आहेत. पण त्यांच्या अभंगातही जी क्रमवारी लावली आहे तीही लक्षात घेणे अवश्य आहे. तसेच नामदेवराय यांच्या अभंगाबरोबर इतर संत मंडळींचा अनुभव हाही येथे ध्यानात घेणे अवश्य आहे. श्री ज्ञानदेवाच्या चरित्राबरोबरच त्यांच्या माता-पित्यांच्या चरित्राचाही विचार करणे अवश्य आहे. ज्ञानेशाचे तीर्थरूप विठ्ठलपंत व सौ. रुक्मिणीमाता यांनी देहत्याग केला आणि तो देहत्याग प्रायश्चित्तरूप होता असा एक समज आहे. विठ्ठलपंतांनी संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात येऊन आरूढ पतित्त्वाचा दोष केला होता. आणि यासाठी त्यांना देहान्त प्रायश्चित्त त्यावेळच्या धर्मशास्त्र्यांनी सांगितले होते. पण 'आरूढपतित' या दोषाला देहान्त प्रायश्चित्त नाही, तरी केवळ अट्टाहासाने ते त्यांना सांगण्यात आले असाही एक पक्ष ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्राचे ग्रंथनकरिता उपन्यस्त करण्याचा प्रयत्न झाला आहे. परन्तु धर्मशास्त्राचा विचार केला तर हा आक्षेपही बरोबर नसून धर्मशास्त्रावर निष्ठा ठेवून वागणाऱ्या विशेष लोकांना दोष देण्याचा तो एक प्रकार आहे हे म्हणावे लागते. यासाठी ज्ञानेश्वर महाराज व त्यांच्या निमित्ताने सांगितलेल्या प्रायश्चित्तांचा विचार करणे अवश्य आहे.

दिव्यत्वाचे रहस्य

श्री ज्ञानेश्वर महाराज हे भगवान विष्णूचे अवतार होते आणि त्यांचे दोन बंधू ब्रह्मदेव व शिव यांचे अवतार होते. त्यांची भगिनी मुक्ताबाई आदि-शक्तीचा अवतार होती हे त्यांच्यासंबंधी असलेल्या वाङ्मयावरून स्पष्ट होते. तेव्हा श्रीविठ्ठलपंतांची संतती ही सामान्यरूप नव्हती. ती सर्वथा देवांशभूत होती हे मानावे लागते. अर्थातच देवांशभूत ही संतती आहे हे मानले की त्यांची गर्भधारणाही देवाच्या

तेजाने झाली होती हे मानावे लागेल. तसे मानले तर विठ्ठलपंतांना आरूढपतित्वाचा दोष येत नाही. आलाच तर तो कर्मलोपाचा दोष येतो. कर्मलोपाच्या दोषाला देहान्त प्रायश्चित्त संभवू शकत नाही म्हणून त्यांना देहान्त प्रायश्चित्त सांगताना हा विचार ध्यानात घेतला गेला नव्हता हेच म्हणावे लागेल. वस्तुस्थिती यापेक्षा फारच निराळी आहे, कारण विठ्ठलपंतांनी संन्यास ग्रहण करण्यापूर्वी आपल्या पोटी आता संतान होणार नाही तेव्हा गृहस्थाश्रमात राहाण्यापेक्षा आपण संन्यास घेऊन आपल्या पूर्वजांच्या ऋणातून मुक्त व्हावे असे ठरविले होते. कारण धर्मशास्त्रात संन्यास परिग्रहण केले असताना बेचाळीस पिढयांचा उद्धार होतो असा नियम आहे. म्हणून त्यांनी संन्यास घेतला होता. संत नामदेवरायांच्या गाथेवरून हेच दिसून येते की विठ्ठलपंतांचे आई-वडील स्वर्गस्थ झाल्यावर त्यांच्या श्वशुरांनी म्हणजे सिदोपंतानी त्यांना आळंदीस येऊन राहण्याची विनंती केली. त्याप्रमाणे ते आपेगाववरून आळंदीस आले. तेथे त्यांनी भजन, कीर्तन, संतदर्शनात पुष्कळ काळ घातला पण त्यांना संतती झाली नाही. तेव्हा त्यांनी संन्यास ग्रहण करण्याचा मानस आपले धर्मपत्नीजवळ विदित केला. तो विचार तिने आपले वडील सिदोपंत यांना सांगितला, तेव्हा सिदोपंतांनी विठ्ठलपंतांना हेच सांगितले की, संतती उत्पन्न झाल्यावाचून पितृऋणाची फेड होत नाही, तरी आपण संतती झाल्यावर संन्यास घेणे श्रेयस्कर होईल. त्यावर त्यांनी तो विचार तात्पुरता स्थगित केला. पण त्यांनी आपले धर्मपत्नीजवळ आपणास संतती होणे कठीण आहे तेव्हा मला संन्यासासाठी संमती द्यावी असे सांगितले. पण तशी संमती मिळाली नाही, पण काही दिवसांनी रागाच्या भरात सौ. रुक्मिणीमातेने 'आपण संन्यास घ्या' असे उद्गार काढले व पडत्या फळाची आज्ञा घेऊन विठ्ठलपंतांनी श्रीक्षेत्र काशी येथे संन्यास घेतला. अशी वस्तुस्थिती नामदेवरायांनी वर्णन केली आहे, पण धर्मपत्नींच्या संमतीशिवाय विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला म्हणून तो संन्यासच नव्हता असाही एक पक्ष मांडला जातो, पण तो बरोबर नसून, विठ्ठलपंतांनी धर्मशास्त्राच्या कोणत्याच मर्यादेचे उल्लंघन न करता संन्यास ग्रहण केले होते. विठ्ठलपंतांनी संन्यास घेतला आहे हे रुक्मिणीमातेलाही माहीत होते. कारण रामानंद सरस्वतींनी 'पुत्रवती भव' हा आशीर्वाद दिल्यावर त्या हसल्या, तेव्हा 'माते, तू का हसलीस,' असे यतिवर्यांनी विचारले तेव्हा त्या म्हणाल्या,

> भ्रातरे जाऊनी घेतला संन्यास
> स्वामीचे वचनास न लगे बोल ॥

यावरून आपल्या पतीने संन्यास घेतला आहे हे त्यांना विदित असले पाहिजे व आपण रागाच्या भरात का होईना त्यांना संन्यास ग्रहणास परवानगी दिलेली आहे हेही त्यांच्या ध्यानात होते. पतीबरोबर झालेल्या संवादात आपणास संतती-

सुख नाही असे त्यांनी श्रवण केले होते म्हणून त्यांनी संततीसाठी अश्वस्थ प्रदक्षिणेचा नेम केला होता. त्या व्रताप्रमाणे संततिप्रतिबंधक दोष नाहीसा झाला होता आणि त्याचवेळी श्री. रामानंद महाराजांनी रुक्मिणीमातेला आशीर्वादही दिला. त्यावेळी आता काय व्हावयाचे असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा रामानंद सरस्वतींनी आपण रुक्मिणीबाईस घेऊन काशीस यावे असे सांगितले, त्याप्रमाणे सिदोपंत काशीस गेले. तेव्हा तेथे अनेक प्रकारचा विचार झाला. यतिवर्यांचे शब्द सत्य करण्यासाठी ईश्वराने आपणास अवतार घ्यावयाचा आहे तेव्हा आपण दिव्य तेजाने रुक्मिणीबाईच्या पोटी येऊ असे सांगितले व ही गोष्ट रामानंदांनी विठ्ठलपंतास सांगितली. ही गोष्ट नामदेवरायांनी,

> आवेधि कर्माचे न धरावे भय ।
> यास आहे साह्य जगदीश ।। (८८७ नामदेव अभंग)

या शब्दात सांगितली यावरून श्री निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव व मुक्ताबाई यांचा जन्म हा सामान्य लोकांसारखा गर्भधारणा होऊन न होता तो दिव्य तेजाने गर्भधारणा होऊन झालेला आहे. पण याच वेळी आणखीही एक विचार झाला होता. त्यावेळी विठ्ठलपंतांनी आपल्या गुरूंना हेच सांगितले होते की, 'जगदिशाचे हे कार्य करण्यासाठी आपण आळंदीस जातो पण कार्य पूर्ण होताच आपण पुन्हा संसारातून बाहेर पडू व त्यानंतर मात्र देह ठेवणार नाही, कारण देवकार्य करण्यासाठी हा दिव्य देह आपण निर्माण केला आहे, तो कार्य पूर्ण होताच आपण विसर्जन करू.' त्यावर यतिवर्य म्हणाले, 'देहत्यागच करावयाचा तर तो आपण त्रिवेणीत करावा. कारण तेथे देहत्यागाचा दोष लागत नाही. कारण वेदामध्ये, गंगा-यमुनेच्या संगमावर देहत्याग करणाऱ्यास आत्मघाताचा दोष लागत नाही व त्यांना दिव्य गतीही प्राप्त होते असे सांगितले आहे, तेव्हा देहत्याग तेथे करावा' असे ठरल्यानंतर विठ्ठलपंतांनी एक तप म्हणजे बारा वर्षांपर्यंत आळंदीस निवास केला व त्याच काळात ब्रह्मांशापासून निवृत्तिनाथ, विष्णूच्या अंशापासून ज्ञानेश्वर महाराज, रुद्राच्या अंशापासून सोपानकाका, शक्तीच्या अंशापासून मुक्ताबाई यांचा जन्म झाला. हे कार्य पूर्ण झाल्यावर विठ्ठलपंतांनी आपले कार्य पूर्ण झाले म्हणून आपला निर्णय प्रगट केला. तेव्हा त्यांच्या संततीसंबंधी काय करावयाचे, तसेच देवकार्याच्या निमित्ताने जी व्रतलोपता आली आणि त्यामुळे जो काही दोष आला त्यासाठी प्रायश्चित्ताची विचारणा त्यांनी केली. त्यावेळी अपराधाची क्षमायाचनाही त्यांनी केली आहे. पण यावेळी श्री निवृत्तीनाथांनी आपण कोण आहोत यांची कल्पना सभेला दिली व आपण अविनाशी अव्यक्त स्वरूपाचे पंचमहाभूताच्या पलीकडील इतकेच नव्हे तर विराटाच्याही पलीकडील आहोत, आपण निर्गुण व सगुण स्वरूपही नाही तेव्हा विधिक्रमात सांगितलेले विधीनिषेध आपणासाठी नाहीत, ही

कल्पना सभेला दिली. विठ्ठलपंतांनाही सांगितली व प्रायश्चित्ताच्या विचाराचे स्वरूप काय असावे हेही सांगितले– ' त्याग आणि वैराग्य हेच आमचे प्रायश्चित्त आहे ' हे सांगितले. यावरून ज्ञानेश्वरादि लोक हे विधिक्रमांचे अधिकारी नसून ते आनंदक्रमांतील होते हे स्पष्ट केले आहे. वैदिक वाङ्मयामध्ये देवांशभूत लोकांच्या चरित्राचा विचार विधिक्रमाने न करता आनंदक्रमाने करावा असे सांगितले आहे. भगवान गोपाळकृष्णाचे चरित्र श्रवण करीत असताना भागवतांमध्ये राजा परीक्षिताने

संस्थापनाय धर्मस्य प्रशमायतरस्यच
अवतीर्णा हि भगवान्शेन जगदीश्वरः
सकथं धर्म सेतुनां वक्ता कर्ता ऽभिरक्षिता
प्रतीपयाच ब्रह्मन् परदाराभिमदर्शनम्
आप्तकामो यदुपतिकृतवानवैजुगुप्सितम्
किमाभिप्राय एतन्न संशय छिंधि सुव्रत ॥२०॥

असे विचारून भगवंताच्या रासलीलेबद्दल परदाराभिमर्शनाचा संशय व्यक्त केला त्यावर शुकाचार्यांनी हेच उत्तर दिले आहे की–

धर्मव्यतिक्रमो दृष्टः ईश्वराणांच साहसम्
तेजायसान दोषाय वन्हेर सर्वविभूजोयथा ॥

यावरून देवांशभूत असणाऱ्यांचा विचार विधिक्रमाप्रमाणे करू नये हेच सांगितले. निवृत्तिनाथांनाही ती गोष्ट येथे सांगितली. परंतु–

विधिवेदविरुद्ध संपर्कसंबंध । नाही भेदाभेद स्वस्वरूपी ॥ १ ॥
अविधि आचरण परमदूषण वेदोनारायण बोलियेला ॥ २ ॥
स्वधर्म अधिकार जातिपरत्वभेद । उचित ते शुद्ध ज्यांचे तया ॥ ३ ॥
म्हणोनिया संती आवश्य आचरावे । जना दाखवावे वर्तोनिया ॥ ४ ॥
कुळीचा कुळधर्म अवश्य पाळावा । सर्वथा न करावा अनाचार ॥ ५ ॥
प्रत्यवाय आहे अशास्त्री चालता । पावन अवस्था जरी झाली ॥ ६ ॥
ज्ञानदेव म्हणे ऐकाजी निवृत्ति । बोलिली पद्धती धर्मशास्त्री ॥ ७ ॥

यावरून ज्ञानदेवमहाराजांनी आपण विधिक्रमांत नसलो तरी विधिक्रमाने काय विचार आहे हे ऐकून घेणे आवश्यक आहे आणि नंतर आपण आनंदक्रमातील आहोत हे दाखवून देणे अवश्य आहे, म्हणजे हा प्रश्न योग्य रीतीनें सुटेल असे सांगितले व ते निवृत्तिनाथाना पटले. त्यांनी आळंदी व पैठण येथील प्रायश्चित्त

विचारांच्या सभेत भाग घेतला. या सभेत भाग घेणाऱ्या लोकांचा मोठ्या आदराने उल्लेख केला. नामदेवरायांनी ते शब्द देताना असे स्पष्ट म्हटले आहे की,

‘ सांगाल ते मान्य म्हणती साहजिणे
शुचीकरणे पतितांसी ’

निवृत्ति म्हणे तुम्ही भूदेव प्रत्यक्ष । दर्शनेची मोक्ष जडमूढा ।

यावरून धर्मशास्त्र सांगणाऱ्या लोकांबद्दल सर्वांना आदर होता हे स्पष्ट होते. आळंदीच्या सभेमध्ये विठ्ठलपंतांनी आपण देहत्याग करणार हे प्रथमच सांगितले व त्याप्रमाणे प्रयाग येथे देहत्याग केला. पण येथे हे ध्यानात घ्यावयास पाहिजे की, विठ्ठलपंतांना देहत्यागाचे प्रायश्चित कोणीच सांगितले नाही. ते त्यांनी पूर्वीच करण्याचे ठरविले होते. यासंबंधीही असे विवेचन कित्येक ठिकाणी केलेले दिसते की, वस्तुतः संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात येणे म्हणजे आरूढपतित्वाचा दोष पत्करणे होय आणि अशा आरूढपतितदोषांना केवळ तीन कृच्छ चांद्रायणाचे प्रायश्चित असताना विठ्लपंतांना देहान्त प्रायश्चित का सांगितले गेले ? पण हा आरोप व्यर्थ आहे. धर्मशास्त्रांच्या नियमाप्रमाणे येथे विठ्ठलपंतांना आरूढपतित्व हा दोष येतच नव्हता. आलाच तर व्रतलोपाचा दोष होता पण त्याचाही विचार करण्याचे प्रयोजनच नव्हते. कारण त्यासंबधी त्यांनी पूर्वीच निर्णय करून ठेवला होता तोच त्यांनी सभेत विदित केला व त्यांनी त्रिवेणीत जाऊन देह विसर्जन केला. धर्मशास्त्रांच्या नियमाप्रमाणे त्यांना प्रायश्चित्त म्हणूनच देहत्याग करावयाचा [असता तर त्यांना आळंदीत प्रयोपवेशन करून देहत्याग करता आला असता पण तो गोष्ट तशी नव्हतीच. त्यासबंधीची योजना पूर्वीच ठरली होती. कारण येथेही विचार करताना विधिक्रमाने या प्रश्नाचा विचार करू नये असे निश्चित असताना वरील प्रकारचा धर्मशास्त्रांचा निर्णय येथे उपयोगी नव्हता. कार्य संपल्यावर आपल्या पूर्वस्थितीला जाणे हा आनंदक्रमाचा पर्याय आहे. म्हणून त्याच्यासंबंधी त्यावेळच्या धर्मशास्त्र्यांनी आपल्या निर्णयाने आपण मुक्त होणार, आपणास ‘पुनरावृत्ति नाही.’ असे त्यांनी म्हटले आहे. प्रायश्चित्त म्हणून देहदंड सोसला तर पाप निरसन झाल्यावर इतर कर्मक्षय करण्यासाठी पुन्हा जन्म घ्यावा लागतो. पण ती गोष्ट विठ्ठलपंतांबद्दल नाही हे येथील वाक्यावरून स्पष्ट होते यावरून ज्ञानेश्वरांप्रमाणेच विठ्ठलपंतांच्याही चरित्राचा विचार आनंदक्रमानेच केला गेला हे दिसून येते. विठ्ठलपंतांनी जेव्हा देहत्याग केला तेव्हा त्यांच्या शरीरातून दिव्यज्योती निघाल्या व त्या आकाशात विलीन झाल्या अशीही कथा सांगितली जाते. विठ्ठलपंतांच्या देहत्यागाचे वेळी ऋषी, गंधर्व, देव हे तीरावर उपस्थित झाले होते त्याप्रमाणे श्री निवृत्तिनाथ वगैरे चारी भावंडेही तेथे होती. अनेक संतही उपस्थित होते. त्यांनी ती दिव्य घटना ध्यानात घेतली व त्यानंतर श्री निवृत्तिनाथादि भावंडे

पैठणास आली. तेव्हा पैठणच्या धर्मसभेत या गोष्टीचा विचार करूनच निर्णय दिला गेला. धर्मशास्त्रांच्या मर्यादा ज्यांच्यासाठी आहेत त्यांच्या पलीकडील हे लोक आहेत हे गृहीत धरून विचार केला गेला. त्याचवेळी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी आपले अलौकिक सामर्थ्यही दाखवून रेड्यामुखी वेद वदविले व सर्वाभूतो ईश्वर म्हणजे आपणच आहोत हे रेड्याच्या पाठीवरील वळ आपले पाठीवर उठतात हे दाखवून सिद्ध करून दाखविले. तेव्हा खरोखर हे सर्व देवस्वरूप आहेत, यांना उपनयनादि संस्कारांची गरज नाही. त्या संस्काराने येणारी पुनीतता किंवा दोषरहितत्व हे यांचे ठिकाणी सहज सिद्ध आहे हे सर्वांच्या ध्यानात आले व त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. नामदेव महाराज म्हणतात–

" करिती आश्चिर्य सकळ द्विजवर
हे तीही अवतार तीन देवाचे
आदिमाया मुक्ताबाई । मुक्तपणे अवतरली

असे सांगून आतापर्यंत आम्ही आपले स्वरूप ध्यानात घेतले नाही म्हणून आमचा प्रमाद घडला आहे असे त्यांनी म्हटले आहे. ते म्हणतात–

" कर्मठ अभिमाने ठकलो देहबुद्धि
गोवियेलो विधिनिषेधांच्या
जणे भक्तिज्ञान वैराग्याचा लेश ॥ ४ ॥

कुटम्बाचा दास होऊन ठेलते ॥ ५ ॥

आणांकाशीसांगो आपण नाचारो
लटकेच हुंबरो प्रतिष्ठेसी
धन्य यांचा वंश धन्य यांचे कुळ
धन्यपुण्यशील अवतार हे ॥ ७ ॥

सकळ द्विजवर करिती नमस्कार
आनंदे जयजयकार करिताती ॥ ८ ॥

ज्ञानदेव म्हणजे तुमच्या पायाचा महिमा
सामर्थ्य हे आम्हा अंगी नाही ॥ ९ ॥

यावरून पैठणच्या लोकांना जेव्हा हे ध्यानात आले की, ज्ञानदेवादिलोक हे विधिक्रमाचा विचार करण्याच्या कक्षेत नसून ते आनंदक्रमातील देवरूप आहेत तेव्हा त्यांना आपण काय शुद्धिपत्र देणार ? तेव्हा त्यांनी विचार करून शेवटी आपला निर्णय दिला. त्यांचे वर्णन संत नामदेवरायांनी केले आहे.

" मिळोनी समस्त सोडियेले शास्त्र
विचारोनी पत्र लिहियेले
हे परलोकांचे तारू देवत्रय कोणी
प्रायश्चित्त काय द्यावे कोणी
लिहोनिया पत्र दिधले तया हाती
समस्ताशी निवृत्ति नमस्कारिले ॥ १९ ॥

यावरून पैठणच्या धर्मशास्त्रज्ञांनाही श्रीज्ञानेश्वरादिकांचे स्वरूप कळाले. त्यासाठी त्यांनी त्यांच्या दिव्य लीलांचा विचार ध्यानात घेतला तेव्हा ज्ञानेश्वरादिकांना छळण्यासाठी काही निर्णय दिले किंवा विठ्ठलपंतांना चुकीने प्रायश्चित्त सांगितले हे म्हणणे सत्यसृष्टीतील नसून ती एक विशेषवर्गाला दोष देण्यासाठी केलेली कपोलकल्पना आहे हे सिद्ध होत आहे. तेव्हा हे विचार ध्यानात घेऊन ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र ग्रथन केले गेले पाहिजे, म्हणजेच हे निर्दोष चरित्र होईल. असे निर्दोष चरित्र लोकांच्या पुढे येणे आवश्यक आहे म्हणून हे विचार येथे मांडले आहेत. याचा आपण हंसक्षीरन्यायाने विचार करावा अशी विनंती करीत आहोत.

卐 卐 卐

तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे । जगी सूर्य जैसे प्रकाशले ॥ १ ॥
धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान । धन्य तो निधान ज्ञानदेव ॥ २ ॥
उपजताचि ज्ञानी हे वर्म जाणोनि । आले लोटांगणी चांगदेव ॥ ३॥
प्रत्यक्ष पैठणी भटी केला वाद । बोलविला वेद म्हैसीपुत्रा ॥ ४ ॥
संस्कृताच्या सोडोनिया गांठी । केलीसे मराठी गीता देवी ॥ ५ ॥
नामा म्हणे सर्व सुख लाहिजे । एक वेळा जाइजे अळंकावती ॥ ६ ॥

—नामदेवांची आदि.

ज्ञानदेवांच्या वाचनात आलेले ग्रंथ

डॉ. म. प. पेठे, पुणे

श्री ज्ञानदेवांच्या जीवनाविषयी माहिती देणारा ऐतिहासिक स्वरूपाचा व तत्कालीन असा कोणताही कागदोपत्री पुरावा अद्यापि उपलब्ध झालेला नाही, असे महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ इतिहासकार महामहोपाध्याय द. वा. पोतदार नेहमी म्हणतात. इतर इतिहास संशोधकही हे मान्य करतात. असा पुरावा उपलब्ध होईपर्यंत ज्ञानदेवांच्या चरित्रविषयक प्रश्नांचा विचार अनुषंगिक पुरावे व भाविक परंपरा यांच्या आधारेच करणे शक्य आहे.

ज्ञानदेवांच्या नावावरील ग्रंथात आलेल्या ज्ञानदेवपूर्वकालीन ग्रंथांचा स्पष्ट वा ओझरता किंवा सूचित उल्लेख यांच्या आधारे ज्ञानदेवांनी कोणते ग्रंथ वाचले असावेत याविषयी अनुमान करता येईल. 'व्यासाचा मागोवा घेत व भाष्यकाराते वाट पुसतु ' ज्ञानेश्वरीतील या दोन उल्लेखाधारे ज्ञानदेवांनी महाभारत व शांकरभाष्य यांचा निर्देश केला असून महर्षी व्यास व आद्य शंकराचार्य यांचे एकप्रकारे ऋण मानले आहे असे म्हणता येईल.

ज्ञानदेवांच्या प्राचीन व अर्वाचीन चरित्रकारांनी ज्ञानदेवांच्वा ग्रंथातील विचारांचे व तत्त्वज्ञान मांडणीचे साम्य ज्ञानदेवपूर्वकालीन ग्रंथांतून शोधण्याचा व ज्ञानदेवांचा व्यासंग दाखविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. त्यामधून ज्ञानदेवांचा कोणत्या ग्रंथांशी परिचय असावा याचा शोध घेता येईल. सर्वश्री ल. रा. पांगारकर, पांडुरंग शर्मा, डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ. शं. गो. तुळपुळे, प्रा. न. र. फाटक इत्यादी आधुनिक अभ्यासकांनी ज्ञानदेवांच्या ग्रंथाचे पूर्वसूरीच्या विचाराशी साम्य दाखविलेले आहे.

अभ्यासग्रंथात व संशोधन स्वरूपाच्या लेखनात माहिती देताना ती माहिती कुठे उपलब्ध झाली याचा स्पष्ट संदर्भ देण्याची प्रथा मराठी वाङ्मयात केव्हा सुरू झाली हा एक स्वतंत्र व संशोधनाचा विषय होण्यासारखा आहे. ही प्रथा पाश्चात्य वाङ्मयाचे मराठी भाषेशी साहचर्य सुरू झाले अशा काळांत सुरू झाली असावी असे माझे अनुमान आहे. असे संदर्भ देणे खरोखर उपयुक्त व आवश्यक

असते. संशोधकाचा व्यासंगही यामुळे स्पष्ट होत असतो. परंतु का कुणास ठाऊक! असे संदर्भ न देण्याकडेच बऱ्याच जणांचा कल आढळतो.

ज्ञानदेवांनी वाचले असावेत अशा संदर्भ ग्रंथांची यादी त्यांच्या ग्रंथाधारे व ज्ञानदेव चरित्रकारांच्या साम्य दर्शनाधारे प्रस्तुत लेखात साकार करावयाची आहे.

ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानासंबंधी आज प्रचलित असलेले वाद पाहिले म्हणजे काही वेळेला मनात येते की, अलीकडच्या अभ्यासग्रंथात ज्याप्रमाणे संदर्भासाठीं घेतलेल्या ग्रंथांची यादी ग्रंथाअखेरी दिलेली असते त्याप्रमाणे आपण संदर्भासाठी घेतलेल्या ग्रंथांची यादी ज्ञानदेवांनी दिली असती तर बरे झाले असते. ज्ञानेश्वर द्वैती की अद्वैती, की विशिष्टाद्वैती, ज्ञानेश्वरीत भाष्यानुसरण कोणाचे आहे, यांसारख्या वादावर प्रकाश पडला असता. कदाचित हे वादही निर्माण झाले नसते. त्यांनी ज्ञानेश्वरीत 'भाष्यकारांते' वाट पुसतु असा मोघम उल्लेख केला. त्यातही भाष्यकारांते[1] या शब्दातील रा वरील अनुस्वार आदरार्थी का बहुवचनार्थी, हा प्रश्न आहे. ग्रंथाच्या शेवटी भाष्यकारांते म्हणजे शंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्य असा संदर्भ दिला असता म्हणजे ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान काहीसे रामानुजीय भाष्याशी जुळणारे आहे, असे मत मांडण्याचा मोह पांडुरंग शर्मा[2] यांना झाला नसता. ज्ञानदेवांनी ज्यांना वाट पुसली ते भाष्यकार शंकराचार्यच होत हे परंपरागत मत पुन्हा ठासून मांडण्यासाठी प्रचंड खटाटोप करण्याचा प्रसंगही डॉ. पेंडसे[3] यांच्यावर आला नसता. परंतु कोणत्याही ग्रंथाच्या शेवटी, निदान अभ्यासग्रंथांच्या अखेरी तरी ग्रंथासाठी संदर्भार्थ घेतलेल्या पुस्तकांची यादी देण्याची उपयुक्त प्रथा अगदी अलीकडच्या काळापर्यंत नव्हती. समर्थ रामदास, वामन पंडित यांनी विवेचनाच्या ओघात पूर्वसूरींच्या ग्रंथाचा उल्लेख केलेला आढळतो. परंतु तो ओझरता उल्लेख होय. तो म्हणजे काही संदर्भ ग्रंथांची यादी नव्हे. सुमारे सातशे वर्षांपूर्वीच्या काळात ज्ञानदेवकाली ती प्रथा नव्हती याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही व ज्ञानदेवांनी तशी यादी ग्रंथाच्या शेवटी दिलेली नाही म्हणून हळहळण्यातही अर्थ नाही. त्यातल्या त्यात सुदैव इतकेच आहे की, तशा यादीच्या अभावी ज्ञानदेवांच्या वाङ्मयाशी इतर ग्रंथांचे असलेले साम्य दाखवून त्यांच्यावर वाङ्मय चौर्याचा आरोप करण्याचे औध्दत्य दाखविण्यास कुणी अद्यापि तरी पुढे आलेला नाही !

ज्ञानदेवांच्या अलौकिक वाङ्मय संपदेकडे पाहिले म्हणजे त्यांतील वाग्विलास, ज्ञानविलास व अध्यात्म ज्ञानाचे सूक्ष्म विवरण पाहून मन दिपून जाते. आणि त्यांच्या बालपणीच्या या सर्वज्ञतेबद्दल कुतुहल निर्माण होते. तसे पाहिले तर ज्ञानदेवांच्या असामान्य जीवनाचा सारा खेळ केवळ एकवीस वर्षांचा. या इतक्या अल्पही जीवनात ज्ञानदेवांनी ही सर्वज्ञता कशी प्राप्त करून घेतली असेल हा विचार मती

गुंग करून सोडतो. भाविक भक्तांच्या मताने एखादा पुण्यात्मा आपला पुर्वसुकृताचा ठेवा बरोबर घेऊन ज्ञानदेवांच्या रूपानं जन्माला आला असावा. आधुनिक काळा-तील संत चरित्रकारही[४] ज्ञानदेवाच्या चरित्राला पार्थितत्त्व कोठेही चिकटलेले नसून मराठी भाषेचा आणि शुद्ध परमार्थाचा गौरव करण्याकरिताच केवळ ईश्वरी तेज या मानव देहातून चमकून गेले, असे मानतात. परंतु आजच्या चिकित्सक माणसाला ज्ञानदेवांच्या सर्वज्ञतेची ही संगती पटेलच असे नाही. बरे, ज्ञानदेवांच्या वाङ्मयांत त्यांच्या या सर्वज्ञतेची कारणमीमांसा शोधावी तर स्वात्मानुभवांत दंग झालेल्या ज्ञानदेवांनी आत्मचरित्रपर असे काही सांगितल्याचे फारसे कुठेही आढळत नाही. आणि मग चिकित्सक बुद्धीने ज्ञानदेव पूर्वकालातील वाङ्मयाशी ज्ञानदेव वाङ्मयाचे साम्य शोधलें जाते. ज्ञानदेव चरित्राकडे भाविक आणि चिकित्सक दृष्टीने पाहावयाच्या या समत्वयाचे उदाहरण लक्षात ठेवण्यासारखे आहे.

ज्ञानदेव समकालीन भक्तराज नामदेव[५] यांनी पैठण येथे ज्ञानदेवांनी अध्यात्मक ग्रंथ पाहिले व त्यात गीता, संबोधिनी टीका यांचा समावेश होता असा स्पष्ट उल्लेख केला आहे. सुमारे साडेसातशे वर्षांपूर्वीच्या त्या काळात दक्षिण काशी म्हणून संबोधिले जाणारे पैठण हे महाराष्ट्रांतील धर्म व संस्कृती यांचे केन्द्र होते. ज्ञानदेवांना कदाचित त्या काळांतील उत्तमोत्तम सर्व ग्रंथ एखाद्या मठात पाहावयास मिळाले असतील. पण ते ग्रंथ कोणते, हे समजायला आज तरी मार्ग नाही. पैठणच्या तत्कालीन ग्रंथांची अशी यादी कुठे उपलब्ध होत नाही. किंवा ज्ञानेश्वरी, अमृतानुभव या ग्रंथांच्या शेवटी आपण कोणते ग्रंथ पाहिले याची संदर्भ सूचीही ज्ञानदेवांनी दिलेली आही. मग ज्ञानदेवांनी कोणते ग्रंथ अभ्यासिले असावेत हा प्रश्न शिल्लक राहतो.


'जे जे भेटे भूत । ते ते मानी भगवंत ' असा संदेश देणाऱ्या ज्ञानदेवांनी अखिल **चराचर विश्व हाच एक प्रचंड ग्रंथ** मानून त्याच्या अध्ययनातून ज्ञानेश्वरी, अमृतानुभव यासारखी अद्वितीय वाङ्मयरत्ने निर्मिली असावीत.

जणु मूर्तिमंत डोळस वैराग्यच असलेले विठ्ठलपंत व समाजाच्या बहिष्काराची झळ आपल्या कोवळ्या मुलांना लागू नये म्हणून सतत आपल्या मायेची पाखर घालणाऱ्या रुक्मिणीबाई या मातापित्यांच्या **जीवनग्रंथातून** कदाचित ज्ञानदेवांनी ज्ञान मिळविले असेल.

निवृत्तिनाथ तर काय त्यांचे साक्षात गुरू. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरीत विलसित झालेली अपूर्व गुरुभक्ति गुरुचरणांच्या आठवाने शब्दसृष्टी आत्सात होईल व अवघे सारस्वत जिव्हेस येईल. गोडपणात अमृतालाही लाजवणारे वक्तृत्व लाभेल, गुरुकृपेने आपले श्वासोच्छवासही प्रबंध होतील हा त्यांचा आत्मविश्वास पाहिला

म्हणजे ज्ञानदेवांनी **निवृत्तिनाथरूपी ज्ञानभांडारातून** ज्ञानकोश ग्रंथांतून काय अभ्यासिले असावे हे केवळ कल्पनेने जाणता येईल. चराचर सृष्टी, माता, पिता व गुरु या संदर्भ ग्रंथाव्यतिरिक्त मूर्त स्वरूपातील इतर कितीतरी ग्रंथ ज्ञानदेवांनी अभ्यासिले असावेत, असे नामदेवांच्या उल्लेखावरून दिसते. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील मंगलाचरणच घ्या. त्यातील गणेशरूपकांवरून तिन्ही वेद, स्मृती, अठरा पुराणे, सहा दर्शने त्यांनी अवलोकिली असावीत हे उघड आहे ज्ञानेश्वरीच्या १३ व्या अध्यायात सांख्यशास्त्राचा संक्षेप आहे तर त्यांतच पुढे नासदीय सूक्ताचे विवरण आहे. बृहदारण्यक, कठ व तैत्तिरीयोपनिषद यांचे ज्ञानदेवांच्या वाङ्मयाशी असलेले साम्य दाखवून दशोपनिषदे त्यांच्या जिव्हाग्री वसत होती असे डॉ. तुळपुळे[६] सांगतात. ज्ञानेश्वरी ही गीतेवरची साक्षात टीका. तेव्हा गीता हा ग्रंथ त्यांनी संदर्भासाठी घेतला होता. हे वेगळे सांगण्याची आवश्यकताच नाही. आचार्यांच्या शतश्लोकीची छाया ज्ञानेश्वरीवर असल्याचे व अमृतानुभवावर योगवासिष्ठाची पुष्कळच छाया असल्याचे डॉ. तुळपुळे[७] यांचे मत आहे. श्री. पांगारकर[८] यांनी ज्ञानेश्वरीचा भागवताशी असलेला निकट संबंध दाखविला आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी ज्ञानेश्वरीचे आचार्यानुसरण सप्रमाण सिद्ध केले आहे. तेव्हा ज्ञानदेवांचा ब्रह्मसूत्र भाष्याचा अभ्यास स्पष्टच आहे. ज्ञानेशांना रामनुजाचार्यांचेही काहीसे अनुसरण केले आहे असे पांडुरंग शर्मा यांचे मत होते. ज्ञानदेवांनी अनुसरण कुणाचे केले या वादात न पडता ज्ञानेश्वरांनी रामानुजभाष्य वाचले असावे असे म्हणता येईल. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील योगायोगाच्या सूक्ष्म विवरणावरून त्यांनी पतंजलीच्या योगसूत्रभाष्याशी असलेली जवळीक कुणाच्याही लक्षात येण्यासारखी आहे. पांडुरंग शर्मा[९] यांनी ज्ञानदेवीचे इशावास्योपनिषद या ग्रंथाशी असलेले साम्य तपशिलवार दाखविले आहे. ज्ञानेश्वरांची योग प्रक्रिया ही पौर्वात्य चरक, सुश्रुत, वाग्भटादि वैद्यक ग्रंथकारांच्या विवेचना सरून आहे असे दीक्षित[१०] यांनी एका स्वतंत्र ग्रंथाद्वारे मांडले आहे. ज्ञानदेवांनी माध्वद्वैतीमताचा पूर्वपक्ष मानून त्यांचे खंडन केले असे मानले जाते. त्यावरून ज्ञानदेवांनी माध्वाचेही ग्रंथ संदर्भार्थ घेतले असावेत असे अनुमान करता येईल. यावरून वरील सर्व ग्रंथांचा ज्ञानेश्वरांच्या संदर्भग्रंथाच्या यादीत समावेश करावा असे कुणालाही वाटेल.

ज्ञानदेवांचा नाथपंथाशी संबंध आला तो गुरूपरंपरेने. आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, निवृत्तिनाथ या त्यांनीच दिलेल्या परंपरेनुसार त्यांचा तत्कालीन नाथपंथी ग्रंथांशी परिचय झाला पाहिजे हे उघड आहे. निळोबा[११] सांगतात त्याप्रमाणे गुरुपरंपरेने आलेले नाथपंथीय गुह्यज्ञान ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी प्रगट केले आहे. यावरून गोरक्षकिमयागार, गोरक्ष–अमरनाथ संवाद, गोरक्षगीता सिद्धसिद्धान्त पद्धती इत्यादि नाथपंथीय ग्रंथ ज्ञानदेवांच्या संदर्भ ग्रंथाच्या यादीत



ज्ञानेश्वरीचे लेखन जेथे झाले तो नेवासे येथील खांब

घालता येण्यासारखे आहेत. वि. ल. भावे म्हणतात की, दोहोतले पाणी मूळ एकाच झऱ्यातले आहे. महेश्वरानंद म्हणजे गोरक्षनाथ व त्यांच्या महार्थमंजिरीचे अनुसरण ज्ञानेश्वरीत आहे असे मत ज्ञानदेवोपासक[१२] यांनी मांडले आहे. तर श्री. ग. वा. तगारे यांनी ज्ञानेश्वरांचा साधनमार्ग विशुद्ध वज्रयान पंथाचा होता. असा विचार मांडला आहे डॉ. पेंडसे[१३] म्हणतात "सूक्ष्मपणे पाहिले तर असे दिसते की उपनिषदे, गीता, गौयपादकारिका, योगवासिष्ठ, शांकरमत, काश्मिरी शैव संप्रदाय आणि गुरुपरंपरेने आलेले नाथपंथीय तत्त्वज्ञान अशा सप्तसिंधूचे ओघ ज्ञानेश्वरीच्या अद्वैत सागरास मिळाले आहेत. यावरून ज्ञानेश्वरकाली उपलब्ध असलेले वरील पंथांचे तत्त्वज्ञान ग्रंथ ज्ञानेश्वरीच्या संदर्भ यादीत समाविष्ट करण्यास प्रत्यवाय नाही. भागवतानंतर ज्ञानेश्वरी रचली गेली व तिचे ज्ञानेश्वरीशी कल्पना साम्य व विचारसाम्य आहे हे मान्य करता येण्यासारखे आहे असे सांगुन भागवतात श्रीकृष्ण व गोपी यांच्या वर्णिलेल्या वासनायुक्त संबंधाला ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत उदात्त, सोज्ज्वळ व भक्तियुक्त स्वरूप देऊन आपले वैशिष्टच प्रगट केले आहे. यामधील फरकाचे मर्म श्री. म. माटे[१४] यांनी उकलून दाखविले आहे.

शिवकल्याण यांनी अमृतानुभवावरील नित्यानंदैक्यदीपिकेत ज्ञानेश्वरीच्या निरूपणाला योगवासिष्ठ, ब्रह्मगीता, उपनिषदे इत्यादी प्राचीन ग्रंथांतून आधार दाखविले असून ज्ञानेश्वरीतील विवेचनाची मनुस्मृती, भागवतपुराण, शंकराचार्यांची विवेकचूडामणी शतश्लोकी, प्रबोधसुधाकर यातील दृष्टान्ताशी साम्य असल्याचे प्रा. न. र. फाटक[१५] यांनी दाखविले आहे. विष्णुपुराणही ज्ञानदेवांना परिचित होते असे फाटक सांगतात.

य. वि. परांजपे[१६] यांनी योगवासिष्ठातील तत्त्वज्ञानाचा ज्ञानदेव वाङ्मयावर झालेल्या परिणामांचे विवेचन केले आहे. विशेषतः योगवासिष्ठ व ज्ञानदेवांचे ज्ञानेश्वरी व अमृतानुभव ग्रंथ यांची तत्त्वज्ञानदृष्टचा तुलना व त्यातील साम्यभेद त्यांनी दाखविले आहेत.

याज्ञवल्क्यास गुरूंनी सोडले, त्यांना वेद ओकावे लागले. आपदा सोसून अपौरूषेय असे वेदवाङ्मय त्यांनी स्वतः संपादिले. या गोष्टीचे ज्ञानदेवांच्या जीविताशी साम्य आहे. त्यांनीही बहिष्कार, विटंबना यांना तोंड देऊन जगाच्या उद्धाराचा मार्ग सांगितला. योगीश्वर याज्ञवल्क्य व योगीश्वर ज्ञानदेव यांच्या जीविताप्रमाणे वाङ्मयातही समान विचार असल्याचे अमृतानुभव व याज्ञवल्क्यास्मृती यांच्यातील समान स्थळे दाखवून पां. ज्ञा. कुलकर्णी[१७] यांनी प्रतिपादन केले आहे. याज्ञवल्क्याप्रमाणे कवषऋषीच्या चरित्र व वाङ्मयाशी ज्ञानदेव चरित्र व

वाङ्मय यांची तुलना करून त्यांच्यातील विचार साम्याचे विवेचन, अश्वत्थवृक्ष वर्णन, विश्वाच्या उपक्रम–उपसंहारासंबंधीच्या कल्पना, त्रैकालिक सत्याचे प्रवर्तन, ऋग्वेदाच्या शाकल संहितेच्या १० व्या मंडलात वर्णिलेल्या पाच सूक्तांचे सार चांगदेवपासिष्ठीत आहे, या उदाहरणाच्या आधारे पांडुरंग शर्मा[१८] यांनी केले आहे.

भागवताशी ज्ञानदेवांचा दृढ परिचय होता. हे श्री. पांगारकर यांनी दाखविल्याचा उल्लेख वर एके ठिकाणी आला आहेच. भागवतातील अनेक कथांचे उल्लेख ज्ञानेश्वरीच्या दृष्टान्तांत आलेले आढळतात. याच्या जोडीला महाभारत व रामायण यांतील कथांचा उल्लेखही प्रसंगाने ज्ञानदेवांनी केलेला आहे. या सुमारे ६०–६५ कथांपैकी प्रचलित कथा वगळून इतरांची संदर्भचर्चा ना. मो. सोमण[१९] यांनी करून ज्ञानदेवांनी कुठेही विसंगती येऊ दिली नाही. हे त्यांच्या दृष्टान्तांचे वैशिष्टच दाखवून दिले आहे. शं. वा. दांडेकर[२०] व नाना महाराज साखरे[२१] यांनीही ज्ञानेश्वरीतील पौराणिक संदर्भ असलेल्या रामायण, महाभारत, भागवत आदी ग्रंथांतील मूळ कथांचे दिग्दर्शन केले आहे.

ज्ञानदेवांनी आपल्या पूर्वसूरीच्या ग्रंथाध्ययनाचा आपल्या धर्मकीर्तनात कसा कौशल्यपूर्ण उपयोग करून घेतला आहे हे लक्षात येण्यासारखे आहे. ज्ञानेश्वरीत आलेल्या समर्पक उपमानांची सूक्ष्मता पाहून त्यांच्या आध्यात्मिक व आधिभौतिक अनुभवांची व्यापकता ध्यानात येते. तसेच भानु-प्रभा, सागर–संहिता, चंद्र–चकोर, चातक–मेघ आदी सांकेतिक स्वरूपाच्या पुनरूक्त उपमानांवरून त्यांच्या संस्कृत, वेदांत ग्रंथाध्ययनाचा व पूर्वकाव्य-साहित्य अध्ययनाचा पडताळा येतो, असा निष्कर्ष ग. श्री. हुपरीकर[२२] यांनी काढला आहे.

ज्ञानेश्वरीच्या वाङ्मयीन अभ्यासेतिहासात डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्या ज्ञानेश्वरीतील ‘विदग्ध रसवृत्ती’ (१९५३) या ग्रंथाला अद्वितीय स्थान आहे. सर्वांगीण स्वरूपाच्या या ज्ञानेश्वरीच्या अभ्यासात ज्ञानेश्वरांचे संस्कृत साहित्यशास्त्र व काव्यशास्त्र या विषयीचा व्यासंग विविध ठिकाणी दाखवून दिलेला आहे.

ज्ञानदेवांनी वाचले असावेत अशा ग्रंथांची यादी आणखीही वाढविता येतील. साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकर यांनी एक ठिकाणी म्हटले आहे की, लेखकाच्या लेखनात प्रगट झालेले ज्ञान हे तत्कालीन ज्ञानाच्या प्रगतीचे निदर्शक असते. त्यांत अनेक विषयांना स्पर्श केलेला असला तरी त्यावरून त्या लेखकाला त्या त्या प्रत्येक विषयांत तज्ज्ञ मानणे चुकीचे आहे. प्रस्तुत यादीसंबंधी असेच म्हणता येईल. ज्ञानदेवांच्या वाङ्मयात पूर्वसूरीच्या काही ग्रंथातील आढळलेल्या साम्यावरून तो तो प्रत्येक ग्रंथ ज्ञानदेवांनी अवलोकिला होता, त्याचा अभ्यास केला होता, त्याचा

संदर्भ घेतला होता असे मानणे अतिशयोक्तीचे ठरेल. परंतु एक मात्र खरे की ज्ञानदेवांच्या संभाव्य संदर्भ ग्रंथांची यादी थोडी फार का होईना अशा विचार-तरंगातून साकार होऊ शकेल.

---

१. तैसा व्यासांचा मागावा घेतु । भाष्यकारांते वाट पुसतु १८ – –१७२२, २. चित्रमयजगत, १९२१–१९२२, ३. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, १९४१, ४. पाच संतकवि, १९६३, पृ. १०, ५. अध्यात्मग्रंथ पाहती पैठणी । गीता संबोधिली जवळी असे भोगावती स्नान कालिका दरूशन । वेदांत व्याख्यान परिमिती सांगती पुराण हरि कीर्तनी । नामदेव ९०७ अभंग, ६. पाच संतकवि – पृ. १०, ७. पाच संतकवि पृ. ११, ८. महाराष्ट्र वाङ्मयाचा इतिहास खंड १, पृ. ५२१, ९. ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान, १९४१ (पृ. ४५३), १०. ज्ञानेशीय इशावास्य – ज्ञानेश्वर ऑगष्ट १९४८ ते १९५०, ११. ज्ञानेश्वरीचे शास्त्रीय मंथन, १९३८, १२. निळा म्हणे अैसियापरी । सांप्रदायाची थोरी । प्रगट केली ज्ञानेश्वरी । भगवदगीता उकलोनी । १५५८ वा अभंग, १३. 'महाराष्ट्र' नागपूर मार्च ते नोव्हेंबर १९५१, १४. संत पंत व तंत, १९५७, (पृ. ४०–५२) १५. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य १९५२ (पृ. २३३–२४६), १६. उपनिषदे व ज्ञानेश्वरी : काही साम्यस्थळे, विदर्भ संशोधन मंडळ, वार्षिक १९६३ (पृ. १४७–१५६), १७. संस्कृत योगवासिष्ठ व ज्ञानेश्वरी–अमृतानुभव योगवासिष्ठ आणि संत वाङ्मय, मराठी संत वाङ्मयावर योगवासिष्ठाचे झालेले परिणाम १९५४ (पृ. १५६–२६९), १८. याज्ञवल्क्य व ज्ञानेश, ज्ञानेश्वर, सप्टेंबर १९६० (पृ. ३–११४.) १९. महर्षि कवष व संत ज्ञानेश, ज्ञानेश्वर जून १९५९, (पृ. १–११), २०. ज्ञानेश्वरीतील कथा संदर्भ, ज्ञानेश्वरदर्शन, शास्त्रीयादि विषय, भाग, २, १९३४ (पृ. १८०–१९६), २१. सार्थ ज्ञानेश्वरी, १९५३, (पृ. ८५३–८६६ : काही पौराणिक कथानके) यांत संदर्भ दिलेला नाही, २२. सार्थ ज्ञानेश्वरी, आ. ८ वी (पृ. ८६८-८८२)– (ओवी संदर्भ व कथा यांसह, १९४१, ज्ञानेश्वरीतील प्रासंगिक कथानके), २३. तत्त्वज्ञ कवि श्री ज्ञानेश्वर, ज्ञानेश्वरदर्शन, साहित्य खंड, १९३४(पृ. २५६)।

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव व इतर ग्रंथ लिहिण्यामागील ज्ञानदेवांचा हेतू

श्री. स. के. नेऊरगावकर, पुणे

जग सुखी असावे

या विषयासंबंधी नाना विद्वानांनी नाना मते प्रतिपादन केली आहेत. ते आपआपल्या दृष्टिकोनातून मते मांडतात ते ठीकच असते. पण हेतू व परिणाम यांच्यामध्ये थोडा फरक करावा लागतो. गंगा ही समुद्राला मिळते, तिचे ध्येय समुद्राला मिळण्याचे असते. परंतु वाटेमध्ये ती तिच्या तीरावरील वृक्षांचे पोषण करते. तिच्या काठावरील गावातील लोकांची स्नानाची सोय करते. त्यांचे पाप-ताप हरण करते. पुढे धरणे बांधून कालवेही निघतात. ही सर्व सत्कृत्येच असतात व त्यामुळे सर्व प्रांत समृद्ध होतात. तसे, ज्ञानेश्वरांचे ज्ञानेश्वरी लिहिण्यामागे जे ध्येय होते ते आपण त्यांनाच विचारू या. त्या ज्ञानेश्वरीचा जगाला झालेला उपयोग हा कालपरत्वे भिन्नही असू शकेल आणि तो बदलताही राहील. पण सर्व काळातील सर्व देशांतील, सर्व मानवासाठी उपयोगी पडावी या हेतूनेच ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहिली–

'ईये मराठीचिये नगरी। ब्रह्मविद्येचा सुकाळु करी।
घेणे देणे सुखचि करी। होऊ देई या जगा।
दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो। — —

असे विश्व व जग यांचे उल्लेख ज्ञानेश्वरीमध्ये बरेच आहेत. त्यावरून आपला ग्रंथ सर्वकाळच्या जगासाठी आहे असा हेतू ज्ञानदेवांचा होता. आणि ज्ञानदेवांनी काय दिले? जगाला जे हवे होते ते दिले. जगाच्या आवडीनिवडी कालपरत्वें बदलतात. परंतु एक गोष्ट मात्र कधीच बदलत नाही ती म्हणजे सच्चिदानंदाची आवड. जगाला अमरत्व हवे, मरण नको. तसेच सुख मिळण्या-करिता जगतातील प्राणी अहर्निश धडपडत आहेत; परंतु ते त्यांना मिळत नाही व जे मिळते ते टिकत नाही.

शाश्वत सुख

ज्ञानदेवांच्या दृष्टीने सुख म्हणजे कायमचे असले पाहिजे. मरणासारख्या दु;खाचा त्या सुखाला स्पर्श होऊ नये.

हा अखंड आनंद जगाला मिळावा, स्वप्नातदेखील दुःखाचे दर्शन होऊ नये हा हेतू ज्ञानेश्वरी जगाला देण्यात त्यांचा होता. त्यांची ओवीच पाहा–

तैसा वाग्विलास विस्तारू। गीतार्थे विश्व भरू।
आनंदाचे आवारू। मांडू जगा।

ज्ञानेश्वरीद्वारा सबंध विश्वात त्यांना आनंद कोंदून भरायचा होता. सध्या आपण एखाद्या खोलीला एअरकंडिशन करतो; त्याप्रमाणे जगतातील मानवाला आनंदाचे आवार ज्ञानदेवांना करावयाचे होते. या आनंदाचे उगमस्थान कशामध्ये आहे याचा विचार ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीत केला आहे. सामान्यतः व्यवहारात मनुष्य हा इंद्रियद्वारा विषयांचा– शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध यांचा भोग घेतो. त्यामुळे त्याला आनंद मिळतो. ह्यात काहीच संशय नाही. परंतु तो आनंद टिकत नाही. आकाशामध्ये वीज चमकते त्यामुळे विजेचा प्रकाश पडतो पण तो दुसऱ्या क्षणाला नाहीसा होतो. त्याचप्रमाणे श्रीखंड सेवन केले, उत्तम गाणे ऐकले; उत्कृष्ट रूप पाहिले तर या द्वारा आनंद होतोच; परंतु तो दुसऱ्या क्षणीच नाहीसा होतो. शिवाय पुन्हा तो भोगण्याची हाव व तळमळ मात्र शिल्लक राहाते. पण तो विषय पुन्हा मिळेलच याची शाश्वती सांगता येत नाही. शिवाय, मनुष्याचे शरीरही थकत जाते म्हणून गीतेने किंवा ज्ञानदेवांनी या विषयांना अनित्य आणि असुखम् ठरविले आहे. प्रत्येकाजवळ आहे मग नित्य सुख कोठे असते ? याचा त्यांनी विचार केला. ते त्यांना प्रत्येकाच्या हृदयामध्ये आढळून आले. या सुखाचा अमर्याद साठा प्रत्येकाच्या ठिकाणी आहे. परंतु मनुष्याला त्याची जाणीव नसते म्हणून बाहेर विषयांकडे धावत असतो. या ठेव्यालाच 'सर्व सुखांचा आरामु' असा राम म्हणतात.

सुखाचा मार्ग गीतेत आहे

त्या रामाची जाणीव नसणे, हे अज्ञान. ती जाणीव करून देण्यासाठी म्हणजे अज्ञान घालविण्यासाठी– ज्ञान हा उपाय आहे. ते ज्ञान ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत करून दिले आहे.

हे ज्ञान प्रत्येकाच्या ठिकाणी एकदम उत्पन्न होऊ शकत नाही. उदा. तलावात पाणी साठविले आहे ते पाणी जर स्वच्छ नसेल किंवा हलत असेल तर पाण्यामध्ये पडलेला पदार्थ वरून दिसत नाही. त्यासाठी ते पाणी स्वच्छ नि स्थिर करावे लागते.

त्याप्रमाणे हृदयस्थ असलेल्या श्रीरामाचे दर्शन मनुष्याला घडत नाही कारण त्याचे हृदय मलीन व अस्थिर असते. ती मलीनता घालविण्यासाठी, तसेच मन

स्थिर करण्यासाठी कर्म, उपासना हे मार्ग सांगितले आहेत. असे हे मन शुद्ध व स्थिर झाले म्हणजे मग ज्ञानाचा उपयोग होतो.

कर्म उपासना व ज्ञान या तिन्ही मार्गांचे विवेचन गीतेमध्ये केले असून त्याद्वारा भगवद्‌दर्शनाचा मार्ग दाखविला आहे. ज्ञानदेवांनी लोकांना सुख देण्यासाठी लोकांचा अवघाचि संसार सुखाचा करण्यासाठी, गीतेचा अंगीकार केला.

मराठीत गीता

परंतु ही गीता तर पडली संस्कृतात. आणि संस्कृत भाषा तर पंडितांखेरीज करून इतरांना दुर्बोध व अगम्य होती. त्यामुळे गीता जरी उत्कृष्ट असली तरी, तिचा उपयोग इतरेजणांना होत नव्हता. तेव्हा सर्व लोकांना देवाचे सर्व सुख मिळावे म्हणून ज्ञानदेवांनी त्या ग्रंथांचे मराठीत रूपांतर केले.

सुस्पष्ट अर्थ

ज्ञानदेवांना हेही आढळून आले की, केवळ भाषांतर करून हे काम भागणार नाही, तर त्याचे स्पष्टीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून त्यांनी का व कसे या मार्गाचा अवलंब केला. तसेच ही गोष्ट का व कशी असावयास हवी याचे सुंदर विश्लेषण त्यांनी केले. म्हणून सामान्य साधकाच्या दृष्टीने या ग्रंथाचे मोल मोठे आहे. कारण त्यात सुखाच्या मार्गाची सुस्पष्टता आहे. साधक सुखासाठी साधना करीत असता, वाटेत ज्या अडचणी, अंतराय येतात तेही ज्ञानदेवांनी सांगितले आहेत. शेवटी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मनुष्य हा बहिर्मुख आहे. त्याच्या इंद्रियांची रचनाच अशी आहे की, त्याची बाहेरच्या विषयांकडेच ओढ आहे आणि देव आहे आतमध्ये, त्या देवाचे दर्शन होण्यासाठी ती अंतर्मुख करावी लागतात. त्याकरिता इंद्रियनिग्रहाची साधना करून त्यांना हळूवारपणाने अंतर्मुख करावे लागते. हे करण्यासाठी ज्ञानदेवांनी त्यांना उपजत प्राप्त असलेल्या साहित्यकलेचा उपयोग केला.

शृंगाररसावर मात करणारा शांत रस

मनुष्याची ओढ शृंगार रसाकडे असते तेव्हा त्या शृंगाररसावर मात करील अशा शांत रसात ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथाची रचना करून तो शब्दालंकार व अर्थालंकारांनी नटविला. या अलंकारिक रचनेमुळे खेचरवृत्तीच्याही मनाला सात्त्विकाचा पान्हा फोडला. सुमनांना तर समाधी सुखाचा अनुभव मिळाला. सारांश– गीतेतील सातशे श्लोकांचा विस्तार ज्ञानदेवांनी सुमारे नऊ हजार ओव्यात करून गीतेचा अर्थ मराठी भाषेत सुसेव्य केला, त्याचबरोबर जगताचेही पांग फेडले : ज्ञानेश्वरीची भाषांतरे जसजशी परदेशीय भाषांत होत जातील तसतसा हा ज्ञानदीप अधिकाधिक अखंड प्रकाश देत राहील.

पसायदानातील मागणी

ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथांचे शेवटी आपल्या गुरूंच्याजवळ जे पसायदान मागितले आहे त्यावरून त्यांची जगताला सुख मिळावे म्हणून असणारी तळमळ व्यक्त होते. ही तळमळ आईच्या अंत:करणातील आहे. एखाद्या माऊलीला दोन-चार मुले असावी आणि त्यातील दुर्दैवाने एखादे पंगू असले तर तिचे खरे लक्ष त्या मुलाकडे असते तसे ज्ञानदेवांचे लक्ष, जे देवाला विन्मुख आहेत, ज्यांना हिताचे काही कळत नाही, केवळ विषयभोग भोगतात आणि तो विषयभोग भोगताना सज्जनांचा छळ करतात अशा खळ व्यक्तींच्यासाठी त्यांनी प्रार्थना केली आहे. माशी ज्याप्रमाणे अन्नातून पोटात जाते आणि मरते. तसेच ज्याच्या पोटात जाते त्याच्या पोटातील अन्नही बाहेर काढते, तसेच खळ पुरुष असतात. म्हणून त्या खळांचा दुष्टपणा जावा, त्यांना सत्कर्म करण्याची बुद्धी व्हावी, जगतामध्ये सत्कर्म करणारी चांगली माणसे असली म्हणजे सुख वाढेल, म्हणून त्यांची ही मागणी आहे. अज्ञानाचा अंधःकार जावा. त्यासाठी विश्वातील लोकांनी आपआपल्या वाट्याला आलेली कर्मे करीत राहावी. त्यामुळे जगात शांती, समाधान, आनंद वाढावे अशी माऊलीला तळमळ आहे–

जे खळांचि व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचे ।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील । तो ते लाहो । प्राणिजात ।

जगतामध्ये सज्जन, परोपकारी, ईश्वरनिष्ठ मंडळी राहतील तितकी जगाची स्थिती चांगली राहील. पाखांडी, कुतर्क करणारे, तशीच भोगलोलुप मंडळी वाढली, तर ती आपल्या स्वार्थाकरिता, सज्जन लोकांचा छळ करतील; त्यामुळे जगताची हानी होईल. म्हणून या मंडळीच्या बुद्धीत पालट पडला पाहिजे. दुष्ट बुद्धी जाऊन, सुबुद्धी आली पाहिजे. श्रीकृष्णाच्या गुणांमध्ये ही मंडळी रंगली तर त्या गुणांचा आविष्कार त्यांच्या चित्तावरती निश्चित होईल. म्हणून ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथामध्ये सज्जनांचे संकीर्तन केले आहे. हेतू एकच– जग सुखी असावे, त्रैलोक्य आनंदाने भरून जावे.

किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकीं ।
भजिजो आदि पुरुखिं । अखंडीत ।।
पुढत पुढत पुढती । या ग्रंथ पुण्य संपत्ती ।
सर्व सुखि सर्व भूति । संपूर्ण होईजे ।

ज्ञानदेव पूर्ण सुखी होते.

शिव शिवा समर्था स्वामी । एवढिये आनंद भूमी ।
घेणे दीजे आम्ही । ऐसे केले ॥

म्हणूनच त्यांना ते जगताला देता आले.

विज्ञानाच्या शोधांनी मनुष्याचे जीवन कमी त्रासाचे, कमी कष्टाचे झाले आहे; पण सुखाचे झाले नाही. कारण सुखाचा संबंध शरीराशी नसतो. मनाशी असतो. मन रामरूप झाले तरच हे सुख मिळते. मनाला श्रीरामाच्या रंगात रंगविण्याचे उपाय ज्ञानदेवांनी सांगितले आहेत.

卐 卐 卐

ज्ञानराज माझी योग्यांची माउली । जेणे निगमवल्ली प्रकट केली ॥ १ ॥
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंद लहरी प्रगट केली ॥ २ ॥
अध्यात्म विद्येचे दाविलेसे रूप । चैतन्याचा दीप उजळिला ॥ ३ ॥
छपन्न भाषेचा केलासि गौरव । भवार्णवी नाव उभारिली ॥ ४ ॥
श्रवणाचि मिषे बैसावे येउनी । सामराज्य भुवनी सुखी नांदे ॥ ५ ॥
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ॥ ६ ॥

— नामदेवांची आदि

ज्ञानदेव व चांगदेव

डॉ. सरोजिनी शेंडे, मुंबई

तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात ज्ञानदेव हे थोर संत, दृष्टे कवी, तत्त्वज्ञ आणि साक्षात्कारी पुरुष झाले. त्यांनी ज्ञानेश्वरी ही भगवद्‌गीतेवरील काव्यात्म व मर्मग्राही टीका लिहून भागवतधर्माला वा वारकरी पंथाला तात्त्विक अधिष्ठान दिले त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वामुळे सारा समाज प्रभावित झाला. त्यांच्या 'जग असकी वस्तुप्रभा' या तात्त्विक विचाराने 'अधिकारी' मने संस्कारित झाली व 'जें जें भेटे भूत। तें तें मानी भगवंत' या विचाराने सामान्य मानवाला व्यापक व उदार मानवतावाद शिकविला. त्यांनी जनसामान्यांची संकुचित दृष्टी समष्टीच्या विशाल जीवनौघाकडे वळविली व त्यातच त्यांना परमेश्वराचा साक्षात्कार घडविला. त्यांच्या जीवनदृष्टीने व अध्यात्मविचाराने संस्कारित झालेला संतमेळा ज्ञानदेवांच्या तत्त्वज्ञानाचा व जीवनकार्याचा प्रसारक बनला. यांपैकीच ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील चांगदेव हे एक होत. या प्रभावळीतील त्यांचे स्थान वैशिष्टयपूर्ण आहे.

चांगदेवांचे चरित्र

चांगदेवांच्या साद्यंत जीवनकथेचे दर्शन महिपतीरचित भक्तलीलामृताच्या दोन ते आठ या अध्यायांत घडते. त्याचा संक्षिप्त भाग भक्तविजयाच्या बाविसाव्या अध्यायात आढळतो. हे चरित्र महिपतीकृत इतर संतचरित्रांप्रमाणे पौराणिक पद्धतीने लिहिले आहे.

इंद्राचा सेवक मरुद्‌गण याच्या हातून स्वामिकार्यात अनवधानाने काही प्रमाद घडला म्हणून इंद्राने त्याला शाप दिला. अशी कथा भक्तलीलामृतात (अ. २) आहे. इंद्रशापामुळे मरुद्‌गण खानदेशात 'तपती' (तापी) नदीच्या व 'पयोष्णा' (पूर्णा) नदीच्या रमणीय संगमावर 'स्वरूप लावण्य' घेऊन जन्माला आले. त्यांच्या सौंदर्यामुळे भोवतालचे लोक त्यांना 'चांगा' म्हणजे सुंदर म्हणू लागले. तापीतीरी त्यांनी दीर्घकाल तपश्चर्या केली.

ल. रा. पांगारकरांनी दिलेल्या माहितीनुसार तापी-पूर्णा नदीच्या संगमाजवळ एदलाबाद या गावाशेजारी चांगदेव नावाचे गाव आहे. गावातील टेकडीवर

यादवकालीन चांगदेवाचे एक प्राचीन मंदिर आहे. या स्थानी चांगदेवांचा जन्म झाला असावा. या मंदिराच्या दारावर एक अस्पष्ट झालेला शिलालेख आहे.

चांगदेव ऊर्फ चांगा वटेश्वर

चांगदेव, चांगा वटेश्वर वा चांगा वटेश ह्या ज्ञानदेव समकालीन एकाच चांगदेवांच्या नाममुद्रा आहेत. त्यातील ' ' वटेश्वर ' हे चांगदेवांचे उपास्यदैवत असावे ' असे विधान डॉ रा. द. रानडे यांनी आपल्या ' Mysticism in Maharashtra ' या ग्रंथात केले आहे. हा त्यांचा तर्क अगदी बरोबर आहे. ह्या तर्काच्या पुष्टचर्थ अनेक आधार उपलब्ध आहेत. चांगदेव हे शैव होते. भक्तलीलामृतातील दुसऱ्या अध्यायातील यासंबंधीची कथा कपोलकल्पित असल्याने तिचा विचार करण्याचे कारण नाही.

एक गोष्ट निश्चित-चांगदेव हे शिवोपासक होते. वटेश्वर हे विशिष्ट शिवाचे नाम, जसे विश्वेश्वर, महाकालेश्वर, त्र्यंबकेश्वर वगैरे. ' ईश्वर ' ही संज्ञा शंकराच्याच संदर्भात योजितात. चांगदेवांनी वटेश्वराला उद्देशून लिहिलेल्या दोन आरत्या आढळतात. त्या पुढीलप्रमाणे आहेत :—

आरत्या

(१) **वटेश्वरू देवो** तारकु माझा । दैवाची उजरी दिनकरु शोभा,
आदीअंतीं सोम झळकत नभा । तैसी तप्तीतीरीं साधुसंतांची सभा ।
जय जय आरती येथें प्रेमाच्या धारा । वर्षत अमृतराज गेला सागरा ।
येथीचे उद्‌गार न समाती देहीं । उन्मळीत थंडी गेली ज्ञानडोही ॥
पाठी ना पोट आदिअंतु नाहीं । त्रिकाळ गर्जती साधुसंत पाहीं ॥
येथ मुक्ताई तारू चांगला पोहणारु । गेला पैलथडीये केला उतारु ।
वटेश्वरीं गर्जतां नाही आपपरु । सोपाना आलंगी विसोबा खेचरु ॥
साधुसंतां वीरीं गर्जतां अंबर । टाळश्रुती गरुडउटके यांचे भार ।
जय जय शंकरा कोंदाटलें महाद्वार । लोळती सनकादीक सेविती ब्रह्म ।
.... अपार ॥
.... । चांगा म्हणे अवघा जाला **वटेश्वरू** ॥

(२) तप्तीतीरीं देव प्रगट जाला । — । आतां विवेक तारावया आला ।
प्रगटली मूर्ति आनंद जाला । जय जय आरती जय **वटेश्वरा** ।
निराकार साकार तूंचि **शंकरा** । सद्‌भावें आरती तुज परात्परा ।
भक्त तारावया कर्पूरगौरा ॥ ध्रु ॥

ज्ञानदेव माउली भेटें आम्हां । तोडिले भवदोष संसारश्रमा ।
मुक्ताई अंजन तिने दाविले ब्रह्मा । निश्चया निश्चित जालों निष्कामा,
धन्य वटेश्वर धन्य मुक्ताबाई । धन्य नामदेव ज्ञानदेव पाही,
नित्यनेम चालतां आरती सोई । प्रकाशी प्रकाश सोहंदीप हृदयीं ।।
बाविस जन्म जाणें भक्तीचे सुख । तेचि प्रेमें आम्हां केलें सन्मुख ।
मुक्ताई प्रसादे चांगावटेश्वरी ऐक्य । ओवाळित पंचारति चांग्या लय लक्ष ।

या दोन्ही आरत्यांतील वटेश्वर हे शंकर या समानार्थक उपयोजिलेल्या पदांतून ' वटेश्वर ' हे चांगदेवाचे उपास्यदैवतच याविषयी संदेह राहात नाही.

चांगदेवांना उद्देशून ' चांगदेवपासष्टी ' हे पासष्ट ओव्यांचे आत्मज्ञान-परिप्लुत पत्र पाठविताना ज्ञानदेवांनी सुरुवातीला ' स्वति श्रीवटेशु ' हे चांगा वटेश यांना उद्देशून लिहिले आहे. त्याच पत्रात विषयनिरुपणात ३७ व्या ओवीत ज्ञानदेव म्हणतात—

तया पुत्र तूं वटेश्वराचा । रवा जैसा कापुराचा ।
मज तुज आपणयाचा । बोल ऐके ।।

हा उल्लेख पिता-पुत्रनात्याचा नसून परमात्म्यासंबंधीचाच आहे, हे नंतरच्या चरणांवरून स्पष्ट होते. चांगदेवांच्या ' तत्त्वसार ' या ग्रंथात ' कथिलें **वटेश्वर** प्रसादें । योगरहस्य हें ।। असा उल्लेख आहे. तो उपास्यदैवताचाच असावा.

चांगदेवांचे अनेकत्व

चांगदेवांच्या ' चौदाशे वर्षे आयुर्मानांचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो.

(१) ' चवदाशें वर्षें शरीर केले जतन । नाही अज्ञानपण गेले माझे ।।
अभंग ११४२ चांगदेवांची समाधी;
—सरकारी नामदेव गाथा

(२) चौदाशें वर्षे श्रम केला । काळापासून नरदेह रक्षिला ।
आंगीं सिद्धाईचा ताठा भरला । सबाह्य वेष्टिला अहंकारें ।।
भक्तलीलामृत ४.७४

(३) फार दिवस तुम्ही रक्षिले शरीर । मुक्ताईनें पार उतरिले ।।
अ. ११५५ चांग. समाधी; नामदेवगाथा.

(४) वोझें जुनाट अति टाकुनि शुद्ध झाला ।
ज्ञानेश्वर विजय—५.१६

या व अशा उल्लेखांतून चांगदेवांचे दीर्घ आयुर्मान वारंवार सांगितले आहे. भक्तलीलामृतात चांगदेवांनी योगसामर्थ्याने मृत्यूला हुलकावणी देऊन चौदाशे वर्षे देह रक्षण केला, असा कथाभाग सांगितला आहे. शिवपूजनाने शिववर मिळवून सर्व सिद्धी चांगदेवांना प्राप्त झाल्या. त्यामुळे त्यांना ' ब्रह्मज्ञानाची कळा । स्वप्नींही नसे त्याच्या डोळा । येविषयीं तो असें आंधळा । म्हणोनि अवकळा अवघ्याची ।। (भ. लीलामृत ४.७५) फार गर्व झाला. अशा स्थितीत त्यांना आत्मज्ञानी ज्ञानदेवांची महती कर्णोपकर्णी ऐकू आली. नामदेवांनी ' आदि ' मध्ये म्हटले आहे,

' उपजतांचि ज्ञानी हें वर्म जाणोनि । आले लोटांगणीं चांगदेव,

(८९९ ना. गाथा)

ज्ञानदेवांची योग्यता जाणून हठयोगी चौदाशे वर्षांचे चांगदेव त्यांना शरण आले हा या साऱ्या वृत्तान्ताचा मथितार्थ होय.

' चौदाशे वर्षांचे जीवनमान ' याचा वाच्यार्थ न घेता दीर्घ आयुर्मर्यादा असा लाक्षणिक अर्थ घेणे उचित ठरावे. यासंबंधी डॉ. रानडे यांनी Mysticism in Maharashtra या ग्रंथात दोन तर्क नमूद केले आहेत,

(१) चांगदेव नावाच्या अनेक व्यक्ती असाव्यात.
(२) एकाच चांगदेवाला अनेक गावी अनेक नावे मिळाली.
(३) चांगदेव हे कुलनाम असावे.

निळोबा पिंपळनेरकरांनी असे सूचित केले आहे की, एकाच चांगदेवांची चौदा नावे असावीत. श्री. शं. गो. तुळपुळे यांच्या मते निळोबांच्या विधानांचा अर्थच चांगदेवांचे आयुष्य चौदाशे वर्षांचे असे सामान्यपणे मानले गेले असावे. चौदा नावांचे चौदाशे वर्षांच्या आयुष्याशी समीकरण झाले असावे.

चांगा वटेश्वर अथवा चांगदेव हे जसे ज्ञानदेवांचे समकालीन तसेच चांगा केशवदास हेही ज्ञानदेव–नामदेवांचे समकालीन असावेत. संतमेळ्यातील ते एक असावेत असे त्यांच्या उपलब्ध अभंगांवरून जाणवते. ' केशवदास चांगा पाईं राख । मातें राख विठ्ठला ।।' अशी नाममुद्रा असलेले, नामदेवांच्या अभंगवाणीचा प्रभाव आढळणारे अभंग चांगा केशवदासांचे आहेत. पंधराव्या शतकात झालेल्या चांगा मुधेश व चांगा मरुद्‌गण या नावाचे, चांगा वटेश्वरांच्या नावाशी संभ्रमामुळे नाव जोडले असावे. महिपतीने भक्तलीलामृतात योजिलेले इंद्र सेवकाचे नाव ' मरुद्‌गण ' हें यांपैकी एका चांगदेवाचे कुलनाम असावे.

ज्ञानदेव व चांगदेव

चांगदेवांनी कोरे पत्र पाठविल्यावर ज्ञानदेवांना निवृत्ती-नाथांनी सुचविले,

ज्ञानसागरा ऐक सत्वर। तूं तरी सिद्धांत वक्ता चतुर।
चांगदेवासी ऐसें ल्याहावें उत्तर। जेणें बोधेल अंतर तयाचें ।।

भक्तलीलामृत ४–८०

ही पार्श्वभूमी सत्य असावी असे 'चांगदेवपासष्टी' च्या प्रारंभावरून वाटते. चांगदेवपासष्टीची सुरुवात–'स्वस्ति श्रीवटेशु' या पत्राच्या मायन्याने झाली आहे. ह्या क्षेमचिंतनानंतर 'जग असकी वस्तुप्रभा' याच सिद्धान्ताचे विवरण करायला सुरुवात करतात. चांगदेवांसारख्या अधिकारी व्यक्तीला विषयाच्या प्रस्तावाची आवश्यकता नाही, असे जाणून ज्ञानदेव इतरत्र आपल्या विवेचनाला सुरुवात करतात तशी इथे करीत नाहीत. तर ते परमात्मा, गुरू व स्फूर्तिदात्री देवता सरस्वती यांना वैशिष्टचपूर्ण शब्दात नमन करतात व विषयाचे महत्त्व विशद करीत त्याचे अन्वय व्यतिरेकाने नेमके रूपदर्शन घडवितात. चांगदेवपासष्टीत स्वस्तिवचनानंतर सरळ विषयालाच शब्दगोचर करतात. परमात्मा प्रकट होत नाही व लपतही नाही, तर वस्तुतः जगदादि सर्व परमात्माच आहे. हाच विचार ज्ञानेश्वरी व अमृतानुभवात साकल्याने मांडला आहे, तसाच इथेही दृष्टान्तासह स्पष्ट केला आहे.

'बहु जंव जंव होय। तंव तंव कांहीच न होये।
कांहींच न होनि आहे। अवघाचि जो ।। ३ ।।
सोनें सोनेपणा उणें। न येतांचि झालें लेणें।
तेंवि न वेंचतां जग होणें। अंगें जया ।। ४ ।।
कल्लोळ कुंचुक। न फेडितां उघडें उदक।
तेवी जगेंसी सम्यक। स्वरूप जो ।। ५ ।।
परमाणूचिया मांदिया। पृथ्वीपणें न वचेचि वाया।
तेवि विश्वस्फूर्ति इया। झाकवेना जो ।। ६ ।।
कळांचेनि पांघरणें। चंद्रमा हरपो नेणें।
कां वन्ही दीपपणें। आन नोहे ।। ७ ।।
तेंवी शिवोनी पृथ्वीवरी। भासती पदार्थांचिया परी।
प्रकाशे, ते एकसरी। संवित्ति हें ।। १२ ।।
बांधयाचिया मोडी। बाधा न होनि गुळाची गोडी।
तयापरी जग परवडी। संवित्ति जाण ।। १४ ।।
घडियेचेनि आकारें। प्रकाशिजे जेवीं अंबरें।
मेवी विश्वस्फूर्ति स्फुरे। स्फूर्तिचि हे ।। १५ ।।' –चां. पा.

असा हा स्फूर्तिवाद ज्ञानदेवांनी चांगदेवांना सांगितला. ज्याप्रमाणे आरशात पाहाण्यापूर्वीं व पाहिल्यानंतर मुख हे असतेच; ते आरशात दिसत असताना ते काही वेगळे असते का ?

‘ दर्पणाच्या आधीं शेखीं । मुख असतचि असे मुखीं ।
माजी दर्पण अवलोकीं । आन कांहीं होये ? ॥ २६ ॥ ’

त्याप्रमाणेच त्या ज्ञानस्वरूप परमात्म्याला अज्ञानाचा स्पर्श नाही व तो स्वतः ज्ञानरूप असल्यामुळे त्याला जाणण्याचा व्यवहार कसा होणार ?

‘ जे जाणणेंचि कीं ठाईं । नेणणें कीर नाहीं ।
परि जाणणे म्हणोनियांही । जाणणे कैचे ॥ ३२ ॥
यालागीं मौनेचि बोलिजे । कांहीं न होनि सर्व होइजे,
नव्हता लाहिजे । कांहींच नाहीं ॥ ३३ ॥
जे देखिजतेंविण । एकलें देखतेपण ।
ते असो, आपणिया आपण । आपणचि जें ॥ ३५ ॥

असे परमात्म्याचे स्वसंवेद्य स्वरूप स्वयंप्रकाशी व आनंदरूप आहे. ह्या ज्ञानाचा साक्षात्कार होताच चांगदेव तो आत्मप्रत्यय शब्दांकित करू लागले.

ज्ञानेश्वरांच्या काव्याचा संस्कार

चांगदेवांच्या मनावर ज्ञानदेवांच्या तात्त्विक विचारांचा प्रभाव पडला. मुक्ताबाईच्या उपदेशाने ते ज्ञान मनोमनी एकरूप झाल्यावर चांगदेवांच्या काव्यरूपात ज्ञानदेवांच्या रचनेचा प्रतिसाद येऊ लागला. ज्ञानदेवांची प्रतिमाने, शब्दकळा, अनुभवाला शब्दरूप देण्याची पद्धती या साऱ्या काव्यव्यापारात ज्ञानदेवांचा सांद्र संस्कार चांगदेवीकाव्यात आढळतो. किंबहुना ज्ञानदेवांच्या अभंगवाणीचे अनुकरण संतमेळ्यातील कोणाही संताला– चांगदेवांखेरीज– कोणालाच करता आले नाही; जमले नाही. संतमेळ्यातील संतांच्या अभंग वाङ्मयाची प्रेरणा नामदेवांच्या अभंगगाथेत होती. विठ्ठलावरील गाढ प्रेम, भक्ताची आर्त भावना, विठ्ठलाच्या वियोगाचे, ताटातुटीचे तीव्र दुःख, त्याची आळवणी व केव्हा केव्हा त्याच्याशी (विठ्ठलाशी) केलेला प्रेमकलह, कृतककलह वा खरेखुरे भांडण, प्रेमाची सलगी व जिव्हाळ्याचे नाते इ. विषय ज्ञानदेवांच्या भावकाव्यात आढळतात. हेच विषय प्रत्येक संतकवीने आपापल्या क्षमतेनुसार आपल्या अभंगांत शब्दांकित केले आहेत.

ज्ञानदेवांच्या अभंगातील आशय प्रगल्भ, सूक्ष्म व तरल आहे. त्यांच्या आनंदमय विश्वात्मक वृत्तीचा सुखद अनुभव शब्दाशब्दांतून पाझरतो व श्रोत्यांना वा वाचकांना अंकित करतो. हा अतींद्रिय अनुभव साऱ्या इंद्रियांच्या संवेदना फुलवीत;

रोमांचित करीत असता पुनःपुन्हा आनंदाला आनंदाचे नवेंनवे उन्मेष फुटून ते विकसित होत जातात. कधी हा आशय प्रेमळ भक्ताचे मनोगत सांगतो–

' गातां वातां नाचतां प्रेमे उल्हासें। चराचरींचे दोष नाशियले अनायासें ।।
हरि मनीं हरि चित्तीं हरि अंकुशरीरीं। तयाते देखोनि हरी चारी बाह्या पसरी ।। ' –ज्ञाने. गाथा. ३

असा चारी बाहुचांनी भक्ताला आलिंगन देणारा भक्त परमेश्वराचा प्रेम-सोहाळा अभंगात आढळतो. तर विराण्यात परमेश्वराचे चिंतन करणारी विरहिणी आपली स्थिती विविध रीतींनी चितारते–

(१) जाणों गेल्यें तंव जाणणें राहिलें। पाहों गेलियें तंव तेंचि जाले गे माय।।

(२) घनु वाजे घुणघुणा वारा वाजे रुणझुणा। भवतारकु हा कान्हा वेगीं भेटवा कां ।।
चांदवो चांदणें चापेवो चंदन। देवकीनंदणेंवीण नावडो वो ।।

(३) अवचिता परिमळु झुळकला अळुमाळु।
मी म्हणे गोपाळु आला गे माये ।।
चांचरती चांचरती बाहेर निघालें।
ठकचि मी ठेले काय करूं ।।

ज्ञाने. गाथा. (संपा. प्रकाशक : तात्या नेमिनाथ पांगळ, १९२७.)

ज्ञानदेव हे आणखी एका रीतीने या सगुणनिर्गुणाचे वा निराकारसाकाराचे रूपवर्णन काही अभंगात करतात. उदा.

आकारीं नाहीं ते निराकारीं पाही। निराकारीं राही शून्याशून्य

किंवा कूटात्मक रचना :–

(१) वऱ्हाड न होतां होतो खेळेमेळे। लग्न लागले कवणे दृष्टवेळे।
तेथूनि अंबुला चालवितो माते। कैसेनि येथें निस्तरावें ।। ' ।। ३८ ।।

(२) ' मज स्वप्नी लेवविला शृंगारू। माझे उदरीं जन्मला भ्रतारू '।। ३९ ।।

अशाच आशयाचे, अशाच प्रतिमानांचा उपयोग केलेले चांगदेवांचे अभंग आढळतात. सकलसंतगाथेत उपलब्ध असलेले वानगीदाखल काही अभंग असे आहेत.

चांगदेवांचे अभंग

(१) निरंजन वनीं केशव फुलला। डोंगर शोभला ब्रह्मगिरी।
तेथें सुमन झाडीन अनुहातें। शिष्ट अनुभवुनि बुद्धि तोचि जाला।
चांगा वटेश्वरी केशव फुलला। भ्रमर जाला रस घ्यावया ।।

(२) आनंदवनी भ्रमर होता । झुरकर उडाला गेला केउता ।
नाम नाहीं रूप नाहीं । पाहों गेलों तो कांहीच नाहीं ।
ऋषी राहिला शब्द निमाला । वटेश्वर चांगा विस्मित झाला ।।

ज्ञानदेवांनी ' अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवी ' या प्रतिज्ञोत्तरानुसार ज्या ' अमृतानुभवा ' चा साक्षात्कार घडविला, त्याचाच हा अनुकार आहे.

सगुणनिर्गुणाचे गूढ उकलून दाखविताना चांगदेव पुढील योजना करतात–

आकार पूजिता निराकार जालें । शून्यीं बुडालें बाईयांनो ।
शून्याचा अंकुर शून्य फळलें । व्योमाकार जालें मन तेथें ।।
तेथें फळ ना डाळ, जाति ना कूळ । वटेश्वर चांगा जाला निर्मळ ।।

ज्ञानेश्वरांच्या विराण्यांचा प्रभाव चांगदेवांचा काही अभंगांवर आशय व शब्दकळा या दोन्ही रीतींनी दृष्टोत्पत्तीस येतो.

(१) अवघीयां डोळां पाहूं गेलीये । तंव अवघा अवघेचि जालीये ।
काय सांगों गे माये अवघाचि आहे । अवघे नसीं पाहे वटेश्वरीं ।।

(२) पाहों गेलें तंव मी माझी हारपलें । ठकचि ठेलें काय सांगो ।।
मन ब्रह्मीं वेडावले । सोहं शब्द हारपलें ।।

कूटात्मक रचना :

(१) सासूचे आधी सून जन्मली । सून मारून सासू वो नोवरी जाली ।
आचोजीं चोजवितलें । तें स्वर्गीं जाणवलें रे भाई ।
पुत्र पितियाचा व्रतबंध करी । वांझ सासू कन्यादान जे नोवरी ।
सिद्धांतींचें वर्म अनुभवीं जाणें । वटेश्वर चांगा बोला खुणें ।।

(२) नोवरीचे हातीं चित्रीव काठी । नोवरी लागे संन्याशापाठी ।
नारायण म्हणा नारायण म्हणा । नारायण म्हणावो नोवरीये ।
विश्वरूप नोवरी संन्याशा रातली। त्या आम्हां भली सोयरीक जाली ।
दिगंबर नोवरा क्षपणिक वऱ्हाडी । वटेश्वर चांगा वाहातो लुगडीं ।।

या व अशाच प्रकारच्या चांगदेवांच्या अभंगरचनेत ज्ञानदेवांच्या काव्याचा अनुकार आढळतो. ज्ञानदेवांचे आध्यात्मिक व्यक्तित्व व काव्य यांनी चांगदेव विनम्र झाले. त्यांचा योगसामर्थ्याचा सारा ताठा लोप पावून ते ' नमो निवृत्ती ज्ञानस्वामीं ' च्या चरणी लीन झाले. त्यांना ज्ञानदेवांच्या आदेशानुसार मुक्ताबाईने गुरूपदेश केला.

मुक्ताबाई व चांगदेव :

चांगदेव ऊर्फ चांगा वटेश्वर ह्यांना ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाई यांनी गुरूपदेश केला. यासंबंधी संत नामदेवांपासून ते निरंजन माधव यांनी, मुक्ताबाईंनी चांगदेवांना आत्मज्ञानाचा साक्षात्कार घडविला, अशा आशयाचे उल्लेख अनेकदा केल्याचे दृष्टोत्पत्तीस येते. स्वतः चांगदेवांनी वटेश्वराच्या आरतीत केलेले उल्लेख अभ्यासण्याजोगे आहेत–

(१) ज्ञानदेव माउली भेटे आम्हां । तोडिले भवदोष संसारश्रमा ।
मुक्ताई अंजन तिनें दाविलें ब्रह्मा । निश्चया निश्चित जालों निष्कामा ।

यामध्ये ज्ञानदेव व त्यांची भगिनी मुक्ताई यांचा ऋणनिर्देश केला आहे. तसेच 'मुक्ताई प्रसादें चांगा वटेश्वरीं ऐक्य' असा दुसऱ्या आरतीत उल्लेख केलेला आढळतो. 'धन्य वटेश्वर धन्य मुक्ताबाई । धन्य नामदेव ज्ञानदेव पाही' हाही चरण त्याच आरतीमधला आहे. ज्ञानदेव–नामदेवांच्याबरोबरच येणारा मुक्ताबाईचा उल्लेख ज्ञानदेवभगिनीचाच असून डॉ. रा. चिं. ढेरे यांनी प्रतिपादन केलेला 'श्रीमुक्तादेवी योगिनी' चा नव्हे, हे लक्षात यावे.

नामदेवरचित 'चांगदेवाची समाधी' या प्रकरणात मुक्ताबाईंच्या चांगदेवावरील पुत्रनिर्विशेष प्रेमभावाचा प्रत्यय वारंवार येतो. समाधी घ्यायला निघालेल्या चांगदेवांना 'मुक्ताईने चांगा घेतलासे पोटा, उठा आता भेटा लहान थोर'।। असा किंवा–

'अभिमानें आलो श्री आळंकापुरी । अज्ञान केले दुरी मुक्ताईने' असे उद्‌गार अनेकदा आढळतात.

'मुक्ताई आणि चांगदेव यांचा संवाद' या प्रकरणात चांगदेव मूलगामी प्रश्न विचारतात व मुक्ताबाई त्यांचे शंकासमाधान करताना दिसतात. हे प्रश्न ज्ञानदेवांच्या 'ज्ञानदेवी' व 'चांगदेवपासष्टी' तील तात्त्विक विचारांवर आधारित आहेत. उदा०

'चांगा म्हणे बाई सांग मुक्ताबाई, लटिकें साच वर्तते देहीं'

ज्ञानदेवीच्या बाराव्या अध्यायातील मंगलाचरणातील गुरुमाऊलीच्या वात्सल्याचे दर्शन त्याच आशयाच्या मुक्ताबाईंच्या वृत्तीत आढळते :

अविनाश पाळणा अव्यक्तें विणिला । तेंथें पहुडला योगीराज ।
जो जो जो जो म्हणतेस माया । साकारातीत निज रे चांगया ।
सोहं सोहं षट्‌चक्रीं न्यासें । तुज परिये देतां मीच न दिसे ।
ऐसी निद्रा तुज लागो रे पुत्रा । मुक्ताई खेचरा उपदेशी मंत्रात ।

किंवा

गुण ना निर्गुण शब्दातीत । तेथें तूं निश्चित बाळा निज ।
पाळणा लाविला हृदयकमळीं । मुक्ताई जवळी सादविते ।।

चांगदेव मुक्ताबाईंना माता मानीत व मुक्ताबाई त्यांना पुत्र मानीत हे वरील उदाहरणांवरून जाणवते. पुढील अभंगातील आशय या दृष्टीने पाहाता–

चांगदेवाचे वऱ्हाड मुक्ताबाईनें केलें । मळ जें फेडिले जन्मांतरिचे
आजवर होतों भाजियेलें हाड । नाचे संतापुढें फुंदफुंदों ।
चौदा शतें जाली बुद्धि माझी गेली । सोय दाखविली मुक्ताबाईने ।
धन्य निवृत्तीदेव धन्य सोपानदेव । परब्रह्म ठेव दाखविली ।
धन्य ज्ञानदेव धन्य मुक्ताबाई । चांगा म्हणे आईपोटीं आलों ।।

या साऱ्या विस्तृत संदर्भात आढळणाऱ्या ज्ञानदेव–मुक्ताबाईंच्या एकत्र उल्लेखांवरून भर्तृहरींची भावजय, गोरक्षनाथांची शिष्या योगिनी मुक्ताबाई या चांगा वटेश्वरांच्या गुरू नसून ज्ञानदेवभगिनी मुक्ताबाई यांनी चांगदेव ऊर्फ चांगा वटेश्वर यांना अनुग्रहीत केले, हे सिद्ध व्हावे. चांगदेवांनी आपल्या 'तत्त्वसार' या ग्रंथात व त्यांनी लिहिलेल्या अभंगांत मुक्ताबाईंना अत्यादराने नमन केले असून त्यांचा ऋणनिर्देश केला आहे.

संदर्भ ग्रंथ व लेख

(१) श्री नामदेव गाथा – (सरकारी प्रत) अभंग– ८९९, ११४२, ११४४, ११५२, ११५३.
(२) चांगदेव पासष्टी – (संपा. साखरे महाराज) ३७, ४०.
(३) भक्तलीलामृत – (महिपतीकृत) अध्याय २ ते ८.
(४) भक्तविजय (महिपतीकृत) अध्याय २२.
(५) सकलसंतगाथा – संपा. त्र्यं. ह. आवटे, १९२४ 'मुक्ताई व चांगदेव यांचा संवाद'.
(६) श्री ज्ञानेश्वर महाराजांची गाथा – संपा. तात्या नेमिनाथ पांगळ, १९२७.
(७) ज्ञानेश्वरांची प्रभावळ– संपा. ल. रा. पांगारकर, १९२८ (चांगदेव-पृष्ठ ३१२).
(८) 'श्री मुक्तादेवी योगिनी' – रा. चिं. ढेरे, म. सा. पत्रिका, (मार्च १९७०).
(९) महाराष्ट्र सारस्वत – ले. वि. ल. भावे; पुरवणी– शं. गो. तुळपुळे.

卐 卐 卐

ज्ञानदेव-नामदेवांची तीर्थयात्रा

डॉ. मु. श्री. कानडे, पुणे

श्री ज्ञानदेव आणि श्री नामदेव या समकालीन व समानशील अशा संत पुरुषांनी परस्परांच्या संगतीत तीर्थयात्रा केली किंवा नाही यासंबंधी पुढील प्रकारची मते मांडण्यात आलेली आहेत–

(१) ज्ञानदेव–नामदेवांची तीर्थयात्रा ही एक कल्पित कथा असावी. (हे मत क्वचितच एखाद्या अभ्यासकाने व्यक्त केले आहे.)

(२) नामदेव एकटेच तीर्थयात्रेला गेले होते.

(३) ज्ञानदेव व नामदेव या दोघांनी मिळून तीर्थयात्रा केली.

(४) या दोघांच्या तीर्थयात्रेत समकालीन अनेक संत सामील झाले होते.

उपलब्ध साधनांच्या आधारे या मत-मतांतरांचा आता परामर्श घ्यावयाचा आहे. ज्ञानदेव–नामदेवांच्या चरित्र ग्रंथांतून तीर्थयात्रेसंबंधी थोडेफार विवेचन केलेले आढळले तरी या विवाद्य घटनेची सांगोपांग चर्चा त्यातून आलेली नाही, म्हणून या प्रसंगाचा मूळ साधनांच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत टिपणात केला आहे–

या संबंधीची जी वेगवेगळी चार मते प्रारंभी उद्‌धृत केली; त्यांपैकी पहिल्या मताचा विचार पुढे विस्ताराने आलेला असल्याने आणि दुसऱ्या मताचा विचार प्रस्तुत टिपणाच्या दृष्टीने गैरलागू असल्याने तीन व चार या मतांचीच चिकित्सा अवश्य आहे. प्रथम तिसऱ्या मताच्या अनुषंगाने जे मुद्दे मांडण्यात आलेले आहेत ते पाहू–

ज्ञानदेव–नामदेवांनी तीर्थयात्रा केली होती असे क्षणभर गृहीत धरले तर ही यात्रा केव्हा केली व तिचा उद्देश तरी काय होता असा प्रश्न साहजिकच निर्माण होतो. बहुसंख्य प्राचीन व अर्वाचीन संतचरित्रकारांच्या मतानुसार ज्ञानेश्वरीचे लेखन झाल्यानंतर (म्हणजे श. १२१२ नंतर) ही तीर्थयात्रा झाल्याचे वर्णन आढळते.

हेतूच्या बाबतीत मात्र एकवाक्यता नाही. त्याबाबतीत पुढील हेतूंचा निर्देश करण्यात आलेला आहे–

(१) नामदेवासारख्या श्रेष्ठ भक्तराजाच्या सहवासाचे सुख घ्यावे अशी इच्छा ज्ञानदेवांच्या मनात निर्माण झाल्याने त्यांनी पुढाकार घेऊन हा तीर्थयात्रेचा प्रसंग घडवून आणला. याला आधार म्हणजे 'तीर्थावळी' या प्रकरणातील पुढील पंक्ती–

तुझ्या संगतीचे नित्य सुख घ्यावें । सार्थक करावें संसाराचें ।
ऐसी ही उत्कंठा बहुत माझें पोटीं । भाग्यें झाली भेटी तुजशीं आजी ।
ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ । करावा मुहूर्त प्रयाणासी ॥ (अभंग क्र. २)

(२) प्रा. न. र. फाटकांनी वेगळेच दोन हेतू पुढे मांडले आहेत. तीर्थयात्रेच्या वेळी, या दोघांना तहान लागली त्यावेळी ज्ञानदेवांनी योगबलाचा तर नामदेवांनी भक्तिबळाचा उपयोग करून पाण्याचा प्रवाह आपल्याजवळ आणला असा एक चमत्कार नमूद आहे. प्रा. फाटकांच्या मते[१], 'योगमार्ग हा कठीण व कदाचित् एखाद्याच्या उपयोगी पडणारा...... भक्तिमार्ग हा काठोकाठ भरलेल्या विहिरीसारखा सर्वांना सुलभ आहे..... तो ज्याचा त्याला तर उपयोगी पडतोच परंतु तो आबाल–वृद्ध मानवांना तसाच वृक्ष-पशूंनाही उपयोगी पडणारा आहे हा संकेत प्रस्तुत चमत्कारामध्ये स्पष्ट उमगतो.' प्रा. फाटकांचे पुढील प्रतिपादन याहीपेक्षा धक्का देणारे आहे. ते लिहितात[२], 'उत्तरेकडील तीर्थयात्रेने इस्लामी परचक्राच्या धुमाकुळाची प्रत्यक्ष माहिती नामदेवांस करून दिली. त्या धुमाकुळातून महाराष्ट्रीय जनतेचा स्वधर्माभीमान ज्ञानेश्वरांच्या शिकवणीने नामदेवांनी पुढील काळात सुरक्षित केला. नामदेवाच्या कर्तृत्वाला या तीर्थयात्रेमुळे निराळे वळण लागले.' प्रा. फाटकांनी ठामपणे मांडलेल्या या सिद्धान्ताला, नामदेवांच्या वाङ्‌मयात मात्र एका ओळीचासुद्धा आधार सापडत नाही. डॉ. वि. भि. कोलते यांनी आपल्या विशिष्ट दृष्टिकोनातून या तीर्थयात्रा प्रसंगाचा वेगळाच अर्थ लावला आहे. त्यांच्या मते, 'ज्ञानदेव नामदेवांच्या भेटीला आले तेव्हा 'जीवन्मुक्त झाली जरी जाले पावन । तरि देवता तीर्थभजन न संदिती' हे त्यांचे मत होते. पण तीर्थाटन करीत असताना नामदेवांच्या बरोबर केलेल्या विचार विनिमयाने आणि अनुभवाने त्यांनी मान्य केले की, 'तीर्थयात्रे जाणे। काही न लगे करणे ।' ज्ञानदेवांच्या विचारातील हा बदल घडवून आणण्याचे कार्य नामदेवांनी केले "[३] ज्ञानदेवांची तीर्थयात्रेविषयीची भूमिका ज्ञानेश्वरीत स्पष्टपणे प्रकट झालेली आहे. डॉ. कोलते म्हणतात तशीच ती आहे; फक्त ती नामदेवांच्या भेटीपूर्वीच निश्चित झालेली असल्याने डॉ. कोलते यांच्या निष्कर्षाचा पायाच उखडल्यासारखे झाले आहे.

प्रा. फाटक आणि डॉ. कोलते या दोघांनीही ज्ञानदेव–नामदेवांनी तीर्थयात्रा केली होती हे मान्य करून तत्संबंधी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ज्ञानदेव आणि नामदेव या दोघांही संतश्रेष्ठांच्या जीवनकार्याच्या दृष्टीने हे अभिप्राय फार

महत्त्वाचे आहेत. परंतु ज्ञानदेव–नामदेवांनी एकत्रितपणे तीर्थयात्रा केली ही घटना विश्वसनीय प्रमाणांच्या बळावर निश्चितपणे घडून आली असे म्हणता येईल काय ? निराग्रही भूमिकेतून आणि वस्तुनिष्ठ दृष्टीने याची पाहाणी करणे अवश्य आहे.

तीर्थयात्रा प्रसंगाचे दोन आधार आजपर्यंतच्या संशोधनातून उपलब्ध झाले आहेत. त्यांपैकी एक आधार अभ्यासकांखेरीज इतरांना फारसा परिचित नसावा. ह. भ. प. सुबंध यांनी नामदेवांची सार्थ गाथा खंडशः प्रकाशित करीत असताना पुणे येथील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या संग्रहात सापडलेले एक तीर्थयात्रा प्रकरण पहिल्या खंडात प्रसिद्ध केले. यामध्ये १४ अभंग असून हस्तलिखिताचा लेखनकाल शक १५०३ असा नमूद केलेला आहे. नामदेवांनी आपल्या तीर्थयात्रेत ज्या पावन क्षेत्रांचे दर्शन घेतले अशा पन्नासावर स्थळांची नोंद या अभंगातून झालेली आहे, किंबहुना हे चौदा अभंग आहेत असे म्हणण्यापेक्षा हा एकच प्रदीर्घ अभंग आहे असे म्हटले पाहिजे; कारण 'नामा म्हणे' ही नाममुद्रा या प्रकरणाच्या अखेरीसच आलेली आहे. प्रकरणाची बारकाईने पाहाणी केली म्हणजे ही तीर्थयात्रा नामदेवांनी एकट्यानेच केली असावी असाच ग्रह होतो. कारण या प्रकरणात ज्ञानदेवांचा एकदाही नामनिर्देशसुद्धा आलेला नाही. 'म्या देखिली', 'मि पावलो', 'म्या पाहिले' असेच उल्लेख सर्वत्र आलेले आहेत. ज्ञानदेव बरोबर असते तर नामदेवांनी त्यांचा निश्चितपणे उल्लेख केला असता.

अभंगातून तीर्थक्षेत्रांचा जो क्रम दिलेला आहे तोही अनेक शंका उपस्थित करणारा आहे. त्यांच्या निर्देशावरून नामदेवांच्या तीर्थयात्रेचा सुसंगत असा आलेख काढता येत नाही हे या प्रकरणाचे आणखी एक मोठे वैगुण्य आहे.

तीर्थयात्रेचा दुसरा सर्वपरिचित आधार म्हणजे नामदेवांच्या नावावर मोडणाऱ्या ज्ञानदेव चरित्रातील तीर्थावळी हे दुसरे प्रकरण. वर्णन शैलीच्या दृष्टीने अत्यंत सुरस असलेल्या या प्रकरणाची वाचनीयता वादातीत असली तरी ऐतिहासिकतेच्या कसोटीवर या प्रकरणातील बारीक–सारीक स्थळांची छाननी केली तर त्यात अनेक संशयास्पद गोष्टी आढळून येतात. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी या 'तीर्थावळी' ला 'कादंबरी' म्हणूनच संबोधिले आहे. त्याची त्यांनी दिलेली व अन्य विविध कारणें अशी आहेत–[४]

(१) तीर्थावळीचे एकूण ५८ अभंग असले तरी प्रत्यक्ष यात्रेचे वर्णन फक्त १६ व्या अभंगात आणि तेही केवळ दोन ओळींतच उरकले आहेत –

पश्चिम प्रभास आदिकरोनि द्वारका ।
पहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या ॥

(२) याच दोन ओळींच्यानंतर 'पंथी पावन तीर्थें पाहिलीं सकळिकें। प्रक्षाळलीं पातकें वासनेची' अशा ज्या दोन ओळी आहेत त्या नामदेव–ज्ञानदेवांच्या पावन चरित्रावर, न कळत का होईना परंतु शिंतोडे उडविणाऱ्या आहेत.

(३) नामदेवांचे अभंग सामान्यपणे ४।५ ओळींचे त्रुटीत स्वरूपाचे असतात; तीर्थावळीतील अनेक अभंग लांबट आहेत.

(४) ५८ अभंगांपैकी फक्त १२ अभंगांच्या शेवटी 'नामा म्हणे' अशी नाममुद्रा आहे.

(५) अनेक अभंगांतून नामदेवांचा उल्लेख तिऱ्हाईताप्रमाणे केलेला आहे.

(६) अनेक अभंगांतून नामदेवांच्या भक्तिभावनेचे मनसोक्त कौतुक केलेले आहे. 'अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकासी' या नामदेवांच्या वृत्तीशी हे विसंगत वाटते.

(७) उत्तरायुष्यात नामदेव पंजाबमध्ये गेल्यावर त्यांना 'जाटहण' हा जो शिष्य मिळाला त्याचा निर्देश या प्रकरणात आहे.

या अंतर्गत उणीवा पाहिल्या म्हणजे तीर्थयात्रा प्रसंगाचा मुख्य आधारच कसा अविश्वसनीय आहे त्याची कल्पना येते. (या तीर्थावळीत, विठ्ठल रखुमाई इतर देवता, ऋषि–मुनी, यक्ष–गंधर्व इत्यादींना मानवी स्वरूपात वारंवार उपस्थित करून नामदेवांच्या भक्तिप्रेमाला जे अद्‌भुत पातळीवर नेऊन ठेवण्याचा सारखा प्रयत्न केला आहे तो भाग तर इतिहासाऐवजी पुराणकथेचीच आठवण करून देणारा आहे.)

ज्ञानदेव, नामदेवादि संत आणि त्यांचे समकालीन यांच्या अभंगातून तीर्थयात्रा प्रसंगाला बळकटी आणणारा काही पुरावा मिळतो किंवा काय याचेही अवलोकन करणे अवश्य आहे, कारण ज्ञानदेव प्रभृती संत-मंडळींच्या चरित्रातील अनेक प्रसंगांचा या अभंगवाणीत निर्देश केलेला आढळतो.

स्वतः ज्ञानदेव आपल्या ९०० अभंगापैकी एकाही अभंगात तीर्थयात्रेचे वर्णन तर करीत नाहीतच, पण नुसता ओझरता उल्लेखदेखील करीत नाही. त्यांच्या पेक्षाही नामदेवाच्या अभंगातील या प्रसंगाचा अनुल्लेख फार खटकणारा आहे. तीर्थवळीमध्ये या प्रसंगाला एखाद्या अद्‌भुतरम्य कथेचे स्वरूप देणारे नामदेव आपल्या इतर २४०० अभंगात तीर्थयात्रा प्रकरणी मौन बाळगून आहेत ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. निवृत्तीनाथांनी पंढरीत झालेल्या काल्याचे वर्णन १० अभंगात केले आहे, पण तेही ज्ञानदेव-नामदेव यांच्यासंबंधी काहीही उद्‌गार काढीत नाहीत. सोपानदेव व मुक्ताबाई ही ज्ञानदेवांची भावंडेही या बाबतीत मुग्ध आहेत. याच काळात आणि या संतांच्या प्रभावळीत चमकून गेलेल्या गोरा कुंभार, सेना न्हावी.

चोखा मेळा, नरहरी सोनार या संतांच्या अभंगांची पाहणी केली तर तीही निष्फळच ठरते.

फक्त परिसा भागवत आणि जनाबाई या दोघांनीच तीर्थयात्रेचा उल्लेख केलेला आहे. परिसा भागवत फक्त एकाच ठिकाणी लिहितो–

'ज्ञानेश्वर संगतीं घडलें । तीर्थमिसें जगदुद्धार'

जनाबाईच्या ३५० अभंगांमध्ये केवळ चार अभंग या तीर्थयात्रा प्रसंगासाठी खर्ची पडलेले आहेत. नामदेवाचा मुलगा विठा याच्या एका अभंगात (क्र.१७) 'भूतळींचीं तीर्थे नामा जंव करी । गांजियेलें पोरीं नामयाच्या' अशी एक ओळ सांपडते, पण त्यात तीर्थयात्रा करणाऱ्या एकटया नामदेवांचाच उल्लेख असल्याने तो ज्ञानदेव-नामदेवांनी मिळून केलेल्या तीर्थयात्रेसंबंधी विचारात घेता येणार नाही.

नामदेव आणि त्यांचे कुटुंबिय यांच्या नावावर जे अभंग आहेत त्यात नामदवांच्या जीवनातील अनेक चमत्कारांची नोंद आहे, पण नामदेवांनी आपल्या उत्कट भक्तीच्या बळावर कूपातील पाण्याचा प्रवाह आपल्या पायापर्यंत आणला या घटनेचा कोणीही उल्लेख करीत नाही. एकनाथांच्यासारखे उत्तरकालीन संत, रेडयामुखी वेद बोलविले, भिंत चालविली इ० चमत्कार वर्णन करतात (अभंग क्र. ३५२८, ३५३०) पण ज्ञानदेव–नामदेवांच्या जीवनातील वरील चमत्काराला तेथे स्थान मिळालेले नाही.

चरित्रविषयक हे उपलब्ध आधार तीर्थयात्रेच्या दृष्टीने कोणतीही माहिती पुरवीत नाहीत हे यावरून स्पष्ट होईल. या बहिरंगाच्या पाहाणीप्रमाणे नामदेव-ज्ञानदेवांच्या वाङ्मयाची अंतरंग पाहाणी करून या तीर्थयात्रेसंबंधी वेगळचा पद्धतीने शोध घेता येण्यासारखा आहे. मुख्यतः नामदेव-ज्ञानदेव तीर्थयात्रा करण्याबाबत कोणती भूमिका वारंवार मांडतात, तिच्या आधाराने त्यांची एतद्विषयक विचारसरणी समजू शकेल.

नामदेवांच्या दृष्टीने पंढरपूर हे एकच महाक्षेत्र आहे. पंढरपूरचा महिमा तर ते वारंवार गातातच परंतु पंढरपूरच्या तुलनेने इतर क्षेत्रांना ते गौण लेखतानाही दिसतात, आणि याहीपेक्षा नामदेवांच्या मनातील एक लक्षणीय विचार म्हणजे तीर्थयात्रेपेक्षा नामभक्तीला आणि आंतरिक शुचितेला त्यांनी अधिक वरचे स्थान दिलेले आहे. या तीनही बाबतीतले त्यांचे मनोगत[५] पुढील पंक्तीतून व्यक्त झालेले आहे.

(१) तीर्थासी जाउनि काय स्या करावे ।
वाउगे हिंडावें पंथें तेणे ।
माझे तीर्थक्षेत्र पंढरी पै जाणा । उघडे निधान दृष्टीपुढे ॥१८०७॥

(२) एक सेविलिया पांडुरंग। अनंत तीर्थे घडतील।
पंचक्रोशी प्रदक्षिणा। नित्य नमस्कारी विठ्ठलचरणां।
तरी घडेल पृथ्वी प्रदक्षिणा। कोटिच्या कोटी अनंत ॥ २००७॥

(३) पृथ्वीवरी तीर्थे आहेत अपार। परि पंढरीसी सर एका नाही
॥ २०३३ ॥

(४) तीर्थे एक भावभजन ॥ २०२० ॥

(५) तीर्थांचे हे तीर्थ नाम हे समर्थ। होईल कृतार्थ रामनामीं ॥२०४१ ॥

(६) कायाक्लेश करणे शरीर दंडणे। न लगे हिंडणे दाही दिशा ॥२०८२॥

(७) कडू वृंदावन साखरें घोळिलें। तरी काय गेलें कडूपण।
तैसा तो अधम करो तीर्थाटण। नोहे त्याचे मन निर्मळत्व ॥
॥ १८४९ ॥

(८) काय करुनि तीर्थाटणे। मन भरिलें अवगुणें ॥ १८६३ ॥

(९) व्रततप न लगे करणे सर्वथा। न लगे तुम्हां तीर्था जाणे तया ॥
आपुलीच ठायीं असा सावधान। करा हरिकीर्तन सर्वकाळ ॥२०४२॥

अशाच प्रकारे ज्ञानदेवांच्या वाङ्मयाचे अवलोकन केले तर त्यांची मतेही नामदेवांच्या मतांशीच मिळती-जुळती असल्याचे दिसून येते.

जो तीर्थे पाहण्याचा कंटाळा करतो तो अज्ञानी आहे–
'आणि एकांते चोखटे। तपोवनें तीर्थे तटे।
देखोनि जो गा विटे। तोहि तोचि ॥ ज्ञानेश्वरी १३–८२३

असा एखाद-दुसरा अपवादात्मक अनुकूल निर्देश वगळला तर, तीर्थयात्रा करण्यासंबंधी ज्ञानदेवांनी कोठेही आग्रह तर धरलेला नाहीच पण कोठे कौतुकाचे उद्गारही काढलेले नाहीत. याच्या अगदी उलट आशयाची एक ओवी मात्र ज्ञानेश्वरीत आढळते, आणि ती ज्ञानदेवांचे हृद्गत व्यक्त करणारी आहे–

तुम्ही व्रतें नियमु न करावे। शरीरातें न पीडावें।
दुरी केंही न वचावे। तीर्थासी ॥ ज्ञा. ३.९० ॥

तीर्थयात्रा करीत बसण्यापेक्षा नामस्मरणाचे आणि अंतकरणातील भावभक्तीचे श्रेष्ठत्व ज्ञानदेवांनी आपल्या अभंगातून प्रतिपादन केलेले आढळते–

(१) अनेक तीर्थांचे बळ। साधलिया हरी नाम कल्लोळ ॥ ३८६ ॥

(२) त्रिवेणी संगमीं नाना तीर्थे भ्रमीं।
चित्त नाही नामीं तरि ते व्यर्थ ॥७४६

(३) तीर्थव्रत नेम भावें विण सिद्धी।
वायांचि उपाधी करिसी जना ॥ ७४८ ॥

(४) हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन ।...
तया नरा लाधलें वैकुंठ जोडले ।
सकळही घडलें तीर्थाटन ।। ७५४ ।।

अन्य तीर्थक्षेत्रांपेक्षा पंढरपूरची थोरवी ज्ञानदेवांनाही अधिक वाटते–

काशी अयोध्या अवंती कांती । मथुरा माया गोमती ।
ऐशीं तीर्थे इत्यादि आहेती । परि सरी न पवती पांडुरंगीं ।। ६४ ।।

तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जाऊन शरीरशुद्धी करण्यापेक्षा सत्कर्माच्या योगाने अंतरंग निर्मल करणे हे ज्ञानदेवांना उचित वाटते–

तीर्थे बाह्यमळु क्षाळे । कर्मे अभ्यंतर उजळे ।
एवं तीर्थें जाण निर्मळें । सत्कर्मेचि ।। ज्ञा. १८.१६०

ज्ञानदेवांच्या मनोभूमिकेतील आणखी एका वैशिष्टयपूर्ण विचाराचा आवर्जून निर्देश करणे आवश्यक आहे. ते तीर्थक्षेत्रांचा महिमा वर्णन करीत नाहीत किंवा तीर्थयात्रेसंबंधी उत्सुकताही दर्शवीत नाहीत, पण याचा अर्थ त्यांच्या दृष्टीने या भूतलावर कोणतीच पावनतीर्थें नाहीत असा मात्र नाही.

आपल्या अवतीभोवती वावरणारी, दैवी गुणसंपदेने युक्त असलेली देव-माणसे ही इहलोकीची तीर्थेच आहेत असा उदात्त विचार ज्ञानदेवांनी अनेकदा सांगितलेला आहे–

आई-वडिल ही सर्वांत श्रेष्ठ अशी तीर्थे आहेत—

सकल तीर्थांचिये धुरे। जिथे कां मातापितरें।। ज्ञा. १७–२०७

गुरूचे चरण हे पावनतीर्थच आहे–

शिवतले गुरूचरणीं । भलते जे पाणी ।
तया तीर्थयात्रे आणी । तीर्थें त्रैलोक्यींची ।। ज्ञा. ३१.४४८

शुचिष्मंत ब्राह्मण हेही तीर्थरूप आहेत–

जे पृथ्वीतळींचे देव । जे तपोवतार सावयव ।
सकळ तीर्थांसि दैव । उदयले जे ।। ज्ञा. ९.४७७

अनन्यभावाने ईश्वराची उपासना करणारा भक्तराज हाही तीर्थाइतकाच पवित्र आहे–

(१) जयाचे नाव तीर्थरावो । दर्शन प्रशस्तीसि ठावो । ज्ञा. ६.१०२

(२) म्हणोनि असो जो ऐसा । शुचित्वें तीर्था कुवासा ।
जेणें लंघविले दिशा । मनोमळ ।। ज्ञा. १२. १७८

(३) तें तीर्थ ते क्षेत्र । जगीं तेचि पवित्र ।
भक्तिकथेसी मैत्र । जयां पुरुषां ॥ ज्ञा. १२. १२.४४५

आणि शेवटी ज्ञानदेवांच्या दृष्टीने वारीक सारीक तीर्थक्षेत्रे धुंडाळण्याचा खटाटोप करण्यापेक्षा ज्याच्या चरणापासून यच्चयावत् तीर्थे निर्माण झाली त्या परमेश्वर स्वरूपात एकरूप होऊन जाणे ही सर्वांत महत्त्वाची आणि शाश्वत आनंदाचा लाभ करून देणारी यात्रा आहे–

म्हणोनि सर्व मी जालेपणें । ठेलें तया येणें जाणें ।
हेंचि गा यात्रा करणें । अद्वया मज ॥
–ज्ञा. १८–११६८

ज्ञानदेव–नामदेवांनी केलेल्या तीर्थयात्रेला पुष्टिदायक अशी प्रमाणे शोधणे हे तर आवश्यकच आहे पण त्याहीपेक्षा त्यांची तीर्थयात्रेविषयीची वैचारिक भूमिका समजावून घेणे अधिक श्रेयस्कर आहे.

या दृष्टीने पाहाता, 'तीर्थावळी' प्रकरणाची अविश्वसनीयता, स्वतःच्या आणि समकालीन संतांच्या वाङ्मयातील तीर्थयात्रा प्रसंगाचा अनुल्लेख आणि तीर्थयात्रा करण्याला बह्वंशी अनुकूल नसणारी ज्ञानदेव–नामदेवांची तात्त्विक दृष्टी या सर्वांचा निराग्रही भूमिकेतून विचार केला म्हणजे ज्ञानदेव–नामदेवांची तीर्थयात्रा ही एक उत्तरकालात रचिली गेलेली कल्पित कथा वाटते.

---

१. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य, पृ. ३३३.
२. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य, पृ. ३३४.
३. ह. भ. प. सुबंध यांनी संपादन केलेली नामदेवरायाची सार्थ गाथा, भाग पहिला, प्रस्तावना पृ. ३०.
४. ज्ञानदेव आणि नामदेव, (१९६९), पृ. ३३२ ते ३३७.
५. लेखांतील अभंगक्रमांक सकलसंतगाथा (दुसरी आवृत्ती) मधील आहेत.

卐 卐 卐

श्री ज्ञानेश्वरांची ' जिवंत समाधी '
(एक वस्तुनिष्ठ अध्ययन)

डॉ. बा. ना. मुण्डी, उज्जैन

अशा एकंदर परिस्थितीत मंडळाने आयोजित केलेले चर्चासत्र अत्यंत सामायिक, अत्यावश्यक, औचित्यपूर्ण. उपलब्ध किंवा नवीन साधनसामग्रीची वस्तुनिष्ठ, निष्पक्ष, भावावेश व पूर्वग्रहरहित, प्रामाणिक दृष्टीनें व सत्यान्वेषणाच्या शुद्ध हेतूने चिकित्सा व्हावी व त्या आधारावर पुनर्मांडणी करून श्री ज्ञानेश्वर चरित्राचे सर्वांगीण परिशीलन व्हावे हा उद्देश स्तुत्य व स्वागतार्ह आहे.

ज्ञानेश्वरांच्या ' समाधी ' बद्दलच काय परंतु त्यांच्या व भावंडांच्याबद्दलची जी काय माहिती उपलब्ध व ज्ञात आहे ती नामदेवांनी पुरविलेल्या एकमेव सामग्रीच्या आधारेच. कालमानाच्या दृष्टीने तिला अग्रतेचा, समकालीनत्वाच्या दृष्टीने विश्वसनीयतेचा व प्रत्यक्ष सहवास व साहचर्य म्हणून अधिकृततेचा, प्रामाणिकतेचा मान देणे सर्वस्वी उचित. आज तरी तिच्या तोडीचीच नव्हे तर तिच्या अतिरिक्त इतर सामग्री प्राप्य नाही. नामदेवांचे साथीं सांगांती जनाबाई आदींनी जी काय थोडीफार स्फुट माहिती दिलेली आहे तेवढीच. पुढील उद्धव चिद्घनादीनीही याच सामग्रीचा आधार अधिकांश घेतलेला आहे.

(१) इतक्या अल्पवयात जिवंत समाधी घेण्याचे औचित्यपूर्ण, योग्य कारण काय असावे हा विचार सर्व प्रथम मनात आला. शंकराचार्य, रामकृष्ण, विवेकानंद आदी अल्पवयीन विभूतींचे स्मरण झाले. शिवाय ' राष्ट्रीय ' विभूतींवर ' राष्ट्राचा ' ही सारखाच अधिकार असल्याने ' अशी जीवनयात्रा समाप्त करण्याचा त्यांनाही अधिकार काय, कारण काय ?' हे एक प्रसिद्ध सूत्रही आठवले. ज्ञानेश्वरांना अल्प वयात जिवंत समाधी घेण्याचा निर्णय तडकाफडकी घेण्यासारखे प्रबळ व संयुक्तिक कारण काय असावे ! उद्दिष्ट किंवा स्वीकृत कार्य पूर्ण झाले की, ' अवतार ' आवरावा हे गीतावचन ?

या दृष्टीने विचार करता त्यांचे अवतार कार्य, उद्दिष्ट काय होते हे सर्व ज्ञात आहे ते समोर येते. ' कलिकलित भूतां ' साठी ' प्राकृत वैखरीत ' केवळ ईश्वर ज्ञानाचा ' ग्रंथ ' सार ' केला. ' तारिले पतित ' आणि ' भक्ति

केली विख्यात ' अशा प्रकारें ' उघडे अध्यात्म बोलियेले ' या द्वारे ' सकळ लोक संस्था । ' रक्षणीय गा सर्वथा ' तिला ' लोकस्थिति आघवि ' ' नासिली ' होऊ न द्यावी म्हणून ' लोकसंग्रहा ' च्या द्वारे ' अवघे विश्वचि माझे घर ' या उच्च भावनेने ' विश्व मोहरे लावावे ' मार्गाधारे वर्तावे ' अलौकिक नोहावे ' हा थोडक्यात हेतू, कार्य.

सारांश, लोकोद्धार, लोकसंग्रह, लोककल्याण, लोकमंगल हे त्याचे स्वीकृत, अवतार कार्य, ते संपन्न झाले का ? लोकांना स्वोद्धाराचा मार्ग दाखविला गेला का ? ' मार्गी अंधा सरिसा । पुढे देखणाही चाले तैसा । अज्ञाना प्रगटावा । धर्म तैसा आचरोनी " " संती अवश्य आचरावे । जना दाखवावे वर्तोनिया." चातुर्वर्णाश्रमात राहून विधिनिषेध पाळीत, विदित कर्मे करीत असावे. ' अलौलिक नोहावे लोकांप्रती ' कारण ' आम्ही पूर्ण काम होआवे जरी । आत्मस्थिति राहूनि । तरी प्रजा हे कैसेनि विस्तरेल ? ।। म्हणोनि समर्थ जो येणे । आथिला सर्वज्ञते ।। तेण्हे विशेष कर्मा ते । त्यजावेना ।। "

हे सर्व लक्षात घेता ज्ञानेश्वरांनी घेतलेल्या ' जिवंत ' समाधीचा निर्णय कसा वाटतो ? यासंबंधी नीट विचार होणे इष्ट, म्हणजेच या प्रकरणाची योग्य संगती लागू शकेल.

ज्ञानदेव–नामदेवाची तीर्थयात्रा स्थलदर्शनापेक्षा ज्ञान व भक्ती या मुक्तिमार्गाच्या साधनाच्या चर्चेनेच अधिक भरलेला आहे आणि वस्तुत: ज्ञानेश्वरांचा हेतूही भक्तिमार्ग समजून घेण्याचाच होता हे त्यांनीच स्वत: स्पष्ट केलेले आहे. (आवटे. अभंग ६२३, पृ. १५६) आणि (आवटे. अभंग ६२६– पृ. १५७) या दोन्ही संवादात्मक अभंगावरून ज्ञानेश्वरांची आंतरिक मनीषा स्पष्ट होते. नामदेवांनी ज्ञानेश्वरांची ' आशा पूर्ण करी मज याचकाची ' ही इच्छा ' अनुभवाचि गोष्टि ' ' काया वाचा मने हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा ' अशा प्रकारे पूर्ण केली. ' भक्ति तूंच जाणलीस ' ही ज्ञानेश्वरांची नामदेवास प्रशस्ती.

सारांश, ज्ञानेश्वरांना हवे ते मिळाले. नामसामर्थ्याचा प्रत्यय त्यांना आला. भक्तीच्या तत्त्वज्ञानाचे सैद्धान्तिक प्रतिपादन प्रवचन करणारे भक्तिमार्गी झाले. दोघे एकमेकांच्या चरणी लागले. ' कवणे कवणा अलंकारिले । हे निर्वचेना ' अशी स्थिती झाली. नाम ज्ञानाच्या चरणी लागले. ते ज्ञानाने कधीच दिपलेले होते पण आता ज्ञान भक्तीच्या, नामाच्या चरणी आले. ज्ञानेश्वर म्हणू लागले, ' देखिला देखिला गे माय तो हा देवाचा फिटला संदेहो निमाले दुजेपण । अनंत वेषी अनंत रूपे देखिले म्या त्यासी । रखमादेवीवर विठ्ठली खूण बाणली कैसी ।। १ ।। कोलायतच्या कूप प्रकरणाने योगमार्ग हा व्यक्तिगत साधनामार्ग तर भक्तिमार्ग

सार्वजनिक, हां प्रत्यय–अनुभवही आला. मावंद्यांच्या वेळी वर्ण–धर्म–जात यांतील भेदाभेदरहितता अनुभवास आली आणि ज्ञानदेव वारकरी झाले. त्यांना वारकऱ्यांनी आपला अध्वर्यु मानले. हरिपाठाची मोत्याची माळा, वारकऱ्यांनी विठ्ठलचरणी वाहिली. चंद्रभागेच्या वाळवंटावर ते वारकऱ्यांच्या समुदायात ‘ कीर्तनाचे रंगी नाचू गावू ’ लागले. ज्ञानदीप उजळला. नाथ पंथी, योगीज्ञानी ज्ञानेश्वर वारकरी भक्तिमार्गी नामसाधक भक्त झाले. नामदेवाची भक्तीमात्र ‘ डोळस ’ ‘ ज्ञान ’ प्राप्त झाल्याने उजळली. पूर्ण झाली.

ज्ञानेश्वरांच्या जीवनपटातील सर्व घटना व त्यांनी केलेल्या कृतीतून जे परिलक्षित होते ते हेच की त्या काळातील “ मतामतांच्या, विचारसरणीच्या गलबल्यात ” स्वमत प्रतिपादनाची, प्रचाराची जशी सर्व पंथीयांना आवश्यकता होती तसाच तो केलाही जात होता. याच स्वमतप्रतिपादन व प्रसाराच्या कार्यात नामदेव आणि वारकरी यांना ‘ आत्मसात ’ करण्याचा जसा एक प्रयत्न मुक्ताबाईच्या आग्रहाने ‘ घट-परीक्षे ’ च्या द्वारे झाला. तसाच तीर्थयात्रेच्या द्वारे स्वमतप्रतिपादन यथार्थ परिचय करून देण्याबरोबरच परमत समजून घेण्याचे समन्वयात्मक कार्यही करण्यात आले. त्यांत परमताचे ‘ मूल्य ’ कळून आले. त्याचे अनुसरणही मान्य झाले, सुरू झाले. ज्ञानेश्वरांनी भक्त मंडळींना, त्यांच्या पुढाऱ्याच्या नामदेवाला ‘ ज्ञानी ’ ‘ डोळस ’ केले, परंतु सर्व साधारणाच्या मात्र ते आवाक्याबाहेरचे ठरले, पदरी पडले नाही, त्यांनी ज्ञानेश्वरांना ‘ अध्वर्यू ’ म्हणून आदराने, आपुलकीने, मान्य केले. ‘ योगी ’ मात्र कोणीच होऊ शकले नाही. याउलट ज्ञानेश्वर ‘ भक्त ’ झाले पण ‘ भक्तीत ’ पूर्णतः विलीन होऊ शकले नाही. आपले ‘ मूळ ’ ‘ पूर्व ’ विसरू शकले नाहीत. ‘ अमृतानुभव ’ निर्मितीचा दुसरा काय अन्वयार्थ लावावयाचा ? हे सर्व केव्हा तर भक्तांच्या सहवासात राहून, अभंग, हरिपाठाच्या द्वारे त्यांचे मार्ग दर्शन केल्यावर.

या सर्वांचा विचार ‘ समाधी ’ चा विचार करताना, चरित्रलेखनापूर्वी व्हावा. ‘ समाधी ’ घेण्याची सुसंगत, योग्य, उचित कारणमीमांसा करणे थोडे सुलभ होऊ शकेल. नामदेवांनी ‘ समाधी ’ बद्दल लिहिताना ‘ देहासी विटला । स्वरूपीं पालटला ’ असे म्हटले आहे (आवटे. अ. ७८५) हे विधान कितपत मान्य होणारे ? एरवी, शके १२१८ मध्ये ज्ञानेशांनी जिवंत समाधी घेतली त्यावेळच्या एकंदर परिस्थितीचे आकलन करून आढावा घेता असे दिसते की ज्ञानेश्वरांना ‘ देहाचा वीट ’ कंटाळा येण्यासारखे योग्य कारण लक्षात येत नाही, ज्ञानेश्वर व सर्व भावंडे एकंदरीत साफल्याच्या अत्युच्च शिखरावर होते. बाल्यकाल व त्या नंतरच्या संकटांची अभ्रे विदीर्ण झाली होती. ज्ञानेशाची व भावंडांची कीर्ती व कर्तृत्व सर्वत्र पसरले होते. ज्ञानेश्वरी व त्यानंतर अमृतानुभव हा ‘ ज्ञानयुक्त ’ ग्रंथ निर्माण

झाला होता; वारकऱ्यांचे अध्वर्यूपण मिळालेच होते, त्यांचा मेळावा अवतीभवती सादर एकत्र झालाच होता; चांगदेवासारखा ' योगी ' शिष्य झाला होता.

सारांश, महाराष्ट्रात नाथपंथी त्यावेळी परमोच्च स्थितीत पोचला होता. ज्ञानेश्वरासारखा नाथपंथीय ज्ञानसूर्य, परमज्ञानी व योगी; निवृत्तिसारखा ज्येष्ठ व श्रेष्ठ नाथपरंपरेतील योगीराज; मुक्ताईसारखी मूर्तिमंत ' विद्युल्लता ' चांगदेवासारखा दीर्घायुषी व अनेकवेळ योग सामर्थ्याने कालवंचना करण्यासारखा पंडित योगी; सोपान व विसोबासारख्या ' ज्ञानियांची ' किंवा ' पक्या घटांची ' एक दीर्घ मालिकाच ज्यावेळी महाराष्ट्रात विद्यमान होती व आपल्या पंथीय सामर्थ्याचे, कर्तृत्वाचे चमत्कार दाखवून मोठमोठयांना पराभूत करीत होती आणि या सर्वांवर कडी म्हणून ' गैबी ' रूपाने सर्वत्र संचार करून प्रचार व मार्गदर्शन करीत ' गोरक्षनाथा ' सारखा महामानव, परम संघटक पाठीशी होता. त्यावेळी ज्ञानेश्वरांच्या मनात ' जिवंत ' समाधीची इच्छा का व्हावी ? एवढेच नव्हे तर नामदेवासारख्या एखाद्या कच्च्या घटाला आत्मसात करणे किंवा चौदाशे वर्षांच्या योगी चांगदेवासारख्यालाही ८–१० वर्षांच्या मुक्ताईचे शिष्यत्व स्वीकारावयास लावणे ज्याच्या तळहाताचा मळ होता अशा वेळीच ज्ञानेश्वरांच्या मनात जिवंत समाधीची इच्छा का उद्‌भवावी ? त्या परिसरात, वातावरणात, अधिकारी व्यक्तींच्या सहवासात येऊन राहूनही ज्ञानेशांनी अकस्मात अल्पवयातच हा असा निर्णय घेण्यासारखे प्रभावी कारण काय असेल ? कार्तिकी एकादशीच्या प्रसंगी पंढरीत एकत्र वारकरी भक्तांच्या समुदायात, आनंदोल्लासात अकस्मात दशमीच्या दिवशीच ज्ञानेश्वरांनी ' समाधी ' घेण्याची घोषणा केली व तडकाफडकी १३ स समाधी संपन्नही झाली !

हे सर्व प्रकरण शांत चित्ताने, सूक्ष्मपणे पुनः एकदा वाचावे. त्यावरून जी माहिती मिळते ती थोडक्यात अशी:–

(१) " मति चालविली रसाळ। संत श्रोत्रियां केला सुकाळ।
दिधलें पुरुषार्थाचे बळ।

अमृतानुभव आनंद लहरी। ग्रंथ सिद्ध केला ज्ञानेश्वरी।
संस्कृत प्राकृत वैखरी। वदविली माझी॥

आतां मोक्षाचिया वाटा। पाहिला षड्‌चक्र चोहटा।
आज्ञा द्यावी वैकुंठा। ज्ञानदेव म्हणे॥ (अभंग ७६०-आवटे)

आतां पदपदांतरीची सेवा। संपादिली स्वामी केशवा।
धन्य आमुचिया दैवा। जोडिला तुम्ही॥

आत्मविद्या बोलावया कारण । सुख पावले श्रोते सज्जन ।
आतां जे आरंभिले मन । तें आपण सिद्धी न्यावे ।।
आतां वैराग्याचे बळ । सिद्धी प्राप्तीचे फळ ।
मागीतला थारा । पदीं तुझ्या... (आवटे अ. ७६१)
देहासी विटला । स्वरूपीं पालटला ज्ञानदेव ।। (आवटे अ. ७८५)

समाधीच्या या कारणांचा विचार व्हावा.

(२) समाधीसाठी "वारकऱ्यांचे" प्रिय तीर्थस्थान पांडुरंग चरणीचे पंढरपुर न निवडता योग्यांचे शिव सिद्धपीठ, अनादी, अनेक वेळ समाधीचे स्थळ–(अभंग ८०२ ही पाहा)

प्रत्यक्ष "भूवैकुंठ पंढरी" त, सर्व भक्त–वारकऱ्यांच्या मेळाव्यात असताही "समाधी" स्थान ठरविले ते "पंढरी" नव्हे तर "त्याहूनि आगळी अलंकापुरी." कारण विचारता देव म्हणतात, "स्थळ सिद्ध हे अनादि" "अष्टोत्तरशे वेळां साधिली समाधी । ऐसे हें अनादि ठाव असे" हे 'सिद्ध पीठ'.

(३) समाधीचा एकंदर विधी झाला तो "समाधी" स बसलेल्यास व्हावा तसा नव्हे तर समाधी घेणे किंवा देण्याचा, पुण्यतिथीचा सामग्री आली ती तसलीच; सोहळा नाथ पंथीयात पुण्यतिथीस आजही प्रचलित असा तोही चक्रतीर्थांवर (अभंग ७८७) दशमीस महोत्सव, हरिदिनी जागरण, द्वादशी पुण्यतिथी, पाच दिवस महोत्सव, अमावास्येला गोपाळकाला त्यानंतर 'काही दिवस हरि राहा येथे' असे विनवून पुढे 'नवदिवस संत समाधीजवळी कीर्तन' आणि 'शुद्ध मार्गेश्वर दशमी भोजने । विधि नारायणे संपादिली । (अभंग ८२८) एकादशीस कीर्तन, द्वादशीस पारणे, त्रयोदशीला देव बाहेर निघाले. हा कार्तिक वद्य १३ पासून मार्गशीर्ष दशमी पर्यंत तेरा-चौदा दिवसांचा सोहळा–विधि–समाधीस बसणाऱ्यासाठी हा सर्व विधी आवश्यक ? कार्तिक कृष्ण ११ चा मान ज्ञानदेवाने मागितला (अ. ७७६)


(४) "योगियांचा सखा" ज्ञानेश्वरास भेटायला हरिहर विधाता अलंकापुरी आले. त्यावेळी 'कोठे ज्ञानेश्वर" असे विचारले तर 'शून्याचिया पोटी निरंजन गुंफा । ज्ञानयज्ञ सोपा सिद्ध केला । उन्मनी निद्रा लागलीसे काळ । स्वरूपी ज्ञानेश्वर जागा झाला । ....लागली समाधी ज्ञानदेवा ।। (अ. ७६५) "देहभान नाही ज्ञानदेवा । करा सावधान" (अ. ७६६ पूर्ण) 'झाला पहा एकांत ज्ञानोबाचा' (अ. ७६७). हे काय दर्शविते ?

(५) सोहळ्याच्या वेळी संतसज्जन विफल झाले.' नव्हे समाधान काही केल्या' 'काय पहावे याला विरक्त पुरुषाला। स्वरूपीं मिळाला ज्ञानदेव' तरीही तिघा भावंडांची स्थिती विचित्र होती. 'कळवळली मनी करिती दीर्घध्वनी। आठविती मनीं ज्ञानदेव। (अ. ७९०). पण किती आठवाल असे देवाने समजाविले 'ब्रह्मी ब्रह्मा खूण मेळविली' 'झाला नाही बां उपाधि। पूर्ण हे समाधी' (अ. ७९४) 'अंतर बाहेर कळले स्वरूप। स्वयें नंदादीप उजळिला॥ १॥ येणे जाणे कोठें योगी पहा अवीट। सान वैकुंठ करुनि ठेवी॥ २॥ ज्ञानीयाला मरण म्हणती **अज्ञान। वाया** तुम्ही शीण करू नका॥ ३॥ (७९५) भावंडांना कसे आवरणार? त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले "संत कासावीस सारे। लाविती पदर डोळियासी" 'आणिकांच्या डोळां अश्रु येती" (८१५, ८१६, ८१९) "बांधल्या तळ्याचा पाट" फुटावा तसे 'काही केल्या मन राहात नाही" 'देवा पेटला हुताशन। करा समाधान निवृत्तीचे" (८१९) देवांनी समाधान करताना म्हटले 'ज्ञानी यांनी ऐसी करावी जंव खंती। अज्ञानाचा किती पाड आला" (८२०) आणि खरेच निवृत्तिसारख्या 'ज्ञानी योगीराजाने असे दुःखाश्रू गाळून विकलता दाखविण्यासारखा हा उदात्त पवित्र प्रसंग होता काय? योगी आणि समाधीस बसणे यात नवीन व विकल होण्यासारखे काय? स्वस्वरूपी विलीन होणे हा लक्षणार्थ आहे काय? समाधीस पुण्यतिथी का म्हणावे? वास्तविक पुण्यतिथीचे हे उदात्तीकरण? पण उन्मनी समाधी अवस्था, देहभान विसरून भोगत असलेले ज्ञानेश्वरास स्नान करविले, त्यांनी सर्वांस नमस्कार केले, नमन केले, पारण्याचे उत्तेजन केले आदि क्रियांचे वर्णन आहे ते कसे? याचाच अर्थ हे प्रकरण चरित्र-लेखनापूर्वी नीटपणे पारखून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

(६) समाधीपुढे 'ज्ञानेश्वरी' ठेविली (अ. ८२५) अमृतानुभव ठेवल्याचा उल्लेख नाही. हे असे का? भक्तिमार्गाचे विवेचन करणारा ग्रंथ ठेवला व योग, ज्ञान यांचा ग्रंथ राखला. यातील अर्थ?

यातून पर्यायाने सुचणारा एक विषय थोडा अपरिचित, म्हणून विचित्र वाटणारा पण विचारणीय.

तीनशे वर्षांनंतर एकनाथांनी ज्ञानेश्वरांच्या स्वप्नातील आदेशा-नुसार अजानवृक्षाची त्यांच्या गळ्याला बसलेली मुळी काढली. पण त्याच्या बरोबरच "ज्ञानेश्वरी" शुद्धीचेही अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले.



आळंदी (देवाची) येथील श्रीज्ञानदेवांची समाधी

पहिला भाग रूपकाचा व दुसरा वास्तविक असेल काय ? समाधीपुढे ठेवलेली ज्ञानेश्वरीची प्रत एकनाथांना क्षत–विक्षत, क्रिमी–भक्षित स्वरूपात मिळाली, व त्यातील खंडित भागाची त्यांनी पूर्ती केली असेल काय ? " आधीच शुद्ध अबद्ध " प्रतीत ' क्षत–विक्षत ' झालेल्या भागालाच त्यांनी आपल्या कर्तृत्वाने पुन्हा 'उजळ' केले हे असंभाव्य, अशक्य दिसत नाही. मुळी काढण्यासाठी ते 'समाधी' स्थानी गेले हे जर मान्य तर ज्ञानेश्वरी मिळण्याची शक्यताही मान्य करण्यास प्रत्यवाय नसावा. नाहीतरी तीनशे वर्षांच्या दीर्घ काळात अनेक प्रती होऊन त्यात पाठांतरे व अशुद्धता आल्याचे म्हणतात. परंतु आजवर एकही प्रत (ज्ञानेश्वर समकालीन तर असोच एकनाथपूर्वकालीनही) सापडलेली नाही. म्हणजे त्यापूर्वीच्या एकूण एक प्रती एकनाथांनी मिळविल्या ? की वस्तुतः त्या नव्हत्याच ? ज्ञानेश्वरीची एकमेव मूळ प्रत जर समाधीत ठेविली गेली तर दुसरी कुठून व कशी येणार ? सच्चिदानंदबाबाच्या प्रतीवरून इतर प्रती झाल्या असे मानले तरी तत्कालीन लेखन–परिस्थितीवरून त्या किती झाल्या असतील ? त्यापेक्षा वरील विचार अधिक सयुक्तिक वाटतो. योगमार्ग, नाथपंथ हा ज्ञानेश्वरांच्या काळापासूनच ' कठीण ' म्हणून हळूहळू उतारावर होता. तशात वारकऱ्यांच्या प्रचंड मेळाव्याने भक्तीची गवांदी घालून मुक्तिमार्ग सरळ, साधा, सोपा केल्याने त्याचा प्रचार–प्रसारही तसाच सर्वसामान्यापर्यंत झाला. महानुभावपंथीयांना जसा अन्य कारणांमुळे आपला उघड प्रचार गुप्त करावा लागला, पंथीयापुरता मर्यादित करावा लागला तसाच नाथपंथही वारकरी पंथ, भागवतापुढे मागे पडला. एकनाथांना स्वप्नदर्शन म्हणजे पुनः प्रेरणा झाली व त्यांनी आपल्या कर्तृत्वाने ते काम संपन्न केले. यावेळपर्यंत नाथ आणि भागवत यांचा समन्वय झालेला असल्याने व मधल्या काळातील प्रतिकूल राजकीय परिस्थितीही निवळल्यामुळे हे कार्य अधिक शक्य झाले. ज्ञानेश्वरी शुद्धीचा हा विचार सयुक्तिक, संभाव्यकोटीचा आहे. एकनाथ हे जसे नाथपंथी तसेच भागवत त्यांनी समन्वयात्मक मार्ग स्वीकारला, यामुळे पुढे झालेल्या नाथ, भागवत, दत्त, आदि सांप्रदायिकात आपापल्या काही वैशिष्ट्यापुरते वेगळेपण दिसत असले तरी समन्वयात्मक सरमिसळही दिसते.

पूर्वापार उपलब्ध सामग्रीच्या विश्लेषणाचे ज्या गोष्टी विचारणीय म्हणून समोर येतात त्या अशा की–

(१) ज्ञानेश्वर हे भक्ती आणि योग याचे समान पालन करणारे. ('धन्य ज्ञानदेव योग साधूनिया । भक्ति आचरोनियां दावी लोकां ॥ ७ ॥ अभंग २०९७ आवटे.) ते उदार, समन्वयवादी, परंतु घट परीक्षेच्या वेळी मुक्ताईचा हट्ट व 'अमृतानुभव' लेखनास निवृत्तीचा आदेश कारण झाला. तीर्थयात्रेची इच्छा स्वतः व्यक्त करून ती घडवून आणण्यात व 'भक्ति' समजून घेण्याची उदार तत्परता दाखविण्यात श्रीज्ञानेश्वरांचा समन्वयात्मक व सर्व संग्राहक दृष्टिकोनच दिसतो. भक्तीचे महात्म्य त्यांना स्वानुभवाने पुनः प्रत्ययास आले व तत्त्व विवेचनास पाठिंबा मिळाला. योगमार्ग हा लोखंडाचे चणे एखाद्या दंतविहीनाने खाण्यासारखा कठीण असल्याचे व प्रत्यक्ष आचरताना एखादा 'दुर्ग' चढून जात असता येणाऱ्या अनेक संकटातून सुखरूप पार पडण्यासारखा कष्टमय असल्याचे त्यांनी सांगून ठेविलेलेच होते. (अध्याय १२ वा, योगदुर्ग अध्याय ६ वा वगैरे.) तरीही वारकऱ्यांचे 'तीर्थस्थान' पंढरी समाधीसाठी न निवडता 'पंढरीहुनी अधिक' असे सांगून वैष्णवांचे पीठ सोडून 'शिवपीठ' ठरविण्यातील रहस्यही ही योगमार्ग परता, नाथपंथाचे आंतरिक आधिक्यच मानणे तर्कयुक्त ठरणारे. हे स्थान निवृत्तींनी पूर्व योजनेनुसार ठरविले. देव बरोबर वावरत होते. रुक्मिणी मार्गदर्शन करीत होती. वारकरी मंडळ पंढरीहून देवासह मुद्दाम आळंदीस आले ! आपल्या मूळ परंपरेबद्दलची आस्था, प्रेम, ओढ आणि म्हणावयाचे झाले तर थोड्या अर्थी अभिमानही समोर येतोच. ज्ञानेश्वरांची स्थिती मात्र 'द्विधा' असणार. दोहीकडे त्यांची सारखीच आस्था, आपुलकी, परंतु त्यांनीहः कुठे आडकाठी घेतली नाही व अलंकापुरच समाधींसाठी देण्याबद्दल देवास म्हटले. अनुभवामृत लेखनानंतर त्यांना एकंदर परिस्थितीची चाहूल लागून यथार्थ जाणीव झालेली दिसते. वारकरी– भागवत धर्माचा वाढता व्याप, सार्वजनिक लोकप्रियता व सहजतेमुळे लोकांचे आकर्षण आणि त्याच्या तुलनेने नाथपंथ त्याच्या कष्टप्रद योगमार्गाबद्दलची एक प्रकारची सादर पण भययुक्त उपेक्षा. यातून निघतो तो निष्कर्ष एवढाच की हळूहळू भक्तीचे महात्म्य वाढत होते व योगमार्ग व पर्यायाने नाथपंथ दुर्लक्षिला जात होता, त्याची हळूहळू पीछेहाट होत होती. ज्ञानेश्वरांनी हे वेळीच हेरले व योग्य तो निर्णय घेतला. ज्ञानेश्वरी समोर ठेवली, अमृतानुभव ठेवला नाही, हे पंथीयाचे कार्यही याच पार्श्वभूमीवर लक्षात घेण्यासारखे आहे. ही कारणे समाधीसाठी कितपत सयुक्तिक, तर्काधिष्ठित, उचित आहेत ते विद्वान अभ्यासकांनी ठरवावे.

आणि शेवटी 'समाधी' प्रकरण व आनुषंगिक सामग्री नीट वाचली. लौकिक, व्यावहारिक दृष्टी–बुद्धीने मनन केले; एकंदर भाषा, शब्द, वर्णने, कार्यक्रम, वातावरण पाहिले, लेखन–वर्णनातील अद्‌भुत, अलौकिक, असंभाव्य कोटीतले वाटणारे

चित्रण, अलंकारिकता बाजूला ठेविली तर या सर्वांतून सरळ, साहजिक, नैसर्गिक, मननीय वाटणारा विचार एवढाच येतो की, अल्पायुष्यभर अकल्पनीय, अकथनीय देहकष्ट, मानसिक त्रास सहन करणाऱ्या या भावंडांचे देह–स्वास्थ्य ही मानवीयच असणार. तशात ज्ञानेश्वरांनी तर अचाट बौद्धिक कार्य केलेले. एकीकडे प्रथम लोकोद्धारार्थ ज्ञानेश्वरी, मग पंथासाठी अमृतानुभव; तशात अन्य दृष्टिकोन समजून घेण्यासाठी तीर्थयात्रा व तीही माहितीनुसार भारत भ्रमणाची, दीर्घयात्रा केल्याने साहजिकच त्यांच्या मानवी देहावर किती ताण पडला असेल हे सहज लक्षात येते. कष्टाची पुढची पायरी झीज. पंढरपुरास ऐन वारकऱ्यांच्या एकादशीच्या पुण्यपर्वात तल्लीन मेळाव्यात ज्ञानेश्वरांनी आपला समाधी निर्णय प्रकट करण्यात औचित्य दिसत नाही. दैहिक अवस्थाच तशी झाली असली पाहिजे, म्हणूनच वारकरी मंडळांना पंढरीस सोडून ते आळंदीस आले व मागून देवासह वारकरी तेथे पोचले व एकंदर कार्यक्रम पार पडला. त्यात पुढाकार नाथपंथीयांचा नव्हे तर वारकरी पुढारी–प्रतिनिधी नामदेवांचा. एकंदर विधीची कल्पना पूर्वी दिलीच आहे. " **अज्ञानी मरण म्हणतात.** " पण ही स्वरूपी विलीन होण्याची प्रक्रिया मात्र आहे. " घटचिया योगें प्रतिबिंब आसे । काय म्हणे नासे निरालंब " (अभंग ७९५) " अंतर बाहेर कळले स्वरूप । स्वयें नंदादीप उजाळिला । येणे जाणे कोठें योगी पहा अवीट । सान वैकुंठ करूनी ठेवी " इत्यादिच्या द्वारे " **स्वरूपीं पालटला ज्ञानदेव** " असे तत्त्वज्ञान सांगितले. हे सर्व साधारण दैहिक अनिवार्य घटनेचे उदात्तीकरण तर नव्हे असा विचित्र विचार क्षणमात्र चमकून जातो. कारण इकडे असे तर " समाधीला बसलेल्या " साठी होणारा कार्यक्रम विधी तेरा–चौदा दिवसांचा, चक्रतीर्थावर, आदि काय सुचवितो ? (अभंग ७९६; ७९९, ८१०, ८२८.) संत श्रीतुकाराम बाबांच्या " सदेह स्वर्गगमना " च्या झालेल्या उदात्तीकरणाची सहजच आठवण होते.

हा धसका सामान्य नव्हे. ' जिवाचा जिवलग सखा ज्ञानेश्वर ' असा अकस्मात समाधिस्त झाला. प्रिय भावंडांचा मोठा आधारच गेला. मित्राचा परममित्र गेला. आणि हळूहळू सोपान, मुक्ता, चांगा, निवृत्ती असे एकेक करून अवघ्या एका वर्षाच्या आत समाधिस्त झाले, वैकुंठवासी झाले.

卐 卐 卐

श्रीज्ञानेश चरित्रासंबंधी काही विचार

श्री. किसन महाराज साखरे, आळंदी

(१) अवतार–प्रवृत्ति निमित्त

जगाच्या परम कल्याणार्थ देवांचे व संतांचे या अवनीतलावर अवतार होतात. त्यांत दुष्टांचा संहार या कार्याऐवजी दुष्टांचा दुष्टपणा जाऊन त्यांचाही वेदप्रणित मार्गाने उद्धार करणे, धर्मसंस्थापना करणे व साधूंचे रक्षण करणे ही कार्ये संत करतात. ज्या ज्या वेळी धर्मावर ग्लानी येते व धर्मानुगुण अशा भक्ती, ज्ञान, वैराग्य, वेदनीती, दया, क्षमा इत्यादी दैवी संपत्तींचा ऱ्हास होतो, त्या त्या वेळी धर्माचे पुनरुज्जीवन करण्यासाठी देव आणि संत अवतार घेतात. अर्थात् धर्मरक्षण, साधूंचे परित्राण आणि दुष्ट उध्दरण ही तीन संत अवताराची प्रमुख प्रवृत्ति निमित्ते होत.

अगदी हीच प्रवृत्तिनिमित्ते संतसम्राट श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या अवताराचीही आहेत—

लोपले ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंगें । नांवें ठेविले ज्ञानी ।।

या श्रीरामजनार्दनोक्तिनुसार समाजात अद्वैत तत्त्वज्ञानाचा लोप होऊन समाजाला आपले खरे हित कशात आहे वा आपले हिततम ब्रह्मस्वरूप हेच खरे मूळ स्वरूप आहे याचा निश्चित निर्णय होईनासा झाला. त्याच काळी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी स्वेच्छामय विग्रह धारण करून या वसुधातलावर अवतार घेतला.

(२) अवतार-काल–परिस्थिती (सामाजिक–राजकीय)

श्री ज्ञानेश्वर महाराजांचा अवतार ज्या राजवटीच्या काली झाला तो काल खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या भाग्यविधात्याने समाजहितासाठी मुद्दाम म्हणून घडवून आणलेला महत्त्वपूर्ण काळ होय. तो काळ म्हणजे महाराष्ट्राच्या भाग्याचाच एक समर्थ सर्वोत्कृष्ट असा अभूतपूर्व आविष्कार होय. कारण, त्या वेळीची ती राजवट म्हणजे यादवांची राजवट होती. देवगिरीचा 'रामदेवराव यादव' यांच्या राज-

वटीचा तो काल होता. संतसम्राट श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या काळात ज्या रामदेवराव यादवाचे राज्य होते तो रामदेवराव यादव हा मोठा वेदनीतीचा पुरस्कर्ता व धर्मनिष्ठ होता. शिवाय तो अनेकविध भाषिक, पंडितांना, कलावंतांना आणि विद्वानांना आश्रय देत असे. स्वत: श्री ज्ञानेश्वर महाराजही रामदेवराव यादवाविषयी गौरवपूर्ण भाषेत सांगतात—

'तेथ यदुवंश विलासु। जो सकळ कळा निवासु।
न्यायाते पोषी क्षितीश। श्रीरामचंद्रु ॥'

अशा या न्यायनीतिसंपन्न, धर्मसंपन्न रामदेवरावांच्या उत्कर्षाच्या व भरभराटीच्या कलशस्थानी पोचलेल्या समृद्ध राज्य कालात श्री ज्ञानेश्वर महाराजांचा अवतार झाला. अशा ऐहिक दृष्टचा समृद्ध व संपन्न जीवन जगत असलेल्या जनसामान्यांना वेदप्रणित अद्वैत तत्त्वज्ञान पटवून सांगण्याची आवश्यकता भासू लागली होती. कारण सर्वसामान्य जनता ही अवैदिक व निरीश्वरवादी होत चालली होती, अतीन्द्रिय धर्मनिष्ठा व ईश्वरनिष्ठा हळूहळू कमी होत चालली होती. दुरित समूह व दुरित तिमिर वाढत चालले होते. वैचारिक क्षेत्रांत तत्त्वज्ञानाची व आचार क्षेत्रात वेदनीतीची जाण यथावत् स्वरूपात राहणार नाही; अशी स्थिती निर्माण झाली होती. त्या काळात कळिकाळ या सर्व भूतमात्रांना ग्रासित असल्याचे दिसत होते. त्या काळातील लोकसमाजचित्र श्री ज्ञानेशांना जे स्पष्ट दिसत होते. त्याविषयी श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

'तेणे कळिकळितु भूतां। आला देखोनि निरुता।
ते आज्ञा श्री निवृत्तिनाथा। दिधली ऐसी ॥ १७५८ ॥
ना आदिगुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संसरा। जाला तो आमुतें ॥ ५९ ॥
तो हा तूं घेऊनि आघवा। कळीं गिळितयां जीवां।
सर्व प्रकारी धावा। करी पां वेगीं ॥ ६० ॥
आधीच तंव तो कृपाळू। वरी गुरुआज्ञेचा बोलू।
जाला जैसा वर्षाकाळू। खवळणें मेघां ॥ ६१ ॥
मग आर्तांचेनि वोरसें। गीतार्थग्रंथनमिसे।
वर्षला शांतरसे। तो हा ग्रंथु ॥ ६२ ॥
तेथ पुढां मी बापिया। मांडला आर्ती आपुलिया।
कीं यासाठीं येवढिया। आणिलो यशा ॥ १७६३ ॥

कळी हा जीवांना पीडा देऊन संत्रस्त करीत आहे, असे पाहून श्री गहिनीनाथ हा धावून आला व त्याने श्री निवृत्तिनाथांना अशी आज्ञा केली की; आदिगुरु

शंकरापासून गुरुशिष्यपरंपरेने जो ज्ञानोपदेशाचा अविच्छिन्न संप्रदाय आमच्यापर्यंत येऊन प्राप्त झाला आहे, तो हा ज्ञानोपदेशाचा संप्रदाय तू आपल्या हाती घेऊन कळीने ग्रासलेल्या जीवाकडे अतीव वेगाने धावत जाऊन, त्यांची सर्व प्रकारे सर्व दुःखातून सदाचीच मुक्तता कर. आधीच तर तो निवृत्तिनाथ अतीव कृपाळू, त्यात श्रीगुरुंचे आज्ञावाक्य लाभले. वर्षाकाळ जसा मेघाच्या खवळण्यास कारण होतो· त्याप्रमाणे तो श्रीनिवृत्तिनाथ दुःखपीडित जीवांच्या दयेने हा गीतार्थ ओवी-छंदांत ग्रथित करण्याच्या निमित्ताने त्याने शांतरसाची, वेदान्त महारसाची, जी वृष्टी केली तोच हा माझा ओवीरूप ग्रंथ होय. तो श्रीनिवृत्तिनाथ शांतरसाचा वर्षाव करीत असता तेथे मी बापडा चातक उद्धारार्थ तीव्र जिज्ञासेने सहजच त्यांच्यासमोर उभा राहिलो, तेव्हा मी अनन्य असल्याचे पाहून मजवर केवळ एवढ्या एकाच कारणास्तव कृपा केली. त्यांचेकरवी मी एवढ्या ग्रंथ-कर्तृत्वाच्या नावारूपाच्या यशास आणिलो गेलो. यादवांच्या ऐहिक समृद्ध अशा राजवटीतही ‘ कळी कळितु भूतां ’ ‘ कळी गिळितया जीवा ’ असा संकट–प्रसंग यावा याचा अर्थ भौतिक, ऐहिक दृष्टया जरी समाज व राजवट वैभवसंपन्न असली तरी तत्त्वज्ञान, ईश्वरनिष्ठा आणि सत्कृती या क्षेत्रांत खरीच अराजकता पसरली होती. त्यास अनुलक्षून श्री ज्ञानेश्वर महाराज उपर्युक्त पदयोजनेच्या द्वारा सूचित करतात. वैचारिक क्षेत्रांत आध्यामिक व धार्मिक क्षेत्रात हर–एक जीवास अधिकारानुरूप वैदिक साधनानुष्ठानद्वारा आपला स्वतःचा उद्धार करून घेण्याचा मूलभूत, स्वभावसिद्ध हक्क आहे; या आध्यात्मिक लोकशाहीचा पहिला पुरस्कार, प्रचार व प्रसार करण्याचे काम व समाज हितोपयोगी, सार्वकालिक, सार्वजनीन, महत्त्वपूर्ण असे अवतार कार्य वाङ्मयनिर्मितीच्या द्वारा महाकैवल्यतेजोनिधी श्री ज्ञानेश्वर महाराजांनी करून त्यास स्थिरप्रतिष्ठत केले.

(३) श्रीज्ञानेशविषयक वाद

संतसम्राट श्रीज्ञानेशांचे चरित्र आणि वाङ्मय–त्यातही चरित्र हे निर्भेळ स्वरूपात उपलब्ध नाही, ही एक अत्यंत खेदाची गोष्ट आहे, असे नाइलाजास्तव म्हणावे लागते. त्यांच्या चरित्रात त्यांचा जन्मशक कोणता ? त्यांचा जन्मकाल कोणता ? श्रीक्षेत्र आळंदी व आपेगाव यांपैकी जन्मस्थळ कोणते ? त्यांचे खरे नाव कोणते ? त्यांच्या भावंडांची खरी नावे कोणती ? त्यांच्या वडिलांनी संन्यासदीक्षा घेतली ती कशी व का ? तो संन्यास मुले होण्यापूर्वी घेतला का नंतर घेतला ? त्यांनी प्रयाग क्षेत्रांत देहान्त प्रायश्चित्त घेतले का हिमालयात निघून गेले ? यात खरे काय ? श्री ज्ञानेशांनी ग्रंथरचना केली की अन्य कोणी केली ? वयाच्या सोळाव्या वर्षी ग्रंथरचना करणे कसे संभवनीय आहे ? आज उपलब्ध असलेली ज्ञानेश्वरी श्री ज्ञानेशांनी जशी सांगितली तशीच आहे का त्यांत फेरफार झालेले

आहेत ? अभंगकर्ते व ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव एक की दोन ? ज्ञानदेव ही व्यक्ती ऐतिहासिक का वाङ्मयीन ? ज्ञानेशांनी आपले स्वतंत्र असे तत्त्वज्ञान लिहिले की पूर्वसुरींचाच केवळ मागोवा घेतला ? श्रीज्ञानेश स्वतंत्रप्रज्ञ असतील 'भाष्यकारांते वाट पुसतु' म्हणण्यात काय हंशील ? बरे ! त्यांनी पूर्वसुरींचाच मागोवा घेतला वा त्यांचेच केवळ अनुकरण केले तर मग ते स्वतंत्रप्रज्ञ होते या म्हणण्यात हंशील काय ? श्रीज्ञानेशांनी स्वतंत्र तत्त्वज्ञान सांगितले असले तर ते अनुभवामृतात आहे की, ज्ञानेश्वरीत आहे की चांगदेवपासष्टीत आहे की, हरिपाठात आहे की, स्फूट अभंगांत आहे ? असे एक ना अनेक संशय निर्माण होतात, किंबहुना या संशयपूर्ण परिस्थितीत निश्चित निर्णय करणे साऱ्याच विद्वानांना कठीण होऊन बसले आहे. आता अमूक एक विधान अव्यभिचरितपणे अचूक आहे, असे विधान करणे अवघड आहे; तरीपण 'शक्य' कोटींतील गोष्टींचा उत्तम समन्वय साधला तर काहीसा चरित्राचा विषय निर्णित होईल. विरोधी वचनांचा 'विरोध परिहार' पद्धतीने विचार केल्यास, 'अधिकारभेदाने विचार केल्यास', 'गौण-प्रधानभावाने' विचार केल्यास, उचित-सम्यक-समतोल समन्वयाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण स्वरूपाचे ठरेल.

(४) श्रीज्ञानेशांचा जन्मशक, जन्मक्षेत्र व वंशावळ

श्रीज्ञानेश्वर महाराज हे साक्षात महाविष्णुचा अवतार होत. त्यांचा जन्म काम–कर्म–अविद्या त्रिगुण, इत्यादिकारण समुदायाविना झालेला आहे. सर्वबंध-लक्षण जीवदशा, चिदचिद्ग्रंथी, धातुसंबंध इत्यादि कारणे सर्वसामान्य जीवांच्या बाबतीत जन्मास कारण संभवतात; पण स्वेच्छामय विग्रह धारण करणाऱ्या भगवदावतारी महापुरुषाच्या जन्मास ती कारणे संभवत नाहीत. अवतारी पुरुषाचाही जन्म दिव्य असतो व त्यांचे कर्मही दिव्य असते. त्याप्रमाणे श्रीज्ञानेश्वर महाराज अवतारी पुरुष होते. त्याचे मूळपुरुष श्री हरिहरपंत कुलकर्णी हे आपेगावचे होत. त्यांचे चिरंजीव रामचंद्रपन्त, त्यांचे चिरंजीव गोपाळपन्त, त्यांचे चिरंजीव त्र्यंबकपंत, त्यांचे पुत्र गोविन्दपन्त, त्यांचे पुत्र विठ्ठलपन्त- हेच श्रीनिवृत्तिनाथ, श्री ज्ञानेश्वर महाराज, श्रीसोपानकाका आणि मुक्ताबाई या भावंडांचे वडील होत. श्रीज्ञानेशांच्या आईचे नाव रुक्मिणीबाई होते. हे सर्व घराणे निष्ठावन्त पंढरीच्या वारकऱ्यांचे होते. आळंदीचे सिद्धोपन्त कुलकर्णी यांनी आपली कन्या पंढरीनाथांनी स्वप्नात येऊन केलेल्या आज्ञेवरून विठ्ठलपंतांना दिली. श्रीक्षेत्र आळंदी येथे विठ्ठलपंतांचा विवाह झाला. बऱ्याच दिवसांत पोटी पुत्रसंतान नसल्यामुळे व वैराग्यामुळे विठ्ठल-पंतांनीं श्रीकाशीक्षेत्री जाऊन संन्यासदीक्षा घेतली. आपल्या पतिरायांनी संन्यास घेतला हे समजल्यावर रुक्मिणीबाईंनी पिंपळवृक्षाला प्रदक्षिणा घालण्यास प्रारंभ केला. ज्या स्वामीजवळ श्रीविठ्ठलपंतांनी संन्यास घेतला त्यांना रुक्मिणीबाईच्या

तपोबलाने असा विश्वेश्वराचा दृष्टान्त झाला की, 'आपण ज्यास दीक्षा दिली आहे; त्यास पत्नी आहे. त्याला पुन्हा त्या पत्नीचा अंगीकार करण्याची आज्ञा करावी' त्याप्रमाणे गुर्वाज्ञा झाली. गुर्वाज्ञेप्रमाणे विठ्ठलपंतांच्या संसारास प्रारंभ झाला नसून जगदोद्धाराचाच प्रारंभ झाला. तर श्रीविठ्ठलपंतांना चार अपत्ये झाली. त्यांची नावे, श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानदेव, श्रीसोपानदेव आणि मुक्ताबाई अशी होती. श्रीज्ञानेशांचा जन्मशक ११९७ हाच आहे या विषयी इतर संतांचे पुरावे उपलब्ध होतात ते असे—

श्रीसंत कवियित्री जनाबाई सांगतात—

' शके अकराशे पंचाण्णव संवत्सरीं । निवृत्ति उदरी प्रगटले ॥ १ ॥
सत्याण्णव सालीं ज्ञानदेव झाले । नव्याण्णवी देखिले सोपानदेवा ॥ २ ॥
बाराशते एकी मुक्ताई जन्मली । जनी म्हणे केली मात त्यांनी ॥ ३ ॥'

श्रीसंत विसोबा खेचर सांगतात—

' महाविष्णुचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
शके अकराशे सत्याण्णव । युवा संवत्सर नाम ॥ २ ॥
वर्षा ऋतु श्रावण मास । कृष्ण पक्ष पर्व दिवस ॥ ३ ॥
अष्टमीचे अपर रातीं । उदया आला निशापती ॥ ४ ॥
विठ्ठल रुक्माईचे कुशी । अवतरले ऋषीकेशी ॥ ५ ॥
विश्व तारावया आले । खेचर वंदीतो पाऊले ॥ ६ ॥'

श्रीसच्चिदानंदबाबा सांगतात—

'श्री शालिवाहन भूपती । अकराशे सत्याण्णव युतीं ।
युवा नाम संवत्सर प्रति । श्रावण कृष्ण अष्टमी ॥
गुरुवार रोहिणी । पर्वकाळ परार्ध रजनी ।
बैसोनि देवगण विमानी । कुसुम वृष्टि करिताती ॥
विठ्ठल रुक्मिणीचे पोटीं । अवतरले जगजेठी ।
ज्ञानदेव नामे सृष्टीं । श्रीगुरु माझा मिरवतसे ॥

या सर्व पुराव्यावरून श्रीज्ञानेश्वर महाराजांचा जन्म शके ११९७ सालीच झाला असे सिद्ध होते. श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञानदेव, श्रीसोपानदेव आणि मुक्ताबाई या सर्व भावंडांचा जन्म श्रीक्षेत्र आळंदी येथेच झाला. उपर्युक्त प्रमाणांवरून श्रीनिवृत्तिनाथ शके अकराशे पंच्याण्णव साली, श्रीज्ञानेश शके अकराशे सत्याण्णव साली, श्रीसोपानदेव शके अकराशे नव्याण्णव साली आणि मुक्ताबाई शके बाराशे

एक साली अवतीर्ण झाले. असे हे जन्मशक बहुत इतिहासकारांनी मान्य केले आहेत.

श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मशकाविषयी व जन्मस्थळाविषयी निर्णित संपूर्ण निर्णय देणारा श्रीभक्तशिरोमणी नामदेव महाराजांचा जो अभंग पुरावा आहे तो असा—

' अधिक सत्याण्णव शके अकरा शती ।
श्रावणमास तिथी कृष्णाष्टमी ॥ १ ॥

वर्षा ऋतु युवा नाम संवत्सर ।
उगवे निशाकर रात्रीमाजीं ॥ २ ॥

पंचमहापातकी तारावया जन ।
आले नारायण मृत्युलोका ॥ ३ ॥

नामा पूर्ण ब्रह्म ज्ञानेश्वर ।
घेतसे अवतार अलंकापुरी ॥ ४ ॥

हा अभंग म्हणजे श्रीज्ञानेशांच्या जन्मकाळचा व जन्मस्थळाचा निश्चित निर्णय सांगणारा आहे. ' अवतार ' म्हणजे निर्गुण–निराकार, अशा स्वरूपापासून अवतरण होणे, खाली उतरणे, खाली येणे, सगुण–साकार होणे. हा वा असेच अनेक अर्थ ' अवतार ' शब्दाचे संभवतात. अवतार शब्दाचा अर्थ ' अवतारकार्य ' असा स्वीकारून कांही लोक अलंकापुरीत ' अवतार घेतसे ' म्हणजे ' अवतारकार्य घडले ' असा या अभंगांतील शेवटच्या चरणाचा अर्थ लावतात. त्यांत ' स्वरसतः ' अर्थाविष्कृती दिसत नाही, अवतार म्हणजे अवतारकार्य अशी अर्थाची ओढाताण दिसते. जसा भगवंताचा जन्म मथुरेत झाला व अवतार–प्राकटच मात्र गोकुळात झाले. त्या प्राकटचास उद्देशून संतांनी बाळक्रीडेत गोकुळात श्रीकृष्णाचा अवतार झाला असल्याचे सांगितले आहे; पण महाकैवल्यतेजोनिधी श्रीज्ञानेशांचे बाबतीत जन्म एके ठिकाणी व प्राकटच अन्य ठिकाणी असा काही प्रकार घडला नाही. परंपरेने ऐकिवातही नाही. ' अवतार पांडुरंग नांव ठेवियले ज्ञानी ' असे साक्षात् पांडुरंगच, भगवान श्रीकृष्णच, श्रीमहाविष्णुच श्रीज्ञानदेवरूपाने या वसुधातलावर, अलंकापुरी अवतीर्ण झाले. जुनाट शिवपीठ श्रीक्षेत्र आळंदी हीच चौघा भावंडांची जन्मभूमी आहे काही लोक उपरिनिर्दिष्ट अभंग ' क्षेपक ' असल्याचा दावा करतात पण ' जन्मकाळ ' सांगणारा या अभंगासारखा बळकट आधार, प्रबळ पुरावा अन्य उपलब्ध होत नसल्याने अगतिकत्वाने ' जन्मकाळ अकराशे सत्याण्णव ' आहे हे सांगण्यासाठी हाच अभंग मानावा लागतो. म्हणून प्रथम चरणातील काळनिर्देश करणारा अभंग एका प्रसंगी प्रबळ पुरावा व अंतिम चरणात स्थळनिर्देश करणारा

अभंग म्हणून क्षेपक मानणे दोषग्रस्त असल्याचे जाणून 'अवतार म्हणजे जन्म नव्हे तर अवतारकार्य' असा अर्थ-पर्याय सांगून मोकळे होतात. ज्या अभंगांतील एका चरणाच्या आधारे चौघा भावंडांचा जन्म आपेगावी झाला असे सांगितले जाते, तो अभंग जन्माच्या स्थल-कालांचा निर्देश करण्याच्या प्रसंगी आलेला नाही. श्रीज्ञानदेव, श्री सोपानदेव यांना समाधी दिल्यावर श्रीनिवृत्तिनाथ, मुक्ताबाई आणि नामदेव इत्यादि संत नेवासा, पैठण येथे आले व तेथून 'आपेगाव पाहू' की, जी आपल्या पूर्वजांची 'मायभूमी आहे' ती उत्कंठा बाळगून ते आपेगावी आले. त्याप्रसंगी श्रीनामदेव महाराज म्हणतात—

'मायभूमी पाहू याचि आम्ही डोळा ।
चलावे गोपाळा सहजासहज ॥

भक्त त्र्यम्बकपन्त मूळ पुरुष आदि ।
तयाचि समाधि आपेगांवीं ॥

आपेगावीं आले देव ऋषीश्वर ।
उतरले भार वैष्णवांचे ॥

धन्य यांचे कुळ धन्य यांचा वंश ।
धन्य यांचे कुशी योगीराज ॥

नामा म्हणे आम्हा दाविले नारायणे ।
जाली चौघी जणे याचि क्षेत्रीं ॥

आपेगावीं असलेल्या वैष्णवकुळांत महाभगवत्‌भक्त श्रीविठ्ठलपंत हे चौघा भावंडांचे वडील होत. ही श्री ज्ञानदेवांच्या पूर्वजांची, मूळ पुरुषांची 'मायभूमि.' ही 'जाली चौघीजणी याचि क्षेत्रीं' याचा अभिप्रायार्थ 'चौघीजणे या क्षेत्रात जन्मली' असा सांगण्यात नसून 'ज्या पवित्र कुळात ही चौघीजणे जन्मली त्या पवित्र कुलाचे हेच क्षेत्र आपेगाव होय. ती भूमी आम्हां वैष्णवांस नारायणाने दाखविली.' एवढाच अभिप्राय सांगण्यात या अभंगाची प्रवृत्ती आहे, संतांची वचने प्रमाण मानूनही आपापल्या 'बुद्धि-कल्पनेप्रमाणे' अर्थ मानला व इतिहास मानला तर तो तरी खरा प्रामाणिक आहे कशावरून ? असा प्रश्न शिल्लक राहातो तो राहातोच.

(५) श्री ज्ञानदेव एक की दोन

अभंगकर्ते ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीकर्ते ज्ञानदेव याविषयी बराच वाद आहे. याविषयी ब्र. भू. वि. ना. जोशी साखरे महाराजांनी दिलेला निर्णय अचूक आहे. तो थोडक्यात असा—

' काही विद्वान् लोकांचे असे मत आहे की, भगवत्‌गीतेवर 'भावार्थदीपिका' नावाचा ग्रंथ लिहिणारे ज्ञानेश्वर व अभंग रचणारे ज्ञानेश्वर या दोन्ही व्यक्ती एकाच नावाच्या खऱ्या; पण ते दोघे भिन्न आहेत. कारण, भावार्थदीपिका म्हणजे ज्ञानेश्वरी या ग्रंथांतील भाषा अभंगांतील भाषेपेक्षा सोपी आहे. (हा वाद सुमारे ४० वर्षांपूर्वी भारद्वाज व भिंगारकर यांच्यामध्ये झाल्याचे प्रसिद्ध आहे.) पण हे म्हणणे योग्य नाही. त्या दोन्ही ग्रंथांचे कर्ते ज्ञानेश्वर ही एकच व्यक्ती आहे. याच्या पुष्टयर्थ ज्ञानेश्वरांच्या अभंगातील चरण दिल्यास वेगळ्या सिद्धतेची जरूरच भासणार नाही. तो चरण असा—

ज्ञानदेवें भाष्य केले। गीता ज्ञान विस्तारिलें।
भक्ति भाग्यवंती घेतले। भाष्य करुनि गीतेच्या ॥

अभंगकार श्रीज्ञानेश्वरांनीच गीतेवर भाष्य केल्याची कबुली दिल्यामुळे आता भाष्यकार व अभंगकार ज्ञानेश्वर अशा दोन व्यक्ती होत्या या शंकेस वावच राहात नाही.' शिवाय ज्ञानेश्वर महाराजांच्या एकूण पाच ग्रंथांतील शब्दसाम्यावरून; अर्थसाम्यावरून, सिद्धान्तसाम्यावरून या पाचही ग्रंथांचे कर्ते एकमेवाद्वितीय श्रीज्ञानदेवच आहेत हे सिद्ध होते. भिन्न कर्ते असल्याची मते भ्रमदूषित आहेत; हेही विचारान्ती लक्षी घेण्याजोगे आहे. ज्ञानेश्वरींत कर्म–उपासना व ज्ञान यांचा समन्वय सांगून सृष्टिप्रक्रियेवर भर देऊन एकमेवाद्वितीय स्वसंवेद्य आत्मरूप व सकलार्थ मति प्रकाशरूप देवाचे प्रतिपादन केले आहे. त्याचप्रमाणे अमृतानुभवात प्रमाण–प्रमेय भावविवर्जित, ज्ञानाज्ञानविरहित स्वयंप्रकाशनिर्गुण ब्रह्माचे निषेधावधीभूत स्वरूप सांगून स्वयंप्रकाश ब्रह्माचेच स्वरूप सांगितले आहे. चांगदेव पासष्टीतही निर्गुण, निर्विशेष दृश्य दृष्टा याहून अतीत केवळ दृङ्‌मात्र संवित् स्वरूप ब्रह्माचेच वर्णन केले आहे.

हरिपाठ व स्फुट अभंग यांत स्वयंप्रकाश आत्मरूप देवाच्या प्राप्तीचा उपाय म्हणून नामसंकीर्तनादि भक्तीचा विस्तार प्रतिपादिलेला आहे. त्या अद्वैताच्या बैठकीवर आधारलेल्या भक्तीची बीजे ज्ञानेश्वरीतही आढळात येतात. अशा विचारान्ती पाचही ग्रंथरत्नातील सैद्धान्तिक साम्य आणि सम्यक्-समतोल समन्वय पाहिल्याने भ्रमदूषित मते कशी चुकीची आहेत हे लक्षी येणे सोपे होईल.

(६) श्रीज्ञानेशांचा जीवनपट

शके ११९७ श्रावण वद्य अष्टमी, मध्यरात्री, युवानाम संवत्सर श्रीक्षेत्र आळंदी येथे जन्म. शके १२०२ ते १२०९ मातापित्यांचा वियोग, श्रीनिवृत्तिनाथ, श्रीज्ञाननाथ, श्रीसोपानदेव आणि मुक्ताबाई ही भावंडे पोरकी झाली. पैठण येथे सर्व भावंडांसह शुद्धिपत्रासाठी प्रयाण, रेड्यामुखी वेद बोलविल्याचा चमत्कार.

शके १२१२ श्रीक्षेत्र नेवासा येथे श्री ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना, श्रीक्षेत्र आळंदीस परत आले.

शके १२१३ श्री चांगदेव भेट. आळंदी येथे चांगदेवपासष्टी रचना.

शके १२१४ अनुभवामृत या अत्युच्च सिद्धान्त ग्रंथाची रचना.

शके १२१४ ते १२१८ श्री नामदेव महाराजांसह तीर्थयात्रा, हरिपाठ रचना, स्फुट अभंग रचना, वारकरी संप्रदायास पूर्ण उन्नत व विकसित वैदिक स्वरूप प्राप्त करून देणारी तत्त्वज्ञानाची बैसका भक्कम केली. शके १२१८ कार्तिक वद्य १३ श्रीक्षेत्र आळंदी येथे 'संजीवन समाधी'.

सारांश, हा संशोधनाचा विषय विवाद्य असूनही पुन्हा त्याविषयी लिहिण्याचा उद्देश असा की, नव्याने उपलब्ध होणारे ऐतिहासिक पुरावे एकत्र करून त्याचे संशोधक व चिकित्सक दृष्टीने विद्वानांनी त्या त्या विवाद्य विषयांविषयी निर्णय घेण्याचा प्रयत्न केला व विद्वानांचे ऐक्यमत सहजी संभवत नाही, या नियमास अपवाद ठरून जर आधुनिक संशोधकांस, चिकित्सकांस एकमताने काही अचूक निर्णय लाभला तर वैचारिक क्षेत्रात त्याचा अभ्यासकांस लाभ होईल. म्हणून हे एक चिंतन व संशयात्मक संभवनीय मुद्दे आणि विचारांची अनाग्रही दिशा मांडून श्री ज्ञानेशांच्या वाङ्मयाचे चिंतन विचार क्षेत्रात प्रेरक, उद्बोधक आणि आचार-क्षेत्रात संजीवक ठरेल असा आत्मविश्वास व्यक्तविला आहे.

आजकाल शके १२१२ हा काल 'ज्ञानेश्वरी' चा रचनाकाल प्रमाण मानला जातो, वादातीत मानला जातो; पण ज्ञानदेव हे ज्ञानेश्वर केव्हा झाले? तर ज्ञानेश्वरी रचनाकालाची दर्शक अखेरची ओवी लिहिली तेव्हा; असेच त्याचे उत्तर द्यावे लागेल. 'ज्ञानदेव' या नावाऐवजी 'ज्ञानेश्वर' नाव आलेली ही ओवी सच्चिदानंदबाबांनी वा त्यांच्या भक्तांनी लिहिली असली पाहिजे असा तर्क पुढे आला तर ज्ञानेश्वरी रचनाकालही विवाद्य ठरण्याचा दाट संभव आहे. निदानपक्षी यदुवंशविलास रामचंद्र राजाच्या कालात श्रीज्ञानेश्वरीची रचना झाली असा पक्ष स्वीकारावा लागेल. तसाच समाधिकालही शके १२१८ हाही विवाद्य ठरण्याचा संभव आहे, इतकेच नव्हे तर ज्ञानेश्वरी स्वतः ज्ञानदेवांनी लिहिलीच नाही त्यांनी फक्त सांगितली व सच्चिदानंदबाबा व इतर अनेक श्रोत्यांनी ती लिहून घेतली असली पाहिजे. भोजपत्रादिकावरच लिहिली असणे दाट संभवनीय आहे. कागदाचा शोध त्यावेळी लागला होता की नाही, कागदच उपलब्ध नसेल तर 'भोजपत्रा-दिकावर' ती लिहिली असणे संभवनीय आहे. त्यामुळे श्रीज्ञानेशांनी जे सांगितले तेच लिहिले गेले असणे अवघड आहे. म्हणून अनवधानानें लेखकाकडून चुकीचे,

भलतेच लिहिले जाणे शक्य आहे. मग श्री एकनाथ महाराजांना उपलब्ध झालेली प्रत तर नेमकी कोणती ? हेही आज निश्चित निर्णित होणे अवघड आहे.

तेव्हा या तर्ककर्कश, संदेहकारक, संशोधनाच्या मोहाला, वृत्तीला कोठेतरी आवर घातला पाहिजे. श्रीज्ञानदेवांनी आपल्या स्वतःच्या हाताने लिहिलेली ज्ञानेश्वरी त्यांची मूळ वाङ्मयमूर्ती लाभणे अशक्य होऊन बसले आहे. ती केव्हा लाभेल हेही नक्की सांगता येत नाही. म्हणून मुमुक्षूने या पाठभेद, कालनिर्णयभेद, स्थलनिर्णयभेद लागेपर्यंत वाट बघत न बसता पाठभेदावाचून काही ओव्या जशाच्या तशा उपलब्ध आहेत. त्या काही पाठात असलेल्या 'भेदांमुळे' मूळ तत्त्वज्ञानात, सिद्धान्तात बदल होत नाही. त्यामुळे ज्ञानेशांना अभिप्रेत असलेले जे नित्यनूतन, अद्वैततत्त्व त्यात मुळीच बिघाड होत नाही हे जाणून प्राप्त वाङ्मयाचे श्रवण-मनन विद्याभ्यास करून रम्य समाधान मिळवावे हेच बरे !! किंबहुना या सप्तम–जन्मशताब्दिनिमित्ताने त्यांच्या उपलब्ध वाङ्मयाचे द्वारा त्याचे चिंतन, मनन करून मोक्ष साधनीभूत दैवीसंपत्तीचे परिपालन करणे, सद्‌गुणांची जोपासना करणे आध्यात्मिक तापातील आधि व व्याधी या प्रकारांपैकी आधि म्हणजे मानसिक ताप, चिंता त्यांचा परित्याग करून मनःशांती मिळविणे वा तशी स्थिती मिळविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्नशील होणे हेच आपले कर्तव्य ठरते. इतिशम्.

卐 卐 卐

काय सांगो देवा ज्ञानोबाची ख्याती । वेद म्हैशामुखी वदविले ॥ १ ॥
कठिवरी वानू याची स्वरूपस्थिती । चालविली भिंती मृत्तिकेची ॥ २ ॥
अविद्या मायेचा लागो नेदी वारा । ऐसे जगदोद्धारा बोलविले ॥ ३ ॥
नामा म्हणे यानी तारिले पतित । भक्ति केली ख्यात ज्ञानदेवो ॥ ४ ॥

— नामदेवकृत श्रीज्ञानेश्वर समाधी

श्री ज्ञानदेवांच्या चरित्रातील काही समस्यांचा उलगडा

श्री. वि. त्र्यं. शेटे, पुणे

ज्ञानदेवांचे चरित्र अनेक गूढ घटनांनी व्याप्त झालेले आहे. आधुनिक चिकित्सक व चोखंदळ मनाला समाधान देईल असे ज्ञानदेवांचे चरित्र अद्यापि लिहिले गेलेले नाही. अर्थात् अशा चरित्रलेखनाला आवश्यक असणारी साधने अत्यंत अल्पप्रमाणावर आहेत व तीही अपुरी आहेत.

नामदेवांच्या 'आदि', 'तीर्थावली' व 'समाधी' या प्रकरणांतून ज्ञानदेव चरित्रविषयक जेवढी माहिती मिळते, तेवढ्याच माहितीवर बहुतेक प्राचीन वा अर्वाचीन चरित्रे आधारलेली आहेत. ही प्रकरणे तरी आद्य नामदेवांची आहेत की, आद्य नामदेवांच्या नावावर इतरांनी रचिली आहेत हाही एक विवाद्य प्रश्न आहे, शिवाय आद्य नामदेव हे तरी ज्ञानदेवांच्या समकालीन होते की काय, हाही विद्वानांमध्ये संशोधनाचा प्रश्न होऊ पाहात आहे. नामदेवांच्या उपरीनिर्दिष्ट प्रकरणांखेरीज सच्चिदानंदांनी लिहिलेले 'ज्ञानेश्वर विजय' या नावाचे तथाकथित चरित्र अद्यापि अनुपलब्ध आहे. सत्यापलनाथांच्या नावावरील 'ललित प्रबंध' आणि 'नवरत्नमाला' हे दोन्ही ग्रंथ आद्य सत्यापलनाथांचे नाव घेऊन अठराव्या शतकात दुसऱ्याच कोणी तरी रचलेले दिसतात.

या व्यतिरिक्त महिपती व निरंजन माधव यांनी लिहिलेली ज्ञानदेवांची चरित्रे आहेत. ती नामदेवांच्या आधारेच लिहिली गेली आहेत. वरील चरित्रांशिवाय बाळाबुवा ज्ञानेश्वरी (शके १७२८ ते शके १८१०) यांचे चरित्र उपलब्ध आहे. उद्धवचिद्घन (इ. स. १६८९) यांनी लिहिलेले ज्ञानेश्वरचरित्र अलिकडे नव्याने मिळाले आहे (पहा 'संशोधन व चिंतन' ले. प्रा. म. शं. वाबगावकर – १९७२.) तुकाविज्ञानी (शके १६९२) लिहिलेले चरित्र डॉ. रा. ग. हर्षे यांनी भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकात (वर्ष ४६ अंक १ ते ४ पान २५) प्रसिद्ध केले आहे. निळोबानीही आपल्या गाथ्यांतील काही ओव्यांमध्ये चरित्रविषयक घटनांचा निर्देश केला आहे. याप्रमाणे चरित्रविषयक विविध सामग्री असली तरी ती बहुंशाने नामदेवाच्या वरील तीन प्रकरणांवरच आधारलेली आहे; क्वचित् वरील प्रकरणाखेरीज अन्य एखाद्याने लिहिलेले परंतु सध्या अनुपलब्ध असलेले

चरित्र वरीलपैकी काही ग्रंथकारांच्या पुढे असावे असे त्यातील काही तपशील-विषयक निराळेपणावरून वाटू लागते. सोपानदेवांचा शिष्य प्रकाशनाथ यांनी द्रविड भाषेत लिहिलेले ज्ञानदेवांचे चरित्रही असेच अद्याप प्रकाशांत आले नाही. बाळाबुवांना त्याची माहिती होती असे मात्र दिसते. याप्रमाणे ज्ञानदेवांच्या चरित्रविषयक अस्सल साधनांची स्थिती असल्याने अस्सल व तपशीलवार पुराव्यानिशी ज्ञानदेवांचे चरित्र लिहिणे फार दुर्घट झाले आहे.

नामदेवांच्या तीन प्रकरणांपैकी "तीर्थावळी" व "समाधी" ही आद्य नामदेवाची नसावीत असा विद्वान संशोधकांचा अभिप्राय आहे व तो मान्य होण्यासारखा आहे. "आदि" प्रकरणांतील सर्व माहितीसुद्धा आद्य नामदेवांच्या प्रत्यक्ष नजरेखालून गेली असावी असे वाटत नाही. कारण नामदेव व ज्ञानदेव यांची भेट ज्ञानदेवाच्या आयुष्यांतील उत्तरार्धात झाली असे नमूद आहे. नामदेवांना मग ज्ञानदेवाच्या चरित्रांतील पूर्वार्धं विषयक माहिती कोणी दिली असावी ? ती बहुधा त्यांना विसोबा खेचराकडून—नामदेवांचे गुरू — मिळाली असावी. ही माहितीही संपूर्ण तपशीलवार व व्यवस्थित नाही. याप्रमाणे नामदेवांना ज्ञानदेवाच्या आयुष्यांतील काही घटनांचा तपशील इतरांकडून मिळाला असावा. तो स्फूर्तिप्रद तपशील कळल्यावर एखाद्या आर्त व भारावून गेलेल्या कविमनाने आपली आदरांजली वाहावी अशा प्रकारचे 'आदि' हे प्रकरण झाले आहे. त्यातील काही माहिती व तपशील अव्वल दर्जाचा आहे यांत शंका नाही. परंतु कालदृष्टचा सुसंगत रीतीने सांगितलेले ते चरित्र होत नाही.

ज्ञानदेवाच्या आयुष्यांतील सर्व घटनांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांच्या आयुष्यात घडलेल्या सर्व प्रसंगांचा क्रमवार कालपट अगोदर तयार केला पाहिजे. ती प्रत्येक घटना ऐतिहासिक दृष्टिकोनातून तपासली गेली पाहिजे, त्यांचे पौर्वापर्य ठरविता आले पाहिजे.

तसेच ज्ञानदेवांच्या ग्रंथावरून व वाङ्मयावरून त्यांच्या कर्तृत्वाचे व समृद्ध संपन्न व्यक्तिमत्त्वाचे जे चित्र आपल्या डोळयांसमोर उभे राहाते व जी वाङ्मयमूर्ती आपल्या नजरेसमोर साकारते तिचा मेळ नामदेवादि ग्रंथकारांनी जे त्यांचे चरित्र वर्णन करून सांगितले आहे, त्याच्याशी संबद्ध असले पाहिजे.

ज्ञानदेवांची जी आधुनिक उपलब्ध चरित्रे आहेत त्यांत निर्दिष्ट केलेल्या काही घटनांची संगती लागत नाही. ती लावता येण्यासारखी आहे की काय हे पाहण्याचा या लेखात प्रयत्न केला आहे.

(१) विठ्ठलपंतांचा विवाह :– ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत व त्यांचे गुरू गहिनीनाथ यांच्या व्यक्तीमत्त्वाला मराठी चरित्रकारांनी पुरेसा न्याय दिलेला नाही.

नामदेवांच्या 'आदि' प्रकरणात निर्दिष्ट केल्याप्रमाणे विठ्ठलपंत यांनी 'काव्य' व 'व्याकरण' या विषयांचा अभ्यास केला होता. त्यांत त्यांनी प्राविण्यही संपादन केले होते. विठ्ठलपंत हे उत्तम शास्त्रवक्ते होते असे नामदेवांनी म्हटले आहे. आपेगांवच्या कुलकर्णी वा जोशी घराण्यांतील गोविंद व निराई यांचा हा एकुलता एक पुत्र हुशार, देखणा, तेजस्वी होता. वृत्तीनें तो जन्मतःच विरक्त दिसतो. गोविंद व निराई यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात या एकुलत्या एक पुत्राचा जन्म झालेला दिसतो. पैठणला आपल्या मामांच्या म्हणजे देवकुळे घराण्यांत राहून त्याने काव्य व्याकरणादि विविध शास्त्रांचे अध्ययन केले असावे वडिलांची ही काव्यविषयक अभिरूची ज्ञानदेवांच्यामध्ये प्रकर्षाने अवतरलेली दिसते. विठ्ठलपंत लहानपणीच एकाकी तीर्थयात्रेला निघाले व आळंदीला त्यांनी वडिलांच्या अनुपस्थितीत विवाह लावला असे अनेक आधुनिक चरित्रकार एकमुखाने सांगत आले आहेत. या विधानातील सत्य पारखून घेतले पाहिजे. विरक्त विठ्ठलपंत आपल्या आई–वडिलांच्या अनुपस्थितीत स्वतःचा विवाह लावून घेईल काय हा एक चिंतनीय प्रश्न आहे. नामदेवादि जुन्या चरित्रकारांनी या विवाहाची सुसंबद्ध तपशीलवार माहिती न दिल्याने विठ्ठलपंतांवर काहीसा अन्याय झाला आहे.

याबाबतीत तुकाविप्रानें आपल्या चरित्रात विठ्ठलपंत आपल्या माता-पित्यासह तीर्थयात्रेला गेले असे जे म्हटले आहे ते अधिक सयुक्तिक दिसते. इतर कोणीही जुन्या चरित्रकारांनी विठ्ठलपंत आपल्या मातापित्यासह तीर्थयात्रेला गेल्याचे म्हटले नाही. तुकाविप्राचे म्हणणे या बाबतीत अधिक सुसंगत वाटण्याची पुढीलप्रमाणे कारणे आहेत. गोविंद व निराई यांना आपल्या आयुष्यात उशीरा पुत्रप्राप्ती झाल्यानें त्या मुलास घेऊन त्यांनी तीर्थयात्रेला निघणे अधिक स्वाभाविक वाटते. शिवाय त्यावेळी विठ्ठलपंत अविवाहित होता व त्या वेळचे विवाहयोग्य वय १० ते १२ वर्षांचे असल्यानें विठ्ठलपंत एकाकी तीर्थयात्रेला निघाला असे मानण्याऐवजी गोविंद व निराई आपला पुत्र विठ्ठलपंत यासह तीर्थयात्रेला निघाले असे मानणे अधिक सयुक्तिक वाटते.

पुढे आळंदीस तेथील सिधोपंत कुलकर्णी यांच्या मुलीशी विठ्ठलपंताने स्वप्नांतील आदेशामुळे तत्काळ व आपल्या आई-वडिलांच्या अनुपस्थितीत विवाह लावला ही घटनासुद्धा मनाला खटकण्यासारखी वाटते. कोणाही चरित्रकाराने निर्दिष्ट केले नसले तरी तुकाविप्राने ते केल्याप्रमाणे गोविंद व निराई हे विठ्ठलासह तीर्थयात्रेला निघाली ही परिस्थिती मान्य केल्यावर ते यात्रा करीत करीत आळंदीस आल्यावर गोविंद व निराई हे विठ्ठलाच्या विवाह प्रसंगी उपस्थित होते हे ओघानेच आले. नामदेवाच्या 'आदि' प्रकरणांत या घटनेचे केलेले वर्णन अद्भुत वाटते. परमेश्वर प्रेरणेनेच जर 'विठ्ठलपंत व 'रखुमाई' यांचा विवाह व्हावयाचा होता,

तर सिधोपंत व विठ्ठलपंत या दोघांना एकाच रात्री का बरे स्वप्न पडले नाही ? शिवाय स्वप्ने पडल्यावर व त्यानुसार 'विठ्ठलपंत' व 'रुक्मिणी' यांचा विवाह-निश्चय झाल्यावर मग सिधोपंतानी ज्योतिषास बोलावून – "पाचारोनि जोशी घटितार्थ पाहिले। गुण उतरले छत्तीसही।" – देवदवक बसवून लग्न लावले असे जे नामदेवाने म्हटले आहे ते अत्यंत विसंगत वाटते. कारण एकदा लग्न ठरल्यावर व देवाची स्वप्नांत आज्ञा झाल्यावर मग पत्रिका पाहण्याची गरज कोठे उरते. तसेच देवदेवक कोणी बसविले त्याचाही उल्लेख यादीत नाही नामदेवाचे हे सर्वच विवाह विषयक प्रकरण अद्भुत व काव्यमय वाटते. या ऐवजी गोविंद व निराई आपल्या एकुलत्या एक मुलास घेऊन तीर्थयात्रेला निघाली व यात्राप्रसंगाच्या निमित्ताने आळंदीस आल्यावर तेथील प्रतिष्ठित कुलकर्णी घराण्यातील सिधोपंतांची योगायोगाने ओळख होऊन व परस्परांना विठ्ठल–रुक्मिणीचा हा विवाहयोग्य जोडा पसंत पडून त्यांचा विवाह गोविंद निराईच्या उपस्थितीत झाला. ही मांडणी अधिक तर्कशुद्ध व सुसंगत वाटते. तुकाविप्राच्या यात्राविषयक उल्लेखाने ही विवाह घटना अधिक सुसंगतपणे निर्दिष्ट करता येते. या निमित्ताने आणखी एका संभाव्य तर्काची मांडणी करता येण्यासारखी आहे.

यादवाच्या राज्यात जे निरनिराळे प्रादेशिक विभाग होते त्यांना 'खंपण' अशी संज्ञा असे. शिलालेखातील उल्लेखावरून 'नेवासे खंपण' हाही एक प्रादेशिक विभाग होता. नेवासे हे त्या विभागातील शासनाचे प्रमुख ठिकाण होते. आळंदीचे सिधोपंत कुलकर्णी व आपेगावचे गोविंद कुलकर्णी हे दोनही वतनदार कुलकर्णी शासनकार्य निमित्ताने नेवासे येथे जात येत असणारच. तेथे या उभयतांचा परिचय होणे अशक्य नाही. अशा या उभयतांच्या परिचयामधून हा विवाह उद्भवला असावा. नाही तर १०।१२ वर्षांचा विठ्ठलपंत एकटाच तीर्थयात्रेला निघून आळंदीस परस्पर व आईवडिलांच्या अनुपस्थितीत विवाहबद्ध होतो अशी विचित्र व विठ्ठलपंतांना अन्याय करणारी व असंबद्ध आणि अतर्क्य घटना आदीवरून स्वीकारावी लागते.

विठ्ठलपंतांची 'तीर्थयात्रा व विवाह' या बाबतीत मराठीतील सर्वच आधुनिक चरित्रकारांनी आदीवर विसंबून विठ्ठलपंतांवर अन्याय करणारी व केवळ काल्पनिक अशी घटना रंगविली असल्याने तिचा येथे एवढा सविस्तर प्रपंच करावा लागला.

तुकाविप्राच्या यात्रा प्रकरणविषयक उल्लेखावरून आता निश्चितपणे म्हणता येईल की गोविंद व निराई हे विठ्ठलपंतांना घेऊन तीर्थयात्रेला निघाले व आळंदीस आल्यावर त्यांनी आपल्या मुलाचे सिधोपंत कुलकर्णी यांच्या मुलीबरोबर लग्न लावले.

(२) निवृत्तिनाथ व ज्ञानदेवांचे विद्यासाधन

ज्ञानदेवांच्या चरित्रातील आणखी एक मुद्दा विचारार्ह आहे. ज्ञानदेवांच्या ग्रंथावरून त्यांच्या विद्यासंपन्न व्यक्तिमत्त्वाचे जे अलौलिक दर्शन घडते त्याने आपण स्तिमित होतो. ज्ञानदेवांनी ही विद्या कोठे संपादन केली असावी याबाबत आपली जिज्ञासा जागृत होते. परंतु त्याविषयी कोठेही सुसंगत माहिती मिळत नाही. याच अनुरोधाने दुसराही एक प्रश्न निर्माण होतो. निवृत्तिनाथांनी ज्ञानदेवांना विद्यासंपन्न केले असावे. त्यांनी त्यांना अध्यात्मज्ञान व इतरही शास्त्रांचे ज्ञान दिले असे मानले तरी निवृत्तिनाथांनी हे ज्ञान कोठे संपादन केले. याविषयी माहिती मिळत नाही. विठ्ठलपंत हे स्वतः विद्याविभूषित व अधिकारी विद्वान होते असे नामदेवांनी ' आदि ' मध्ये म्हटले आहे; विठ्ठलपंतांनी निवृत्तिनाथांचे संस्कारी जीवन घडविले असले तरी निवृत्तिनाथांना खरी ज्ञान प्राप्ती गहिनीनाथांकडूनच झाली असावी. ही कथा रूपकात्मकरीतीने प्राचीन चरित्रकारांनी सांगितलेली आहे. ब्रह्मगिरीवर (त्र्यंबकेश्वर) विठ्ठलपंत, निवृत्तिनाथ, ज्ञानदेव इत्यादी मंडळी असताना वाघाच्या भीतीने या मंडळींची दाणादाण उडाली व निवृत्तिनाथ गहिनीनाथांच्या गुहेत शिरले व ते तेथे बराच काळ राहिले. यावेळी निवृत्तिनाथांचे वय व्रतबंधास योग्य असे ५/७ वर्षांचे होते. (मनुस्मृतीत मौंजीबंधनाचे वय ५ हे दिले आहे.) आळंदीच्या ब्रह्मवृंदानी या अगोदर विठ्ठलपंतांना निवृत्तिनाथांची मौज लावण्यास परवानगी नाकारली आहे. अशा पेचप्रसंगात विठ्ठलपंतांनी आपले गुरू गहिनीनाथ यांचेकडे त्र्यंबकेश्वरी मार्गदर्शनार्थ धाव घेतली असणे संभवनीय वाटते. व्रतबंध केल्याखेरीज वेदविद्या आपल्या पुत्राला शिकता येत नाही असे पाहिल्यानंतर विठ्ठलपंतांनी निवृत्तीनाथास गहिनीनाथाकडे वेदशास्त्रांच्या अध्ययनार्थ ठेवले असावे हा या सर्व रूपकाचा प्रमुख उद्देश आहे. त्र्यंबकेश्वर हे नाथपंथियांचे त्यावेळी प्रमुख केन्द्र होते. निवृत्तिनाथांची योग्यता व विद्वत्ता ज्ञानदेवांनी आपल्या ग्रंथात ठिकठिकाणी मोठ्या भक्तिभावाने वर्णन केलेली आहे. गहिनीनाथांनी त्यांना विद्वत्तेबरोबरच आर्तांचे कल्याण करण्याचा व श्रीकृष्णभक्तीचा संदेश दिल्याचा पुरावा निवृत्तिनाथांच्या अभंगावरून दिसून येतो. या सर्व घटनेवरून गहिनीनाथाच्या व्यक्तिमत्त्वावर एक निराळाच प्रकाश पडतो. गहिनीनाथ हे स्वतः एक थोर अध्यात्मज्ञानी व विद्यासंपन्न तर होतेच; परंतु अध्यात्म दृष्टीने आर्त असलेल्या सामान्य जनतेच्या विषयी त्यांना विलक्षण कळकळ वाटत होती. नामदेवांच्या आदीवरून गहिनीनाथांच्या व्युत्पन्न व्यक्तिमत्त्वाची नीटशी कल्पना येत नाही. गहिनीनाथासारख्या अधिकारी विद्वान व्यक्तीकडून संपादन केलेली विद्या निवृत्तिनाथांनी ज्ञानदेवांना दिली व त्यांच्या श्रीकृष्णभक्तीचा व आर्त मुमुक्षू सामान्य जनांना अध्यात्मविद्या स्वभाषेतून देण्याचा गहिनीनाथांचा दिव्य

संदेशही पोहोचविला. आपल्या अंतरंगात निवृत्तिनाथांनीच जणू काही प्रवेश करून ही ' ज्ञानदेवी ' टीका लिहिली आहे असे जेव्हा ज्ञानदेव आपल्या भावार्थदीपिकेच्या शेवटी म्हणतात; तेव्हा त्यात त्यांची गुरुभक्ती, नम्रता व संस्कारसंपन्न मन जसे दिग्दर्शित होते तसेच निवृत्तिनाथांची योग्यता व विद्वत्ताही सूचित होते.

पैठणला ही भावंडे नंतर आली व तिथे ज्ञानदेवांनी गीतेवर मराठी भाषेत टीका लिहिण्यास प्रारंभ केला असावा. ज्ञानदेवांचे वय तेव्हा १४ वर्षांचे असावे व निवृत्तिनाथांचे वय १६ वर्षांचे असावे. विठ्ठलपंतांनी निवृत्तिनाथांना गहिनीनाथांकडे जेव्हा पोहोचते केले तेव्हा निवृत्तिनाथांचे वय व्रतबंधयोग्य असे ५/६ वर्षांचे होते. तेव्हा मधला हा ८/१० वर्षांचा या उभयतांचा काळ अर्थातच विद्यासंपन्न होण्यात गेला असावा. त्याखेरीज या ८/१० वर्षांची संगती लागत नाही. उभयता बंधूंचा हा ८/१० वर्षांचा काळ ज्ञानसाधना करण्यात त्र्यंबकेश्वरी व पैठणला गेला असावा यात शंका नाही.

(३) विठ्ठलपंतांचा संन्यास

विठ्ठलपंतांच्या संन्यासाबाबतही अशीच गोंधळाची विधाने आढळतात. त्यांच्या संन्यासाला त्यांच्या पत्नीची संमती आवश्यक होती असे सूचित केले गेले आहे, संन्यास स्वीकारण्यास पत्नीची संमती आवश्यक आहे असे कोणत्याही धर्मशास्त्रात नमूद नाही. पूर्वी सर्वच ब्राह्मण अग्निहोत्री होते. अग्निहोत्री ब्राह्मणाला संन्यास घ्यावयाचा झाला तर पत्नीची संमती घेणे कदाचित आवश्यक असेल कारण त्यायोगे अग्निहोत्राचा नाश संभवतो. अग्निहोत्र चालविण्यात पत्नीचाही वाटा असतो; परंतु विठ्ठलपंत हे अग्निहोत्री होते असा कोठेही उल्लेख नाही. तेव्हा पत्नीच्या संमतीची काहीच आवश्यकता नव्हती. विठ्ठलपंतांची जन्मजात विरक्तवृत्ती विवाहानंतर काही वर्षांनी पुन: उफाळून आली व तिचे पर्यवसान संन्यास स्वीकारण्यात झाले हे अधिक स्वाभाविक वाटते

संन्यासाश्रमाचा त्याग करून पुनः गृहस्थाश्रम स्वीकारणाऱ्यास कोणती शिक्षा होती याबद्दलचे शास्त्रशुद्ध विवेचन पं. श्रीधरशास्त्री पाठक यांनी केले आहे. अलीकडे वाईचे पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नवभारत मासिकामध्ये लेख लिहून व आद्य शंकराचार्यांच्या भाष्याचा आधार देऊन पं. श्रीधरशास्त्री पाठक यांचे मत खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु शांकरभाष्यातील वचनाला स्मृतिप्रामाण्य कितपत येईल हा एक विचार करण्यासारख्या विवाद्य प्रश्न आहे.

संन्यास प्रकरणातील या शिक्षाविषयक प्रश्नाला ज्ञानदेवांच्या आयुष्यात बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. स्मृतिशास्त्रात नमूद नसलेली शिक्षा विठ्ठलपंतांना

देऊन आळंदीच्या ब्रह्मवृंदांनी आपले स्मृतिविषयक अज्ञानच प्रकट केले आहे. या सर्वच प्रश्नांबद्दल अधिक सखोल व शास्त्रीय विवेचन व्हावयास पाहिजे एवढे मात्र खरे.

(४) पैठणचा कर्तृत्वशाली मुक्काम

ज्ञानदेवांच्या चरित्रात त्याचा पैठण येथे जो ८।१० वर्षे मुक्काम झाला त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नामदेवांच्या आदि प्रमाणे ज्ञानदेव पैठण येथे नित्य अध्यात्म ग्रंथ पाहात असत. कथा, कीर्तन, पुराण, प्रवचने असा त्यांचा नित्यक्रम असे. 'प्रत्यक्ष पैठणी भटी वाद केला' असे जे नामदेवांनी म्हटले आहे त्याचा विशेष विचार केला पाहिजे. ज्ञानदेवांचा पैठणच्या पंडितांबरोबर जो वाद-विवाद झाला तो केवळ 'या संन्याशांच्या मुलांना शुद्धिपत्र द्यावे की नाही' याबद्दल झालेला दिसत नाही. याबाबत 'रेड्याच्या पाठीवर आसुडांनी जे वळ उठले ते वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उठलेले दिसले व 'रेड्यामुखी वेद वदविले' या रूपकात्मक कथांचा नीट विचार केला पाहिजे.

पैठण हे शातवाहनकालापासून विद्येचे व संस्कृतीचे केन्द्र होते. तेथील विद्वत्तेची आणि शास्त्रज्ञांची परंपरा अव्याहतपणे थेट अठराव्या शतकापर्यंत चाललेली दिसून येते. तेथील विद्वान घराणी शास्त्रनिपुण व पंडित होती. कोल्हापुरच्या दुसऱ्या रामराजासमोर सन १७२६ ते १७३० मध्ये कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवतेच्या पुजाऱ्याचे जे एक प्रकरण न्यायनिवाडा करण्यासाठी आले होते; तेव्हा त्यांनी ते प्रकरण अखेरच्या निर्णयासाठी पैठणच्या विद्वत्सभेकडे पाठविले होते. आधुनिक काळातील सुप्रीम कोर्टाप्रमाणे महाराष्ट्राचे ते सुप्रीम कोर्ट होते. त्या विद्वत्सभेने १०।१५ वर्षे खालील कोर्टांत चाललेल्या या दत्तक प्रकरणविषयक वादाचा ३ महिन्यांत निकाल दिला. सदरील विद्वत्सभेचा जो लेखी न्यायनिवाडा आहे तो अत्यंत विद्वत्तापूर्ण व तर्कशुद्ध रीतीने लिहिलेला आहे. आधुनिक कालातील सुप्रीम कोर्टाच्या न्यायनिपुण न्यायाधिशांनी लिहिलेल्या उत्कृष्ट निवाडापत्रांच्या तोडीचे ते विद्वत्सभेने लिहिलेले निवाडापत्र आहे. पैठणची ही विद्वत्परंपरा अशी थोर होती.

शास्त्रीय विद्वत्तेबरोबर शातवाहनकाळापासून चालत आलेली यज्ञयागांची व पूर्वमीमांसाधिष्ठित कर्मकांडाचीही परंपरा तेथे अव्याहत चाललेली होती. त्यामुळे सनातनी पंडितांचा तेथे विशेष प्रभाव होता. या विद्वान शास्त्री पंडितांना स्त्रीशूद्रादिकांनाही यज्ञविषयक अधिकार देणाऱ्या भगवद्गीतेबद्दल विशेष आदरभाव व आपुलकी नव्हती.

V. P. Bhagwat

ज्ञानदेवांना वेदशास्त्रांबद्दल जरी आदर असला तरी या प्राचीन पंडितांच्या यज्ञयागासंबंधी व तत्संबद्ध विचारसरणीविषयी त्यांना आस्था नव्हती. ज्ञानदेवीत त्यांनी या यज्ञयागपंडित दीक्षितांविषयी नापसंतीचेच उद्‌गार काढलेले दिसतात. साहजिकच ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व पैठणला वादविषयभूत झाले असल्यास नवल नाही.

शिवाय संस्कृत भाषेत असलेले अध्यात्मज्ञान ज्ञानदेवांनी मराठीतून स्त्रीशूद्रादिकांना देण्यास पैठणला सुरुवात केली. तेव्हाही त्यांनी या सनातनी पंडितांचा रोष ओढवून घेतला असावा.

या जुन्या सनातनी प्रवृत्तीच्या व 'वचनात् प्रवृत्तिः वचनात् निवृत्तिः' अशा शाब्दिक वचनावर भर देणाऱ्या पंडितांचा सर्वसामान्य लौकिक जनतेशी संपर्क व संबंध राहिला नव्हता. त्यांच्या मोक्षविषयक आकांक्षा त्यांनी सहानुभूतीने कधी समजूनच घेतल्या नव्हत्या. शिवाय निवृत्तीनाथाकडून त्यांना 'आर्ताचेनिवीरसी' अशी अखिल जनतेला जे अध्यात्म ज्ञानाचे भांडार खुले करावयाचे होते, त्याबद्दलही या पंडित वर्गाची सहानुभूती नव्हती. प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी एकच आत्मा भरून राहिला आहे व समाजातील दलित व शूद्रादिकांनाही अध्यात्म ज्ञान प्राप्त करून देण्याची आवश्यकता आहे. याबद्दल ज्ञानदेवांना जी कळकळ वाटत होती तशी कळकळ वा भावना या पंडित वर्गाला मुळीच वाटत नव्हती. जैन व बौद्धांनी सामान्य प्राकृत जनामध्ये विद्येची अभिरुची निर्माण केली होती व अध्यात्मपर आकांक्षा निर्माण केल्या होत्या. सनातनी पंडित वर्गाच्या आग्रही विचारसरणीमुळे ही प्राकृत सामान्य जनता वेदविद्येला व वैदिक विचारसरणीला पारखी होत चालली होती. या प्राकृत सामान्य जनतेच्या मुमुक्षुवृत्तीबद्दल व आकांक्षांबद्दल नाथपंथीय निवृत्ति-ज्ञानदेवांना सहानुभूती वाटत होती. तेव्हा पैठणला 'जो भटी वाद झाला' तो या दोन भिन्न भिन्न विचारसरणींबद्दल वाद झाला असावा व 'म्हैसाकडून वेद वदविले' व 'श्राद्धासाठी स्वर्गातून पितर पृथ्वीवर उतरविले' या चमत्कारांनी पैठणचे पंडित प्रभावित झाले नसून ते ज्ञानदेवाच्या या विशाल तत्त्वज्ञानाच्या विचारसरणीमुळे व अलौकिक वाक्‌चातुर्याच्या प्रवचनांनी शेवटी प्रभावित झाले. ज्ञानदेवाच्या 'जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत' या नवीन आत्मौपम्य वृत्तीच्या तत्त्वज्ञानाने पैठणचा पंडित वर्ग शेवटी ज्ञानदेवांचा अनुयायी बनला असे नामदेवांनी आपल्या आदीत नमूद केले आहे. त्याचे रहस्य हे आहे. एका नव्या विचारसरणीच्या युगाची पैठणला सुरुवात झालेली दिसते. तेव्हा पैठणला व्यतीत झालेल्या ज्ञानदेवांच्या आयुष्यातील या खंडाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, 'पैठणचे जन बोधियेले' असे जे नामदेवांनी आपल्या आदीत म्हटले आहे त्याचा व्यापक अर्थ वरील विचारसरणीवरून सहज ध्वनित होतो.

ज्ञानदेवांच्या चरित्रकारांनी ज्ञानदेवांनी पैठणला जे कर्तृत्व गाजविले व महाराष्ट्राच्या धार्मिक क्षेत्रांत ज्या नवीन युगाला सुरुवात केली; त्याला प्राधान्य करून जितके महत्त्व द्यावयास पाहिजे तितके दिले नाही.

(५) **नेवासेच का ?** निवृत्तीनाथांच्या आदेशाप्रमाणे ज्ञानदेवांना सर्व प्राकृत जनतेसाठी मोक्षाची व अध्यात्मज्ञानाची संस्कृत भाषेत बंद करून ठेवलेली संपत्ती प्राकृत भाषेच्या द्वारा सामान्य जनतेला उपलब्ध करून द्यावयाची होती, याशिवाय त्यांना ज्ञानमय प्रेमभक्तीचा संदेशही अखिल जनतेस द्यावयाचा होता. गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना ही कामगिरी सांगितली होती. ज्ञानदेवांचे वाग्वैभव व विद्वत्ता पाहून निवृत्तिनाथांनी त्यांचेवर ही कामगिरी सोपविली होती. आपल्याला जर ही कामगिरी समर्थपणे पार पाडावयाची असेल तर त्यासाठी भगवद्गीता हाच ग्रंथ अत्यंत उपयुक्त होईल असे पाहून ज्ञानदेवांनी आपल्या विषय प्रतिपादनासाठी भगवद्गीता हा ग्रंथ निवडला. त्यावरील भाष्य त्यांनी पैठणच्या जनतेपुढे न करता नेवासेच यासाठी का पसंत केले याची उपपत्ती कशी लावावयाची ही एक कूट समस्या आहे.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे पैठण ही सनातनी पंडितांची सांस्कृतिक राजधानी होती. तेथील पंडितवर्ग ज्ञानदेवांनी वादविवादात जरी जिंकला होता तरी आपल्या कार्यासाठी त्या नगरीतील तो पंडितवर्ग उपयोगी ठरणारा नव्हता. पैठणच्या जनतेला त्यांनी नामदेवांनी आदिमध्ये म्हटल्याप्रमाणे बोधियले होते हे खरे; परंतु आपल्या तत्त्वाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी एखादे शासकीय केंद्र ठिकाण जितके उपयुक्त ठरते; तितके नुसते एखादे सांस्कृतिक केंद्र ठरत नाही नेवासे हे परंपरागत असे पैठणप्रमाणे विद्वतेचे शहर नसले तरी महालक्ष्मीच्या वास्तव्यामुळे तीर्थक्षेत्र होते. परंतु ज्ञानदेव काळात ते एका प्रादेशिक विभागाचे मुख्य शासकीय ठिकाण असल्याने तेथे सर्वसामान्य जनतेची वसती अधिक प्रमाणावर होती. शिवाय इतर सुशिक्षित सुबुद्ध मंडळीही अशा शासकीय ठिकाणी असणारच, तेव्हा आपल्या मत प्रतिपादनाला हे शासकीय ठिकाण अधिक उपयुक्त होईल हे जाणून ज्ञानदेवांनी आपल्या गीतेवरील प्राकृत भाष्याला नेवाशास सुरुवात केली असावी.

(६) ज्ञानदेवांचे समाधीपूर्व जीवन

ज्ञानदेवांनी आपली ज्ञानदेवी नेवाशास लिहिली. 'अनुभवामृत' नेवासे अगर आळंदीस परिपूर्ण केले व 'चांगदेवपासष्टी' आळंदीस लिहिली. अभंगरचनाही आळंदीसच झाली असावी. याप्रमाणे आपले जीवनकार्य यशस्वीरीतीने पार पाडल्यावर ज्ञानदेवांची समाधी पूर्वीची २।३ वर्षे कशी गेली असावीत अशी जिज्ञासा

राहाते. नामदेवांचे 'तीर्थावळी' हे प्रकरण कल्पित वाटते. ज्ञानदेवांनी अनेक तीर्थयात्रांच्या ठिकाणी प्रवास केला असावा हे आपल्या तर्कबुद्धीला पटत नाही. ज्ञानदेव हे एक साक्षात्कारी, योगी व मुमुक्षु होते. ग्रंथरचना पूर्ण झाली होती. तेव्हा मोक्षमार्गावरील त्यांची वाटचाल नंतर कशी झाली हे पाहणे उद्बोधक ठरेल. अध्यात्मज्ञानाची शाब्दिक चर्चा हे काही मोक्षमार्गाचे खरे साधन होत नाही. महर्षि याज्ञवल्क्य मुनींनी म्हटल्याप्रमाणे 'आत्मा वा अरे मन्तव्य निदिध्यासितव्यः' तेव्हा निदिध्यास मनन करण्याचे नाम हे एक प्राथमिक साधन असते. ज्ञानदेवांनी आपल्या हरिपाठात व ज्ञानदेवीतसुद्धा नामाचे अपार माहात्म्य वर्णन केले आहे. नामाने चित्ताची एकाग्रता साधते; परंतु केवळ नामानेसुद्धा साक्षात्कार व आत्मप्रतीती होत नाही. म्हणून शेवटी मौन हेच मोक्ष साधनाचे प्रमुख साधन उरते, असे ज्ञानदेवांचे मत होते. ज्ञानदेवांसारख्या प्रेषित अवतारी पुरुषाचे या जगातील प्रमुख कार्य संपल्यावर त्यांना उरलेल्या जीवनात रस वाटेनासा होतो. ते एक थोर तत्त्वज्ञ व योगी मुमुक्ष असेब्रह्मवत्ते होते, परमार्थ संपादन करण्याची त्यांना अत्यंत ओढ होती. तेव्हा ज्ञानदेवांची आळंदीतील ही शेवटची दोन वर्षे मौनावस्थेत गेली असावीत. मौनाचे हे अखंड प्रभावी व्रत त्यांनी आचरण्यास सुरुवात केली असावी आणि हे व्रत अखंड पाळावयाचे असेल तर योगमार्गाने संजीवनी समाधी घेणे हेच क्रमप्राप्त ठरते व तसे त्यांनी आपल्या मनाशी ठरविलेले दिसते. त्यांच्या संजीवनी समाधीची जी समस्या आहे, तिची उपपत्ती या प्रकारे अधिक सुसंगतपणे लागते.

(७) ज्ञानदेवादि भावंडांची समाधीस्थाने

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे आपले जीवितकार्य संपल्यावर त्यांनी आळंदीस मौनाचा आश्रय सतत लाभावा म्हणून संजीवनी समाधी घेण्याचा निश्चय केला. त्यांनी आळंदीसच 'संजीवनी समाधी का घेतली व त्यांच्या भावंडांनी इतरत्र निरनिराळ्या ठिकाणी समाधी का घेतली या विषयीची आपली जी जिज्ञासा असते, तिचा समर्पक खुलासा कोठे झालेला नाही.

संजीवनी समाधीचा हा विचार निवृत्तीनाथांच्या अगोदर ज्ञानदेवांनाच का सुचला हाही एक प्रश्न आहे. आळंदी हे सुप्रसिद्ध शैव ठिकाण व सिद्धांची भूमी होती. नाथपंथियांचे सुद्धा ते एक ठिकाण असावे असे वाटते.

ज्ञानदेवांचे आजोळ याच गावी व तेथेच त्यांचे बालपण गेलेले होते. त्यांची तपोसाधना तेथील इंद्रायणी काठच्या सिद्धबेटात झाली होती. तेव्हा या गावाविषयी व विशेषतः तेथील सिद्धेश्वर देवतेबद्दल त्यांना अधिक जिव्हाळा वाटला असल्यास नवल नाही. शिवाय त्यांचा कान्होपाठक विसोबा खेचर हा शिष्यवर्गही

तेथे होता. ही शिष्यमंडळी त्यांच्या आयुष्याच्या या अखेरच्या काळात त्यांच्याजवळच असावीत. तेव्हा आपल्या जीवनाची समाप्ती त्यांनी संजीवनी समाधीने सिद्धेश्वर देवतेसमोर करणे उचित ठरत होते.

निवृत्तीनाथ, सोपानदेव यांनीही निरनिराळ्या ठिकाणी समाधी घेण्याचे ठरविले, त्या मागील कारणमीमांसेचा उलगडा कसा करता येईल हे पाहणेसुद्धा उद्‌बोधक ठरेल.

मोक्ष मार्गी सत्पुरुषांना आपला विद्यावंश व शिष्यवर्ग अधिक जवळचा वाटतो. आपल्या शिष्यवर्गाच्या समवेत आपल्या आयुष्याचे शेवटचे क्षण घालवावे असे मुमुक्षूंना नेहमीच वाटते सोपानदेवाचे शिष्य प्रकाशनार्थ संवत्सर सासवड गावाच्या परिसरात राहात होते, त्यामुळे त्यांनी सासवड हे क्षेत्र आपल्या समाधीसाठी ठरविणे युक्तच ठरते.

मुक्ताबाई ही आपले शिष्य चांगदेव यांच्याकडे तापीतीरी जाण्यास निघाली असताना विजेचा लोळ आल्याने त्यांत अदृश्य झाली असे नामदेवांनी सांगितले आहे. तर उद्‌बोधनाथांनी आपल्या ज्ञानेश्वर चरित्रात त्र्यंबकेश्वरी जळरूप झाल्याचे लिहिले आहे, तर तुकाविप्राने आपल्या चरित्रात ब्रह्मगिरीवर (त्र्यंबकेश्वरी) मुक्ताबाईने जलसमाधी घेतल्याचे लिहिले आहे. त्र्यंबकेश्वरी कोठेही मुक्ताबाईच्या समाधीचे ठिकाण नाही.

त्र्यंबकेश्वरी निवृत्तीनाथांनी समाधी घेतली असे नामदेवादि अनेक चरित्रकारांनी निर्दिष्ट केले आहे. त्र्यंबकेश्वर हे नाथपंथियांचे प्रमुख केंद्र व निवृत्तीनाथांचे गुरू गहिनीनाथ यांचे वास्तव्याचे ठिकाण. येथेच त्यांना गहिनीनाथांकडून वेदविद्या, शास्त्रविद्या व योगविद्या व अध्यात्मज्ञान झाले होते. अशा ठिकाणाविषयी त्यांना आकर्षण वाटले असल्यास नवल नाही. आपल्या समाधीचे ठिकाण त्र्यंबकेश्वर पसंत करण्यात निवृत्तीनाथांनी याप्रमाणे अनेक प्रकारे औचित्य दाखविले. याप्रमाणे या भावंडांनी निरनिराळ्या ठिकाणी समाधी का घेतल्या त्याची उपपत्ती लावता येण्यासारखी आहे. ही चारी भावंडे आयुष्यभर एकत्रित राहिली, वागडली, खेळली पण समाधी मात्र त्यांनी एके ठिकाणी न घेता भिन्न भिन्न ठिकाणी घेतल्या, याचे गूढ मात्र कायमच राहते.

ज्ञानदेवांच्या आयुष्यातील विविध घटनांची संगती लावण्याचा येथे प्रयत्न केला आहे. उपलब्ध पुराव्यावरून व इतर परिस्थितीवरून तर्कशुद्ध अनुमाने काढून ज्ञानदेवांचे सुसंगत चरित्र लिहिता येण्यासारखे आहे, तसा प्रयत्न अद्याप झाला नाही. अव्वल चरित्र साधने अत्यंत अल्प व अपुरी आहेत हे प्रारंभीच नमूद केले आहे. परंतु निरनिराळ्या पुराव्याच्या साधनांची संगती लावून व घडलेल्या घटनांचा

अन्वयार्थ लावून जर चरित्र-लेखनाचा प्रयत्न झाला तर सध्या उपलब्ध असलेल्या चरित्रापेक्षा हे नवे चरित्र अधिक तर्कशुद्ध तर होईलच, परंतु ज्ञानदेवांच्या कार्याची व व्यक्तिमत्त्वाची त्यावरून अधिक डोळस, सार्थ व उज्ज्वल ओळख होईल यात शंका नाही. चरित्रातील भावडेपणा पुष्कळसा कमी होईल. ज्ञानदेवांच्या चरित्रातील इतरही अनेक घटनांचा उलगडा याच पद्धतीने करता येण्यासारखा आहे.

उपलब्ध चरित्र साधनांची तर्कशुद्ध संगती त्यांच्या ग्रंथावरून कल्पनेने निर्माण होणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशी मेळ घालण्याचा जर प्रयत्न झाला व त्यातून अधिकारी संशोधक विद्वनाने जर एखादे नवे ज्ञानदेव चरित्र लिहिले तर त्यांच्या या सप्तम जन्म शताब्दीच्या निमित्ताने त्यांना वाहिलेली ती सुयोग्य आदरांजली होईल.

卐 卐 卐

माझे जन्मपत्र बाबजी ब्राह्मणें। लिहिलें त्याची खूण सारू ऐका ॥
अधिक त्र्याणव गणित अकरा शतें। उगवतां आदित्य रोहिणीसी ॥
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार। प्रभव संवत्सर शालिवाहन ॥
प्रसवली माता मज मळसूत्री। तेव्हा जिव्हेवरी लिहिले देवे ॥
शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा। नाममंत्र खुणा वाचुनी पाहे ॥
ऐंशी वर्षे आयुष्य पत्रिकाप्रमाण। नामसंकीर्तन नामया वृद्धि ॥

नामदेवकृत ज्ञानेश्वर-चरित्र

डॉ. गंगाधर मोरजे, नगर

मराठी साहित्य क्षेत्रात ज्ञानेश्वर समकालीन आद्य नामदेव हाच मराठीतील आद्य संत चरित्रकार व आत्मचरित्रकार म्हणून परंपरेने मानण्यात येत आहे. विशेषतः ज्ञानेश्वर–चरित्र साधनांत नामदेवांच्या नावावरील आदि, तीर्थावळी व समाधी या प्रकरणांना फारच महत्त्व प्राप्त झालेले दिसते. महिपती, निरंजनमाधव, वा अलीकडे झालेल्या बऱ्याचशा ज्ञानेश्वर चरित्रांचा मूलाधार हे नामदेव लिखित चरित्र आहे. परंतु जाणकारांना मुद्रित स्वरूपात असलेला नामदेवगाथा, त्यातील अभंग-रचना व चरित्रकथा या सर्वस्वी आद्य नामदेवांच्याच आहेत, किंवा नाही याबद्दल शंका आहे. शंकांचे मुख्य स्वरूप असे सांगता येईल.

(१) यादवकालीन भाषेशी मिळती जुळती भाषा सर्वत्र दिसत नाही.

(२) नामदेवाने (आद्य) सांगितलेली अभंग रचनेची मांडणी सर्व अभंगांत दिसून येत नाही.

(३) नामदेव लिखित ज्ञानेश्वर चरित्रातील 'आदि' प्रकरणातील काही भाग ऐतिहासिक सत्याला धरून असल्यासारखा दिसतो. संपूर्णपणे ऐतिहासिक सत्य नाही. तीर्थावळी व समाधी प्रकरणे काव्यात्मक असली तर समकालीन व्यक्तीने घेतलेल्या वास्तव अनुभवातून व्यक्त झालेली दिसत नाहीत.

(४) पाल्हाळ करणारा, वास्तव्याच्या, भानाचा अभाव असलेला व पुराण-ग्रंथांच्या परंपरेतून रचना करणारा हा ग्रंथकार दिसतो.

आद्य नामदेवाचे म्हणून सांगितले जाणारे ज्ञानेश्वर चरित्र आद्य नामदेवांचे नसून मराठीतील बखरी, पोवाडे ज्या पौराणिक ग्रंथांच्या परंपरेतून लिहिले गेले आहेत, त्याच परंपरेतील नामदेव नावाच्या कुणी पुराणिकाने वा कीर्तनकाराने लोकरंजनासाठी व काही अंशी अध्यात्मिक ज्ञान प्रसारासाठी केलेली ही ललित वाङ्मय रचना आहे.

हा नामदेव माणकोजी बोधल्याचं चरित्र लिहितो. माणकोजी बोधल्याचा निर्याण काळ ३१ मे १६९४ [१] असा आहे. याशिवाय कबीर, कमाल, मीराबाई, भानुदास, जगमित्रनागा, संताजी पवार, जनजसवंत, जनाबाई, सावतामाळी, गोरोबा कुंभार, राका कुंभार, नरसी मेहता, चोखा मेळा,[२] आदींची चरित्रे याच्या

नावावर आहेत. यांपैकी 'जनाबाई' ही तर नामदेवाच्या घरची दासी. तिचे चरित्र नामदेव प्रथमपुरुषी निवेदनाने व्यक्त करील पण प्रस्तुतच्या चरित्राची मांडणी "नामयाचे घरी असे दासी जनी। तिने चक्रपाणी वश केला "[३] अशी तृतिय पुरुषी निवेदकाची आहे आणि शेवट "धन्य तेचि जन धन्य तिची भक्ति। नामदेव स्तुति करीतसे ॥" वरील सर्व चरित्रामध्ये भक्त आणि देव यांच्यातील भक्तीसंबंधी चटकदार कथा निवेदनाला महत्त्व आहे संपूर्ण ऐतिहासिक चरित्राला हा नामदेव विशेष महत्त्व देत नाही.

थोडक्यात अशा प्रकारची चरित्रे लिहिणारा हा नामदेव कुणी कीर्तनकार आहे आणि कीर्तनाच्या उत्तररंगासाठी अनेक संतांची व देवतांची कथारूपाने त्याने चरित्रे गायिली आहे. ही चरित्रे गाण्यामागे ऐतिहासिक सत्याची जाण वा चिकित्सक बुद्धीची बैठक नाही.

(१) बखरकार जसे ऐतिहासिक घटनांची चिकित्सा करून वा ऐतिहासिक घटना तपासून बखरी लिहीत नाहीत, तसाच हा नामदेव करतो. परंपरेने पूर्वजांकडून व इतिहासाच्या ओघात जी माहिती त्याला मिळाली आहे; ती चिकित्सा न करता तो मांडतो. अधिक माहिती मिळविण्याच्या खटपटीतही तो पडत नाही.

ज्ञानेश्वर समाधी महिम्यात येणारे "तिही शिवपीठ ऐसे म्हणितले। जुनाट असे केशवा ॥९॥ या शिवतीर्थाचा महिमा। कवणा वर्णवेळ पुरुषोत्तमा" [४] हे वर्णन पौराणिक ग्रंथ परंपरेतील वंशावळी किंवा पूर्व महात्म्य वर्णन करण्याच्या पद्धतीचे आहे. आळंदीचे स्थान महात्म्य "पुराणी म्हणसी कोण कथा। तरी ऐकेगा तू सकलार्था। शैवशास्त्र हा ग्रंथ सर्वथा। सिद्धमार्ग हा असे ॥[५] मग येणारे जेवणावळीचे वर्णन[६] ही सर्व कीर्तनकाराची रचना आहे. तसेच ज्ञानेश्वर चरित्रात येणाऱ्या वंशावळी, अद्‌भुत कथा, शकुनादी रचना बखरकार व कीर्तनकार ज्या मालमसाल्याने रंगवतात त्या स्वरूपाच्या आहेत. आपल्या रचनेमुळे खुद्द विठ्ठलावर, नामदेवावर विपरीत परिणाम होईल याचे भानही त्याला नाही, अद्‌भुत वर्णनाच्या पौराणिक शैलीने त्याने समाधी महिमा वर्णिला आहे. या अभंगात विठ्ठलांनी निवृत्तीनाथांना त्रिंबकशिखरी जाण्याचा आणि सोपानदेवांना कऱ्हेपठारावर समाधी दे असे सांगितले. ज्ञानदेवांनी निवृत्तीनाथांना त्रिंबकशिखरी जाण्यास सांगितले ह्या गोष्टी समकालीन नामदेवाच्या बाबतीत घडणे शक्य नाही. नामदेव 'ज्ञानेश्वरांच्या आदी' मध्ये धन्यधन्य तुमची वैखरी। जगदोद्धार केला संसारी। बावीस वरुषे असता पै जो जो दिवस उगवला। तो तो ज्ञानदेवे सफल केला। पदपदांतर कथिला। जेणे आत्माराम संतोषे ॥ (१००८) या ओवीने ज्ञानेश्वरांचा जन्मशक ११९७ असा मानला गेला. जनाबाई शालिवान शके अक्राशे नव्वद। निवृत्ति आनंद प्रकटले। त्र्याण्णवाच्या साली ज्ञानेश्वर प्रकटले। सोपान देखिल शाण्णवात। नवाण्णवाच्या साली मुक्ताई देखिली। जनी म्हणे केली मात त्यांनी ॥[७] या अभं-

गात येणाऱ्या 'साली' शब्दावरून हा आद्य जनाबाईचा अभंग संभवत नाही १७।१८ व्या शतकातील कुणा जनाबाईचा असावा.

पुराणे ज्या अर्थाने इतिहास आहे वा बखरींना ज्या अर्थाने इतिहास म्हणता येईल त्या अर्थानेच ह्या ज्ञानेश्वर चरित्राला ऐतिहासिक महत्त्व देता येईल.

तीर्थावळीला डॉ. पेंडसे यांनी कादंबरी म्हटले आहे. पण कादंबरीत 'संभाव्यतेचे' एक तत्त्व अनुस्युत असते. तीर्थक्षेत्रांची जी नावे दिली आहेत आणि प्रवासाचा मार्ग सूचित केला आहे; त्यामध्ये अतिशय असंभाव्यता आहे. याचे उघड कारण निवेदकाने स्वतः हा प्रवासाचा मार्ग स्वतः पाहिलेला नाही. परंपरागत गोष्टी व स्थळे यांचा उल्लेख करून हा प्रवास मांडलेला आहे.

आजचा एखादा ऐतिहासिक कादंबरीकार वा पौराणिक कादंबरीकार आपली कलाकृती रचण्यासाठी प्रथमपुरुषी, द्वितियपुरुषी वा तृतीयपुरुषी निवेदन करील तशीच रचना हा कीर्तनकार आपली कथावस्तू निर्माण करण्यासाठी करीत आहे. कीर्तन किंवा कथा रंजक व्हावी म्हणून नाट्याचाही वेळप्रसंगी उपयोग करीत आहे. थोडक्यात हा कीर्तनकार नामदेव पौराणिक कथाकार आहे. आद्य नामदेव नव्हे.

या नामदेवाच्या बाबतीत एक गोष्ट स्पष्ट आहे; ती म्हणजे त्याला ज्ञानेश्वर, त्यांची भावंडे याबद्दल आत्मियता आहे. तसेच संतांची चरित्रे गाण्याची आवड आहे. आपण संताच्या कृपेमुळे हे करू शकतो याची जाणीव आहे.

आज नामदेवाच्या नावावर असलेली ज्ञानेश्वर चरित्रविषयक प्रकरणे आद्य नामदेवांची नसून १७।१८ व्या शतकातील कुणा कीर्तनकार, पौराणिक कथाकाराची ती प्रकरणे आहेत. त्या प्रकरणातील भावनिक व भक्तीच्या ओलाव्याने ती लोकप्रिय झाली तरी ऐतिहासिकदृष्ट्या ती उपयोगाची नाहीत. ती प्रकरणे समकालीन नामदेवांची असती तर ऐतिहासिक सत्य, तत्कालीन जीवनपद्धती, भाषा, यांचा अपरिहार्यपणे उच्चार झाला असता. कारण चरित्रप्रकार हा समाज जीवनाशी निगडित असा वाङ्मय प्रकार आहे. या दृष्टीने महानुभावांची चरित्रे व उत्तरकालीन संतांची चरित्रे लक्षात घेण्यासारखी आहेत. मी हा नामदेव १६९४ च्या आजूबाजूचा असावा असे म्हणतो आहे कारण बोधल्यांचा निर्याण काळ या काळातील आहे. बोधल्यांच्या जीवनातील त्याची भक्त 'हांसी' चीच कथा हा नामदेव लिहितो, संपूर्ण चरित्र नाही.

१) डॉ. गंगाधर मोरजे 'माणकोजी बोधले यांचा निर्याण काळ' मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, जुलै १९६७ वर्ष १४ वे अंक ४ पृ. १९७. २) श्री नामदेव महाराजांच्या अभंगाची गाथा, संपा. त्र्यं. ह. आवटे, इंदिरा प्रेस, पुणे. पृ. ६०६ ते ६३४, ३) उनि. पृ. ६२५. ४) उनि. पृ. २११. ५) उनि. पृ. १९७. ६) उनि. पृ. २०७. ७) उनि. पृ. ७४३.

卐 卐 卐

ज्ञानदेव – नामदेव

प्रा. श्री. मा. कुलकर्णी, नागपूर

श्री ज्ञानेश्वरांच्या चरित्रात श्री नामदेवांचे स्थान अनन्यसाधारण आहे. नामदेव हे ज्ञानदेवांचे सखे, सोबती आणि पंथप्रचारक आहेतच; शिवाय ते आद्य-चरित्रकारही आहेत.

नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या चरित्रपर जे अभंग लिहिले आहेत ते 'आदि' 'तीर्थावळी' 'समाधी महिमा' आणि 'समाधी' अशा चार प्रकरणांत विभागलेले आहेत. याशिवाय सोपान, मुक्ताबाई, निवृत्तीनाथ आणि चांगदेव यांच्या 'समाधी' ही त्यांनी वर्णिल्या आहेत. त्यातही ज्ञानदेवांच्या चरित्रपर असे काही उल्लेख सापडतात. यांपैकी 'आदि' आणि 'समाधी' ही प्रकरणे अधिक विश्वसनीय आहेत. 'तीर्थावळी' यात चरित्रपर माहिती फार थोडी असून अद्भुतरम्य भागच अधिक आहे. 'समाधी महिमा' प्रकरणही याच स्वरूपाचे आहे. ही दोन्ही प्रकरणे याच कारणांसाठी अनेक अभ्यासकांनी अविश्वसनीय ठरविली आहेत, ते योग्यच आहे. 'समाधी' प्रकरणातील काही अभंगही अद्भुत व अतर्क्य वाटतात, पण त्यात विश्वसनीय वाटतील असे अभंगही बरेच आहेत. 'आदि' हे प्रकरण अधिक वास्तव व विश्वसनीय आहे. म्हणून 'आदि' व 'समाधी' प्रकरणांच्या आधारे ज्ञाने-श्वरांच्या चरित्राची रूपरेषा मांडावी आणि अन्य समकालीन व उत्तरकालीन संतांच्या ज्ञानेश्वरविषयक उद्गारांचा मेळ या रूपरेषेतील घटनांशी बसवून ती अधिक दृढ करावी. तसेच स्वतः ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील चरित्रपर असे प्रत्यक्षाप्रत्यक्ष आधार शोधून काढावेत आणि त्यांचा उपयोग करून नामदेववर्णित चरित्र अधिक दृढ व विश्वसनीय करावे. नाही तरी नामदेवांचे अभंग हाच ज्ञानेश्वर चरित्राचा मुख्य आधार आहे. तो सोडला तर आजचे परिचित व प्रचलित असे ज्ञानेश्वरांचे चरित्र लटके पडते. म्हणून हा मूळ आधार कायम ठेवून इतर आधारा-प्रमाणांच्या सहाय्याने व सत् तर्काच्या आधाराने त्याला अधिक विश्वसनीय करावे, दृढ करावे व शक्यतो तपशिलवार करावे हेच रास्त आहे.

चरित्राची मांडणी

१. नामदेवकृत ' आदि ':– ज्ञानेश्वरांचे आजे गोविंदपंत व आजी निराई या दोघांनाही गहिनीनाथांचा अनुग्रह होता व प्रेम होते. नामदेव वर्णन करतात—

म्हणोनि बैसलों संतांचे संगतीं । गोविंदा विश्रांति गहिनीनाथ ॥ ८७२ ॥
तेंचि हें सर्व विठोबाचें नाम । निराईस प्रेम गहिनीनाथी ॥ ८७३ ॥

पुढे या दोघांना पुत्ररत्न झाले. मूर्तिमंत वैराग्यच अशा या पुत्राचे–

विठ्ठल आवडी ठेवियेलें नाम । निराईस प्रेम गहिनीनाथी ॥ ८७४ ॥

विठ्ठल विरक्त असल्यामुळे तीर्थे पाहावी असे वाटून माता–पिता यांना वंदून तो भक्तिपूर्वक तीर्थाटणाला निघाला. द्वारावती, पिंडारक, सुदाम्याची नगरी, मूळ माधव, भालुकातीर्थ, प्रभास, सोमनाथ, मुचकुंदतीर्थ, धवलपूर, सप्तशृंग, कपाळेश्वर, त्र्यंबक, कुशावर्त, ब्रह्मगिरी ही तीर्थे करून तो भीमाशंकर येथे आला. आणि—

देखोनियां भीमा आठवे पंढरी । विठ्ठला अंतरीं पांडुरंग ॥ ८७६ ॥

पुढे तो अलंकापुरी आला. तेथे सिदोपंतांनी विचारल्यावरून त्याने सांगितलें–

विठ्ठलाचें नाम रामेश्वरीं भाव । वृत्ति आपेगांव गोदातीरीं ॥
मातापिता वृद्ध वसताती तेथें । द्वारकादि तीर्थे करुनि आलों ॥

पुढे आपली कन्या याला द्यावी असा स्वप्न-दृष्टान्त सिदोपंताला पंढरीनाथाचा झाला. विठ्ठलाच्याही स्वप्नात येऊन पंढरीनाथाने हेच सांगितले आणि विठ्ठल–रुक्मिणीचे लग्न झाले. त्यानंतर पांडुरंग क्षेत्री यात्रा भरली होती तेथे हे नवविवाहीत पति-पत्नी गेले आणि त्यांनी पांडुरंगाच्या चरणावर मस्तक ठेवले (८७७). त्यानंतर विठ्ठलाने आपली राहिलेली तीर्थयात्रा पूर्ण करण्याचा मनोदय व्यक्त केला व सिदोपंतांची अनुज्ञा घेऊन तो एकटाच रामेश्वरापर्यंत जाऊन परत आळंदीस आला. (८७८–८०). परत आल्यानंतर विठ्ठल पत्नीसह व सिदोपंताला बरोबर घेऊन माता–पित्यांकडे आपेगावी आला (८८१). कालांतराने माता–पिता वैकुंठवासी झाले. विठ्ठलाचे लक्ष संसारी नव्हते. सिदोपंतांनी मग विठ्ठल–रुक्मिणीला परत आळंदीला आणले व तेथेच राहण्यास सांगितले (८८२). आळंदीस राहात असता विठ्ठलपंत नित्य हरिकथा, नामसंकीर्तन, संतांचे दर्शन यात काळ घालवीत असत. आणि ' पंढरीची वारी आषाढी कार्तिकी ' करीत असत (८८३). ' ऐसा बहुत काळ क्रमिलियावरी । पुत्र अपत्यउदरी होतां न दिसे ! ' मग विठ्ठलाने पत्नीजवळ संन्यास घेण्याचे मनोगत व्यक्त केले. काही काळ गेला आणि—

असतां दुश्चितपणें निरोप पुसिला । जा जा म्हणें दिधला अवसरू ।
जाऊनि विठ्ठलें घेतला संन्यास । चिंता रखुमाईस पडली भारी ॥ ८८४ ॥

रुक्मिणीचे उग्र अनुष्ठान, श्रीपादाचे आगमन, रुक्मिणीची हकीगत कळणे, सिदोपंत-रुक्मिणीसह श्रीपादांचे वाराणसीस परत जाणे आणि विठ्ठल ऊर्फ चैतन्याला ' करीं पाणिग्रहण इचे आता ' असे सांगणे, या घटना नामदेवांनी सरळ वर्णिल्या आहेत. ' पाणिग्रहणाची ' आज्ञा दिल्यानंतर ' अविधि कर्माचें न धरावें भय । यासी आहे साह्य जगदीश ' असे अभय व आश्वासनही श्रीपादांनी दिले हे विशेष होय (८८७). संन्यासी गृहवासी झाल्यामुळे लोकांनी उपहास केला, ब्राह्मणांनी वाळीत टाकलं, आप्तवर्गाने उपेक्षा केली, सर्व समाजानेच त्यांचा त्याग केला. अशी बारा वर्षे गेल्यानंतर निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई अशी चार अपत्ये झाली. मुले व्रतबंधायोग्य झाल्यावर विठ्ठलपंतांनी ब्राह्मण सभेपुढे क्षमायाचनापूर्वक आपला प्रश्न मांडला. शास्त्रज्ञांनी शास्त्रग्रंथ पाहिले व देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरा उपाय नाही असे सांगितले. विठ्ठलपंतांनी ते मान्य केले व दारा, पुत्र, गृहाचा त्याग करून ते त्रिवेणी संगमाकडे निघाले. पत्नीचाही त्याग केला असे म्हटले असले तरी ' झडझडा ज़ाती मागे परतोनी न पाहती ' या वर्णनावरून दोघेही गेले असेच अनुमान होते आणि पुढे मुक्ताबाईच्या समाधी प्रकरणात मुक्ताबाईने ' तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ' असे म्हटल्याचे नामदेवांनी वर्णिले आहे त्यावरून माता–पिता दोघेही गेली हेच निश्चित होते (८८९).

निवृत्तीने ' आम्हां कवण गती ' असे विचारल्यावरून द्विजांनी त्यांना ' प्रतिष्ठानास जाऊन पत्र आणा ते आम्ही मानू ' असे सांगितल्यावरून ही भावंडे प्रतिष्ठानास गेली. जाण्यापूर्वी निवृत्तीनाथ व ज्ञानदेव यांच्यात थोडी चर्चा झाली. तीत व्यक्त झालेले ज्ञानेश्वरांचे मत व दृष्टिकोण त्यांनी ज्ञानेश्वरीत सर्वत्र मांडलेल्या व तिसऱ्या अध्यायात विशेषत्वाने प्रगट झालेल्या मताशी तंतोतंत जुळणारे आहे. या चरित्राच्या विश्वसनीयतेत त्यामुळे भर पडते.

पैठणच्या ब्राह्मणांनीही याला ' प्रायश्चित्त नाही ' असेच सांगितले आणि जीवन सार्थकी लावण्याचा उपाय म्हणून ' अनन्य भक्तीचा ' उपदेश केला. ते ऐकून निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई आनंदली आणि ' ज्ञानदेव म्हणे सांगाल तें मान्य ' (८९३)

त्यांची नावे ऐकून ब्राह्मण हसले. कोणी म्हणाले, नावात काय आहे ? हा ज्ञाना (रेडा) पखाल वाहतो आहे. ' त्याचा व आपला आत्मा एकच आहे असे ज्ञानदेवांनी सांगितले. आणि म्हैशाच्या पाठीवर मारलेल्या आसुडाचे वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उठले. तरी ब्राह्मणांनी त्या रेड्यामुखी वेद वदविण्याची अट घातली. ' तरीच तुमची समता आम्हां येईल कळों ' असे म्हटले. ज्ञानेश्वरांनी मग रेड्यामुखी वेद वदविले (८९४). त्यानंतर मात्र ब्राह्मणांचा अभिमान गेला,

त्यांना पश्चात्ताप झाला आणि हे देवाचे अवतार आहेत अशी त्यांची खात्री पटली. श्राद्धदिनी पितरांना प्रत्यक्ष बोलविण्याचाही प्रकार घडला आणि सोपानादिकांच्या आग्रहावरून द्विजांनी पत्र दिले.

पैठणला असताना या भावंडांची दिनचर्या काय होती ? नामदेव सांगतात–

अध्यात्मग्रंथ पाहती पैठणीं । गीता संबोधिनी जवळी असे ।
भोगावती स्नान, कालिकादरूषण । वेदांत व्याख्यान परिमिती ।।
सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन । पैठणीचे जन वेधियेले ।। ८९७ ।।

पुढे ते पत्र घेऊन व तो म्हैसाही बरोबर घेऊन ते नेवाशास आले आणि 'प्राकृत पैं केली गीतादेवी.' त्यानंतर,

'निवृत्ती म्हणती ऐके ज्ञानदेवा । अनुभव करावा अमृता ऐसा'
हा उल्लेख अनुभवामृताच्या रचनेचा आहे हे स्पष्ट आहे.

आदिशक्ती म्हाळसेला वंदन करून तेथून ही मंडळी निघाली. 'क्रमितातीं मार्ग अनुभवा कुशळ । हरिनाम सकळ . कवित्व कला' याचा अर्थ असा की, मार्गात ते हरिनाम कीर्तन करीत असत व कवित्वरचनाही करीत असत. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या दोन ग्रंथांच्यानंतर ही कवित्वरचना कोणती असणार ? अभंगरचनाच होय. पैठण मुक्कामीही कीर्तन–पुराण यांच्या निमित्ताने अभंगरचना होत असलीच पाहिजे. असो. नेवाशाहून ते 'आळे' गावी आले. तेथे पशू म्हणजे 'रेडा' शांत झाला. त्याची क्रिया करून ही मंडळी 'आळंकावती निजस्थान प्रवेशली' (८९८).

आळंदीला आल्यावर तेथील लोकांचीही 'परब्रह्माचे ठसे' असे देव आहेत अशी खात्री पटली आणि–

'उपजतांचि ज्ञानी हें वर्म जाणोनि । आले लोटांगणी चांगदेव' (८९९)

'आदी' प्रकरणातील शेवटचे तीन अभंग ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांच्या गौरवपर असून ज्ञानेश्वरांच्या कार्यावर त्यातून प्रकाश पडलेला आहे

अशा रीतीने या प्रकरणात पूर्वजवृत्तान्तापासून ज्ञानेश्वरी, अनुभवामृत इ. ग्रंथरचनेपर्यंतचा वृत्तान्त सुसंगतपणे वर्णिलेला आहे. नामदेवाबरोबरची तीर्थयात्रा आणि नंतर संजीवनसमाधी या दोनच महत्त्वाच्या घटना या 'आदी' प्रकरणात आलेल्या नाहीत.

नामदेवांचे 'तीर्थावळी' प्रकरण इतक्या अद्‌भुतरम्य घटनांनी भरले आहे की, त्यात विश्वसनीय भाग फारच थोडा आहे. अनेक अभ्यासकांनी या प्रकरणाची अविश्वसनीयता दाखवून दिली आहे. शिवाय त्यात ज्ञानदेव–नामदेव तीर्थयात्रेला गेले होते या पलीकडे महत्त्वाची चरित्रविषयक माहिती मिळत नाही. म्हणून या प्रकरणाचा येथे विचार केला नाही. 'समाधी महिमा' या प्रकरणापासून प्रारंभ करू.

२. **श्रीज्ञानेश्वर समाधी महिमा** :– या प्रकरणातही अद्‌भुत व अविश्वसनीय भाग बराच आहे. तथापि त्यातील काही उल्लेख महत्त्वाचे वाटतात.

पव्हे घालुनी ज्ञानदेवें। जग तारिलें कीर्तनें ॥ ९७१ ॥

असा अभिप्राय येथे दिला आहे. यात ज्ञानदेवांनी कीर्तन केल्याचा, ते कीर्तन करीत असत या 'आदी' प्रकरणातील उल्लेखाशी तो जुळणारा आहे. दुसरा अधिक महत्त्वाचा आहे,

जगदोद्धार केला संसारीं। बावीस वरुषें असतां पै ॥ ९९९ ॥

ज्ञानेश्वरांच्या संदर्भातील हा उल्लेख आहे आणि ज्ञानेश्वरांच्या एकंदर आयुर्मानाशी जुळणारा व रूढ समजुतीला बळकटी आणणारा असा तो आहे.

३. **श्री ज्ञानेश्वरांची समाधी** :– या प्रकरणातील कित्येक उल्लेख 'आदी' प्रकरणात वर्णिलेल्या घटनांना दृढ करणारे आहेत. हे प्रकरण बव्हंशी विश्वसनीय असेच आहे व तसे ते मानलेही गेले आहे.

काय सांगों देवा ज्ञानोबाची ख्याती। वेद म्हैशामुखीं वदविले ॥
कोठवरी वानूं याची स्वरूपस्थिती। चालविली भिंती मृत्तिकेची ॥१०४७॥

गीतेवरी टीका ग्रंथ केला सार। केवळ ईश्वर ज्ञानाचा हा ॥ १०५१ ॥

छळिलें ब्राह्मणे प्रतिष्ठानीं जातां। रेड्यामुखीं वेदांता बोलविले ॥
आला चांगदेव व्याघ्रवाहन घेऊन। नेला अभिमान ज्ञानदेवें ॥ १०५९ ॥

प्रतिष्ठानास जाणे, तेथे रेड्यामुखी वेद वदविणे, गीतेवर टीका करणे, चांगदेवाचा गर्व दूर करणे व त्या संदर्भात भिंती चालविणे इ. गोष्टी 'आदी' प्रकरणात वर्णिलेल्याच आहेत. येथील हे उल्लेख निवृत्तिप्रमुख भावंडे व स्वतः नामदेव यांना समाधीच्या प्रसंगी ज्ञानदेवाचे एकंदर चरित्र व कर्तृत्व आठवले तसे वर्णिले या स्वरूपाचे आहेत. त्यामुळे अगोदरच्या घटनांची विश्वसनीयता या उल्लेखांनी वाढविली आहे. या 'समाधी' प्रकरणांतील काही अभंगांमधून निवृत्तीनाथ, ज्ञानदेव यांच्या संबंधांवरही मनोज्ञ प्रकाश पडला आहे. निवृत्ती–ज्ञानदेव यांचं नातं

दुहेरी आहे. शिवाय त्यांच्या वयातही अंतर फार थोडं आहे. पुढील अभंगातील भाव या सर्व गोष्टी प्रकाशित करतात–

पुढे ज्ञानेश्वर जोडोनियां कर। बोलतो उत्तर स्वामिसंगें॥
पाळिलें पोसिलें चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा
स्वामिचिया योगें जालो स्वरूपाकार। उतरलों पार मायानदी॥

ज्ञानदेवांनी असे म्हटल्यावर–

निवृत्तीने हात उतरिला वदना। मागिलें निधाना आम्हालागी ॥१०८०॥

पुढे आलिंगन देऊन निवृत्तीने कौतुकोद्‌गार काढले ते असे–

अमर्यादा कधी केली नाही येणे। शिष्यगुरूपण सिद्धी नेले॥
गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा। गुह्यगोप्यमाळा लेवविल्या॥
फेडिलीं डोळयांचीं अत्यंत पारणीं। आतां ऐसें कोणी सखे नाही ॥१०८१॥

निवृत्तीनाथासारख्या महायोग्याच्या मनाची स्थितीदेखील अत्यंत व्याकुळ झाली असे नामदेवांनी मोठे प्रत्ययकारी वर्णन एका अभंगात (१०८५) केले आहे. ते वाचले म्हणजे ज्ञानदेवांचे मोठेपण, त्या समाधीप्रसंगाचे करूणोदात्त गंभीर स्वरूप आणि त्याच्या वर्णनातील सच्चेपणा मनाला पटल्याशिवाय राहात नाही.

या प्रकरणातील आणखी एक उल्लेख मला महत्त्वाचा वाटतो. ज्ञानेश्वर समाधीच्या ठिकाणी जाऊन आसनावर बसले तेव्हा त्यांनी आपल्या पुढे 'ज्ञानेश्वरी' ठेवली. नामदेवांनी या गोष्टीचा मुद्दाम उल्लेख केला आहे–

जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी। पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥१०९१॥

४. अन्य समाधी प्रकरणे : नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या समाधी सोहळयाचे वर्णन केले तसेच सोपान, चांगदेव, मुक्ताबाई आणि निवृत्तीनाथ यांच्या समाधींचे वर्णन केले आहे. ही सर्व समाधी प्रकरणे सलग अशी जाणीवपूर्वक आणि पांडुरंगाच्या प्रेरणेने वर्णिली असल्याचे नामदेवांनी सांगितले आहे, ते महत्त्वाचे आहे. निवृत्तीनाथांच्या समाधीचे वर्णन केल्यानंतर नामदेव म्हणतात–

शेवटची समाधि जाली जैसी तैसी। तुज हृषीकेशी समर्पिली॥
आपुल्या सत्ताबळे चालविलें हरि। विष्णुदासावरी कृपा केली॥
नेणो कैसा होईल समाधीचा प्रसंग। बोलिलेति अंगे पांडुरंगा॥
मुकियाला वाचा दिधली श्रीरंगें। इच्छिला प्रसंग सिद्धी नेला॥
नामा म्हणे देव माय बाप विठ्ठल। म्हणोनि माझे बोल स्वीकारिले॥
(१२०६)

या सर्व समाधी प्रसंगी नामदेव उपस्थित होते आणि त्या पार पाडल्यानंतर लवकरच ते सगळे प्रसंग त्यांनी अभंगांतून वर्णिले असे अनुमान यावरून करता येते. अडचण फक्त चांगदेवाच्या समाधी प्रकरणाची आहे. कारण चांगदेव शके १२४७ मध्ये समाधिस्थ झाला. ते प्रकरण त्यामुळे संशयास्पद ठरते. तथापि त्यातील काही उल्लेख उपयुक्त आहेत.

समाधीला बसण्यापूर्वी चांगदेवाने पुढीलप्रमाणे उद्गार काढले–

चवदाशे वर्षे शरीर केलें जतन । नाहीं अज्ञानपण गेले माझे ॥
अभिमाने आलों श्री अलंकापुरीं । अज्ञान केले दुरी मुक्ताबाईने ॥ (११४२)

मुक्ताबाईने आपणाला उपदेश दिला असे आणखी काही अभंगातही उल्लेखिले आहे (११४३, ११४४, ११४५ इ.) यावरून चांगदेवाला उपदेश देणारी मुक्ताबाई ज्ञानेश्वर भगिनी मुक्ताबाईच होय असे नामदेव मानीत होते हे स्पष्ट आहे.

चांगदेव समाधी प्रकरणाच्या शेवटी झालेला एक उल्लेखही लक्षणीय आहे. ' निवृत्तिराज म्हणे जावे म्हाळसापुरीं । जेथे ज्ञानेश्वरी पूर्ण जाली ॥ हे म्हाळसापूर म्हणजे ' नेवासे ' असा उल्लेख आहे त्यावरून स्पष्टच आहे.

मुक्ताबाई समाधी प्रकरणात सर्व संत मंडळी प्रतिष्ठानाला आली असें वर्णन आहे. त्यानंतर नामदेवाने ' आपेगांव कोठे सांगा स्वामी ' (११६३) असे ' हरी 'ला विचारले आणि ' मायभूमि पाहूं यांची आम्ही डोळा ' अशी इच्छा व्यक्त केली. ' भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आदि । तयाची समाधी आपेगांवी ' अशीही माहिती या अभंगात (११६४) दिली आहे, ती महत्त्वाची आहे. ' नामा म्हणे आम्हां दाविले नारायणें । जालीं चौघेजणें याचि क्षेत्रीं ' हा या अभंगातील उल्लेख आणि यांच्या पुढच्या अभंगातील (११६५),

निवृत्ति मुक्ताईने पाहुनि स्थळ डोळां । आलासे उमाळा ओसंडोनी
तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ॥
निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मजलागी ॥

हे वर्णन ज्ञानेश्वरादिकांच्या जन्मस्थळाबद्दल संदेह उत्पन्न करणारे आहे.

निवृत्तीनाथाच्या समाधीचे जे वर्णन नामदेवांनी केले आहे त्यात निवृत्तीनाथांना ज्ञानदेवादि आपल्या भावंडांचे वारंवार स्मरण होत असल्याचे व त्यांच्याविषयी ते कौतुकोद्गार काढीत असल्याचे सांगितले आहे. त्यातील ' ज्ञानराजे आमुचे निववीले डोळे । आता ऐसे खेळे नाही कोणी ' (११८३), ' गुरुत्वासी

लाज नाही आली ' (११८४), ' गहिनी नाथें मज सांगितलें सार । केली ज्ञानेश्वरें व्याख्या त्याची ' (११८६), हे उल्लेख लक्षणीय आहेत.

५. **नामदेवकृत ज्ञानदेवांची जी आरती आहे :** (२१०४) तिच्यातील ' म्हैसिकपुत्र केला वाचक वेदाचा । प्रतिष्ठानी गर्व हरिला विप्रांचा ।। विशेष अर्थ केला भगवद्गीतेचा । प्रत्यक्षद्वारीं शोभे पिंपळ कनकाचा ' हे उल्लेख ' आदी ' प्रकरणातील वर्णनांशी जुळणारे व त्याची विश्वसनीयता वाढविणारे आहेत. ही आरती नामदेवांनी ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर काही वर्षांनी लिहिली असावी. कारण कार्तिक वद्य एकादशीला आळंदीला यात्रा सुरू झाली होती असा उल्लेख तीत आहे.

कृष्ण एकादशी कार्तिकमासीं । आपण पंढरिनाथ सनकादिकांसी ।
यात्रेसी येताती स्वानंदू राशी । दर्शन घडे तया निजयुक्ती देसी ।।

६. **समकालीन संतांचे उद्‌गार :** समकालीन व काही उत्तरकालीन संतांच्या उद्‌गारांनी नामदेववर्णित ज्ञानेश्वर चरित्रातील कित्येक घटनांची पुष्टी होते. ज्ञानेश्वरादि भावंडे अवतारी होत, ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहिली हे जनाबाई सांगते.

सदाशिवाचा अवतार । स्वामी निवृत्ति दातार ।।
महाविष्णूचा अवतार । सखा माझा ज्ञानेश्वर ।। ४०९ ।।

गीतेवर आन टीका । त्यांनी वाढियेली लोकां ।।
रत्नकनक ताटा माजीं । त्याने वोगरिलें कांजी ।।
एका ज्ञानेशांवाचोनी । म्हणे नामयाची जनी ।। ४०४ ।।

ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यावर लिहिलेल्या एका अभंगात जनाबाई म्हणते,

अळंकापुरवासिनी बैसे माझ्या मनीं । सन्मुख इंद्रायणी वाहातसे
ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायीं । धांवोनिया येई दुडदुडा ।।
बहु कासावीस होतो माझा जीव । कळवळ्याची कीव येऊं देई ।। ३०५ ।।

यावरून ज्ञानेश्वरांच्याविषयी समकालीन संतांना काय वाटत होते याची नीट कल्पना येते. सेना न्हावी यांचा पुढील अभंग नामदेववर्णित चरित्रातील अनेक घटनांची पुष्टी करीत आहे.

वैकुंठवासिनी कृपावंत माउली । जगा तारावया अलंकापुरी आली
शिव तो निवृत्ति आदिमाया मुक्ताई । ब्रह्मा तो सोपान विष्णु ज्ञानदेव पाही ।।

येउनी प्रतिष्ठानीं पशू वेद बोलविला । पंडित ब्रह्मज्ञानी यांचा गर्व हरीला ॥
तप्तीतीरवासी चौदाशे वर्षांचा होता । तयाचा अभिमान गर्व हरी आदिमाता ॥
वाळितां ब्राह्मणीं स्वर्गींचे पितर आणविले । सेना म्हणे जगी पूर्णब्रह्म अवतरले ॥ १३२ ॥

इतर अनेक अभंगातून ज्ञानेश्वरांविषयी पराकोटीचा आदर व आत्मियता सेना यांनी व्यक्त केली आहे.

श्रीज्ञानराजें केला उपकार । मार्ग हा निर्धार दाखविला ॥ १२८ ॥
अलंकापुरवासिनी । ज्ञानाबाई मायबहिनी ॥
लेकुराची चिंता । वागवावी कृपावंता ॥ १२७ ॥
ज्ञानदेव गुरु ज्ञानदेव तारुं । उतरील पैलपारुं ज्ञानदेवा ॥ १२६ ॥

ज्ञानेश्वरीच्या रचनेचा एक मार्मिक असा सूचक उल्लेख एका अभंगात आहे.

गिरजेप्रती शंकर उपदेशिले । तो गुह्य मंत्र सप्त समुद्रापलीकडे
ऐसें निजगुज साराचेंहीं सार । उघडें दाविलें साचार ज्ञानदेवें ॥ १२५ ॥

समकालीन संतांवर ज्ञानेश्वरांचा हा केवढा प्रभाव होता !

बंका याच्या एका अभंगात आपली गुरुपरंपरा दिली आहे. ती ज्ञानदेव–विसोबा खेचर–नामदेव–चोखा–बंका अशी आहे (३९). ज्ञानदेव–नामदेव संबंधावर त्यामुळे प्रकाश पडतो.

थोड्याशा उत्तरकाळी झालेल्या कान्होपात्रेचे हे उद्‌गारही लक्षणीय आहेत–

शिव तो निवृत्ति विष्णु ज्ञानदेव पाही । सोपान तो ब्रह्मा मूळ माया मुक्ताई
प्रत्यक्ष पैठणी भटां दाविली प्रचिती । रेडियाचें मुखें वदविली वेदश्रुती
चौदाशें वरुषांचे तत्पीतीर रहिवासी । गर्व हरविला चालविले भिंतीशीं ॥ २ ॥

याच्या अगोदरच्या अभंगात ती म्हणते–

आलंकापुरी पुण्यठाव । तेथें समाधी ज्ञानदेव ॥
पांडुरंगें दीधला वर । भेटी निर्धार कृष्णपक्षीं ॥ १ ॥

७. **एकनाथकृत स्तुती** : एकनाथांनी निवृत्ती प्रमुख चारी भावंडांच्या स्तुतिपर अभंग लिहिले असून त्यात चरित्रपर भाग आला आहे. ज्ञानदेवांच्या स्तुतिपर असे २६ अभंग आहेत (३५०७ ते ३५३३). त्यात नामदेववर्णित अनेक घटनांचा उल्लेख आहे–

चालविली जड भिंती । हारली चांग्याची भ्रांती ॥
रेड्यामुखीं वेद बोलविला । गर्व द्विजांचा हरविला ॥ ३५१६ ॥

नररूपें विष्णु अवतरला हा भगवान । नदीनद वापी कूप पाहतां
उदक नव्हे भिन्न । नवल हेंचि पशु म्हैसा करितो वेदाध्ययन ।
नमन करुनि सद्भावें जपतां होय विज्ञान ॥ देशिकराज दया–निधि ।
अलंकापुरी जो नांदें । देशभाषा ज्ञानदेवी गीतार्थ वदे ॥ ३५१७ ॥

या सर्व घटनांचा उल्लेख व इतर अनेक अभंगांतूनही आलेला आहे. मुक्ताबाईच्या स्तुतिपर अभंगातील पुढील उल्लेख महत्त्वाचे आहेत–

बाळलीला केली जगीं ख्याती मिरविली । चांगयाची हरली चौसष्ट कळा ॥
कळा पासष्टावी ज्ञानदेवें दाविली । चांगयाची विराली अहंममता ॥
चांगदेव शरण कायावाचा मनें । एका जनार्दनी म्हणें तैशापरी ॥ ३५४० ॥

चांगदेवावर अनुग्रह करणारी मुक्ताबाई ती हीच असा एकनाथांचा दृढ समज आहे. शिवाय यात चांगदेवपासष्ठीचाही सूचक व मार्मिक उल्लेख आहे.

८. **तुकाराम व विठोबा :** ज्ञानदेवांनी ज्याचा पाया रचिला त्या भागवतधर्म मंदिरावर कळस चढविणारे तुकोबा एका अभंगात म्हणतात—

जयाचियें द्वारीं सोन्याचा पिंपळ । अंगीं ऐसें बळ रेडा बोलें
करील तें काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं
जेणें हें घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ॥ २३४० ॥

आळंदी येथे समाधी, रेड्यामुखी वेद वदविणे आणि ज्ञानेश्वरीच्या रूपाने मुक्तीचे अन्नसत्र घालणे या गोष्टी यातून स्पष्ट होतात.

निळोबारायांनी चांगदेवाचे चरित्र सविस्तर वर्णिले आहे. त्यातच ज्ञानेश्वरादि भावंडांचे चरित्रही विस्ताराने आले आहे, 'आपेगांवकर गोविंदपंत निराई। आणि सिदोपंत गिरिजाई अलंकापुरीं ' ' ते गैनीनाथाची शुद्ध सांप्रदायी । परि येरयेरा नाहीं परिचय कदा ' येथपासून तो पैठणला जाऊन ज्ञानेश्वरादि भावंडांनी शुद्धिपत्र मागणे, तेथे ज्ञानदेवांनी म्हैसीपुत्रा मुखी वेद वदविणे, पुढे चांगदेवाच्या कोऱ्या पत्राला उत्तर ' पासष्टींची निर्मिती जड भिंती चालविणे, त्या अगोदर नेवाशाला …'केला भगवद्गीता अर्थ । दहा सहस्र ग्रंथ सिद्ध झाला ' हे सर्व सविस्तर वर्णिले असून नामदेववर्णित चरित्राशी जुळणारे असेच आहे. ज्ञानेश्वरीच्या संबंधात ' बाबाजीपंतांनी स्वहस्तें लिहिला । परी ओवीबद्ध केला. ज्ञानेश्वरीं ॥ सच्चिदानंद-बाबा ठेवियेलें नांव । शिक्षपिला भाव देखोनियां ॥ हा उल्लेख महत्त्वाचा आहे.

पुढे चांगदेवाच्या भेटीच्या वेळी निवृत्तीनाथादि तिघांनींही त्याला मुक्ताईच्या स्वाधीन केले व तिनेच त्याला गुरूपदेश दिला हेही सांगितले आहे. निळोबांनी एका अभंगात (१५६७). ज्ञानदेवांची परंपरा दिली आहे ती आदिनाथ–मत्स्येंद्रनाथ–गोरक्षनाथ–गहिनीनाथ–निवृत्ती–ज्ञानदेव–मुक्ताई–चांगा अशी आहे. ज्ञानेश्वरांची एक आरतीही निळोबांनी केली आहे आणि तिच्यात, पशु बोले वेद, चाले भिंती, भगवद्गीता टीका ज्ञानेश्वरी, चांगदेवाचे शरण येणे, समाधीद्वारी अज्ञानवृक्ष, सुवर्णपिंपळ हे सारेच उल्लेख आलेले आहेत.

निरंजन माधव, महिपती, उद्धव चिद्धन या सर्वांची ज्ञानेश्वर चरित्रे नामदेववर्णित चरित्राची पुष्टी करतात. त्यांनी पुरविलेला तपशील व घातलेली भर कल्पनाविलासात्मक असून अविश्वसनीय आहे.

९. ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील आधार : नामदेववर्णित ज्ञानदेव चरित्राची मांडणी करून तीत अन्य समकालीन व उत्तरकालीन संतांच्या वाङ्मयातील उल्लेखांच्या आधारे कोणती भर पडते वा तिला कशी बळकटी येते हे येथवर पाहिले. आता स्वतः ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाची साक्ष या संदर्भात काढावयाची आहे. प्रथम त्यांचे अभंग–वाङ्मय विचारात घेऊ.

ज्ञानेश्वरांचे पूर्वजही हरीचं स्मरण करणारे होते असे पुढील उल्लेखावरून कळून येते–

ज्ञानदेवीं अभ्यास मोठा । नामस्मरण मुखावाट ।
पूर्वज गेले वैकुंठा । हरिहरि स्मरतां ॥ ८९ ॥

निवृत्तिनाथांकडूनच त्यांना विठ्ठलनामाची प्राप्ती झाली होती–

निवृत्तिप्रसादे जोडे । विठ्ठल नामे घडे ।
ज्ञानदेव बागडे । पंढरिये ॥ १२३ ॥
श्रीगुरु निवृत्तीने दिधले । तें प्रेम कोणे भोग्यें लाधलें
बाप रखुमादेविवर विठ्ठलें । ऐसे केले ज्ञानदेवा ॥ १४१ ॥

' हरिपाठा ' तील पुढील उल्लेखही हीच गोष्ट सांगतात—

' ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहुनी वाड नाम आहे (२२)
ज्ञानदेवाप्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ' (२७)
(गाथा क्र. ६९ व ७४)

पंढरी आणि विठ्ठल यांच्यासंबंधी ज्ञानदेवांनी विपुल रचना केली आहे. ' ज्ञानदेवे केले कीर्तन ' असे ते एका अभंगात (१५८) म्हणतात. ज्ञानेश्वरीच्या

शेवटी ज्ञानेश्वरी ग्रंथाला अनुलक्षून त्यांनी 'धर्मकीर्तन' हा शब्द वापरला आहे हे लक्षणीय आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ गुरुकृपेने सिद्धीस गेल्याचा सूचक उल्लेखही एका अभंगात (४२७) आहे–

निवृत्तिसुखाचा परमानंदु । ज्ञानशक्तीचा क्षीरसिंधू ।
ज्ञानेश्वराचा पदबंधु । सिद्धि नेला ॥

एका अभंगात चरित्रविषयक महत्त्वाचे उल्लेख आलेले आहेत. नामदेव वर्णित चरित्राशी ते जुळणारे आहेत हे विशेष. ते उल्लेख असे–

प्रतिष्ठान क्षेत्र तेथे ज्ञानियांचे स्वगोत्र । म्हणती हा पवित्र पतित जाला
नव्हे पुरा यती ना हा गृहस्थ । घातला याती वेगळा रे रे ॥
प्रुस्टीवरी मारीती ज्ञान्या चाल म्हणती । ऐकोनीया श्रुती दुखावला
मग बोलावुनी म्हैसा म्हणे तू ज्ञानीया कैसा । बोल का रूचा वेदश्रुती
तंव तो उपनिषदांचे सार । वेदांचे गव्हर कथीत असे '
यैसा देखोची चमत्कार म्हणती साक्षात्कार । ईश्वर आहे हा तारक
वौंशासी ॥ ७३१ ॥

नामदेवांचा उल्लेख ज्ञानेश्वरांच्या दोन अभंगांत आलेला आहे–

ज्ञानदेव म्हणे नामया हें तूं गा जाणसी । भजन केशवासी तूंचि
तुझा ॥ ८१ ॥

ब्रह्म ऐसें नामयाने जाणिले । हृदयीं धरिले प्राणलिंग ॥ ४७५ ॥

एका अभंगात (७३२) चांगदेवाचा उल्लेख आहे–

निवृत्तिदास म्हणे चांगया ब्रह्म तेचि खरे । सावळें निर्धारे जाण रया ॥

'चांगदेवपासष्टी' या प्रकरण ग्रंथात चांगदेवाचा व वटेश्वराचा उल्लेख असून हा ग्रंथ म्हणजे चांगदेवाला पत्ररूपाने केलेला उपदेश आहे हे सर्वश्रुत व सर्वमान्यच आहे. यावरून चांगदेव भेटीच्या प्रसंगाची पुष्टी होते. अमृतानुभव ग्रंथात श्रीगुरु निवृत्तीचे स्तवन आलेले असून गीतेचा उल्लेख 'आणि वैकुंठीचेही सुजाणें । ज्ञानापाशीं सत्त्व गुणें । बांधिजे हे बोलणे । बहु केले ' असा आलेला आहे, यावरून ज्ञानेश्वरीची रचना अगोदर झाल्याचे अनुमान होते व नामदेवांनी वर्णिलेल्या क्रमाशी ते सुसंगत ठरते. ज्ञानेश्वरीत तर आपली गुरूपरंपराच ज्ञानेश्वरांनी दिली आहे आणि ज्ञानेश्वरीच्या रचनास्थळाचा व काळाचाही निर्देश केलेला आहे. यदुवंशविलासु असणाऱ्या रामचंद्र क्षितीशाच्या कारकीर्दीत या ग्रंथाची रचना नेवासे येथे झाली. शके १२१२ या सर्वमान्य रचनाकाळाला जुळणाराच हा उल्लेख आहे.

निवृत्तीनाथांच्या अभंगातही विठ्ठलभक्ती आपणाला गुरूकडून मिळाली, आपल्या कुळातच कृष्णभक्ती आहे, हरिनाम हेच श्रेष्ठ आहे, असे कितीतरी उल्लेख आहेत. वानगीदाखल चार–दोन पाहू.

निवृत्तीचे गूज विठ्ठल सहज । गयनीराजे मज सांगितले ॥ १५ ॥
निवृत्तिगयनी कृपा केली असे पूर्ण । कूळ हे पावन कृष्णनामे ॥ १७२ ॥
निवृत्ति म्हणे तेचि गा जीवनमोल । भिवरा विठ्ठल दैवत आम्हा ॥२१२॥

एका अभंगात तर निवृत्तिनाथांनी आपल्या सर्व भावंडांचा उल्लेख केला असून इतर काही संतांचाही उल्लेख त्यात आहे–

सोपान सवंगडा स्वानंद ज्ञानदेव । मुक्ताईचा भाव विठ्ठलराज ।
दिंडी टाळघोळ गाती विठ्ठलनाम । खेचरासी प्रेम विठ्ठलाचे ॥
नरहरि विठा नारा ते गोणाई । प्रेम भरित डोहीं वोसंडती ॥
निवृत्ति प्रगट ज्ञानदेवा सांगे । पुंडलिकसंगें हरि खेळे ॥ १६४ ॥

सोपान व मुक्ताई यांच्या अभंगांतूनही असेच विठ्ठलप्रेमाचे उल्लेख आलेले आहेत. चांगदेवाच्या कित्येक अभंगांतून मुक्ताईने चांगदेवाला उपदेश केल्याचाही उल्लेख आहे (१ ते १८), तोही लक्षणीय आहे.

चरित्राचे विवेचन

नामदेव वर्णित जे ज्ञानदेव चरित्र आहे त्याची विश्वसनीयता–अविश्वसनीयता ठरविण्याचे प्रकार दोन. अन्य बलवत्तर आधारांनी यातील काही बाबी अविश्वसनीय ठरविणे हा एक प्रकार आणि यातीलच काही बाबी त्यातील अद्‌भुतरम्यतेमुळे वा तर्काला न पटल्यामुळे अविश्वसनीय मानणे हा दुसरा प्रकार. नामदेवाहून बलवत्तर असा अन्य पुरावा आज उपलब्ध नसल्यामुळे पहिल्या प्रकाराने या चरित्रातील गोष्टी अविश्वसनीय ठरविणे शक्य नाही. म्हणून दुसऱ्या प्रकाराचा अवलंब करूनच त्यातील विश्वसनीय–अविश्वसनीय ठरविले पाहिजे. मुळात या चरित्राची मांडणी करताना याच धोरणाने ती केलेली आहे. तीर्थावळी, समाधी महिमा यातील अद्‌भुत भाग बाजूलाच ठेवला आहे आणि 'आदी' व 'समाधी' प्रकरणातील वर्णनाला अन्य संतांच्या व स्वत: ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयातील उल्लेखांचे आधार शोधून दिले आहेत. त्यामुळे येथे पुनरुक्ती टाळून संक्षेपाने विवेचन केले असता पुरेसे आहे.

कुलवृत्तान्तामध्ये नामदेवाने त्र्यंबकपंताचा मूळ पुरुष म्हणून उल्लेख केला आणि त्यांची समाधी आपेगावी असल्याचे सांगितले आहे. गोविंदपंत–निराबाई

यांचा काहीशा विस्ताराने उल्लेख केला असून विठ्ठपंतांचा वृत्तान्त जन्मापासूनच दिला आहे. हा सर्व वृत्तान्त सरळ असून विश्वसनीय आहे. याला विरोधी असा पुरावा नाही आणि यात स्वभावतः विसंगत वा अद्‌भुत काही नाही. श्री. भिंगारकरांनी काही राजाज्ञापत्रांच्या आधारे त्र्यंबकपंतांची व गोविंदपंतांच्या आणखी एका भावाची जास्तीची माहिती दिली आहे. पण ती नामदेववर्णित चरित्रात भर आहे. विठ्ठलपंतासंबंधीचा जो वृत्तान्त नामदेवांनी वर्णिला आहे त्यात काही गोष्टी लक्षणीय आहेत. विठ्ठपंतांच्या माता–पित्यांना गहिनीनाथांचा उपदेश तर होताच पण विठ्ठलाचीही भक्ती होती, म्हणूनच त्यांनी आपल्या पुत्राचे नाव आवडीने विठ्ठल असे ठेवले. विठ्ठलालाही पंढरीचे व विठ्ठलाचे प्रेम होते व तो पंढरीची वारीही करीत असे. यावरून या घराण्यात नाथपंथाची दीक्षा व विठ्ठलभक्ती पूर्वापार चालत आलेली होती हे उघड होते. ज्ञानेश्वरांना विठ्ठलभक्तीसाठी पंढरीला येऊन नामदेवाची भेट होईपर्यंत थांबण्याची आवश्यकता नव्हती हे यावरून स्पष्ट होईल. याचा अर्थ असा की ज्ञानेश्वरीत विठ्ठलनाम नसण्याला तोपर्यंत त्यांना विठ्ठलाची माहिती व भक्ती नव्हती हे कारण देता येणार नाही आणि त्या आधारावर (ज्ञानेश्वरीत विठ्ठलाचा उल्लेख नसणे) दोन ज्ञानेश्वरांच्या कल्पनेला खतपाणीही घालता येणार नाही.

विठ्ठलपंताचे जे चरित्र नामदेवांनी वर्णिले आहे त्यात विठ्ठलपंत, पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यावर आळंदीस येऊन राहिले की, आपेगावास हे स्पष्ट सांगितलेले नाही. परंतु त्यांच्या वर्णनाचा भाव व रोख असाच आहे की, तें आळंदीसच येऊन राहिले, तेथेच निवृत्ती–ज्ञानेश्वरादींचा जन्म झाला आणि तेथील ब्राह्मणांनीच प्रायश्चित्त सांगितल्यावरून तेथूनच ते प्रयागाकडे निघून गेले. तेथूनच मग निवृत्ती–ज्ञानेश्वरादि भावंडे पैठणला शुद्धिपत्रासाठी गेली. (‘ आदी ’ ८८७ ते ८९०) शुद्धिपत्र मिळवून, नेवाशाला ज्ञानेश्वरीची रचना करून ही भावंडे ‘ आळंकावती निजस्थान प्रवेशली ’ (८९८) असे नामदेव सांगतात. पुढे चांगदेवाची भेट येथेच झाली हेही त्यांनी सांगितले आहे. (८९९) पण मुक्ताबाईच्या ‘ समाधी ’ वर्णनात मात्र ‘ जालीं चौघीजणें याचि क्षेत्रीं ’ (११६४) “ तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हां आम्ही लहान पांडुरंगा ’ (११६५) या अनुक्रमे नामदेव मुक्ताबाई यांच्या तोंडच्या उद्‌गारात आपेगावाचा जन्मक्षेत्र म्हणून उल्लेख केलेला आहे. त्यामुळे जन्मस्थळासंबंधी संदिग्धता उत्पन्न होऊन आळंदीपक्ष व आपेगावपक्ष असे दोन पक्ष उत्पन्न झाले व बराच वाद झाला. ‘ आदी ’ प्रकरणाची अधिक विश्वसनीयता, सर्व समकालीन व उत्तरकालीन संतांची दृढ समजूत या गोष्टी विचारात घेतल्या तर डॉ. म. प. पेठे यांनी या वादाच्या चर्चेचा समारोप करताना जे म्हटले आहे की, ‘ जोपर्यंत ज्ञानदेव आपेगावी जन्माला आले अशा

अर्थाचा कोणताही ऐतिहासिक कागदोपत्री पुरावा नव्याने उपलब्ध होत नाही. तोपर्यंत ज्ञानदेवांचा जन्म आळंदीसच झाला ही परंपरांगत रूढ असलेली समजूतच प्रमाण मानावी हे बरे, ते सयुक्तिक वाटते. (' श्रीज्ञानेश्वर वाग्यज्ञ दर्शन ' पृ. १४६.)

ज्ञानेश्वरादि भावंडे पैठणला असताना अध्यात्मग्रंथ पाहात होती, गीता संबोधिनी त्यांच्याजवळ होती आणि ते रात्रीला पुराण सांगत व कीर्तन करीत, असे नामदेव सांगतात (८९७). यावरून ज्ञानेश्वरी रचनेच्या पूर्वी ज्ञानेश्वर कीर्तन-प्रवचन करीत होते व त्या निमित्ताने अभंगादि कवित्वरचनाही करीत असावेत असे म्हणता येते.

पैठणहून ही मंडळी नेवाशास आली व तेथे ज्ञानेश्वरी व अमृतानुभवाची रचनाही त्यानी केली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी नेवाशालाच ज्ञानेश्वरीची रचना झाली असे स्पष्ट म्हटले आहे. त्यामुळे नामदेवांचे हे वर्णन सत्य आहे. ज्ञानेश्वरीच्या रचनास्थळीसंबंधी शंकेला काहीही आधार नाही.

नामदेववर्णित या चरित्रात दोन–तीन चमत्कार वर्णिले आहेत. रेड्यामुखी वेद वदविणे, श्राद्धाला प्रत्यक्ष पितरांना आणणे, भिंत चालविणे असे ते चमत्कार आहेत. चमत्कारांचा प्रांत नुसत्या तर्काच्या पलीकडे आहे. असे चमत्कार एखादा योगी, अवतारी पुरुष दाखवू शकतो यावर विश्वास ठेवणे हे ज्याच्या त्याच्या धारणेवर अवलंबून आहे. इतके खरे की, नामदेवापासून तुकाराम–निळोबापर्यंत सर्व अधिकारी पुरूषांनी या चमत्कारांचे श्रद्धा–विश्वासपूर्वक वर्णन केले आहे. हे संत दंभाचारावर कडाडून टीका करणारे आहेत हेही लक्षात घेतले पाहिजे.

या चमत्कारांचा बौद्धिक व तार्किक उलगडा करण्याचा प्रयत्न कित्येक विद्वान करतात. म्हैशामुखी वेद वदविण्याचा असा उलगडा करण्याचा प्रयत्न प्रा. न. र. फाटक (' ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य ' प्रथमावृत्ती, १९५२, पृ. ३२०–२१) आणि प्रा. म. रा. जोशी (' श्रीज्ञानदेव चरित्र संशोधन ' प्रथमावृत्ती, १९७४, पृ. ५९–६१) यांनी केला आहे. ' रेडे ', किंवा ' म्हैसे ' हे आडनाव मानून किंवा ' म्हैसा ' या शब्दाचा लाक्षणिक अर्थ मंद, मूढ, जडभरतासारखा असा घेऊन केलेला हा उलगडा समाधानकारक नाही. हा चमत्कार वर्णन करणाऱ्या सर्व संतांच्या मनात म्हैसा म्हणजे म्हैसा असा सरळ वाच्यार्थच होता याबद्दल शंकेला जागा नाही. दुसरे असे की, इतर चमत्कारांचे काय ? भिंत चालविली याचा तार्किक अर्थ काय करावयाचा ? म्हणून चमत्कार हे आहेत तसे स्वीकारणे अथवा नाकारणे हेच सयुक्तिक होय. या चमत्कारांवर संतांचे मोठेपण अवलंबून नाही हेही ध्यानात ठेवणे बरे.

चांगदेवाला उपदेश देणारी मुक्ताबाई ही ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताईच होय हे नामदेवांच्या अभंगावरून स्पष्ट आहे योगिनी मुक्ताबाई व ही मुक्ताबाई एकच असा चुकीचा समज निदान नामदेवांचा व चांगदेवाचा तरी होणार नाही.

ज्ञानदेव–नामदेव संबंधावरही या चरित्रांतून थोडा फार प्रकाश पडतो. ज्ञानेश्वरांची विठ्ठलभक्ती नामदेवभेटीपूर्वीची व कुळपरंपरेने आलेली आहे. तसेच अभंगरचनाही पैठण व नेवासे येथे ज्ञानेश्वरी रचनेच्यापूर्वी व नंतर झालेली आहे. ज्ञानदेव व नामदेव यांची तुलना करण्याची गरजच काय? आजच्या आपल्या विशिष्ट दृष्टिकोणातून या तुलनेची कल्पना निघालेली आहे आणि त्या तुलनेत ज्ञानेश्वर हे ज्ञानी, नामदेव हे भक्त; ज्ञानेश्वरांनी नामदेवाला ज्ञान दिले व नामदेवांनी ज्ञानदेवांना भक्ती दिली. अशा रीतीने दोघेही परस्परांना पूरक ठरले असे मानण्याची एक रीत पडली आहे. याच्या मुळाशी दोघांनाही तुल्यबल ठरविण्याची भूमिका व वृत्ती आहे. ज्ञानेश्वरांना विठ्ठलभक्ती अगोदरपासूनच होती आणि त्यांनी ज्ञानेश्वरीतही भक्तीलाच सर्वाधिक महत्त्व दिले आहे. उलट नामदेवांना ज्ञानेश्वर भेटीनंतर विसोबा खेचरांकडून गुरूपदेश झाला आणि त्यांचा 'डोळियाचा डोळा' उघडला, ही वस्तुस्थिती आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या रूपाने ब्रह्मविद्या मराठीत आणली. अद्वैत तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक वारकरी संप्रदायाला प्राप्त करून दिली. त्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर नीति-शास्त्राची उभारणी केली आणि ज्ञान–कर्म–भक्ती–योग या सर्वांची एकवाक्यता करून सर्वांना त्यांच्या त्यांच्या अधिकारानुरूप उद्धाराचा मार्ग दाखवून दिला. हरिहरैक्य, सगुण–निर्गुण ऐक्य प्रस्थापित करून अज्ञानमूलक अनेक देवतावाद मोडून काढला. संसारात राहूनच स्वकर्मरूपी कुसुमांनी परमेश्वराची पूजा केल्याने ऐहिक कायम राहून मोक्षही मिळतो असे ठामपणे सांगून अविवेकी संन्यासाचा मार्ग मोडून काढला. 'भक्ति हेच प्रमाण, जाती अप्रमाण' असे निक्षून सांगून भक्तीच्या क्षेत्रात समता प्रस्थापित केली. ज्ञानेश्वरांचे हे कार्य महाराष्ट्रातील या पंथाच्या दृष्टीने पायाभूत असे आहे. आणि म्हणूनच 'ज्ञानदेवे रचिला पाया' हे संत बहिणाबाईचं म्हणणे यथार्थ आहे. ज्ञानदेवांच्या या तत्त्वज्ञानाचा, शिकवणीचा, संप्रदायाचा त्यांनीच घालून दिलेल्या हरिकीर्तनाच्याद्वारा नामदेवांनी प्रसार केला. 'नामा तयाचा किंकर। तेणे केला हा विस्तार' हेही तितकेच खरे आहे. स्वतः नामदेवांच्या मनात ज्ञानदेवांच्या विषयी अपार प्रेम, अलोट भक्ती आणि असीम आदर आहे. 'काय सांगों देवा ज्ञानोबाची ख्याती' अशी नामदेवांची स्थिती आहे. 'भक्ति केली ख्यात ज्ञानदेवें' 'उघडे अध्यात्म बोलियेलें' 'करणें न करणे सांगितला पंथ। तिहीं लोकी कीर्त वाढविली' (१०४७-४८) अशी नामदेवांची वचने आहेत. ज्ञानेश्वरादिकांना ते अवतारी पुरुष मानतात.

नामदेववर्णित या चरित्रावरून ज्ञानदेव–नामदेव समकालीनतत्व सिद्ध आहे. नामदेव एकच ज्ञानेश्वर मानतात. म्हणजे मुळात दोन ज्ञानेश्वर कल्पनेला वावच नाही.

नामदेव ज्ञानदेवांच्या समाधी प्रसंगी उपस्थित होते. त्यानंतर ते अनेक वर्षे हयात होते. हे त्यांच्या निर्वाण शकावरून तर उघड होतेच; परंतु नामदेवांनी आळंदीला ज्ञानेश्वर समाधीचा सोहळा सुरू होऊन तेथे यात्राही भरत असल्याचे पाहिले व वर्णिले आहे (२१०४) त्यावरूनही हे म्हणता येते.

नामदेववर्णित या चरित्रावरून ज्या गोष्टी कळतात आणि त्या कळल्यामुळे ज्या शंका दूर होतात वा जे प्रश्न निकालात निघतात त्यांचे दिग्दर्शन येथवर केले.

संदर्भ ग्रंथ (केवळ मूळ संहिता ग्रंथ)

[या लेखातील अभंगांचे क्रमांक पुढील संबंधित ग्रंथातील आहेत.]

१. 'सार्थ श्रीज्ञानदेव अभंग–गाथा', सं. डॉ. प्र. न. जोशी, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे; प्रथम आवृत्ती, १९६९. २. श्रीनामदेव गाथा, महाराष्ट्र शासन प्रकाशित, १९७०. (जनाबाईचे अभंग हा याच गाथ्यातील) ३. श्रीतुकारामबाबांच्या अभंगांची गाथा, शासकीय प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुनर्मुद्रण १९७३. ४. श्रीसकल संत गाथा, खंड १ व २, आवृत्ती दुसरी, १९६७ (अन्य सर्व संतांच्या अभंगांसाठी)

卐 卐 卐

निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांचे नाते
(काव्यनिर्मितीच्या संदर्भात)

डॉ. व. दि. कुलकर्णी, मुंबई

श्री निवृत्तिनाथ हे जन्माने ज्ञानेश्वरांचे ज्येष्ठ बंधू, पण पारमार्थिक नात्याने ते त्यांचे मोक्षगुरू. त्यांची ही नाती कशी आहेत हा आपला आजचा विषय नाही, तर ज्ञानेश्वरांचे कवी म्हणून निवृत्तिनाथांशी काय नाते आहे हाच आपला आजचा विचार-विषय आहे.

निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे 'काव्यकारण' आहेत, म्हणजे ज्ञानेश्वरांच्या काव्यनिर्मितीमागील मूलशक्ती आहेत. प्रतिभा, लोकव्यवहार व शास्त्रकलादींचे ज्ञान, आणि काव्यज्ञशिक्षयाभ्यास ही काव्यनिर्मितीची महत्त्वाची कारणे म्हणून मान्यता पावलेली आहेत. 'गुरूकृपा' हे काव्यकारण म्हणून मात्र साहित्यशास्त्रात कोठे नोंदविलेले दिसत नाही. ज्ञानेश्वर हे गुरूप्रसादालाच मूलभूत आणि सर्वश्रेष्ठ काव्यकारण मानतात. गुरूकृपा नसेल तर काव्य होणार नाही आणि गुरुकृपा असेल तर काव्यविषय कितीही कठीण असला, आविष्काराची साधने उपलब्ध असली किंवा नसली, तरीही काव्यनिर्मिती झाल्याविना राहात नाही, ही त्यांची प्रत्यक्ष अनुभूती आहे. ज्ञानेश्वर हे स्वतः सिद्धप्रज्ञेचे पुरुष आहेत आणि त्यांना गुरू-प्रसादही लाभलेला आहे. सिद्धप्रज्ञा आणि गुरूप्रसाद हे चिकित्सेचे विषय नव्हेत हे खरे! तरी पण काव्यनिर्मितीच्या संदर्भात निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर यांचे नाते अभ्यासविषय म्हणून काही ठरू शकते, असे वाटते. हे नाते शक्य होईल तितके आपणास आता पाहायचे आहे.

निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांचे नाते तीन स्तरांवरील आहे. (१) निरू-पाधिक मुक्तीच्या स्तरावरील—केवळ अमृतमय स्वरूपातले, (२) गुरू-शिष्य स्तरा-वरील—विशिष्टाद्वैतरूपातले, आणि (३) काव्यनिर्मितीच्या स्तरावरील—कर्त्याकर-वित्याचे. निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांच्यातील नाते काव्यनिर्मितीच्या संदर्भा-पुरते पाहायचे झाले तरी पहिल्या दोन स्तरांवरील त्यांच्यातील नात्यांचा विचार करणे आवश्यक आहे, कारण ही नाती वरून विविधस्तरीय दिसली तरी ती आतून एकजिनसी अशीच आहेत.

प्रथम आपण निरुपाधिक स्तरावरील निवृत्ती-ज्ञानदेव यांचे नाते पाहू. श्रीगुरुंचा अध्यात्मिक अधिकार असा असतो की, ते आपल्या शिष्याला सोपाधिक मुक्तस्थितीतून निरुपाधिक मुक्तस्थितीत, म्हणजे कैवल्यावस्थेत, नेत असतात. सोपाधिक मुक्त स्थिती म्हणजे काय ? 'तत्त्वमसि', म्हणजे 'ते ब्रह्म तू आहेस' या महावाक्याच्या बोधाने देहात्मबुद्धिरूपी अविद्येचा नाश होतो. या अविद्येच्या नाशाबरोबर अविद्यामूलक चारही वाणी नाश पावतात. पण 'अहं ब्रह्माऽस्मि', 'सोऽहं' अशा स्फुरणाने, तत्त्वज्ञानरूपाने त्या वस्तुतः जाग्याच असतात. येथे देहबुद्धीची निद्रा गेलेली असते, आणि 'आत्माऽहं' ही जागृती आलेली असतें. ओढयाचे पाणी वाहून गेल्यावर मागे ओल उरावी तशी ही जागृती असते. ही जागृती म्हणजे एका परीची निद्राच होय. 'अहं ब्रह्माऽस्मि' ह्या ज्ञानवृत्तीची येथे उपाधी उरलेली असते. ह्या स्थितीला 'सोपाधिक मुक्तस्थिती' असे म्हणतात. ह्या ज्ञानवृत्तीचा, ह्याही उपाधीचा जेव्हा त्याग केला जातो तेव्हा 'निरुपाधिक मुक्तस्थिती प्राप्त होते. अज्ञान आणि ज्ञान दोन्हीही बाधक असल्याने त्या दोन्हीचाही निरास करणे आवश्यक असते. 'अहं ब्रह्माऽस्मि'चे हे औपाधिक स्पंदन केवळ गुरुला शरण गेल्यानेच थांबते, संपते. ज्ञानेश्वरांनी याच मार्गाने ही फुणफुण शांत केली,

> ते ऋणशेष वाचा इया । न फेडवे मरोनिया ।
> तें पायां पडोनि मियां । सोडविले ।। (अमृतानुभव, III ३२)

आत्म्याची ही पूर्ण जागृती, ही निरुपाधिक मुक्तस्थिती निःशब्द, निर्धर्म, सहज, केवल ज्ञानमात्र असते. हा निखळ अमृतानुभव होय.

> मुक्ति करि वेल्हाळ । अनुभवामृत निखिळ ।
> परी अमृताही उठी लाळ । अमृतें येणें ।। (अमृतानुभव, X २०)

या निरुपाधिक मुक्तावस्थेत काव्यनिर्मिती संभवतच नाही. ही केवळ आनंदमय जीवन्मुक्तावस्था होय. येथे 'परेसी वैखरी' बुडून जाते. अशा क्षणी ज्ञानेश्वर स्तुती सांडूनि गुरुचरणी 'उगियाची माथा' ठेवितात. येथे शब्दब्रह्म सर्वतोपरी निमालेले असते. 'वंदन' ही समर्पण-क्रियाच आहे. सारा वाग्व्यवहार थकला, संपला की मौनाचे, मौनाचिया मौनाचेही विसर्जन करण्याची, सर्वतोपरी 'निवांत' होण्याची ही क्रिया आहे[1]

या चिन्मयावस्थेत ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांच्या सन्निधी काही न होऊन, राहिलेले असतात. खरे तर, यावेळी 'मजही आनु रिघुनिया (श्रीगुरु) राहाटती' हेच ज्ञानेश्वरांचे भान असते. ज्ञानेश्वरांचा 'अमृतानुभव' म्हणजे केवलानंदमय

अनाख्येय असा ' निवृत्तिनाथानुभव 'च असतो. या अवस्थेत काव्यसंभव असंभवनीय आहे.

या निरुपाधिक मुक्तावस्थेत निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर वेगळेपणाने खरोखरी उरू नयेत. ते एकमेकात विरूनच जावेत; कारण येथे " सैंघ आम्हीच दाटलों " ही अनुभूती आहे. " होऊनि ठेला येकांतु । विश्वचि हें " हे अखिल विश्वच ह्या ज्ञानियाला एकांत होऊन राहिले आहे. पण ज्ञानेश्वर अशा ' एकांता 'चे चित्र काढीत नाहीत, ज्ञानेश्वरांनी अर्जुन हा कृष्णरूपात विरत चालल्याचे अनेक प्रसंग ज्ञानेश्वरीमध्ये शब्दचित्रित केले आहेत. एकमेकात विरून जाण्याची ही क्रिया काय आहे ? दोघात अभेद आहे, पण तरीही ते दोन आहेत. त्यामुळे येथे द्वय–सापेक्षी अद्वयाचे भान आहे. पण मूळ वस्तू तर एकाकी, म्हणजे दुजेवीण एकली आहे. तेव्हा एकमेकात विरून जाण्याच्या ह्या क्रियेने हे ' दुजेवीण एकपण ' ऐन्द्रिय रूपात दर्शविता–प्रकटविता येते. ज्ञानेश्वर अशी चित्रे काढतात. पण येथे एक लक्षात घेणे आवश्यक आहे. कृष्णार्जुन एकमेकात विरून जात आहेत असे चित्र काढता काढता ज्ञानेश्वर मध्येच थांबतात. ते चित्र ते पुरे करीत नाहीत. चित्र मध्येच तोडतात आणि दोघांना पुन्हा वेगळेपणाने उभे करतात. द्वैत मोडून अद्वैतात पूर्णपणे विरून गेल्याचे पूर्ण चित्र ते कधीच काढीत नाहीत भेदच नाहीसा झाला तर भक्तीचे सुख, संवादसुख कसे लाभणार ? प्रेमरसाच्या उपभोगासाठी अद्वैताला द्वैतावर येऊन, पुन्हा द्वैत न मोडता अद्वैताचे सुख भोगायचे असते. येथे आपाततः भेद आहे, पण तत्त्वतः अभेद असतो. संवाद–व्यापाराला हे आवश्यक आहे; पोषक आहे. द्वैतपणाने बोलत असता येथे संवादानेच द्वैताचा ग्रास केला जातो. ज्ञानेश्वरीत दिसून येणारे श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील नाते, आणि निवृत्तिनाथ व ज्ञानेश्वर यांच्यातील नाते अगदी एकरूप नसले तरी तसे समांतर आहे. ज्ञानेश्वर हे अर्जुनाप्रमाणे ' मोडतु मांडतु ब्रह्मे । दुःखे देहाचिया सीमे '. उभे ठाकलेले नाहीत. त्यांना द्वैत–अद्वैताचे अखंड भान आहे, त्यामुळे निवृत्ति–ज्ञानेश्वरांच्या ह्या दर्शनात सामरस्याचे चित्रण येते. पण कृष्णार्जुनांप्रमाणे क्षेमालिंगने, विरून जाणे ह्या क्रिया कोठेही येत नाहीत; त्याचे कारणही नाही. सच्चिदानंदरूप आत्मभावाने असणाऱ्या शिष्याकडे ते प्रेमकृपादृष्टीने पाहात असते.

> म्हणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोन्ही शब्दांचा अर्थु ।
> श्रीगुरुचि परि होतु । दोहो ठाईं ॥ (अमृतानुभव. २.६१)

देहदृष्टया गुरू आणि शिष्य असा भेद दिसला तरी त्या दोन्ही ठायी परमार्थतः अस्ति–भाति प्रियत्वाने एक आत्मतत्त्वच नांदत असते. ज्ञानेश्वर अभेदभावाने श्रीगुरूंना वंदन करतात आणि सद्गुरूंच्या सख्यपणाची नवलाई सांगतात–

याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपणा रूप नाही ।
आणि गुरुशिष्य दुवाळीही । पवाडु केला ॥ (अमृतानुभव – २.५५)

सद्‌गुरूच्या सख्यपणाने द्वैत तर नाहीच, पण द्वैतसापेक्ष एकपणाही नाही.

कैसा आपणा आपण । दोंवीण सोयरेपण ।
या याहूनि विलक्षण । नाही ना नोहे ॥ (अमृतानुभव–२.५६)

गुरुशिष्यमिषाने मूळ एकपणच उल्हसित असते. गुरु–शिष्यामधील नात्याचे रहस्य असे आहे की, सद्‌गुरु हे पारमार्थिक स्वरूपावर गुरुशिष्याचा व्यवहार दाखवितात, पण स्वकीय ब्रह्मैक्यभावास किंचितदेखील चोळवटीत नाहीत; धक्का लावीत नाहीत; मात्र गुरुशिष्यातील प्रेम मात्र परिपुष्ट करीत राहतात.

एवं द्वैतासी उमसो । नेदी ऐक्यासी विसकुसो ।
सोइरिकीचा अतिसो । पोखीतसे ॥ (अमृतानुभव २.६९)

गुरुशिष्यातील अद्वयानंदाच्या ह्या सोयरिकीतूनच ज्ञानेश्वरांच्या काव्याच उगम झालेला आहे.

श्रीनिवृत्तिनाथ हे साक्षात् परब्रह्म आहेत. त्यांच्या रूपाने ज्ञानेश्वरांना अमृतानुभव ‘ समक्ष ’ होतो. श्रीनिवृत्तिनाथ हे स्वप्रभ, विशुद्ध, सकल, केवल ज्ञानमात्र आहेत. त्यांचे स्वरूप स्फुरत्–अमंद–आनंद–बहळ असून ते सतत जगत्–उन्मीलन–अविरल–केलिप्रिय आहेत. ‘ अमृतानुभवा ’ त ज्या चित्स्वरूपाचे वर्णन आले आहे ते चित्स्वरूप सगुण रूपाने, मानवरूपाने पाहयचे झाले तर ते निवृत्तिनाथांच्या रूपाने पाहावे. मूळ चित्स्वरूपाप्रमाणेच गुरूही शब्दांत आकळत नाही. गुरूंच्या अंगावर मौनाचाच अंगरखा घालावा लागतो. अशा अवस्थेत गुरुस्तवन करणे म्हणजे एकप्रकारी मूळ चित्स्वरूपात मिळून जाण्याचीच क्रिया होय. गुरुस्तवनात एकाच वेळी अमृतत्वाचा अनुभव येत असतो आणि भक्तीचे सुखही हृदयात दाटून येत असते. ही एक प्रकारची विशिष्टाद्वैती अवस्थाच होय.

द्वैतदशेचें आंगण । अद्वैत ओळगे आपण ।
भेदु तंव तंव दुण । अभेदासी ॥ (अमृ. ९.२८)

ही विशिष्टाद्वैती दुहेरी अवस्था काव्यव्यापाराला अत्यंत पोषक ठरणारी आहे. ती आवश्यकच आहे. वस्तूशी तदात्मता आणि दूरता एकाच क्षणी असल्या-विना कलासंभव शक्य होत नाही. निरूपाधिक मुक्तीच्या स्तरावर कलासंभव नाही; कारण तेथे निवृत्तिनाथांकडे पाहता पाहता ज्ञानेश्वर स्वतःच निवृत्तिमय होऊन जातात, स्वतः सैंघ दाटलेली चिद्‌वस्तूच ते होतात. तेथे सारे व्यापार संपलेले असतात; शब्द मावळलेले असतात; सारेच काही मावळलेले असते. केवळ एकाकी

चित् तेवढे स्फुरद्रूपाने विलसत असते. गुरु–शिष्य–स्तरावर मात्र 'अभेदुनि भेद' राखिलेला असतो.

देव देऊळ परिवारु । कीजे कोरूनि डोंगरु ।
तैसा भक्तीचा वेव्हारु । का न व्हावा ॥ (अमृ. ९.४१)

ज्ञानेश्वर हे येथे चिद्रूप निवृत्तिनाथांचे जणू विलासात्मक रूपच होत ! येथे संवादसौख्य आहे. येथेच काव्यसंभव आहे.

अक्षर, अनाख्येय, आनंद, अज, केवल अशा गुरूच्या स्वरूपाच्या ठायी तादात्म्य होताक्षणीच ज्ञानेश्वरांची कविप्रज्ञा स्फुरद्रूप होते. ह्या स्फूर्तिरूपात सहज शब्दसंभव घडतो. अनवरत आनंदवर्षाव करणाऱ्या गुरुकृपा–दृष्टीने ज्ञानेश्वरांच्या अंतरंगात प्रसादरसकल्लोळ उठवतात. निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांत मूलतः अद्वय-रूप आहे. त्यात 'सद्‌गुरु श्रीनिवृत्तिनाथ मजही आतु रिघोनिया राहाटत असे' ही ज्ञानेश्वरांची उघड अनुभूती आहे. आधीच देखणी अशी ज्ञानेश्वरांची दृष्टी यामुळे सूर्याचे तेज घेऊन प्रकटते. गुरुस्तवनाने ज्ञानेश्वर काव्यनिर्मितीस आवश्यक अशा उत्कट भावमय मनोवस्थेत पोहोचतात : शब्दांतून शब्दातीताला प्रकट करण्याची त्यांना उत्कंठा लागते; मन आतून सारस्वताने दुभू पाहते; अक्षरांशी रस ओळगू बघतात. शब्द–बिंदुल्यात सूर्य सामावू पाहतात. पण निरुपाधिकाला शब्दोपाधीत बांधायचे का ? ज्ञानेश्वर श्रीगुरूंनाच प्रार्थितात की–

'म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते ।
आज्ञापी मातें । ग्रंथनिरुपणी ॥ (ज्ञा. १२.१०)

गुरूकृपेने स्फूर्ती जी येते ती कशी अवचित येते, अगदी अनिवारपणे येते, अशा वेळी प्रज्ञेचे अंग–अंग फुलून-बहरून जाते; मर्यादा सुटते; मूळ भाव पालटून जातो; मती उत्क्रांत होते.

हें असो सांगो किती । नाही पारु गुरुभक्ती ।
परी गा उत्क्रांतमती । कारण हें ॥ (ज्ञानेश्वरी, १३.४५१)

आणि निवृत्तिनाथांच्या अनुज्ञेने ज्ञानेश्वर आनंदित होऊन 'ग्रंथोद्यम' आरंभितात.

काव्यनिर्मितीकाली निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर एकमेकांच्या सन्निध असतात. निवृत्तिनाथ हे सिद्ध कोटीतील पुरुष; केवळ 'ज्ञ', केवल द्रष्टे, अक्रिय चैतन्य-रूप ! प्रायः मौनावस्थेत, स्वानंदमग्न ! ज्ञानेश्वर हे क्रियाशील सिद्ध पुरुष; निर्मितिप्रवण प्रतिभा असलेले कवी. तुलनेपुरते असे जाणवावे की, सांख्यांच्या 'पुरुष' आणि 'प्रकृति' यांच्याप्रमाणे 'निवृत्तिनाथ' आणि 'ज्ञानदेवांची प्रतिभा'

यांचे स्वरूप–संबंध असावेत. ज्ञानेश्वरांची प्रतिभा ही निवृत्तिनाथांभोवती रुंजी घालते; त्यांच्याच सान्निध्यात ती स्फूर्ती पौर्णिमा बनते, त्यांच्याच अनुज्ञेने ती कार्यकर होते; आणि अखंड क्रियाशील राहते निवृत्तिनाथ ज्ञानेश्वरांना स्वात्मसुख इतक्या अनिवारतेने आणि उदारतेने देत राहतात की, ते साऱ्या जगाला वाटूनही अनंत उरते.

निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांची मूर्तिचित्रे डोळयांपुढे येतात ती प्रायः 'ज्ञानेश्वरी'तूनच ! ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांचे स्तवन–वंदन करतात; ठायी ठायी निवृत्तिनाथांची सम्मती घेत–घेतच पुढे जातात. निवृत्तिनाथांच्या संमतीने ते सुखी होतात. त्यांना उल्हास वाटतो. त्यांचे आत्मबल वाढते. ते प्रतिज्ञेवर बोलू लागतात. त्यांचे बोलणे प्रसंगी अनावर होऊ लागते. बहुशः अबोल असलेली निवृत्तिनाथांची मूर्ती अशावेळी त्यांना आवर घालते आणि मूळ ग्रंथनिरूपणाकडे जाण्याचे सांगते. निवृत्तिनाथ क्वचितच बोलतात. ते पाहतात आणि पाहतच राहतात. कासवीच्या दृष्टीने ते पाहात राहतात.

शांति क्षमा दया निवृत्ति माऊली।
अखंड साउली कासवदृष्टी ॥

(नि. अभंग. १८८)

या दृष्टीत वात्सल्य, कौतुक, आनंदनिर्भरता आहे. तीत प्रेमपान्हा आहे. ही दृष्टी ज्ञानेश्वरांच्या कविप्रज्ञेचे अखंड पोषण करीत राहते.

निवृत्तिनाथ फारसे बोलत नाहीत. जेव्हा केव्हा बोलतात तेव्हा तो आविष्कार मोजकाच पण अमृतरसाने तुडुंबलेला असतो. प्रायः ते संमतिदर्शक मान डोलावताना दिसतात. निवृत्तिनाथांची सम्मती घेत घेतच ज्ञानेश्वर पुढे जातात. ह्या कृतीचा, ह्या घटनेचा अर्थ पाहणे फार महत्त्वाचे आहे. भक्ती संप्रदायातील एक उपचार म्हणून या कृतीकडे पाहता येईल; ज्ञानेश्वरांचे गुरुप्रेम, त्यांचा विनय म्हणूनही ह्याचा स्वीकार करता येईल. पण याहूनही या कृतीला काही वेगळा, विशेष अर्थ आहे; औचित्य आहे, असे जाणवते. याचा थोडा विचार करू.

आपल्या नेहमीच्या काव्यात लौकिक अनुभव अलौकिक रूपात व्यक्त होतो; म्हणजे वास्तव आणि कविमन यांच्या परस्पर संबंधातून, प्रक्रियेतून काही नवे, विशेष वेगळे जे भावसत्य निर्माण झालेले असते ते कवितेत प्रकटलेले असते. ही प्रक्रिया कशी घडते ? प्रा. दि. के. बेडेकरांनी[२] ही प्रक्रिया फार सुंदररीतीने विशद केली आहे. त्याचा आशय असा– कविमन हे मुळात आत्मनिष्ठ असूनही वास्तवाशी तादात्म्य पावते; त्याचा आकार घेऊ पाहते. या उलट वास्तव हे आपली मूळ

'बाह्यार्थां'ची स्थिती सोडून देते आणि कविमनाच्या 'आकारा'चा आशय बनू पाहते. बालकवींच्या 'फुलराणी'चे उदाहरण घेऊ. बालकवींचे अंतर्मुख व चिंतनशील मन बाह्यार्थाशी म्हणजे एका सुंदर फुलाशी, एकरूप होते. ते त्या फुलाच्या रंग-रूपाशी, दवबिंदूशी तादात्म्य पावते. ते फूलही कविमनात अनुप्रवेश करते. कवि-मनातील आनंदाशी व सौंदर्यासक्तीशी एकरूप होऊन जाते. यातून 'फुलराणी' ही कविता जन्मास येते. या कवितेत कवीचे मन असते व फूलही असते. अव्यक्त मन प्रकट व मूर्त होते, आणि व्यक्त व मूर्त फूल कलात्मक कल्पनेचा वेष धारण करून अवतरते. मूर्ताने कल्पनेचे रूप घेतलेले असते; उलट अमूर्ताने मूर्त रूप धारण केलेले असते.

ही अशी काही प्रक्रिया ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'च्या निर्मितीमध्ये घडते काय ? वास्तव आणि कविमन असा येथे काही भेद आहे काय ? मूलानुभवाला कलात्मक कल्पनेच्या पातळीवर काही निराळेच रूप लाभून ते येथे काव्यात आविष्कृत होते का ? मूळ अमृतानुभव आणि 'अमृतानुभव' या ग्रंथात आविष्कृत झालेला अमृतानुभव एकच की काहीसा वेगळा ?

'अमृतानुभवा'च्या दहाव्या प्रकरणात पुढील ओवी येते.

जनातें जनें देखता । द्रष्टेचि दृश्य तत्त्वता ।
कोण्ही नहोनी आइता । सिद्धान्तचि हा ।। १० ।।

मनुष्याकडे मनुष्य पाहतो तेव्हा ते एकमेकांचे द्रष्टे असतात; म्हणजे तेथे दृश्य नसतेच. दृश्य नसल्याने मग तेथे दृश्यसापेक्ष द्रष्टत्वही नसते. म्हणून दृश्य द्रष्टृत्व-संबंधाविना चित्प्रकाश 'आइता' – स्वतः सिद्ध द्रष्टा आहे, असे ठरते. या पलीकडे संविद्–रहस्य राहत नाही. येथे इंद्रियांचा आणि विषयांचा संबंध होतो न होतो तोच विषय हे इंद्रियांचे नाहीत आणि इंद्रिये ही विषयांची नाहीत, असे अनुभवास येते. म्हणजे इंद्रियांना व विषयांना अधिष्ठान जे स्वतःसिद्ध चैतन्य, तेच अनुभवास येते व विषयांचा संबंध कल्पित आहे, असे निश्चित होते.

आता अमोद सुनास जाले । श्रुतीस श्रवण रिघाले ।
आरिसे उठिले । लोचनेसी ।। (अमृतानुभव, ९.१)

अशी स्थिती होते. हा अनुभव स्वयंभू, परमकोटीचा रसमय, केवलानंदमय असतो. तो कोणावरही अधिष्ठित नसतो, आणि तो ज्ञातृनिरपेक्षपणे, स्वतःसिद्ध-रूपात अस्तित्वात असणारा असा आहे. हा जो त्रिपुटी–भेद-रहित, ज्ञानमात्रतेचा अमृतानुभव आहे, त्याच्या काव्यरूप आविष्काराच्या बाबतीत उपरिनिर्दिष्ट प्रक्रिया, म्हणजे 'फुलराणी'च्या बाबतीत मांडलेली काव्यनिर्मिती प्रक्रिया लागू पडते काय ?

हा प्रश्न आहे, अमृत–अनुभवाच्या अभिव्यक्तीत सर्जनशील प्रक्रिया कोणती ? नवसर्जन ते कोणते ?

येथे मूलानुभवच नित्य नवे रूप घेणारा आहे; पार्वतीचे सौंदर्य क्षणक्षणाला नवता धारण करते. तसे हे ' अमृतत्व ' क्षणक्षणाला नवतेने खुलत असते.

' देवी जैसें का स्वरूप तुझें । तैसें हें नित्यनूतन देखिजें '

ह्या स्फुरद्रूपाचा नित्यनूतन विलास शब्दरूपाने साकार करायचा हीच ज्ञानेश्वरांची कविप्रतिज्ञा आहे. येथे, खरे तर कविमन आणि वास्तव असा भेदच नाही. जे आत तेच बाहेर; तेच विश्वभर ! तेच कालचे, आजचे, उद्याचे ! तेच अनाद्यनंत दिक्कालाचे ! विराट आणि सूक्ष्म, चैतन्यशील आणि सुंदर, आनंदमय आणि केवल, अमृतमय आणि अनंत असा हा अनिर्वचनीय कावरुखा मूलानुभव आहे. हा अनुभव पुनःपुन्हा घेऊनही शिळा न होणारा आहे.

ह्या नित्यनूतन मूलानुभूतीचे संवेदनाचित्र काढणे म्हणजे केवळ निवेदन (Reportage) नव्हे, ते सर्जनशील कलेचेच लक्षण होय. ज्ञानेश्वरांची शब्दसृष्टी ही काव्यरूप झाली आहे. या काव्यरूपात मूलानुभव यथातथ्यपणे, त्याच्या साऱ्या स्फुरद्रूप चैतन्यानिशी, सौंदर्यानिशी ' समक्ष ' झाला आहे.

पण आपण हे कशाच्या बळावर म्हणतो ? म्हणू शकतो ? ज्ञानेश्वरांचा ' अमृतानुभव ' हा ग्रंथ वाचून आपणास ' अमृतानुभव ' म्हणजे काय, ह्याचे आकलन होते ना ? तेव्हा ' अमृतानुभव ' हा ग्रंथ वाचूनच अमृत-अनुभव समजून घ्यायचा व तो ' अमृतानुभव ' या ग्रंथात कसा अचूकपणे चित्रित झाला आहे, असे पुन्हा आपणच म्हणायचे, हे विचित्र कोडे नाही काय ? नाही. बालकवींना भावलेले ' फुलराणी ' हे भावसत्य काय आहे हे आपणास त्यांची ' फुलराणी ' ही कविता वाचूनच जाणवते आणि हे जाणवलेले भावसत्य बालकवींनी किती सुंदरपणे व्यक्त केले आहे, हे ह्या 'फुलराणी' कवितेतूनच पुन्हा आपणाकडून दाखविले जाते. ह्याला आपण विचित्र कोडे म्हणतो काय ? ' भारतीय साहित्यशास्त्रातील सौंदर्य-कल्पना ' या आपल्या व्याख्यानात डॉ ग. त्र्यं. देशपांडे[3] यांनी मांडलेला आशयाभिव्यक्ती-संबंधीचा विचार या संबंधाचा स्वच्छ उलगडा करणारा आहे. " काव्यामध्ये कविगत संविद् ही शब्दार्थांतून अभिव्यक्त होते......शब्दार्थमयता हे कविसंविदेने घेतलेले रूप आहे. म्हणजे शब्दार्थमयता हा कविसंविदेचा विवर्त आहे. याला ' विकल्पन ' किंवा ' कलना ' म्हणतात. हा विवर्त-विकल्प किंवा ही कलना संविदेहून गौण असते असे नाही, कारण या विवर्तातून संविदेचे नवनवीन विशेष आविष्कृत होत असतात. म्हणून या विवर्ताने मूळ संविद् झाकली जात नाही.

उलट प्रत्यक आविष्काराबरोबर ती नवीनतेने किंवा अपूर्वतेने प्रकट होते. सोने हे अंगठीच्या रूपाने प्रकट होते. तेव्हा अंगठीपणाने मूळ सोने काही झाकले जात नाही. (ह्यास 'अनध्यस्त विवर्त' म्हणतात) किंबहुना अलंकारागणिक नवनवीन रूपात सोनेपण प्रकट होते. यात सोनेपण व अंगठीपण यांना सारखेच प्राधान्य आहे. काव्यात संविद् शब्दरूपाने प्रकट होते, हा अनध्यस्त विवर्त होय. येथे संविद् आणि शब्दार्थ यांना सारखेच महत्त्व आहे. अनध्यस्त विवर्तात अधिष्ठान व रूप यांच्यात नेहमी अभिव्यंग्य–अभिव्यंजक भावच असतो. अभिव्यंग्य आणि अभिव्यंजक यांचा संबंध गौणप्रधान नसून तो साहित्य-संबंध असतो. (म्हणजे त्यात सहभाव असतो.) या साहित्य भावात घटकांची परस्पर-संपृक्तता असते, काव्यगत शब्दार्थांची संपृक्तता अन्यून–अनतिरिक्तत्वाने असते......संविदेच्या शब्दार्थरूप आविष्काराला अभिनवगुप्ताने 'चिद्विकास' असा शब्द वापरला असून ज्ञानेश्वर महाराजांनी त्यालाच 'चिद्विलास' असे म्हटले आहे." [३] ज्ञानेश्वरांचा मूळ अमृताचा अनुभव आणि 'अमृतानुभव' या ग्रंथरूपाने त्याला लाभलेले शब्दार्थरूप यांत अभिव्यंग्य-अभिव्यंजक-भाव आहे. त्यांचा–साहित्य संबंध आहे. त्यांच्यामध्ये परस्पर-संपृक्तता आहे. ज्ञानेश्वरांची शब्दसृष्टी हाच मुळी चिद्विलास आहे !

आता बालकवींची 'फुलराणी' ही संविद् हे भावसत्य आकळण्यास आणि आस्वादिण्यास आपणांस अशक्य नसते कारण आपल्या अनुभव-क्षेत्राशी ते कोठेतरी येऊन बिलगत असते. एका मुग्ध बालेच्या मनात उमलणारा प्रेमभाव आणि त्याने होणारे तिचे लीलाव्यापार आपणास अनोळखी नसतात. 'हॅम्लेट,' 'मॅक्बेथ,' 'किंग लियर' यांतील भावसत्याचा आस्वाद कोणास पुनः प्रत्ययात्मक, प्रत्यभिज्ञात्मकही असू शकतो. ही भावसत्ये अलौकिक खरी, पण परमार्थाने ती लौकिकच असतात. त्यांच्या रूपाची, त्यांच्या यथार्थाभिव्यक्तीसंबंधीची चिकित्सा आपण करू शकतो. तेवढे अधिकारी आपण होऊ शकतो. अमृतानुभवाचे मात्र असे नाही. ज्ञानेश्वरांच्या शब्दार्थातून अभिव्यक्त होणारा हा अमृताचा अनुभव आपणास पुनःप्रत्ययात्मक किंवा प्रत्यभिज्ञात्मक तर नाहीच, पण तो इतका लोकोत्तर, लोकोत्तीर्ण असतो की तो आपल्या चिकित्सेच्या क्षेत्रात येऊ शकत नाही. आपण त्याचे अंतरंग-अधिकारी नसतो. आणि नेमके निवृत्तिनाथांचे प्रयोजन काय ते ध्यानी येऊ शकते. निवृत्तिनाथ संमतिदर्शक मान डोलवितात म्हणजे काय याचा अर्थ स्पष्ट होतो. ज्ञानेश्वरांच्या अक्षरा-अक्षरांतून अमृताचा अनुभव कसा अविकृतपणे निस्पंदत आहे, हे जाणणारे अधिकारी श्रीनिवृत्तिनाथच ! ज्ञानेश्वर हे निवृत्तिनाथांची सम्मती घेत घेत पुढे जातात, यात गुरुभक्तीचा किंवा लाडिवाळपणाचा भाव किंवा भाग असला तरी त्यात आपल्या भाष्यरूपावर मान्यतेची मुद्रा मिळविण्याचा आनंद अधिकतर आहे.

आता गीतार्थाची मुक्तमुदी । लावी माझिये वाग्वृद्धी
जे माने हे सभासदीं । सज्जनांचां ॥ (ज्ञानेश्वरी, १८.२७)

निवृत्तिनाथांच्या मान्यतेची मोहर आपल्या निरुपणावर ठसली की त्याला जणू प्रामाण्य लाभते, अधिकृतता येते, आणि मग श्रोतेही जणू ते निरुपण निर्विकल्पपणे मानतात. शब्दातीत जे आहे ते शब्दद्वारा व्यक्त करण्यासाठी आपण आपल्या शब्दांना सर्व प्रकारे समर्थ करू शकलो की नाही, हे तर ज्ञानेश्वरांना प्रत्यक्षपणे यामुळे समजेच, पण अप्रत्यक्षपणे श्रोत्यांच्या ठायीही त्यांच्या निरुपणाविषयी विश्वास निर्माण होत असे. ज्ञानेश्वर निवृत्तिनाथांना पुनःपुन्हा पुसत राहतात तेव्हा निवृत्तीनाथ सांगतात की–

......नको हे पुढत पुढती ।
परिसी लोहा घृष्टी किती । वेळवेळां कीजे ॥

निवृत्तिनाथांच्या परीसस्पर्शाने ज्ञानेश्वरांच्या वाणीचे जणू सुवर्ण होते, आणि हे सुवर्ण बावनकशी आहे की नाही, हेही पुन्हा निवृत्तिनाथांच्याच कषपट्टिकेवर घासून परीक्षिले जाते. निवृत्तीनाथ हे अधिकारी पुरुष आहेत. 'प्रभु तुम्ही महेशाचिया मूर्ती' असे ज्यांना संबोधून ज्ञानेश्वर उद्‌गारतात त्या श्रोत्यातील सर्वश्रेष्ठ श्रोते, सर्वज्ञ अधिकारी म्हणजे निवृत्तिनाथ हे होत. ते वक्ता आणि श्रोता या दोघांनाही सुखाच्या राणिवेवर बसवितात. निवृत्तीनाथांच्या साक्षीने जणू त्यांच्या अध्यक्षतेने ज्ञानेश्वर आपले निरुपण करतात.

निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे गुरू; सर्वाधिक श्रीमंत माहेर ! निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांकडे जसे वात्सल्याने व कौतुकाने पाहतात; तसेच काव्यज्ञ रसिकाच्य दृष्टीनेही बघतात. पाल्हाळ किंवा काहीसे विषयांवर आपल्या हातून होत आहे, हे जाणवताच ज्ञानेश्वर त्याचा परिहार करू लागतात, तो निवृत्तिनाथांच्या प्रेमळ धाकामुळेच ! निवृत्तिनाथ हे सूत्रचालक आहेत, नियंत्रकही आहेत. ज्ञानेश्वरांची विनंती ते कौतुकाने मान्य करतात, आणि त्यांची काळजीही (?) प्रेमाने दूर करतात.

तंव गुरु म्हणती काइ जाहलें । हें समस्तही आम्हां पावलें ।
आता सांगे जें निरोपिलें । नारायणें ॥ (ज्ञानेश्वरी, ९.३२).

निवृत्तिनाथांचे हे उद्‌गार वात्सल्याचे, कौतुकाचे व समाधानाचे आहेत. निवृत्तिनाथ हे अल्पवाक् खरे, पण ज्ञानेश्वरीत ते सर्वत्र भरून राहिल्यासारखे वाटतात. निवृत्तिनाथ हे शिव आणि ज्ञानेश्वरांची प्रतिभा ही शक्ती मानली तर, या शक्तीच्या वर्तनातून म्हणजे ज्ञानेश्वरांच्या काव्यातून शिवाचा स्पंद म्हणजे

निवृत्तिनाथांचा स्पंद सतत जाणवतो; आणि हे स्पंदन-वर्तन खरोखरी आपलाच प्रतिभानमय आविष्कार आहे या प्रत्ययाने निवृत्तिनाथ आत्मानंदात निमग्न झालेले दिसतात. ज्ञानेश्वरांचे भाष्य हे जणू निवृत्तिनाथामृतच होय !

निवृत्तिनाथांच्या सान्निध्यात, त्यांच्या साक्षीने, सज्जनांच्या सभेत अमृत-अनुभवाचे निरूपण करणे म्हणजे काय ते आपण पाहिले. निवृत्तिनाथ हे केवळ स्फूर्तिदाते, प्रेरक, सूत्रधार, नियंत्रक गुरुमूर्ती नाहीत. किंवा ते सर्वज्ञ श्रोते आणि केवळ मान्यतेची मुद्रा ठसविणारे अधिकारी पुरुष नाहीत. निवृत्तिनाथ हे, हे सर्व तर आहेतच; पण ते मूलतः ज्ञानेश्वरांच्या वाग्यज्ञाची अधिष्ठात्री देवता आहेत; वरदायिनी अंबिका आहेत. ज्ञानेश्वर पसायदान मागतात तें विश्वात्मक देवाला; आणि विश्वात्मक देव त्यांच्यापुढे निवृत्तीनाथांच्या रूपाने आसनस्थ झालेला आहे. म्हटले तर त्याला उराउरी भेटता येईल, तो सन्निध आहे; आपला आहे. आणि ह्या विश्वेशरावाने म्हणजे सद्‌गुरु निवृत्तिनाथांनी ज्ञानेश्वरांस पसायदान दिलेही.

येथ म्हणें विश्वेशरावो । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ (ज्ञानेश्वरी, १८.१८–१).

ग्रंथोद्यमाची प्रेरणा देण्यापासून ते ग्रंथ समाप्तीपर्यंत, त्याच्या मूलानुभूती-पासून ते फलश्रुतीपर्यंत निवृत्तिनाथ हे 'ज्ञानेश्वरी' त आहेत. ते आदि-अंतीं भरून उरले आहेत. 'अमृतानुभवा'चा विषयच मुळी स्वतः निवृत्तिनाथ हा आहे. ज्ञाने-श्वरांचे काव्य म्हणजे निवृत्तिनाथामृताच्या विविध परींचा आविष्कार होय !

निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांच्या काव्याचा विषय, काव्यनिर्मितीची शक्ती, रसिक अंतरंग–श्रोते, साक्षी सर्वज्ञ, प्रमाणमुद्रा देणारे अधिकारी पुरुष आणि पसायदान देणारे विश्वात्मक देव आहेत. हे सारेच विलक्षण आहे. येथे 'चित्' आणि 'चिद्-विलास' अलग असून अद्वयतेनेच नांदतात. चंद्रम्याकडे चकोर पाहतात आणि तृप्तकाम होतात; तर चंद्रमाही चकोराकडे पाहतो आणि तृप्तकाम होतो. ह्या वैशिष्टयपूर्ण सामरस्यातून ज्ञानेश्वरांची काव्यसृष्टी उद्‌भवली, उमलली आहे. आणि अखेर प्रत्यक्ष काव्यनिर्मितीव्यापार जेव्हा सुरू होतो तेव्हा निवृत्तिनाथांची केवळ उपस्थितीच साऱ्या निर्मितीची अंतःशक्ती बनते. ते स्वतः अक्रिय, पण सारी क्रिया त्यांच्यातूनच घडते. ही सृष्टी हा जसा 'चित्'चा विलास, तसेच ज्ञानेश्वरांचे काव्य हेही त्या 'चित्'चाच शब्दरूप विलास ठरते !

निवृत्तिनाथांची व्यक्तिरेखा मुळात धूसर आहे. 'अमृतानुभवा'तून आणि मुख्यतः 'ज्ञानेश्वरी'तूनच आपण निवृत्तिनाथांच्याकडे पाहतो. निवृत्तिनाथ आपल्या स्वतःच्या अभंग गाथेत कसे दिसतात ते आपण सहसा पाहत नाही. निवृत्तिनाथांच्या अभंगातून निवृत्तिनाथ जे दिसतात ते घनदाट भरून राहिलेल्या परब्रह्मरूपातच.

'निवृत्ति परिमाण सर्वपूर्ण घन...'
'निवृत्ति निमग्न शून्याकार घट...'
'निवृत्ति पैं सुब्रह्मची प्रकाशु...'

असे कितीतरी उद्गार निवृत्तिगाथेत आढळतात. निवृत्तिनाथांचे उघडे ब्रह्मरूप, त्यांची ब्रह्मी झालेली निमग्नता, त्यांची परिपूर्णता या उद्गारातून दृग्गोचर होते. निवृत्तिनाथांच्या अभंगात 'निवांत' हा शब्द पुनः पुन्हा येतो.

'निवृत्ति निवांत समरसें पाहात।
तव अवघाचि दिसत देहीं विदेही॥'

हे एक वानगीदाखल उदाहरण! 'निवान्त' या एका शब्दात निवृत्तिनाथांची संपूर्ण प्रतिमा उमटलेली आहे. निवान्तता म्हणजे निवृत्तिनाथ. जेथून वाराही निघून गेलेला आहे, म्हणजे जेथे वाराही फिरकत नाही, असे स्थळ; अशी मनोवस्था म्हणजे निवान्तता. संकल्प-विकल्प नाहीत, असे हे मन. येथे शब्दांचे श्वास-निःश्वासही होत नाहीत. सूक्ष्मात् सूक्ष्म अशी कसलीही हालचाल येथे नाही. इतके हे सर्वपूर्ण, धालेले मन आहे. 'निवृत्तीची वृत्ती प्रेमेचि डुल्लत' अशी आहे. निवृत्तिनाथांच्या गाथेत 'निवृत्ति-तटाक' ही रूपकात्मक संज्ञाही सतत येते.

'निवृत्ति-तडाग निवांत सम्यक्।
सर्वरूपें एक आत्माराम।'

सर्वत्र एकच एक आत्माराम घनदाट भरून राहिला आहे, हा शांतरसात्मक अखंडानुभव आल्याने हा 'तडाग'ही 'निवान्त' आहे. आत्मनिमग्न असे, प्रेमेचि डुल्लणारे, निरंतर तुर्यावस्थेत असणारे निवृत्तिनाथ ब्रह्मानुभूतीच्या अंतिम भूमिकेत विहरणारे सिद्ध पुरुष होत. अशांची भूमिका ही कर्त्याची नसते; तर ती करवित्याची असते. 'अमृतानुभव' हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनी लिहिला तो गुरूंच्या—निवृत्तिनाथांच्या—सांगण्यावरून असे रूढ चरित्र सांगते. निवृत्तिनाथ हे चांगदेवांच्या कोऱ्या पत्रालाही स्वतः उत्तर देत नाहीत, तर ते ज्ञानेश्वरांनाच उत्तर देण्यास सांगतात. निवृत्तिनाथांसारखे पराकोटीचे सिद्ध पुरुष शिष्याच्याद्वारा कार्य करीत असतात व जगाला सुख-साम्राज्य-पदावर बसवितात. (येथे रामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांची या संदर्भापुरती आठवण व्हावी!)

परी साचचि गुरुनाथें। निमित्त करूनि मातें।
प्रबंध व्याजें जगानें। रक्षिलें जाणा॥
(ज्ञानेश्वरी, १८. १७६५)

निवृत्तिनाथांनी ज्ञानदेवाला संपूर्ण केले. ' निवृत्ति निर्वाळिला ज्ञानदेव.' निवृत्तीच्या सान्निध्यात ज्ञानेश्वर धीट होतात;[४] उन्मनी भरून येतात,[५] जणू वैकुंठाला क्षेमालिंगन देऊन राहतात,[६] निवृत्तिनाथांच्या कृपा सामर्थ्याने ' आताच हे आघवे निर्मीन ' असा विश्वास आणि असे प्रज्ञाबळ ज्ञानेश्वरांच्या ठायी निर्माण होते.[७] त्यात ज्ञानेश्वरांचे भाग्य असे की ही गुरूकृपा त्यांना एकटयालाच सारीच्या सारी, अगदी एकहाती मिळालेली आहे. ते आपल्या गुरूंचे ' एकलौते अपत्य ' आहेत.

जें तान्हेनि मियां अपत्यें। आणि माझे गुरुसी एकौलतें।
म्हणोनि कृपेसी एकहातें। जालें तिये ॥

(ज्ञानेश्वरी, १५.१९)

सद्‌गुरू निवृत्तिनाथांचा ज्ञानेश्वरांच्या मस्तकी सदैव वरदहस्त आहे. हा वरदहस्त कसा आहे ?

ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्‌गुरूंनी केला कोडें।
माथां हात ठेविला तें फुडें। बीचि वाइलें ॥

(ज्ञानेश्वरी ६.४९२)

बी पेरण्यासाठी पाभरीवर जे लाकडाचे भांडे असते त्याला चाडे असे म्हणतात. निवृत्तिनाथांनी प्रमेयबीजांची पेरणी करण्यासाठी ज्ञानेश्वरांची जणू चाडयाच्या जागी योजना केली व त्यांच्या मस्तकी वरदहस्त ठेवला; म्हणजेच प्रमेयबीजेच चाडयात घातली; त्यांची पेरणी केली. हे पीक पुढे महाराष्ट्र-भूमीत पिकले. ' पिक पिकले घुमरी. ' ताटलीएवढे पौर्णिमेचे चंद्रबिंब वाढत वाढत इतके वाढावे की सर्व आकाशच त्याने आपल्या पोटात घेऊन दिशातीत प्रकाशाने, चंद्र आणि चांदणे एकच होऊन जावे, तसे हे झाले आहे. ' धर्म जागो निवृत्तीचा ' हा घोष असा सार्थ झाला आहे महाराष्ट्रातला भागवत धर्म हा मूलतः निवृत्तिनाथांचा धर्म आहे; पण तो प्रवर्तित केला ज्ञानदेवांनी ! निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव यांच्या अद्वयानंद वैभवातून मराठी भागवत-धर्म आणि भागवत-काव्य स्फुरले आणि विरुढले !

---

(१) काय वानू आता, न पुरे हे वाणी।
मस्तक चरणीं ठेवीतसे ॥ तुकाराम.

(२) दि. के. बेडेकर – ' साहित्य : निर्मिती आणि समीक्षा ', आवृत्ती.

(३) ग. त्र्यं. देशपांडे – ' भारतीय साहित्यशास्त्रातील सौंदर्यकल्पना, ' पृ. ५९–६०

(४) निवृत्तिनिकट ज्ञानदेव धीट .. (निवृत्तीनाथ अभंग २०५)

(५) निवृत्ति निवाला, आनंदे नाचतु। उन्मनी भरितु ज्ञानदेव ॥ (अ. २६६)

(६) सोपान खेचर ज्ञानदेव लाठा। देताती वैकुंठा क्षेम सदा ॥
(अभंग–२६२)

(७) ज्ञानेश्वरी, १२.१७

संदर्भ

(१) लेखाच्या शेवटी तळटीपेत दिलेले अभंग 'श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गाथा'–संपादक व प्रकाशक तात्या नेमिनाथ पांगळ, १९२७. या पुस्तकातील 'श्रीनिवृत्तिनाथांचे अभंग' या विभागातील आहेत.

(२) लेखातील ओवी क्रमांक हे 'सार्थ ज्ञानेश्वरी–सं. शं. वा. दांडेकर, १९५३, या आवृत्तीतील आहेत.

(३) वापरलेली अमृतानुभवाची प्रत–' सार्थ श्रीअमृतानुभव'–सं.विष्णुबुवा जोग, आवृत्ती ३, १९७२.

卐 卐 卐

ज्ञानराज माझी योग्यांची माउली। जेणे निगमवल्लि प्रगट केली ॥ १॥
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंदलहरी प्रगट केली ॥ २॥
अध्यात्मविद्येचें दाविलेंसें रूप। चैतन्याचा दीप उजळिला ॥ ३॥
छप्पन भाषांचा केलासे गौरव। भवार्णवीं नाव उभारीली ॥ ४॥
श्रवणाचे मिषें बैसावें येउनी। सामराज भुवनीं सुखी नांदे ॥ ५॥
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी ॥ ६॥

ज्ञानदेवांचा नाथपंथ
(पूर्व व समकालीन व्यक्ती)

प्रा. मधुकर रामदास जोशी, नागपूर

संशोधन पद्धती

श्री ज्ञानेश्वरचरित्र संशोधनाचा प्रारंभ नामदेवविरचित आदि, तीर्थावळी व समाधि प्रकरणापासून होतो व आजपर्यंतच्या सर्व अभ्यासकांनीही नामदेव विरचित ज्ञानेश्वरचरित्र डोळ्यांसमोर ठेवूनच ज्ञानेश्वरचरित्र लिहिलेले आहे. परंतु नामदेवविरचित आदि, तीर्थावळी व समाधी प्रकरणाविषयी अनेक अभ्यासक संशोधकांनी असंख्य शंकाही उपस्थित केल्या आहेत. बुद्धिवादाच्या भूमिकेतून केवळ तर्कशक्तीच्या साह्याने अनेक अभ्यासकांनी नामदेवविरचित ज्ञानेश्वरचरित्राकडे पाहिले. पण केवळ तर्क याला अन्त नसतो व तर्कशास्त्रापेक्षा तर्कशक्तीच्या जोरावर आपण स्वतःच्या फक्त कल्पनाच सादर करीत असतो. प्रत्यक्ष पुरावा फारसा नसतोच व पुरावा म्हणून ज्या काही घटना मांडल्या असतात त्या बऱ्याचशा अंधुक, धूसर, संदिग्ध व तुटपुंज्या अशा असतात. अशावेळी ज्ञानेश्वरचरित्रांतील गहन व गूढ समस्या तर्कशक्तीने सोडविण्यापेक्षा ज्ञानेश्वरचरित्रसंशोधकांनी आपल्या संशोधनपद्धतीचा व मांडणीचा पुर्नविचार करून ज्ञानेश्वर चरित्र संशोधनाचे नवीन मार्ग हाताळणे योग्य होईल.

ज्ञानेश्वरचरित्राचा गुंता केवळ आज उपलब्ध असलेल्या नामदेवविरचित प्रकरणाद्वारे होऊ शकेल काय याचा गंभीरपणे पुर्नविचार होणे आवश्यक आहे. मला नामदेवविरचित ज्ञानेश्वरचरित्राचे महत्त्व नाकारावयाचे नाही.

नामदेवांनी ज्ञानेश्वरचरित्रांतील ज्या घटनांची नोंद केली व त्यांची जी कालसंगती लावली तीत विसंगती नसली तरी ज्ञानेश्वरचरित्र दृष्टीने नामदेवांची माहिती फार तुटपुंजी ठरते आहे. उदा.

आधुनिक वाङ्मयेतिहासकार वि. ल. भावे[1] व पांगारकर[2] यांनीही नामदेवाबरोबर दासोदिगंबर व सत्यामलनाथांच्या माहितीचा उपयोग व ज्ञानेश्वरचरित्र

मांडले; पण नामदेव, दासो दिगंबर व महीपतीनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरचरित्राचे स्वरूप भाव्यांनी सादर केलेल्या ज्ञानेश्वरचरित्राहून कितीतरी भिन्न आहे. किंबहुना वि. ल. भाव्यांनी काल्पनिक ज्ञानेश्वरचरित्रच सादर केले आहे असे सूक्ष्म अवलोकनाने दिसून येईल. भाव्यांप्रमाणेच काही अभ्यासक व संशोधकांनी केवळ नामदेवावर विसंबून ज्ञानेश्वरचरित्र लिहिले. याला अपवाद डॉ. रा. ग. हर्षे यांचा आहे. त्यांनी प्रथमच जुनी व प्राचीन ज्ञानेश्वरचरित्रे प्रकाशात आणण्याचा उपक्रम सुरू केला व सत्यामलनाथ आणि तुकाविप्रविरचित ज्ञानेश्वरचरित्रे उजेडात आणली. सत्यामलनाथ, तुकाविप्राप्रमाणे इतरांनी ज्ञानेश्वरचरित्रे लिहिली असून त्यात नामदेवाप्रमाणेच उद्धवचिद्धन, सत्यामलनाथ, उद्बोधनाथ, एकनाथ, श्रीधर ब्रह्मानंद, बाळाबुवा ज्ञानेश्वरी, काशीनाथशिष्य श्रीधर, महिपती, निरंजनमाधव, श्यामजी गोसावी, बालकनाथ, सच्चिदानंद, नाथाजी, निळोबा पिंपळनेरकर, संतोषानंद, (आळंदी माहात्म्य) प्रकाशनाथ, ज्ञानेश्वरविजयकर्ते सच्चिदानंद, बालमुकुंद इत्यादि ग्रंथकारांनी ज्ञानेश्वरचरित्रे रचलेली असून त्यांचा विचार मी माझ्या 'श्री ज्ञानदेव चरित्र संशोधन' ग्रंथात केलेला आहे. वरील सर्व ग्रंथकारांनी नामदेवाशी सुसंगत पण क्वचित प्रसंगी वेगळा तपशील देऊनच ज्ञानेश्वरचरित्र लिहिलेले आहे. अशाप्रकारे नामदेवांना 'वाट पुसत' ज्ञानेश्वर चरित्रमंदिराकडे प्राचीनांनी वाटचाल केलेली आहे, परंतु वरील सर्व चरित्रकारांच्या रचलेल्या ज्ञानेश्वरचरित्रांचे तुलनात्मक अध्ययन करूनही ज्ञानेश्वर चरित्रातील शंकाग्रंथी सुटत नाहीत, हेही नितकेच खरे. नामदेवमहाराज वारकरी होते व त्यांनी भागवत धर्माचा प्रसार ज्ञानदेवांच्या समवेत नाथ वारकरी मंडळीबरोबर केला. त्यांना नाथपंथीय विसोबा खेचराचा अनुग्रह होता व ज्ञानेश्वरादि भावंडांच्या समाधीनंतर काही वर्षांनी सदगुरु विसोबा व आळंदी, पैठण परिसरातील वृद्धमंडळीकडून त्यांना ज्ञानदेवांच्या घराण्याची ऐकीव माहिती मिळाली असावी. काही वृद्धांकडून ज्ञानेश्वरांच्या घराण्याविषयीक आठवणी मिळाल्या व त्या आधारे नामदेवांनी ज्ञानेश्वरचरित्रातील 'आदि' प्रकरण रचले असावे. विठ्ठलपंताच्या गुरुंचा उल्लेख ते श्रीपाद नावाने करतात. ह्यावरून विठ्ठलपंताच्या गुरूचे नाव त्यांना माहीत नव्हते. नामदेव-ज्ञानदेवाची भेट ज्ञानेश्वरी रचनेनंतर झाली असे कित्येक अभ्यासक समजतात. पण ज्ञानेश्वरीरचनेनंतर वा पूर्वी जेव्हा केव्हा नामदेव-ज्ञानदेव भेट झाली तेव्हा ज्ञानदेवांचे वडील जिवंत नव्हते असे दिसते. नामदेवांची व ज्ञानेश्वरांच्या वडिलांची भेट झाली असती तर त्यांनी त्यांच्या जीवनाविषयी विसंगत, संदिग्ध व अपुऱ्या माहितीऐवजी सुव्यवस्थित घटना नोंदविल्या नसत्या काय? तसेच पैठण आळंदीच्या ब्रह्मवृंदांनी धर्मशास्त्रावरील निबंध पाहिले असे नामदेव सांगतात पण त्यांची नावे देत नाहीत. ज्ञानेश्वरादिकांचा व्रतबंध झाला नव्हता व ज्ञानेश्वरघराणे नाथपंथीय असले तरी नाथपंथाचा व्रतबंधाला विरोध

नव्हता. अनेक नाथपंथीय साधु व अनुग्रहित ब्राह्मणकुळातील होते व आहेत, परंतु त्यांच्या व्रतबंधाला व संन्यासाला नाथपंथीयांचा विरोध कधीही झाला नाही. उदा. पैठणचे शिवदिनकेसरी हे ब्रह्मकुलोत्पन्न नाथपंथीय साधु. त्यांच्या वंशातील सर्वांचा व्रतबंध झाला होता व अनेकांनी शांकरपद्धतीप्रमाणे संन्यासही घेतला होता. एखाद्या व्यक्तीचे नाथपंथियत्व हे त्याच्या व्रतबंध, गृहस्थाश्रम वा संन्यासाला आड येत नसे व येत नाही. म्हणून ज्ञानेश्वरघराणे केवळ नाथपंथीय आहे एवढ्याच कारणाने ते व्रतबंधाला अयोग्य आहेत असे पैठण आळंदीच्या ब्राह्मणांचे मत नव्हते. ब्राह्मणकुलात असूनही ज्ञानेश्वर भावंडांचा व्रतबंध झाला नव्हता व तो न होण्याचे कारण धर्मशास्त्रातील निबंधांत त्यांना आधार नव्हता असे नामदेव सांगतात. 'धर्मशास्त्री निबंधो' असे नामदेवांचे स्पष्ट शब्द असता धर्मशास्त्रातील निबंधाने शांकर ब्रह्मसूत्र भाष्य अभिप्रेत आहे असे आजचे काही विद्वान म्हणतात. तेव्हा ब्रह्मसूत्रशांकरभाष्य हा धर्मशास्त्रावरील निबंध आहे काय याचाही त्यांना विसर पडलेला असतो.

नामदेव व ज्ञानदेवभेट ही ज्ञानेश्वर चरित्रातील महत्त्वपूर्ण घटना आहे. माझ्या मते नामदेवांनी प्रथम तीर्थावळी; नंतर समाधी व शेवटी आदि रचली. तीर्थावळी व समाधी प्रकरणाने ज्ञानेश्वरांचे उत्तरचरित्र व भागवतधर्मातील कार्यावर प्रकाश पडतो; तर 'आदीने' ज्ञानेश्वरांच्या पूर्वचरित्राचा बोध होतो. खरा प्रश्न 'आदि' मधील घटना व प्रसंग नामदेवांना कोठून प्राप्त झाल्या हा आहे. गुरुपरंपरेतून की अन्य व्यक्तीकडून हा जसा महत्त्वाचा प्रश्न आहे; तसाच ज्यांनी ज्ञानेश्वरचरित्रे लिहिली, त्यांनीही ज्ञानेश्वर घराण्याची माहिती नामदेवविरचित आदिमधून उचलली की, अन्यमार्ग व व्यक्तीकडून मिळविली ? थोडक्यात, नामदेव विरचित आदि व सत्यामल उद्बोधनाथादिकांचे ज्ञानेश्वर चरित्र यांचे संबंध काय ? सत्यामल उद्बोधादि नाथपंथीय संतमंडळी नामदेवांच्या आदिचेच अनुसरण करतात की, तपशीलासह वेगळी माहिती देतात ? त्याचा विचार केला असता असे प्रत्ययास येते की, सत्यामलनाथ व उद्बोधनाथ ज्ञानेश्वरचरित्रातील घटना केवळ आळंदीऐवजी आपेगावी झाल्या एवढेच कथन करतात असे नव्हे तर अधिक तपशील देतात. ज्या यतिराजांनी विठ्ठलपंतास संसार करण्यास सांगितले तोच पुनः आपेगावी आला व संन्यासग्रहणानंतर गृहस्थधर्म चालविल्याबद्दल शास्त्रतः एक प्रायश्चित्त आहे ते घेण्यास सांगितले. महापंथगामी होण्यास त्याने विठ्ठलपंतास सांगितले. तेव्हा चार लहान अर्भकास टाकून महापंथास विठ्ठलपंतासह रुक्मिणी निघाली. इतक्यात तेथे एक सिद्ध पुरुष आला व त्याने रुक्माईचे सांत्वन केले. हा सिद्धपुरुष म्हणजे गहिनीनाथ होय असे सत्यामलनाथ सांगतात. दुसरा नाथग्रंथकार उद्बोधनाथ होय. त्यांनी मार्गशीर्ष पौर्णिमा प्रमाथी संवत्सरी शके १२०१ मध्ये निवृत्तींनी ज्ञानेश्वरांना उपदेश दिला असे सांगितले आहे. उद्बोधनाथांनी शके

१५५२-१५५५ दरम्यान ज्ञानेश्वर चरित्र रचले तर सत्यामलनाथांनी शके १६६० ला ज्ञानेश्वर चरित्र लिहिले. ह्या दोन्ही ग्रंथकारांसमोर परंपरेने चालत आलेली नामदेव विरचित आदि, तीर्थावळी व समाधि प्रकरणें नसावीत असे म्हणता येणार नाही. भागवतधर्मीयाप्रमाणे नाथपंथीयांचेही आळंदी तीर्थक्षेत्र आहे व ज्ञानेश्वर समाधिशेजारी भोजलिंग, केसरीनाथ व लक्ष्मीनाथ ह्या नाथसिद्धांच्या समाधीही अद्यापि आहेत. नामदेवाप्रमाणेच तुकाविप्रादि मंडळी ज्ञानेश्वर चरित्र कथन करतात परंतु उद्‌बोधनाथ, बालकनाथ व सत्यामलनाथ मात्र वेगळी माहिती व अधिक तपशील देतात. त्यावरून असे समजण्यास प्रत्यवाय नसावा की, ज्ञानेश्वरांच्या नाथ-पंथीय शिष्य परंपरेत ही ज्ञानेश्वरचरित्रघटनांची बरीचशी माहिती होती.

ह्या दोन नाथपंथीय ज्ञानेश्वरचरित्रकाराप्रमाणेच नाथपंथीय दृष्टीने माहिती देणारे श्रीधर व बाळकनाथ हे नाथपंथीय ग्रंथकार आहेत व त्यांनीही सत्यामलनाथ व उद्‌बोधनाथाप्रमाणेच पण नामदेवविरचित ज्ञानेश्वर चरित्राला अविरोधी अशी ज्ञानेश्वरचरित्रविषयक माहिती पुरविली आहे. अशाप्रकारे भागवत धर्मीय सत्पुरुषांची परंपरा व नाथपंथीय सत्पुरुषांची परंपरा ज्ञानेश्वर चरित्र जुळणीच्या दृष्टीने उपयोगी आहेत. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर शिष्य सच्चिदानंद परंपराही आहे. भिंगारकर, पांगारकर व आजगावकर ह्यांनी ज्ञानेश्वरशिष्य सच्चिदानंदबाबाकृत ' ज्ञानेश्वरविजय ' ग्रंथाची माहिती दिली असली तरीही ज्ञानेश्वरविजय ग्रंथ अद्यापपर्यंत अनुपलब्ध आहे व हा सच्चिदानंदही ज्ञानेश्वरांचा साक्षात् शिष्य नसून राक्षसभुवनच्या अनंतनाथांचे वडील सच्चिदानंद होते व त्यांनी ' मानसपूजा ' नावाचा उपासनापद्धतीविषयक ग्रंथ रचला.[३] ह्याच परंपरेत बाळाबोवा ज्ञानेश्वरीकृत भक्तितत्वामृत नावाचे विख्यात सत्पुरुष झाले. त्यांनी सोपानदेवशिष्य प्रकाशनाथाचा उल्लेख केला आहे. ह्याने द्रविड भाषेत ज्ञानेश्वर-चरित्र लिहिल्याची समजूत बाळाबुवा ज्ञानेश्वरींच्या गुरुपरंपरेत होती. अशाप्रकारे बाळाबुवा ज्ञानेश्वरीच्या परंपरेत ज्ञानेश्वरशिष्य सच्चिदानंद व सोपानशिष्य प्रकाशनाथ यांचा संबंध येतो. सच्चिदानंद व सोपान परंपरेतील ज्ञानेश्वर चरित्रां-तील घटनांची थोडी फार माहिती होऊन ज्ञानेश्वर चरित्र जुळणी करण्यास उपयोगी पडते. याशिवाय आळंदी महात्म्य व अलंकामहात्म्य ह्या स्थलमहात्म्याचा उपयोग होतो. आळंदीमहात्म्य ज्ञानेश्वर शिष्य सदाशिवनाथाचे आहे.

ज्ञानदेव चरित्राची जुळणी

श्री ज्ञानेश्वरचरित्राची जुळणी नामदेव कृत आदि, तीर्थावळी व समाधीप्रकरणे, नाथपंथीयांनी लिहिलेली ज्ञानेश्वर चरित्रे, ज्ञानेश्वरांच्या सच्चि-दानंदादि शिष्यांच्या परंपरा व आळंदीमहात्म्यासारख्या स्थळ महात्म्यांचा उपयोग

करून करता येते. आजपर्यंत नामदेवविरचित प्रकरणावर व भागवतधर्म आणि वारकरी पंथ जमेस धरून ज्ञानेश्वर चरित्राचा विचार झाला. ह्याला नाथपंथीय परंपरा व सत्पुरुषांची माहिती पूरकच आहे. पण एवढ्याने ज्ञानेश्वरचरित्रातील सर्वच प्रश्न सुटतील असेही नाही. उत्तरार्धापेक्षा ज्ञानेश्वर चरित्राचा पूर्वार्ध अधिक रहस्यमय व तितकाच तो धूसर आहे. उत्तरार्धातील अनेक घटनांचे धागेदोरे पूर्वार्धाशी निगडीत आहेत ह्यासाठी ज्ञानेश्वरादि भावंडांचे व ज्ञानेश्वर परिवारांतील चांगदेव-नामदेवांचे समग्र वाङ्मय अभ्यासणे आवश्यक आहे ज्ञानेश्वर विरचित वाङ्मयाचे चिकित्सापूर्ण अध्ययन व सूक्ष्म अवलोकन करून त्याचा पारंपारिकांनी दिलेल्या ज्ञानेश्वर चरित्राशी मेळ बसतो काय हे पाहणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वर वाङ्मयाचे सूक्ष्म व चिकित्सापूर्ण अध्ययनसौकरार्थ, ज्ञानेश्वरांच्या नाथसंप्रदायाचाही विचार करणे क्रमप्राप्त आहे. नाथपंथाविषयी सामान्य लोकांच्या नव्हे तर मी मी म्हणविणाऱ्या काही अभ्यासकांच्या धारणाही प्रायः धुंडिराजमालुकृत नवभक्तिसारावर आधारीत असतात. अद्भुतरम्य वातावरण, नानाप्रकारच्या सिद्धी, किमया इत्यादि सर्वांना क्षणभर बाजूला सारून नाथपंथाची व तीही ज्ञानेश्वरांच्या नाथपंथाची यथार्थ जाणीव झाल्याशिवाय ज्ञानेश्वरचरित्रातील शंकाग्रंथी सुटणार नाहीत, याकडे अभ्यासक व संशोधक व ज्ञानेश्वरप्रेमीजनांचे मी लक्ष वेधू इच्छितो :—

श्रीज्ञानदेवांनी ज्ञानदेवीच्या अठराव्या अध्यायात जी गुरुपरंपरा दिलेली आहे, त्यात आदिनाथांचा अपवाद वगळता मत्स्येंद्र, गोरक्ष, चौरंगी, गहिनी व निवृत्ती या ऐतिहासिक व्यक्तींची नावे आहेत. सहाव्या अध्यायातदेखील,

पिंडे पिंडाचा ग्रासु । तो नाथसंकेतीचा दंशु ।
परी दावोनी गेला । महाविष्णु ॥

या महाविष्णु पदाने श्रीगुरु मत्स्येंद्रनाथांचा उल्लेख केला आहे. गुरुपरंपरेतील निवृत्तीचा अपवाद वगळता बाकीच्या चौघांची म्हणजे मत्स्येंद्र, गोरक्ष, चौरंगी व गहिनींची नावे नवनाथनामावळीत आढळतात. ह्यांतील गोरक्ष व चौरंगीचे उल्लेख सर्व नाथनामावळीत व सिद्धसूत्रांत येतात, तर मत्स्येंद्र, गोरक्ष, चौरंगींची नावे काही मोजक्या नवनाथनामावळीत आढळतात. गोरक्षाप्रमाणे चौरंगीही मत्स्येंद्रांचे शिष्य होते व त्यांची भेट सप्तशृंगपर्वतावर झाली असे ज्ञानेश्वर सांगतात. सप्तशृंगी पर्वतावर देवीचे ठाणे आहे व तिची उपासना ज्ञानेश्वर घराण्याप्रमाणे सर्व नाथपंथीय व कौलसिद्ध करीत. सप्तशृंग पर्वताच्या आसपासच व त्र्यंबकेश्वराजवळ अनेक नाथसिद्ध राहात व तेथे शैवाप्रमाणेच कौलसाधक येत. श्री मत्स्येंद्रनाथ हे मत्स्योदर कौलशाखेचे महान् आचार्य होते व त्यांनी

भग्लावयी चौरंगीला सनाथ केले. सप्तशृंगावरील मत्स्येंद्र चौरंगीची भेट महाराष्ट्रातील नाथसंप्रदायाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. चक्रधरांनीही अप्रत्यक्ष-रीत्या चौरंगीचा जो उल्लेख केलेला आढळतो[४] त्यावरून सप्तशृंगपरिसरात चौरंगीनाथाचे प्रदीर्घ काळपर्यंत वास्तव्य होते व गोरक्षासह मत्स्येंद्रनाथांचे आगमन तेथे झाले असता त्यांनी चौरंगीला अनुग्रह दिला ही गुरुपरंपरेतील व नाथसंप्रदायांतील हकीकत ज्ञानेश्वर मुद्दाम नमूद करतात. मत्स्येंद्र, गोरक्ष व चौरंगीनाथाप्रमाणे इतरत्रही नाथपरंपरेतील सिद्ध होते. उदा. खुद्द नेवाश्याला रसेश्वरसिद्ध कनेरीनाथांचे समाधिस्थान होते व सिद्धेश्वर रसेशानींचे मंदिर होते. रसेश्वरसिद्ध हे शैवसिद्धच असून रसेश्वरशाखा नागार्जुनाने प्रवर्तीत केली व नागार्जुनशिष्य कनेरीने आपले कार्यक्षेत्र शके १०६० पूर्वी नेवाश्याचा परिसरच निवडला बीडला नाथसिद्ध कंकाळेश्वराचे समाधिस्थान आहे व हा नाथसिद्धही मत्स्येंद्रपूर्व कालात होता. मत्स्येंद्र व नागार्जुन हे आदिनाथ परंपरेतील शैवसिद्ध असले तरी मत्स्येंद्राची मत्स्योदरकौलशाखा तर नागार्जुनाची रसेश्वरशाखा होती. ह्याच नाथपरंपरेतील पण जरा वेगळचा अशा शैवकापालिक शाखेत जालंदर होता. ज्ञानेश्वरीत जालंदरबंधाचा उल्लेख येतो व जालबंध तंत्रयोग परंपरेतील प्रक्रियाप्रधान असल्याने ज्ञानेश्वरांना व पर्यायाने त्यांच्या गुरुपरंपरेतील नाथ-सिद्धांना ती प्रक्रिया संपूर्णपणे अवगत होती हे आपोआप स्पष्ट होते. त्यावरून ज्ञानदेव निवृत्तिनाथांचा तांत्रिकयोग करणाऱ्या सिद्धसाधकांशी निकटचा परिचय होता हे स्पष्ट होते. ज्ञानदेवोक्त कुंडलिनी उत्थापन ही सर्व नाथसिद्धात मान्यता पावली होती. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील कुंडलिनी उत्थापन–कुंडलिनी-योग नव्हे, कारण अशा प्रकारचा कोणताही योग नाही ही तर कुंडलिनी उत्थापन प्रक्रिया लययोग अंतर्गत आहे. म्हणून ती हठयोगात येत नाही. हठयोगात प्राण-विजयावर साधकाचा भर असतो. नाथसिद्ध हठयोगी असतात हे खरे; पण हठयोगापेक्षाही ज्ञानेश्वरांच्या नाथपंथाचा भर लययोगांतर्गत कुंडलिनी उत्थापनावर आहे. हा सर्व भाग तंत्रप्रक्रियेचा आहे व तो मत्स्येंद्र–गोरक्ष–चौरंगी परंपरेत होता.

यावरून असे स्पष्ट होते की, ज्ञानेश्वरांच्या पूर्वी नाथसंप्रदायाच्या अनेक शाखोपशाखा सर्व भारतभर पसरलेल्या असल्या तरी ज्ञानेश्वरांनी मत्स्येंद्र–गोरक्ष-चौरंगी पुरस्कृत लययोगांतर्गत कुंडलिनी उत्थापनावर भर दिला. ह्या लययोगाचे प्रधानकेंद्र सप्तशृंगी व त्र्यंबकचा परिसर होता. विशेषतः समाधिसुखाचा अखंड अनुभव यावा या हेतूने श्री मत्स्येंद्रनाथांनी आपले सर्व ऐश्वर्य गोरक्ष चौरंगीनाथांना देऊन स्वतः अखंड समाधिसुखात मग्न झाले. नंतर गोरक्षनाथांनी त्र्यंबकेश्वरजवळील ब्रह्मगिरीवर ठाणे करून त्र्यंबकपासून पैठणपर्यंतचा मुलुख पायाखाली घातला व

असंख्य जीवांना दिलासा दिला. गोरक्षांचा संचार गोदातीरप्रदेशात जेव्हा झाला त्यावेळी मत्स्येंद्रनाथ व बहुधा चौरंगीही समाधिस्थ झाले असावे असे दिसते. श्री-गोरक्षांचे अनेक शिष्य होते व त्यातील काहीची नावे नवनाथनामावळीतही आढळतात. उदा. गोरक्षशिष्य भर्तृहरिनाथाचे नाव नवनाथ नामावळीत येते परंतु गोरक्ष-शिष्य भर्तृहरीची शिष्य परंपरा प्रामुख्याने विदर्भ–मराठवाडा व तेलंगणात पसरली होती. गोदातीरावर गाहिनी–अमर व गोविंद-निराईचे वास्तव्य होते. गोरक्षशिष्य अमरनाथाचा 'गोरक्ष-अमरसंवाद' नावाचा ग्रंथ आहे. ह्या ग्रंथाचा प्रभाव ज्ञाने-श्वरीवर आहे हे चांदोरकर–वि. ल. भाव्यांनीही दाखवून दिलेच आहे. अमरनाथाची शिष्य परंपरा ही महाराष्ट्रात होती व श्रीनिवृत्तिनाथांनीही गहिनी–गोरक्षाबरोबर अमरनाथांचा स्पष्ट उल्लेख केला आहे. माझ्या मते अमरनाथांचा गोरक्ष-गहिनी-प्रमाणेच ज्ञानेश्वरांच्या वाडवडीलापासून संबंध होता. श्रीनिवृत्तिनाथांनी अमर, गुप्तनाथ, सत्याकवानाथादि नाथसिद्धांना नमन केले आहे व ज्ञानेश्वरापेक्षा श्री-निवृत्तिनाथांचा गहिनी-अमरनाथाप्रमाणेच इतरही नाथसिद्धांशी संबंध ब्रह्मगिरीच्या वास्तव्यात आला आहे. श्रीनिवृत्तिनाथांच्या अगोदरच्या पिढीत अदंडीनाथ, विश्वनाथ व कुईराम इत्यादी नाथसिध्दही नाथपंथाचा प्रसार महाराष्ट्रात करीत होते. अदंडीनाथाचा प्रभाव राजघराण्यावर होता व राजाची राणी अदंडीना गुरू-स्थानी मानीत होती. लीळाचरित्राच्या पूर्वार्ध व उत्तरार्ध लीळेत अदंडीनाथाचा उल्लेख चक्रधराने केला आहे.[५] अदंडीनाथ हे हठयोगी असून त्यांनी जैनगुरुचा पराभव करून वैदिकमार्गाची स्थापना केली अशी चक्रधराची साक्ष आहे. चक्रधर म्हणतात, 'भटाचार्या मागा पुढती: अदंडीनाथे वेद प्रतिष्ठिले: ते निवर्तले: तेयाचे देऊळ हे :' चक्रधराचे भ्रमण व लीळाचरित्र पूर्वार्ध-उत्तरार्धाचा काल शके ११८९ ११९६ दरम्यान असल्याने असे समजण्यास प्रत्यवाय नसावा की, अदंडीनाथ शके ११७० च्या सुमारास समाधिस्थ झाले होते व त्यावरून स्थूलमानाने त्यांचा समय शके ११००–११७० दरम्यान ठरतो ह्या सुमारास देवगिरीच्या यादवांची सत्ता वर्धिष्णु होती व त्यांनी अनेक मांडलिकांना पराभूत करून आपल्या सत्तेखाली आणले. अदंडीनाथाचा उल्लेख लीळाचरित्राच्या पूर्वार्धातही येत असल्याने व पूर्वार्धात चक्रधराचे भ्रमण मराठवाडा परिसरात झाल्याने अदंडीनाथ हे मराठ-वाड्यातील एखाद्या महामंडलेश्वराचे गुरू असावेत. अदंडीनाथांची गुरूपरंपरा उपलब्ध नसली तरी हठयोगावरील प्रमुख, जैनगुरूंच्या मताचे खंडण व वेदाची प्रतिष्ठा त्यांनी केली हे सिद्ध होते व नाथयोगी वा नाथपंथ प्रारंभापासून वेदानुकूल असल्याने ज्ञानेश्वरांच्या पूर्वजांनी नाथसिद्धाकडून अनुग्रह घेतला व निवृत्तिज्ञाने-श्वरपर्यन्तच्या मंडळींनी वैदिक धर्मानुकूल भूमिका घेतली हे स्पष्ट होते. ज्ञानेश्वर घराण्यात पूर्वीपासूनच शांकराद्वैत व वेदमान्यता होती व नाथपंथीयांचा मोक्षविषयक विचार शांकराद्वैतासारखा होता. हा विचार केवळ ज्ञानेश्वर घराण्यासंबंधापुरताच

मर्यादित नसून अमरनाथ, गहिनी, गोरखनाथ व अदंडीनाथादी नाथसिद्धांनाही मान्य होता. मोक्षविषयक प्रतिपादन, शांकराद्वैत, वेदानुकुलता व खुद्द नाथपंथाविषयी आजच्या अनेक अभ्यासकांचे गैरसमज आहेत. श्रीज्ञानेश्वरांच्या नाथपंथाचा विचार व अध्ययन केले तर ज्ञानेश्वरचरित्रातील असंख्य समस्यांचा उलगडा होतो. नाथसिद्ध हे किमयेसाठी प्रसिद्ध आहेत ही आजची समजूत नाही तर ती पूर्वापार आहे. उदा. चक्रधराने विश्वनाथ ह्या नाथसिद्धाचा उल्लेख केला आहे. विश्वनाथ जोगी किमयेत लक्ष घालणारा होता व किमयेबाबत गोरक्षांचा 'किमयागार' नावाचा ग्रंथ होता हे ध्यानात घेतलें, तर विश्वनाथही कदाचित् गोरक्षपरंपरेतील ठरावा. 'आपण पिवळी दांडी करू जाणिजे' असे तो चक्रधराला म्हणतो. किमयेचे हे लोण ज्ञानेश्वरापर्यन्त चालत आले आणि एकनाथांनी प्रतिशुद्ध संहितेत ज्ञानदेवकृत किमयेच्या ओव्या गाळल्या असा समज विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या ज्ञानेश्वरी अभ्यासकात होता. हा समज ज्ञानेश्वर हे नाथपंथीय होते व नाथसिद्ध किमया विद्या जाणतात ह्या कल्पनेतून निर्माण झाला आहे हे लक्षात घेतले की, आजचे अभ्यासकही एखाद्या कल्पनेच्या आहारी जाऊन संशोधनक्षेत्र व ज्ञानेश्वरचरित्र कसे रंगवितात याची जाणीव होते.

किमयेप्रमाणे अद्‌भुत चमत्कार व सिद्धीसाठी नाथसिद्ध प्रख्यात आहेत. महानुभावीय लीळा चरित्रात चक्रधराने लसौरच्या कुईराम नावाच्या नाथसिद्धाचा उल्लेख केला आहे. त्याला अनेक सिद्धी प्राप्त होत्या. पाण्यावर तरंगणे वगैरे पवनकार्य सिद्धी कुईरामजवळ होत्या व या सिद्धीचा चक्रधराने उपहास केला आहे. कुईरामप्रमाणेच श्रीपर्वतावर भर्तृहरिशिष्या मुक्ताई व किष्किंधा पर्वतावर मत्स्येंद्र परंपरेतील घोडाचुडी नाथसिद्ध होते. अशा प्रकारे तोरणमाळ, लासौर, नाशिक, त्र्यंबकेश्वर, बीड, नेवाशे व पैठण परिसरात अनेक नाथसिद्ध आपापल्या परीने कार्य करीत होते. नवनाथ–नामावळी व सिद्धसूचीवरूनही महाराष्ट्रातील व विशेषतः मराठवाड्यांतील नाथसिद्धांच्या कार्याची व वज्रयानी, शाक्त, तांत्रिक, कापालीकादि सिद्धांच्या विचारप्रणालीची ओळख आपणास होऊन ज्ञानेश्वरकालीन सांस्कृतिक विश्वाची ओळख होते.

समकालीन विचारविश्व व पूर्वापार सांस्कृतिक धारणेशी ज्ञानेश्वरांचा निकटचा संबंध असेल वा होता असे मानले, तर ज्ञानेश्वरकालीन संस्कृत मराठी फगड शिलालेख, विविध पंथोपपंथ, मठमंदिरे व सिद्ध आचार्यादी मंडळी व ग्रंथ यांचा मागोवा घेऊन ज्ञानेश्वरकालीन सांस्कृतिक वातावरणाचा शोध घेणे क्रमप्राप्त ठरते. ज्ञानेश्वरकालीन वातावरण व विशेषतः त्यांचे घराणे ज्या एका संप्रदायाशी निगडीत होते, त्या नाथपंथाचा अभ्यास व मराठवाड्यातील नाथसिद्ध परंपरेचा इतिहास, ज्ञानेश्वरचरित्र उभारण्यास बहुमोल साह्य करतो. उदा.

भगवद्‌गीतेच्या बाराव्या अध्यायांतील तिसऱ्या, चवथ्या व पाचव्या श्लोकावरील टीकेत अव्यक्तोपासना योगप्रधान असल्याचे ज्ञानदेवांनी दाखविले आहे. ही टीका अव्यक्तोपासक निर्गुण निरंजनाची उपासना करणाऱ्या नाथसिद्धांचा दृष्टिकोन स्पष्ट करणारी आहे. एवढेच नव्हे तर श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा भावार्थ स्पष्ट करताना गीतोक्त योगाचे स्पष्टीकरण व सांख्याचे प्रतिपादन नाथपंथीय दृष्टिकोणातून बरेचदा केलेले आढळते. उदा. चवथ्या अध्यायातील तिसऱ्या श्लोकातील ' प्राणान् प्राणेषु जुह्वति ' पदावरील ज्ञानेश्वरांची टीका नाथपंथीय वज्रयोगक्रम व पर्यायाने प्राणशक्ती कुंडलिनी उत्थानपर आहे. बाराव्या अध्यायातही प्राणशक्ती चामुंडेचा म्हणजे कुंडलिनी शक्तीचा निर्देश आढळतो. गीता ही शिवशक्ती संवादात्मक व गीतातत्त्व हे भवानीचे नित्यनूतनरूप होय. हाही विचार नाथपंथीयांचा आहे. श्रीकृष्ण वचनोक्ती साक्षात् शक्ती व श्रीकृष्ण शिव अशी धारणा नाथपंथीयांची होती. श्रीकृष्ण वचनोक्ती म्हणजे परमेश्वरी जगदंबा कुंडलिनीचे स्वरूप व ह्या वचनोक्तीचे मर्म तंत्रप्रधान लययोगांतर्गत कुंडलिनी उत्थापनाप्रमाणेच नामभक्तीने अवगत होते ही नाथपंथीय धारणा ज्ञानेश्वरीत जागोजागी आढळते. सारांश, ज्ञानेश्वरीमधील भक्तीचे विवेचन नाथपंथीय तांत्रिक शक्तिसाधना व प्रक्रियेशी संबंधित आहे व महाराष्ट्रातील वारकरीसंप्रदाय नाथपंथीय शिवशक्य द्वैतावर आधारलेला आहे. नाथसिद्ध योगसाधना करीत व राजयोग, हठयोगाप्रमाणेच कुंडलिनी उत्थापन असलेल्या लययोगावर विशेष भर देत. किमान पक्षी ज्ञानदेवांच्या गोरक्ष-गहिनी-निवृत्ती शाखेत तर लययोगांतर्गत कुंडलिनीचे अपरंपार महत्त्व होते व ह्या योगापेक्षा त्यांना इतर योगसाधना दुय्यम वाटत असत. ज्ञानेश्वरी लिहिताना त्यांच्या समोर पातंजल योगसूत्र निश्चित होते परंतु पातंजलयोगसूत्रावरील व्यास भाष्य असण्याची शक्यताही लक्षात घ्यावी लागते. पण पातंजलयोगसूत्र व्यासभाष्यावरील भोजवृत्ती नव्हती. कारण भोजवृत्ती अनुसार ज्ञानदेव निवृत्तिनाथांच्या ग्रंथांतील योगविवेचन आढळत नाही. ज्ञानेश्वरी व अभंग वाङ्‌मयात योगाचे भरपूर संदर्भ आहेत पण ह्या दोन्ही ग्रंथांतील योगविवरण भोजवृत्तीअनुसार नाही. याचे कारण असे की, भोजवृत्ती ही धारेश्वर भोजाची आहे व धारेश्वर भोज हा शैव माहेश्वर होता. शैव माहेश्वर, लाकुलीश व काळमुखांचे मठ ज्ञानेश्वर पूर्वकालात मराठवाड्यात होते व पैठण-देगलूर परिसर तर कालमुख शैवाचार्यांच्या प्रभावाखाली होता. शैव माहेश्वर, कालमुख व लाकुलीशांचे प्रधान केंद्र आवंढा नागनाथ होते व शैव पाशुपतांचे प्रधान केंद्र गुजराथमध्ये होते. ज्ञानेश्वरपूर्व कालातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण शैवमाहेश्वर, कालमुख, लाकुलीश व पाशुपत शैवाचार्यांनी भारून टाकले होते. परंतु ज्ञानेश्वरीवर ह्या शैवाचार्यांचा व शैवसिद्धान्ताचा प्रभाव नसून तंत्रप्रधान नाथशैव-सिद्धांचा आहे. वर सांगितल्याप्रमाणे नाथसिद्ध प्रामुख्याने लययोगाचा तर काही शैवसिद्ध हठयोगाचा पुरस्कार करून निरंजनतत्त्वाचा पाठपुरावा करीत. नाथसिद्ध

हे योगप्रवीण व अव्यक्तोपासक निर्गुण निरंजनाची उपासना करीत. आपल्या गुरू-परंपरेचे वैशिष्टच मोठ्या डौलाने सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात की, प्रवृत्तिरूप वृक्षाच्या बुडाला निवृत्तिरूप फळाचे घड लागले आहेत व श्रीशंकरही अजून याच मार्गाचा यात्रेकरू आहे. असे असताना इतर योगीजन मात्र प्रारंभी दुसऱ्याच आडव्यातिडव्या मार्गाने गेले, पण अनुभवाच्या पायवाटेने हाच राजमार्ग त्यांनी स्वीकारला. या ठिकाणी 'इतर योगीजन' शब्दाने ज्ञानदेवांना तत्कालीन शैवाचार्य व सिद्धमहंत अभिप्रेत दिसतात. ज्ञानदेवांच्या मते नाथपंथ प्रवृत्तिरूप असून निवृत्तीत परीणत होतो व नाथपंथीय योगीजन ह्या प्रवृत्ति-निवृत्तिरूप पंथाचा आश्रय घेतात. हे लिहिताना त्यांच्या समोर त्यांचे वडील विठ्ठलपंत व आजोबा गोविंदपंत असावेत असे दिसते. लययोगांतर्गत कुंडलिनी उत्थापनाची प्रक्रिया कमालीची जटिल आहे व ती करण्यास शांत वातावरण आणि प्रसन्न परिसर असणे आवश्यक असते. कुंडलिनीचे उत्थापन करण्यास शरीर केवळ मजबूत असून चालत नाही तर योगसाधन कालात शरीराची योग्य काळजी घेणाऱ्या व्यक्तीही पाहिजेत. उदा. रामकृष्ण परमहंसदेवांच्या साधनकालात त्यांच्या शरीराची काळजी घेणाऱ्या व्यक्ती होत्या. तसेच ज्ञानदेव भावंडांची साधना श्री निवृत्तिनाथांच्या देखरेखीखाली जेव्हा आपेगावी सुरू झाली तेव्हा त्या सर्वांची देखभाल करण्याचे कार्य त्यांच्या आई-वडिलांकडे असावे असे दिसते. याचेच प्रतिबिंब माताबालक वात्सल्यरूपाने ज्ञानेश्वरीत व 'बापरखुमादेवीवरु' पदाने अभंग वाङ्मयात उमटलेले दिसते. ज्ञानेश्वरीत मातेच्या वात्सल्याचे व बालकाच्या लडिवाळपणाचे मोहक चित्रण जागोजागी आहे व मातृवात्सल्यदर्शक दृष्टान्ताचे सम्यक् प्रयोजनही एरवी स्पष्ट करता येत नाही. पण, आईवडिलांनी जी देखभाल केली व त्यांचा कठीणतम योग परीपूर्ण अवस्थेत नेला त्याचे स्मरणच कृतज्ञतापूर्वक ज्ञानेश्वरांनी केले नसावे हे समजणे योग्य होईल काय ? आपेगावी योगसाधना व नाथपंथीय जटिल तंत्रोपासना करण्यात बराच काल व्यतीत झाल्यामुळे ज्ञानेश्वरादिकांच्या पूर्वजीवनाची फार थोडी माहिती उपलब्ध होते. आई-वडिलांनी ह्या भावंडांचा निरोप आळंदीहून नव्हे तर आपेगावाहून घेतला. आळंदीच्या ब्रह्मवृंदांनी व्रतबंध करण्याचे नाकारल्यावर श्री निवृत्तिनाथांना त्यांच्या वडिलांनी गहिनीनाथाच्या हाती सोपविले व आपण स्वतः मुलाबाळासह आपेगावी निघून गेले. निवृत्तिनाथांनीही गहिनीनाथाकडून 'नाथसंकेतीचा देशु' प्राप्त करून ब्रह्मगिरीचा निरोप घेतला व आपेगावी प्रयाण केले. गहिनीनाथाकडे श्री निवृत्तिनाथ शके ११९८–१२०० दरम्यान होते व नंतर शके १२०१ मार्गशीर्ष पौर्णिमेस त्यांनी आपेगावी ज्ञानदेवास नाथपंथाची दीक्षा दिली. व्रतबंध–प्रकरणानंतर निवृत्ति–ज्ञानेश्वरांचा संबंध नाथसिद्धासी आला व आळंदीऐवजी आपेगावी त्यांचे वास्तव्य झाले. तेथे विठ्ठलपंत पूर्वीच आले होते. आळंदी–ब्रह्मगिरी – आपेगाव – पैठण – नेवासे – आळंदी – पंढरपूर – आळंदी अशा प्रकारे

पुढे निवृत्ती–ज्ञानेश्वरांचे वास्तव्य झाले. आपेगावी त्यांच्या पूर्वजाची–त्र्यंबकपंतांची समाधी होती व तेथूनच विठ्ठपंतांनीही त्यांचा निरोप घेतला. नामदेव म्हणतात–

भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आदि ।
तयाचि समाधि आपेगांवी ।।
आपेगांवी आले देवऋषीश्वर । उतरले भार वैष्णवांचे ।।
निवृत्ती मुक्ताईने पाहुनी स्थळडोळा । आलासे उमाळा ओसंडुनी ।
तात आणि माता गेलीसे येथून । तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा ।
निवृत्ती ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न । सांभाळी सोपान मजलागी ।।

आळंदीप्रमाणेच आपेगावचा ज्ञानेश्वर जीवनाशी संबंध होता. नाथपंथीय परंपरेने आपेगावचा पक्ष उचलून धरला नामदेव, उद्बोधनाथ व सत्यामलनाथ ह्या तिघांनी लिहिलेली ज्ञानेश्वरचरित्रे लक्षात घेतली व त्याबरोबर महाराष्ट्रातील नाथपंथाचा व विशेषतः मत्स्येंद्र–गोरक्ष–गहिनी परंपरेचे कार्य अभ्यासले तर आळंदी, आपेगाव, ब्रह्मगिरी, पैठण, नेवाशे, आळंदी व पंढरपूर ह्या गावाशी व ह्यामधील भूभागाशी ज्ञानेश्वरांचा संबंध आला व त्यांनी ह्या भूप्रदेशात प्रारंभी कार्य केले. पण एवढ्यापुरतेच त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित नसावे असे समजण्यास जागा आहे. ज्ञानेश्वरचरित्रांचा विचार केवळ वारकरी वा भागवतधर्मापुरताच करण्यात येत असला तरी त्याला इतर काही पैलू आहेत. उदा. ज्ञानदेवांचा जीवलग सखा नामदेव हा मूळचा नागनाथ औंढा परीसरातील. तेथून तो पंढरीस आला व विठ्ठलभक्तीत रममाण झाला व पुढे निवृत्तिज्ञानदेवांच्या आग्रहावरून त्याने नागनाथ औंढ्यास जाऊन विसोबा खेचराचा अनुग्रह घेतला. विसोबा हा मूळचा शैवयोगी होता व तो मुंगी पैठणला राहत असे. ज्ञानदेवांच्या सांगण्यावरून तो नागनाथ औंढ्यास गेला होता. नागनाथ औंढा हे शैवमाहेश्वर व कालमुखांचे प्रख्यात केंद्र होते व तेथील परममाहेश्वर शैवाचार्यांची परंपराही सर्वदूरवर पसरलेली होती. हे शैवाचार्य श्रीकृष्णाचेही परमभक्त होते व पाशुपतशैवाचार्य तर असे म्हणत की, उपमन्यूने श्रीकृष्णाला पाशुपत दीक्षा दिली. यावरून पाशुपत व शैवाचार्य श्रीकृष्णाचे परम भक्त होते व ह्या शैवाचार्यांच्या प्रभावक्षेत्राखाली असलेल्यांनी श्रीविठ्ठलोपासनाही केली होती हे पंढरपूरच्या सुप्रसिद्ध चौऱ्यांयशी शिलालेखावरून स्पष्ट होते. नामदेव व विसोबाही मूळचे शैवाचार्य पुरस्कृत माहेश्वरशैव होते व तेथून नामदेवांनी पंढरीस प्रयाण केल्यावर कालमुखमाहेश्वर शैवप्रणीत विठ्ठलउपासना करण्यास प्रारंभ केला असावा. माहेश्वर शैवाचार्य योगाचा पुरस्कार करणारे असले तरी श्रीकृष्णभक्तही होते व विसोबा-नामदेवांनीही योग व भक्तीचाच आश्रय घेतला होता. सारांश ज्ञानेश्वरादि नाथपंथीय भावंडांचा शैवविसोबाशी संबंध आला व ज्ञानदेवांच्या कार्यामुळे विसोबासारखे शैवमाहेश्वर,

नाथ व भागवतधर्माकडे वळले. शैवमाहेश्वर हे द्वैती तर नाथसिद्ध हे अद्वैती. ज्ञानदेवादि भावंडांनी द्वैती शैवमाहेश्वरसिद्धयोग्यांना प्रभावित करून अद्वैतावर अधिष्ठित भागवतधर्ममंदिराचा पाया उभारला. नामदेवांचे पूर्वआयुष्य नागनाथ औंढा परिसरातील माहेश्वरशैव परंपरेत गेल्याने त्यांना ज्ञानदेवांच्या पूर्वआयुष्याची माहिती नसावी. कारण निवृत्तिज्ञानदेवांचे पूर्वायुष्य आळंदी–नाशिक–ब्रह्मगिरी व आपेगावशी संबंधित आहे. भिन्न भौगोलिक परिसर व वेगवेगळे उपासनासंप्रदाय ह्यामुळे नामदेव ज्ञानदेवापासून दूर दिसतात. नामदेव हे नागनाथ औंढा व पंढरपूर परिसरातच वावरताना आढळतात. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्ञानदेव व विशेषतः निवृत्तिनाथांना तत्कालीन शैवसंप्रदायांची व पंथोपंथाची सूक्ष्म माहिती होती. ज्ञानेश्वरभावंडात निवृत्तिनाथांचेच भ्रमण जास्त झाले आहे व प्रारंभी तर नाशिक–ब्रह्मगिरी परीसरात त्यांनी गहिनीनाथाकडून नाथपंथाची दीक्षा व योगसाधनाही पूर्ण केली. योगात त्यांचे असामान्य प्राविण्य होते व विसोबा खेचरला जो तारकयोग सांगण्यात आला तो बहुधा निवृत्तिमुळेच. निवृत्तिनाथांच्याच आदेशाने विसोबा नागनाथ औंढचास गेले व तेथे योगसाधनेत निमग्न झाले. विसोबा खेचरांची योगसाधना प्रारंभी पातंजलयोगाप्रमाणे म्हणजे राजयोगाची होती. नंतर त्यांनी ध्यानयोगाचा अभ्यास केला व शेवटी नाथपंथीय कुंडलिनी उत्थापन–लययोगातही प्राविण्य मिळविले. त्यांच्या अभंगात ध्यान व तारकयोगाचे विशेष उल्लेख येत असले तरी नामदेवाला मात्र त्यांनी कुंडलिनी उत्थापनाचीच प्रक्रिया कथन करून लययोग दिला. विसोबांना सोपानदेवाने अनुग्रह व नाथपंथाची दीक्षा दिली. ह्याला प्रेरणा निवृत्ती–ज्ञानदेवांची होती हे स्पष्ट असले तरी प्रश्न असा निर्माण होतो की, ही चारही भावंडे नेहमीच एकत्रित राहत की प्रसंगपरत्वे वेगवेगळचा ठिकाणी राहत.

सर्वसाधारण समज मला असा की, ही चारही भावंडे सदोदित एकत्रित राहात व नामदेवांच्या वर्णनावरूनही चौघेही सदोदित एकत्र वास करीत असेच प्रत्ययास येते. पण वर सांगितलेल्याप्रमाणे निवृत्तिनाथांचा बराच काळ ब्रह्मगिरी व त्र्यंबकेश्वराच्या परिसरात गेला व निवृत्तिनाथांच्या अनेक गुरुबंधूंचे व प्रत्यक्ष गुरुंचेही वास्तव्य त्र्यंबकेश्वरीच होते. तसेच सोपानदेवाचेही आहे. सोपानदेवांनी विसोबा खेचर व नामदेव यांच्याप्रमाणे प्रकाशनाथसारख्यांना दीक्षा व अनुग्रह दिला. नाथपंथाचा प्रसार करताना भागवतधर्माप्रमाणेच तत्कालीन वटेश ह्या शैवसंप्रदायाशीही त्यांचा संबंध आला. चांगदेव वटेश्वर ह्या एक की दोन भिन्न व्यक्ती हा प्रश्न बाजूला सारला तरीही चांगदेववटेश्वरांचा संबंध वटेशशैवांशी होता हे उघड आहे. वटेशपंथीय चांगदेवाशी ज्ञानेश्वर, सोपान व मुक्ताई निगडीत आहेत. सोपान ज्ञानेश्वरांच्या समाधीनंतर निवृत्तिनाथासह मुक्ताई तापीतीरावर गेली व तिकडेच समाधिस्थ झाली. आळंदी, त्र्यंबकऐवजी मुक्ताईने तापीतीरावर जाण्याचे कारण

काय ? बहुधा त्या भागातील वटेशशैवांनी तिला बोलाविले असावे असे दिसते. कारण वटेशशैवांचा प्रभाव सोलापूर, पुणे, अहमदनगर व खानदेशाचा काही भाग ह्या प्रांतात होता. निवृत्तिज्ञानेश्वरांच्या कार्याने महाराष्ट्रातील पाशुपत, कालमुख, माहेश्वर, लाकुलीश व वटेश ह्या शैवसंप्रदायाचा संकोच होऊन कित्येक शैवांनी ज्ञानेश्वरादि भावंडांचे शिष्यत्व पत्करले व योगाधिष्ठित भक्तीचा पुरस्कार केला. ज्ञानेश्वरपूर्व व समकालीन शैववातावरणाने भारावलेल्या अनेकांनी योगशास्त्राचा पुरस्कार केला पण निवृत्तिज्ञानेश्वरांनी योग व भक्तीला प्राधान्य दिले. निवृत्तिज्ञानेश्वरांच्या रचनेतील योगशास्त्रांचे विवरण व योगानुभव पूर्ववर्ती शैवप्रभावाशी सुसंगत असेच आहे. योगाने समाधिसुख मिळते तसे भक्तीनेही भावसमाधी लागते. योग आणि भक्ती परस्परांशी मुळीच विरोधी नाहीत तर योगनिष्णात उत्तम भक्त असतो हे श्रीगहिनीनाथांनी सांगितले व निवृत्तीने त्याचा पुरस्कार केला. ज्ञानदेवांनी तर " तोचि योगी तोचि भक्त " असा सिद्धान्त उद्घोषित केला. योग व भक्ती ह्यांचे मधुर मीलन ज्ञानेश्वरांच्या नाथपंथात होते. नाथपंथी गहिनी-निवृत्तिज्ञानेश्वरांनी योगभक्तीचा पुरस्कार करून पूर्ववर्ती सर्व शैवांना भागवत-धर्मात आणले. ज्ञानेश्वरांची योगभक्तीविषयक भूमिका तत्कालीन शैवयोग्यांना मान्य झाली हे विसोबा खेचर व वटेश चांगदेवांच्या उदाहरणांवरून स्पष्टच होते. सारांश ज्ञानेश्वरांचा नाथपंथ योग व भक्तीचा पुरस्कर्ता असून योगी हा सर्वश्रेष्ठ भक्तही असतो हे गहिनीनिवृत्तीनाथांचेच विचार ज्ञानदेवांनी आपल्या अभंग रचनेत व ज्ञानेश्वरीत अधिक प्रभावीरीतीने मांडलेले आहेत.

आतापर्यंतच्या विवेचनाचे निष्कर्ष असे–

(१) नामदेवविरचित ज्ञानेश्वरचरित्र प्रकरणाप्रमाणेच नाथपंथीय विरचित ज्ञानेश्वरचरित्रेहि महत्त्वाची आहेत.

(२) नाथपंथीय विरचित ज्ञानेश्वरचरित्रे नामदेवांच्या माहितीशी विसंगत नाहीत. उलट अधिक तपशील देतात. विशेषतः ज्ञानेश्वर जन्म शके ११९३ मध्ये झाला व ज्ञानदेवांना नाथपंथाची दीक्षा शके १२०१ मध्ये मिळाली ही माहिती कथन करून आपेगावशी ज्ञानेश्वरांचा संबंध होता हे सांगतात.

(३) ज्ञानेश्वर चरित्राच्या उत्तरार्धापेक्षा पूर्वार्धच अधिक धूसर व रहस्यमय असून जास्त प्रमाणात अज्ञात आहे. ह्या पूर्वार्धातच ज्ञानेश्वरादि भावंडांचा नाथपंथाशी व नाथपंथीय योगप्रक्रियेशी सबंध आला.

(४) खुद्द ज्ञानेश्वरीत मत्स्येंद्र, चौरंगी, गोरक्ष, गहिनी ह्या नाथसिद्धांची नावे येतात व हे नाथसिद्ध नवनाथ नामावळीतही आढळतात.

(५) ह्या नाथसिद्धाप्रमाणेच इतरही अनेक नाथसिद्ध त्यावेळी कार्यरत होते. नागार्जुन–कनेरीसारखे रसेश्वरसिद्ध, कंकाळीसारखे तांत्रिकसिद्ध, जालंदर–कान्हसारखे शैवकापालीक व घोडाचुडी, कुईराम, विश्वनाथसारखे सिद्ध होते.

(६) नाथसिद्ध प्रामुख्याने तंत्र व योगसाधना करीत. ज्ञानेश्वरांच्या गुरु-परंपरेत कुंडलिनी उत्थापन–असा लययोग होता.

(७) नाथसिद्धाप्रमाणे माहेश्वर, कालमुख, लाकुलीश, पाशुपत व वटेश हे शैवसंप्रदाय व शैवसिद्ध होते. नाथ व शैवसिद्धांनी भारलेल्या सांस्कृतिक वातावरणात ज्ञानेश्वरादि भावंडे लहानाची मोठी झाली.

(८) ज्ञानेश्वरीत गीतेतील अनेक श्लोकांचे स्पष्टीकरण नाथपंथीय योगानुसार आहे, व ज्ञानदेवांच्या मते नाथपंथ प्रवृत्तिप्रधान असून निवृत्तीत परिणत होतो. निवृत्ती व संन्यास नाथपंथाला मान्य आहे.

(९) ज्ञानेश्वरशिष्य विसोबा व चांगदेव मूळचे शैवसिद्ध होत. एकाचा शैव माहेश्वर कालमुख तर दुसऱ्याचा वटेश संप्रदाय होय.

(१०) योगाप्रमाणेच भक्तीनेही समाधिसुख मिळते. योग व भक्ती विरोधी नव्हेत. नाथपंथात योग व भक्तीचे मधुरमीलन असून गहिनी–निवृत्ती ज्ञानेश्वरांच्या मते योगी हा सर्वश्रेष्ठ भक्तच असतो.

संदर्भ :

१. महाराष्ट्र सारस्वत
२. मराठी वाङ्मयाचा इतिहास
३. ज्ञानदेव चरित्र संशोधन : म. रा. जोशी.
४. लीळाचरित्र
५. लीळाचरित्र

卐 卐 卐

श्री ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ

डॉ. उषा माधव देशमुख, मुंबई

संत कोणाला म्हणावे ?

'युक्तः कर्मफलम् त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकम्' या भगवद्‌गीतेतील उक्तीप्रमाणे भारतवर्षात प्राचीन काळापासून अनेक शतकात साधूसंतांनी समाजाला भावनिक, मानसिक आणि अध्यात्मदृष्टया मार्गदर्शन केलेले आहे. आज कायद्याने ज्या गोष्टी नियंत्रित केल्या जातात त्याच गोष्टी धर्मातील विचारांनी व साधुसंतांच्या नीतिनियमांनी नियंत्रित होत असत. समाजाचे वैचारिक भरणपोषण आणि मानसिक पुनरुत्थान जे राजदंडांनी साधू शकले नाही ते संतवाणीने आणि उपदेशाने साध्य करून दाखविले असे भारतीय इतिहास सांगतो. भारतीय संस्कृती आणि समाज यांतील सामंजस्य आणि सातत्य टिकवून ठेवण्यात संतमहंतांनी हातभार लावला आहे.

काळ बदलतो, परिस्थिती बदलते, धार्मिक, राजकीय अवस्थांतरे होतात पण समाजाचे मानसिक परिवर्तन होते असे नाही. त्यासाठी रंजल्यागांजल्याचे अश्रू पुसण्यासाठी आणि त्यांच्या सुखदुःखात वाटेकरी होण्यासाठी एक सुहृद असावा लागतो; एक समान धर्म असावा लागतो. महाराष्ट्रातील साधुसंतांनी त्या त्या काळात समाजाचे मानसिक बळ वाढवून ईश्वराकडे जाण्याचा भक्तिमार्ग दाखविला. या भक्तिमार्गाने जात असता ज्ञान आणि कर्म यांची ओळख करून देत आणि आत्माविष्कार करीत उत्कटतेने ईश्वराचे गुणसंकीर्तन केले. संतांची कामगिरी अशा-प्रकारे दुहेरी स्वरूपाचो झाली. एकारीतीने ती आध्यात्मिक आत्मोन्नती आणि समाजोन्नती करण्यासाठी अवतरली व संतवाणीतील आत्माविष्कारामुळे तिला वाङ्मयाचे रूप आले. केवळ यादवकाळापुरता विचार केला तरी असे दिसते की चक्रधरांच्या विहरणातील उपदेशाने मराठी वाङ्मयाच्या ललितगद्याला प्रारंभ केला. चरित्र, आत्मचरित्रादी वाङ्मयप्रकार निर्माण झाले व ज्ञानदेव–नामदेवांच्या आत्माविष्कारीवाणीने अभिजात भावकाव्याचा [Lyrical poetry] जन्म झाला. राजकीय, ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक जीवन-व्यवहाराचेही दर्शन संत-वाणीतून घडते, पण ते तिचे प्रयोजन नव्हते. महाराष्ट्रीय संस्कृतीत जे एक विचार-

सातत्य आणि परम सहिष्णुता जाणवते त्याची पाळेमुळे यादवकाळातील संतवाणीत आहेत. मानवतावाद, उदारमतवाद, समानता आणि स्त्रीपुरुषसामंजस्य या ज्या आजच्या काळाच्या सामाजिक गरजा म्हणून आपण लक्षात घेतो त्या यादवकाळातील संतांनी आपल्या कृतिउक्तीतून समाजातील मनामनांच्या अंतःकोषात रुजविल्या होत्या; ही गोष्ट विसरता येत नाही. शिक्षणाचे कोणतेही संस्कार नसता भौतिकदृष्टचा अत्यंत मागासलेपण भोगत असताही वैचारिकदृष्टचा महाराष्ट्रातील संतमंडळाने पुरोगामी दृष्टिकोण स्वीकारून अध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त केले. आत्मशुद्धीकडून समाजशुद्धीकडे, आत्मविकासाकडून समाजविकासाकडे आणि आत्मज्ञानाकडून अध्यात्मज्ञानाकडे यादवकालीन साधुसंतांनी वाटचाल केली. तीतून 'आधी केले मग सांगितले' अशी साधना त्यांच्या जीवनव्यवहारातून पुढील पिढयांना मार्गदर्शक ठरली. खरा क्रांतदर्शी, जिज्ञासू द्रष्टा तोच की जो आपल्या उपदेशाने आणि आचरणाने समाजाचे मार्गदर्शन करतो आणि धार्मिकदृष्टचा नेतृत्व करतो. मानवकल्याणाची भूमिका घेत व भूतवर्तमानातून भविष्यात डोकावीत पुढे जाण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच त्यांचा उपदेश हा वाळूवरील पावलासारखा क्षणकालीन नसतो. क्षणजिवी नसतो. यादवकाळातील संतांची जीवनदृष्टी आणि वाङ्मयदृष्टी न्याहाळली तरी तीतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सौहार्द, भक्तिभाव आणि कारुण्याचा महासागर उचंबळताना दिसू लागतो.

अंतिम सत्याचे (Absolute truth) आकलन आणि दर्शन घेण्याचा प्रयत्न आणि जीवमात्रांचे गूढ उकलण्याचा प्रयत्न माणूस ज्यावेळी करू लागतो, त्यावेळी तो काही निष्कर्ष काढतो. काही सिद्धांत बांधतो. जीव, जगत् आणि ईश्वर यांच्या संदर्भात विचार करतो. त्याला तत्त्वज्ञान म्हणता येईल. जीव, जगत् आणि ईश्वर यांच्या अंतिमरूपाकडे ज्या भूमिकेतून बघितले जाईल त्या भूमिकेतून निष्कर्ष निघतील. म्हणूनच ईश्वरवादी आणि निरीश्वरवादी तत्त्वज्ञानाचे सरळ दोन गट पडलेले भारतीय तत्त्वज्ञानात दिसतात. बौद्ध, जैन, सांख्य आणि महानुभाव यांचा पहिल्या वर्गात समावेश होतो तर वेदांत, न्याय, वैशेषिक यांचा अन्तर्भाव दुसऱ्या गटात होतो. यामधूनच विविध संप्रदायांची आणि पंथांची बांधणी झालेली आहे. एक स्वतंत्र संप्रदाय (School) आपण स्थापन करीत आहोत याची तीव्र जाणीव चक्रधरांच्या ठिकाणी होती तशी ज्ञानदेवांच्या ठिकाणी असण्याचे कारण नाही; कारण वारकरी किंवा विठ्ठलपंथ हा नवव्या दहाव्या शतकापासून अस्तित्वात होता. चार्वाकांची भौतिकता, सांख्यांचे प्रकृतिपुरुषवर्णन, पातंजलाचे योगदर्शन, जैनांची चराचर विश्वाची मूलतत्त्वे, शंकराचार्यांचे केवलाद्वैत, रामानुजांचे विशिष्टाद्वैत, मध्वाचार्यांचे पूर्ण द्वैत किंवा वल्लभाचे शुद्धाद्वैत हे सर्व दृष्टिकोण म्हणजे जीव, जगत् आणि परमेश्वराच्या संदर्भात त्या त्या विचारवंतांनी केलेला तत्त्वविचार होय. पण नुसत्या तत्त्वज्ञानामुळे संप्रदायाची संघटना होऊ शकत

नाही तर संप्रदायप्रमुखाच्या वैचारिक दृष्टिकोणाचा जिवंतपणा आणि लोकाभिमुखता याशिवाय संप्रदाय बळ धरणार नाही. तसेच सांप्रदायिकांची पृच्छावृत्ती आणि अन्वेषणवृत्ती (Spirit of enquiry) यांचे खतपाणी मिळाल्याशिवाय संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि संप्रदाय अंग धरू शकणार नाही. संप्रदायाची तात्त्विक आणि संघटनात्मक अशी दोन्ही अंगे जोपर्यंत परस्परपूरक आणि परस्परसाक्षेप राहणार नाहीत, तोपर्यंत संप्रदाय आणि तत्त्वज्ञान टिकू शकणार नाही. पैकी पंथाची तात्त्विक भूमिका ही संस्थापकाच्या जीवनविषयक दृष्टिकोणातून आणि अनुशासनातून निश्चित होईल तर संघटनात्मक भूमिका ही सांप्रदायिकांच्या अनुसरणातून पंथसंस्थापकाचा दृष्टिकोण नीट समजावून घेऊन निश्चित होईल ! यादृष्टीने यादवकालीन धर्मविचारांची, तत्त्वज्ञानाची आणि संप्रदायाची चिकित्सा होणे आवश्यक आहे, पण आजपर्यंत तसा प्रयत्न झालेला दिसत नाही. त्यामुळे चक्रधर आणि ज्ञानदेव यांचा विचार करताना किंवा महानुभावपंथ आणि वारकरीपंथ यांचा विचार करताना जणू ते पंथ आणि पंथीय यांचे कार्य हे क्रियाप्रतिक्रियात्मकच आहे असे गृहीत धरून आजवर विचार होत आला व त्यात एकाने क्रांती केली असेल तर दुसरा समन्वयवादी ठरविला गेला ! खरोखर वस्तुस्थिती तशी आहे का ? चक्रधर, ज्ञानदेव यांच्या विचारातून खरोखर तसे जाणवते का ? एकमेकांचा वैचारिक आणि तात्त्विक पराभव करण्यासाठीच त्यांनी आपली वाणी परजली होती का? असा विचार करू लागता एका अंतिम मुक्कामाला जाणाऱ्या समांतर विचारधारा असेच चक्रधर–ज्ञानदेव यांच्या विचारांचे रूप नाही काय ? परंतु एकदा गृहितकृत्य निश्चित केल्यामुळे आपोआपच एक श्रेष्ठ ठरविला जातो. दुसरा कनिष्ठ ठरविला जातो. चक्रधरांना महात्मा ठरविण्यासाठी डॉ. वि. भि. कोलते यांना ज्ञानदेवांचे क्रांतिकारत्व उणे वाटू लागले तर विशिष्ट परिस्थितीजन्य असे संतकार्य आहे हे निश्चित करण्यासाठी मुसलमानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली असा अपसिद्धान्त प्रा. न. र. फाटक यांना मांडावा लागला. त्याचा मूळातच विचार करू या !

दोन आक्षेप

'बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाचे आघात उत्तरेत सुरू होताच त्यापासून वैदिक तत्त्वज्ञानाचे संरक्षण करण्यासाठी भारताच्या दक्षिणेत जन्मलेल्या शंकराचार्यांना धावून जावे लागले. उलटपक्षी जैन आणि बौद्ध यांना दक्षिणेत उतरावे लागले' (चक्रधर आणि ज्ञानदेव, पृष्ठ १०) असे डॉ. कोलते प्रतिपादन करतात आणि त्यातून महाराष्ट्रात चक्रधर का आलें याचे कारण सुचवितात. तसेच पुढे पृष्ठ १५ वर ते म्हणतात, 'चक्रधर आणि ज्ञानेश्वर यांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानातील

द्वैता-द्वैताच्या ह्या मुख्य भूमिका आणि या दोन व्यक्तींचे पौर्वापर्य लक्षात घेतले म्हणजे ज्ञानदेवांच्या कार्याची भूमिका स्पष्ट होते असे मला वाटते. तेराव्या शतकाच्या शेवटी शेवटी महाराष्ट्रात 'अद्वयानंदवैभव' जनतेला देण्याची ज्ञानदेवांना आवश्यकता का वाटली असावी ? या प्रश्नांचे उत्तर असे देता येईल की त्यावेळी महाराष्ट्रामध्ये 'द्वैतां'चे तत्त्वज्ञान विशेष प्रसार पावत होते. हा द्वैत तत्त्वज्ञानाचा प्रसार चक्रधराने चालवला होता खास ज्ञानदेवांच्या काळातही चक्रधराचे अनुयायी हेच कार्य करीत होते. याचा प्रतिरोध करण्यासाठी ज्ञानदेवांना द्वैताविरुद्ध विवेकाचे शस्त्र उपसावे लागले[१] ... ' पुढे आणखी दोन वर्षांनी लिहिलेल्या चक्रधर चरित्रात डॉ. कोलते म्हणतात, 'स्वामींच्या तत्त्वज्ञानामुळे आणि सामाजिक आचार-विचारामुळे अन्य पंथातील धर्मधुरीणांची संपुष्टात येऊ लागलेली प्रतिष्ठा हे होय '[२] आणि एका मुलाखतीत त्यांनी 'चक्रधरांचे (मातंगाच्या हातचा लाडू खाणे) हे एकच कार्य लक्षात घेता 'मातंगाचे सदन टाळले पाहिजे' असे सांगणाऱ्या ज्ञानेश्वरांना मी कदापि क्रांतिकारक म्हणणार नाही '[३] असे उद्‌गार काढले.

गेल्या चाळीस वर्षांतील चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या संदर्भातील डॉ. कोलते यांचे आक्षेप लक्षात घेतले पाहिजेत. चक्रधरांचे चरित्र–आत्मचरित्र असलेला आणि मराठी गद्याचा पहिला ग्रंथ आणि महानुभाव तत्त्वज्ञानाचा बीज–ग्रंथ समजला गेलेला 'लीळाचरित्र' हा एकमेव बृहद ग्रंथ चक्रधर चरित्र देतो. त्यातून चक्रधरस्वामी धर्मप्रचारासाठी किंवा धर्मसंस्थापनेसाठी म्हणून महाराष्ट्रात आलेले नाहीत तर एका विमनस्क अवस्थेत [४] घर सोडून निघाल्यावर व समाजाची स्थितिशील अवस्था न्याहाळल्यावर स्वामींच्या वृत्ति-प्रवृत्तीत फरक पडत गेला व वयपरत्वे तो वाढत जाऊन अखेर शके ११८५ मध्ये पैठणला येऊन त्यांनी मानवी जीवनातील अंतिम आश्रम जो संन्यास त्याचा स्वीकार केलेला आहे. त्यानंतर त्यांनी आपल्या विहरणातून भक्तगण मिळविले, संघटना तयार केली व आपले तत्त्वविचार समाजासमोर ठेवले. यावरून शंकराचार्यांना उत्तरेत धावून जावे लागले तसे चक्रधरांना महाराष्ट्राच्या मदतीसाठी धावून यावे लागले ही वस्तुस्थिती नाही.

डॉ. कोलते यांच्या विचारसरणीत दोन हेतू दडलेले दिसतात. एक म्हणजे ज्ञानदेवांपेक्षा चक्रधर क्रांतिकारक कसे हे दाखविणे व दुसरा म्हणजे द्वैत तत्त्वज्ञानाचा महाराष्ट्रात झालेल्या प्रसार-प्रचाराचे उत्तरदायित्व चक्रधरांकडे देणे, हे होय ! पण त्यासाठी त्यांनी ऐतिहासिक किंवा वाङ्मयीन पुरावे दिलेले नाहीत. वास्तविक चक्रधरांचे गुरू, स्वतः चक्रधर आणि चक्रधरांचे शिष्य नागदेव या महानुभावपंथाच्या आचार्यांनी वाङ्मयनिर्मिती केलेली नाही. ते पंथीयांच्या वाङ्मयनिर्मितीचा विषय झालेले आहेत. भोवतालच्या केसोबास, म्हाइंभट, भास्करभट यांसारख्या साहित्यिकांना त्यांनी लेखनप्रवृत्त केलेले आहे. ज्ञानदेवांची गोष्ट तशी

नाही. कालसापेक्ष अशी निर्मितीची भूमिका ज्ञानदेवांच्या उपदेशवाणीत नाही. कारण ज्ञानदेवांपुढचा समाज हा सर्व पृथ्वीतलावरील समाज आहे, मानव आहे. ज्ञानदेव स्वतः कलावंत आहेत, केवळ उपदेशक नव्हे ! ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी मागितलेले पसायदान आणि विश्वात्मक देवाजवळ त्यांनी केलेली प्रार्थना त्यांची भूमिका स्पष्ट करते. ज्ञानदेव आणि चक्रधर यांच्या व्यक्तित्वात हा मूलभूत फरक आहे. मानवकल्याणाच्या तळमळीतून चक्रधरांनी जे विचार मांडले ते नंतरच्या पंथीयांनी संकलीत केले होते. ज्ञानदेवांच्या जीवनदृष्टीचे प्रतिबिंब त्यांच्या काव्य-सृष्टीत पडले असल्यामुळेच त्यांची काव्यनिर्मिती पुढील मराठी कवितेला आणि वारकरीपंथाच्या संघटनेला, तत्त्वविचाराला अधिकच उपकारक ठरली होती. पंथ आणि व्यक्तित्व यांतील द्वैत समजून घेत व अनेकात एक असे आपण आहोत हे लक्षात घेत ज्ञानदेव वारकरीपंथाशी एकरूप झाले होते. चक्रधरांची भूमिका त्यांच्या नंतर महानुभाव पंथाला उपकारक ठरली का ? चक्रधरांच्या व्यक्तिवादी भूमिकेमुळे त्यांच्या तत्त्वज्ञानाला व आचारधर्माला आलेले सांकेतिक स्वरूप नंतरच्या काळात कमी होऊ शकले नाही; उलटपक्षी ते अधिकाधिक वाढतच गेले. चक्रधरांच्या द्वैत तत्त्वज्ञानाला विरोध करण्यासाठी ज्ञानदेवांनी भगवद्‌गीता निरुपणासाठी स्वीकारली असे काही वेळ गृहित धरले तरी ज्ञानदेवांबरोबर निवृत्तिनाथ, नामदेव आणि ज्ञान-देवांपूर्वी विवेकसिंधुकार मुकुंदराजांनी जो अद्वैततत्त्वज्ञानाचा सतत पुरस्कार केला त्याचा अन्वयार्थ कसा लावावयाचा ! अर्थात जर ज्ञानदेवांना चक्रधरांच्या द्वैत तत्त्वज्ञानाला विरोध करावयाचा असता तर जैनांचा किंवा बौद्धांचा उल्लेख जसा ज्ञानेश्वरीत आला आहे तसा महानुभाव पंथाचा किंवा चक्रधरांचा किंवा त्यांनी निरुपित केलेल्या जीव, देवता, प्रपंच, परमार्थ या संकल्पनांच्या संदर्भात विचार आला असता पण तसे ज्ञानेश्वरीत दिसत नाही. मूळ वस्तुस्थिती अशी आहे की अद्वैत तत्त्वज्ञानाची भारतीय परंपरा ही फार प्राचीन असून वेद-उपनिषदातून ती विकसित होत आलेली आहे. गीतेतील तत्त्वज्ञान हे मूळ उपनिषदातील तत्त्वज्ञान आहे. ब्रह्मविद्या, कर्मयोग, साक्षात्कार, भक्तियोग, ज्ञानयोग, नीतिविचार, आत्म-विचार, सगुणनिर्गुण विवेक ही सर्व भारतीय संस्कृतीच्या तात्त्विक अधिष्ठानाचेच विषय आहेत तेच गीतेने अनुसरले व त्यातील मानवकल्याणाचा व समाजहिताचा आणि सर्वात्मकतेचा दृष्टिकोण स्वीकारीत ज्ञानदेव आपले 'देशीकार लेणे' घड-वितात वस्तुतः महानुभावपंथ हा ज्ञानदेवपूर्वकालीन आहे परंतु त्याला संघटनात्मक आणि वाङ्मयीन बळ मिळवून दिले ते नागदेवाचार्यांनी ! व नागदेवाचार्य ज्ञानदेव समकालीन होते. ज्ञानेश्वरीपूर्वी चक्रधरोक्ती एकत्रित करण्याचे व तिचे संकलन-संपादनाचे काम महानुभाव पंथीयांनी केले होते पण महानुभाव कविता मात्र ज्ञानेश्वरी नंतरच लिहिली गेली आहे. केवळ सातीग्रंथांची जरी साक्ष काढली तरी ही गोष्ट स्पष्ट होईल ! चक्रधरकाळी आणि चक्रधरांनंतर 'महानुभावपंथ' हे नाव संप्र-

दायाला नव्हते तर ते सोळाव्या सतराव्या शतकात मिळालेले आहे. तत्पूर्वी चक्रधर काळात या पंथाला 'परमार्ग' हे नाव होते. नागदेवाचार्यांचे काळी 'भटमार्ग' असे त्याला म्हणत असत. 'आम्ही भटमार्गाचे महात्मे जालो[५]' किंवा 'मज भटमार्गाचा उपदेसु असे'[६] असे उल्लेख येतात. आर. ई. एन्थोवेन यांनी या पंथाला एकूण बारा नावे असल्याचे म्हटले आहे.[७] वरीलपैकी एकातरी नावाचा द्वैताच्या संदर्भात ज्ञानदेवांनी उल्लेख केला असता. पण ज्ञानदेवांची महानुभावांप्रमाणे इतकी मर्यादित भूमिका नव्हती. कारण ते केवळ उपदेशक, विचारवंत किंवा समाज शिक्षक नव्हते. त्यांच्यासह एक प्रतिभावंत कवी होते, दृष्टे होते. या संदर्भात प्रो. वा. ब. पटवर्धन म्हणतात ते लक्षात घ्यावे लागेल; "ज्ञानदेव is thus the father of Marathi Literature. He was the first eloquent advocate of the doctrine of Bhakti in Marathi. He was probably, the first to break away with the tradition that required all religious and higher thoughts to be conveyed through Sanskrit. He was the first gifted poet and 'man of letters' to descend proudly from the isolated neights of Sanskrit and to employ the vernacular of the land for all purposes. For purposes of religious and zonal teaching; for purposes of philosophic discussion and metaphysical reasoning; for purposes of all higher life of the spirit. He was discovered the artless grace of Marathi."[८]

या उताऱ्यावर भाष्य करण्याची गरज नाही.

ज्ञानेश्वरी म्हणजे केवळ टीका, भाष्यरूप नाही. गीतेतील हिंदुधर्माच्या आधारभूत तत्त्वांना धक्का लागू न देता समाजाच्या जीवन जाणिवांमध्ये बदल घडवून आणण्यात आणि धार्मिक परिवर्तन घडवून आणण्यात कालोचित समन्वय आणि बदल ज्ञानेश्वरीत गीतेच्या आधाराने ज्ञानदेवांनी घडवून आणला. याही दृष्टीने चक्रधारांच्या तुलनेत ज्ञानदेव धर्मसुधारणेच्या संदर्भात अधिक वास्तववादी भूमिका घेणारे होते ही गोष्ट स्वतः सिद्ध झालेली आहे. ज्ञानदेवांनी केलेली गीतास्तुती व त्यातून सुचविलेली स्वकाव्यविषयक भूमिका लक्षात घेता ज्ञानदेवांची वैचारिक सर्वात्मकता लक्षवेधी ठरते. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायात शब्दब्रह्माब्धीचे मंथन करून निघालेल्या नवनीताला ज्ञानाग्नीच्या स्पर्शाने आणि विवेकाने कढविलेले स्वादिष्ट तूप म्हणजे गीता होय. अशा गीतेचे निरुपण करताना 'बोली अरुपाचे रूप दावीन, अतींद्रिय परी भोगवीन इंद्रिया करवी' अशी आपली प्रतिज्ञा ज्ञानेश्वर व्यक्त करतात. गुरू, ईश्वर आणि गीता यांच्यात ज्ञानदेव एकरूपता मानतात.

तैसी जो ब्रह्मविद्या रावो : जो सकल शास्त्रां विसंवता ठावो
ते भगवद्गीता वोविं–गाओ : ऐसे केले॥ ज्ञा. १० : १९॥

द्वैत तत्त्वज्ञानाचा तात्त्विक निरास करणे ज्ञानदेवांना अशक्य नव्हते. ज्या प्रज्ञेने आणि प्रतिभेने त्यांनी ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव यांची निर्मिती केली तिला ही गोष्ट आवश्यकही नव्हती. पण ज्ञानदेवांची भूमिकाच मुळातून वेगळी होती. 'मराठी संतोका सामाजिक कार्य' याही ठिकाणी डॉ. कोलते यांनी ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ही आत्मशुद्धीसाठी, मनःशांतीसाठी आणि आत्मोद्धारासाठी लिहिली' असे म्हटले पण यादवकालीन सर्व संत आत्मोद्धाराकडून समाजोद्धाराकडे वळलेले होते; त्यात ज्ञानदेवांचा अपवाद नाही.

चक्रधरांनी प्रवर्तित केलेल्या पंथाला 'महानुभाव' हे नाव सोळाव्या सतराव्या शतकात मिळाले. एकनाथांनी 'मानभाव' हा पंथवाचक-शब्द पहिल्यांदा योजून आपली नाराजी व्यक्त केली. 'होऊनो मानभाव : अवघा बुडविला ठाव' किंवा 'जालो म्हणती मानभाव । अंतरी शुद्ध नाही भाव' यावरून एकनाथकाळी महानुभाव पंथाला विशेष प्रसिद्धी आणि अनुकूलता होती असे दिसत नाही. आणि वाङ्मयीनदृष्टचा डॉ. कोलते यांचे विधान तपासले तरी नागदेव आचार्यपदी आल्यानंतर महानुभाव वाङ्मयाचा उषःकाल झाला आहे. नागदेवाचार्यांनी लीळाचरित्र, दृष्टान्तपाठ, रत्नमाला स्तोत्र, सूत्रपाठ या ग्रंथांना प्रेरणा दिली व सत्यान्वेषणाच्या भूमिकेवरून सर्व तपशील मूलतः अनुसरण्याची दक्षता घेतली. 'स्वदेश संबंधु त्याज्य, स्वग्राम संबंधु त्याज' किंवा 'तेलंग देशा न वचावे महाराष्ट्री असावे' या उपदेशाचा संदर्भ वेगळा असला तरी प्रादेशिकतेची जी भूमिका चक्रधरांनी व्यक्त केली, तशी ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीमागे नाही म्हणून आज सातशे वर्षे होऊनही ज्ञानेश्वरीचे चैतन्यमयी आणि रसरसलेले ताजे अनुभव विचारप्रवर्तक ठरतात. चक्रधरांच्या आणि ज्ञानदेवांच्या मूळ लोककल्याणाच्या भूमिकेतच फरक होता व त्या भूमिकांचा परिणाम त्यांच्या पंथावर पडला गेला व अनुयायांनीही त्याच भूमिका स्वीकारल्या ! हा मूलभूत दोन व्यक्तित्वातील फरक लक्षात न घेतल्यामुळे आजवर तरतमची भाषा वापरावी लागली. प्रा. न र. फाटक यांनीही ज्ञानदेवांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन करताना तिला कालसापेक्ष ठरविले आहे. मुसलमानी आक्रमणाला परतविण्यासाठी ज्ञानदेव लेखनप्रवृत्त झाले असे प्रा. फाटकांना वाटते. ते म्हणतात, 'अशा बहुविध अडचणींच्या अनुभवाने भांबावून कोलमडू पाहणाऱ्या बुद्धीला स्थैर्य पुरवून कर्तृत्वक्षम करण्यासाठी ज्ञानेश्वरांनी गीतेवर टीका लिहिली असून तिच्या प्रेरणेने पुढे नामदेवांनी लोकसंघटनेचे कार्य पार पाडले.[९] प्रा. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी या विधानाला उत्तरही दिलेले होते. इस्लामी संकटाला मागे हटविण्यासाठी धार्मिक जागृतीशिवाय दुसरा पर्याय नव्हता म्हणून ज्ञानदेवांनी गीतेवर

निरूपण केले. प्रा. सहस्रबुद्धे यांनी विजयनगर व राजपुतांचा दाखला देऊन शस्त्र-बळाने इस्लामी आक्रमण हटविता आले असते व गीतेचे तात्कालिक प्रयोजन अर्जुनाला युद्धाला प्रवृत्त करणे हे आहे अशा गीतेवर ज्ञानदेवांनी भाष्य केले.[१०] असे डॉ. सहस्रबुद्धे म्हणत असले, तरी ज्ञानदेवांनी युद्धाला प्रवृत्त करणारा अर्जुन आणि कृष्ण स्वीकारलेला नाही; तर एक समचित्त आणि वैश्विक पातळीवरील मानवी जीवनाचा विचार ज्ञानेश्वरीत सतत प्रतीत होतो म्हणूनच 'स्वतंत्रता' किंवा 'आज्ञापक' या शब्दांचे अर्थ आध्यात्मिक दृष्टचा घेतले पाहिजेत. राजकीय दृष्टचा ते ज्ञानदेवांना अभिप्रेत होते असे नाही.

वस्तुत: चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या सामाजिक कार्याचे अवलोकन केले तर स्पष्टच दिसते की ईश्वर भक्तीच्या संदर्भात आणि मोक्षमार्गाच्या वाटेवर एका समान निष्ठेने दोघांनीही वाटचाल आरंभिली व पूर्णत्वास नेली. किंबहुना यादवकालीन संत मंडळाचे कार्य न्याहाळले तर मी–माझे, तू–तुझे इतकी मर्यादित ऐहिक भावना कोणत्याच साधुसंताने व्यक्त केलेली नाही. किंबहुना एका समष्टीच्या विचाराने आणि सामाजिक जाणिवांनाच आपल्या जाणिवा मानीत कार्यप्रवृत्त झालेले ते दिसतात. अशा वेळी 'परस्परांचे मैत्र' च त्यांच्या विचारातून व्यक्त होते. जर महानुभावपंथ आणि वारकरीपंथ यांना परस्परांना सतत विरोधी उभे राहायचे असते तर लिंगायत किंवा दत्तसंप्रदायाप्रमाणे त्याचेही रूप मर्यादित झाले असते. वास्तविक दोन्ही पंथातील लेखकांनी मराठी भाषेला आणि वाङ्मयाला जे गर्भ–श्रीमंत बनविले ते काही विरोधविकासातून नव्हे ! संतांच्या कार्याचा विचार करताना संत आणि समाज यांतील भावनिक नाते शोधावे लागते. समाज विशिष्ट पद्धतीचा होता, परिस्थिती अमुक प्रकारची होती म्हणून द्रष्टे पुरुष निर्माण होतात असे नाही; तर अंधाराला जे प्रकाशाचे महत्त्व ते समाजाला द्रष्टचा माणसाचे ! यादवकाळामुळे चक्रधर किंवा ज्ञानदेव निर्माण झालेले नसून त्यांनी आपल्या संघ-टनांना तात्त्विक अधिष्ठान दिले, हजारो लाखोंचा समाज आपल्यामागे नेला. समाजजीवनाला एक दिशा दाखविली आणि त्यातून एका मानवधर्माला आणि समतेला परिपुष्ट केले. हे त्यांचे खरे लौकिक दृष्टचा आणि आध्यात्मिक दृष्टचा सामाजिक कार्य आहे. वाङ्मयाच्या साह्याने आणि माध्यमातून ज्या भक्तिपंथात ही संतमंडळी होती त्यांनी यादवकाळात जन–जागृती घडवून आणली ही वस्तु-स्थिती विसरता उपयोगी नाही.

मराठी भाषा, गद्यपरंपरा, काव्यपरंपरा, चरित्र-आत्मचरित्र, दैनंदिनी, वृत्त-कथन, कथात्मकता, शास्त्रीय परिभाषा, व्याकरण, सूत्रभाष्य, संकलन संपादनाचे आदर्श चक्रधर आणि ज्ञानदेव यांनी ज्या पंथात राहून कार्य केले, त्यांनी घालून दिले व पुढिलांनी ते पुढे नेले. या आदर्शांमध्ये आजही घटनात्मक किंवा रूपांतरात्मक

बदल झालेला नाही. चक्रधर आणि ज्ञानदेव यांचे कार्य भिन्न भिन्न पातळीवरचे असूनही त्यांनी समाजाला सत्य आणि शिवाचा भक्तिमार्गप्रदीप दाखविला व समाजाचे मानसिक पुनरुत्थान घडवून आणले. ज्ञानदेव आणि महानुभावपंथ यांचे नाते असे आहे म्हणून ज्ञानदेव आणि महानुभावपंथ यांचा विचार करताना ज्ञानदेव व महानुभावपंथाचे अध्वर्यू चक्रधर यांची व्यक्तित्वे कशी घडत गेली ते बघितले पाहिजे.

चक्रधर आणि ज्ञानदेव

यादवकाळाच्या शेवटच्या दशकात दोन घटना घडल्या. एक म्हणजे महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधरस्वामी यांचे उत्तरापंथे प्रयाण शके ११९४ मध्ये झाले व ज्ञानदेवांचा जन्म शके ११९७ मध्ये झाला. मूळ गुजराथमधून चक्रधर आले असले तरी त्यांची कर्मभूमी महाराष्ट्रच होती. चक्रधर आणि ज्ञानदेव यांची जीवननिष्ठा लक्षात घेता आणि त्यातून घडत गेलेली त्यांची व्यक्तिमत्त्वे बघता या दोन्ही पंथप्रमुखांच्या लौकिक जीवनातील चढउतार आणि त्यातून व्यक्त झालेली त्यांची जीवनविषयक जाणीव विलक्षण प्रत्ययकारीपणे गोचर होते. चक्रधरांच्या ऐन तारुण्यात अत्यंत जिवलग अशा प्रिय पत्नीने आपल्या उत्कट प्रेमापेक्षा द्रव्याला महत्त्व द्यावे, ऐहिकांत सुख मानावे या गोष्टींचा परिणाम होऊन त्यांची वृत्ति-प्रवृत्ती बदलली. जीवनविषयक अंतिम मूल्यांचा हिशोब मांडला जाताच चक्रधर अन्तर्मुख होऊन रामटेकच्या यात्रेला गेले ते पुन्हा परत फिरले नाहीत. सालबर्डीच्या डोंगरावर व इतर अनेक ठिकाणी वास्तव्य करीत शके ११८५ मध्ये त्यांनी पैठणला येऊन संन्यास घेतला. भारतीय संस्कृतीत संन्यास हा मानवाचा अंतिम आश्रम समजला जातो. तेथूनच पुढे आठ नऊ वर्षे सतत विहरण करीत गावागावांतून, वस्त्यावस्त्यांतून ते भटकले. याच वेळी त्यांनी महानुभाव पंथाची रचना, संघटना आणि प्रचार, प्रसार आरंभिला. जीवनाच्या पूर्वार्धात आणि एकांतकाळातही ऐहिक सुखोपभोग चक्रधरांनी घेतले होते, विवाह केले होते, राजभोग स्वीकारले होते. यातून बाहेर पडून ते निःसंग बनले. संन्यास स्वीकारल्यावरही त्यांनी दोन विवाह केल्याची नोंद लीळाचरित्र देते. परिभ्रमणात आपल्या विचारांना द्वैताचे तात्त्विक अधिष्ठान त्यांनी दिले व जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार संकल्पना निश्चित केल्या. जीव व ईश्वर यांची एकरूपता शक्य नाही, जर जीवाला मोक्षप्राप्ती अपेक्षित असेल तर सगुणोपासनेतून त्याला ती शक्य आहे असे ते सांगत. अहिंसा, निवृत्तिपर संन्यास, स्पृश्यास्पृश्यामधील अभेद, स्त्रीपुरुष समानता या मूलभूत मानवी जीवनातील मूलगर्भ तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी केला व आपल्या विचारांचा कायमचा ठसा (imprint) महानुभाव संप्रदायावर ठेवला.

ज्ञानेश्वरांच्या जीवनातील संघर्ष हा चक्रधरांसारखा आत्मसंघर्ष नव्हता, तर समाजाशीच त्यांना सतत संघर्ष करावा लागला. कुलपरंपरेने ब्राह्मण्य मिळूनही ' संन्याशाची मुले ' हा शाप चारही भावंडांना जीवन जगणे अशक्य करणारा ठरला. जीवन व्यवहारातील सारीच द्वारे बंद झाल्यामुळे ज्ञानदेवांना शुद्धिपत्रासाठी जावे लागले तेही पैठणलाच. चक्रधरांनी घेतलेला संन्यास आणि ज्ञानदेवांनी मिळविलेले शुद्धिपत्र हे पैठणचे स्थळमाहात्म्य लक्षात घेता; संवेदनशील अशा मनांचा झालेला कोंडमारा आणि त्यातून त्यांची बनत गेलेली वृत्तिप्रवृत्ती यांचे आत्मबल चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या दयार्द्र, सहृदय आणि विश्वकल्याणात्मक भूमिकेमागे असलेले बीजकेंद्र होय. चक्रधरांनी पुरस्कृत केलेले तत्त्वज्ञान उत्स्फूर्त होते, नवे होते; पण त्यातील जटिलताच त्याच्या प्रसाराला मारक ठरली. उलटपक्षी ज्ञानदेवांनी अद्वैत तत्त्वज्ञानात मायावादाचा निरास करीत आणि चिद्‌विलासाचा प्रत्यय देत आपले निरूपण अधिक सर्वंकष पद्धतीने मांडले. जीव ,जगत् आणि ईश्वर या संकल्पनांच्या संदर्भात चक्रधर आणि ज्ञानदेव यांच्या मनोभूमिकांत फरक होता, तसा त्यांच्या मानवकल्याणाच्या बाबतीत नव्हता. म्हणूनच वारकरी पंथाला द्वैत स्वीकारणारा महानुभाव पंथ हा सर्वार्थाने अधिक जवळचा होता.

तरीही मोक्षमार्गाकडे समाजाला घेऊन जात असता मीच ईश्वर आहे ही व्यक्तिवादी भूमिका चक्रधरांनी महानुभावपंथाला दिली. ' गोसावी ईश्वरु ' (उत्तरार्ध ली. च. २६९) 'आपणेयासि ते ईश्वर म्हणावितातिं' (उत्तरार्धः ३४३) मीच ईश्वर आहे ही चक्रधरांची स्वतःविषयीची भूमिका त्यांनी पंथीयांना स्वीकारावयास लावल्यामुळे चक्रधर आणि पंथीय यांमधील भावनिक नाते ज्ञानदेव आणि वारकरी यांच्यातील भावनिक नात्यासारखे राहाणे शक्य झाले नाही.

ज्ञानदेवांनी अध्यात्माच्या क्षेत्रात ईश्वराच्या सगुणनिर्गुण रूपाच्या अवलोकनात तफावत केलेली नाही. किंवा स्वतःला प्रतिईश्वर मानले नाही. आध्यात्मिक स्वरूपाच्या एका समर्थ लोकशाहीचा पाया ज्ञानदेवांनी घातला. जीवन व्यवहारातील वर्णद्वेषाची जातीजातीतील तरतमभावांची मर्यादा ज्ञानदेवांच्या लोकशाहीला बंदिस्त करू शकली नाही. त्यासाठी मातंगाच्या हातचे लाडू खाण्याची गरज काय ? आत्मोद्धार, आत्मविकास आणि आत्माविष्कार यामधील व्यक्तिमत्त्वांच्या स्वयंभूपणाला कुठेही ढळ न येऊ देता ज्ञानदेवांनी वारकरीपंथाला आपल्या वाङ्मयनिर्मितीतून तात्त्विक बळ आणि लोकसन्मुखता मिळवून दिली. दैनंदिन व्यावहारिक जीवन जगत असतानाच भक्तिमार्गाच्या साहृयाने ज्ञानासह मोक्षापर्यंत जाता येते हे ज्ञानदेवांनी स्वतः सिद्ध करून दाखविले. ज्ञानदेवांनी महाराष्ट्रातील धर्मविचाराला एक गतिशील रूप दिले. परंपरेने चालत आलेल्या वारकरीपंथाला तात्त्विक अधिष्ठान देऊन अधिक भरीवपणा मिळवून दिला. घराघरांतून आणि गावागावांतून

एका उत्कट तळमळीने आणि भक्तिभावाच्या प्रेरणेने प्रपंची राहूनही परमार्थाकडे सहजसुलभ जाण्याचा मार्ग वारकरीपंथाला जो मिळाला, तो ज्ञानदेवांच्या आत्मानुभवातून ! ज्ञानदेव सतत वारकरी पंथाबरोबर राहिले. ‘ ज्ञानाचा एका ’, ‘ नाम्याचा तुका ’ वारकरी पंथात निर्माण होऊन संप्रदाय, तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांना वेगवेगळ्या शतकांत अनेक विचारधारा येऊन मिळत गेल्या व वारकरीपंथ व त्याचे वाङमय जिवंतपणे साक्षात झाले. आत्माविष्काराला बंधने आली नाहीत. ज्ञानदेवांनी स्वत:कडे ईश्वरीपण न घेतल्यामुळे अनेकांतील आपण एक आहोत असे भान सतत ठेवीत; कधी तत्त्वनिरूपण करीत, तर कधी आत्माविष्कार करीत समाजासमोर कथाप्रवचनांच्या आणि कीर्तनपरंपरेच्या आधाराने जनजागर केला म्हणून त्यांच्या वाङ्मयाला श्रवणसुभगतेचे लेणे मिळाले. नामदेवाबरोबर ज्ञानदेवांनी केलेली तीर्थयात्रा आणि घेतलेले विविध जीवनानुभव यांचे लक्षणीय प्रतिबिंब दोघांच्याही वाङ्मयात पडले आहे. वारकरीपंथाच्या छत्राखाली सर्व संतमेळा एकत्र आला असता त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि आत्माविष्काराचे स्वातंत्र्य ज्ञानदेवांनी हिरावून घेतले नाही. एक मुक्त आत्मक्रीडा आणि आत्मोद्‌गारी भावानुभवांची अभिव्यक्ती उत्स्फूर्त अशा अभंगवाङ्मयातून प्रतीत होते. महानुभाव पंथाच्या लेखकांना असे व्यक्तिस्वातंत्र्य नव्हते किंवा आत्माविष्काराचेही स्वातंत्र्य नव्हते. पंचकृष्णांपैकी एक पूर्णावतारी व उभयदृश्यावतारी चक्रधर हा विषय व त्यांची विविध पद्धतींनी केलेली लीळागुणवर्णने करणे पंथीय शिस्तीला धरून होते. मानवीरूपात असलेल्या ईश्वराकडून मोक्षप्राप्तीची अपेक्षा पंथीयांना ठेवावी लागली. चक्रधरांनी पुरस्कारिलेल्या पंथाची खरी संघटना नागदेवाचार्याने बांधली व पंथीयाकडून वाङ्मयनिर्मिती करवून घेतली.

चक्रधरांच्या उत्तरापंथे गमनानंतर त्यांच्याविषयी वाटणारा विरह कमी व्हावा म्हणून लीळाचरित्राची निर्मिती झाली, आणि हा ग्रंथ महानुभावपंथाच्या तत्त्वज्ञानाचा आणि चक्रधरोक्तीचा बीजग्रंथ मानला गेला. आठनऊ वर्षांच्या भ्रमणातील सूत्ररूपभाष्य आणि आचारदीक्षा चक्रधरांच्याबरोबरच्या पंथीयांनी आठवणीतून एकत्र आणली व त्या लीळांचे संकलनसंपादन नागदेवांच्या देखरेखीखाली माइंभट्टाने केले. यावरून चक्रधरोक्ती पंथीयांच्या आठवणीतून आलेली आहे, तर ज्ञानदेवांनी अभिजात वाङ्मयनिर्मिती केली. ज्ञानदेवांनी जे जे अनुभवले, वैयक्तिक दृष्टिकोणातून बघितले, ते ते आपल्या प्रासादिक वाणीतून मांडले व त्याचा परिणामही डोळसपणे न्याहाळला. उलट चक्रधरोक्ती आठवणीतून आल्यामुळे एक विभूतीवादी दृष्टिकोण प्रबळ ठरला. महानुभाव लेखक पंडिती विद्वान असूनही त्यांनी चक्रधरांच्याच विचारांची व्यवस्था लावण्याचा, संकलन, संपादन करण्याचा आणि ते विचार अधिक नीट कळावे म्हणून सूत्रभाष्य, व्याकरणशास्त्र,

टीका, टिप्पणी तयार केल्या म्हणजे त्यांची विद्वत्ता, पांडित्य अखेर चक्रधरांना शरण गेले. त्यात नवी काही भर घालणे, आत्माविष्कार करणे पंथीय दृष्टीला मान्य झाले नाही. त्यामुळे पंथाला काळाबरोबर वाटचाल करता आली नाही व सांकेतिकतेमुळे महानुभाव पंथ अधिकच बंदिस्त झाला. अल्लाउद्दिन खिलजीची स्वारी होताच महानुभावांची जी पळापळ झाली किंवा ज्या सांकेतिक लिप्या त्यांना आपले धर्मग्रंथ जपून ठेवण्यासाठी निर्माण कराव्या लागल्या, तशी अवस्था वारकरी पंथाची झालेली दिसत नाही. 'इतुकियावरी तुरकान आले तै सकु सोळा मन्मथ संवत्सरे : एक वेळ दिल्लीचा सुलतान चाळीला अवघे मंडळ हालविले'[११] अशी अवस्था वारकऱ्यांची झालेली नाही. उलटपक्षी आपल्या पदरचे विविध भावानुभव वाङ्मयात घुसडून देऊन नामदेवाची गाथा, ज्ञानदेवांची अभंग-गाथा फुगविल्या गेल्या ही वस्तुस्थिती वारकरी पंथ व महानुभाव पंथ यांतील वाङ्मयनिर्मितीमागील भूमिकेवर प्रकाश टाकते. चक्रधर म्हणजे महानुभावपंथ व महानुभावपंथ म्हणजे चक्रधर इतके बंदिस्त रूप पुढील काळात या पंथाला आले. चक्रधर भाष्यामुळे मराठी गद्याची पायाभरणी झाली; पण मतामतांचे हुंकार जसे प्रत्येक शतकात वारकरी पंथाच्या कवितेतून ऐकू येतात तसे महानुभाव वाङ्मयातून ऐकू येत नाहीत इतके ते निष्क्रिय (Stagnant) झाले.

लोकमान्य टिळकांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, "महाराष्ट्र देशात दहाव्या शतकाच्या सुमारास किंवा त्यापूर्वी जी काही धर्मोन्नतीकडे लोकांची प्रवृत्ती झाली तिचेच महानुभाव पंथ हे पहिले फळ आहे आणि इतर पंथांप्रमाणे जर हा पंथ आज आपल्या विशेष नजरेस पडत नसला तर त्याचे कारण या पंथाचे खरे पुढारी म्हणजे संन्याशाचे मेळे व त्यांचे महंत हे आपला धर्म प्रसृत करण्याची विशेषशी आस्था न करता जो आपल्याकडे खुशीने येईल त्यासच दीक्षा देऊन आपापल्या मोक्षप्राप्तीच्या कामात निमग्न असतात एवढेच होय. साधुसंतांच्या वारकरीपंथापेक्षा याची योग्यता काही कमी नाही, इतकेच नव्हे तर त्यापेक्षा काही वर्षांनी तरी तो जुना असावा हे निर्विवाद होय"[१२] लोकमान्यांनी महानुभावपंथाला काही वर्षांनी जुने ठरविले असले तरी शके ११८५ पूर्वी काही तो अस्तित्वात नव्हता आणि वारकरी पंथाची मूळ पूर्वपीठिका नाथपंथातून प्रगट झाली आहे. नाथपंथाचे एक विकसित रूप वारकरी पंथात दिसते. त्यामुळे त्याची पाळेमुळे परंपरेत खोलवर रुजली गेली आहेत. चक्रधरांचे गुरू आणि आजे गुरू नाथपंथी होते; इतकेच नव्हे तर बालोन्मत्त पिशाच्चवत वर्तन करणारे गुंडमराऊळ हे नाथ-योग्याचे एक प्रातिनिधिक रूपच होते; आणि दुसरी एक साम्याची गोष्ट म्हणजे जैनांचे गुरू महावीर आणि गुंडमराऊळ यांचा जन्मही 'दवडणे' या पद्धतीनेच झालेला आहे. ज्ञानदेवांची गुरुपरंपरा नाथपरंपराच स्वीकारणारी दिसते.

'श्री ज्ञानेश्वर आणि महानुभाव' यांच्या संदर्भात डॉ. य. खु. देशपांडे यांनी "शके ११९५ पूर्वी ८–९ वर्षेच जरी महानुभावपंथाचे प्रसाराचे कार्य श्री चक्रधरस्वामींनी केले तथापि महानुभावीयपंथाच्या तत्त्वांचा प्रसार व्हावयास तत्पूर्वी १००–१२५ वर्षांपासून सुरुवात झाली होती आणि महानुभावीय वाङ्मय निर्माण व्हावयास ५०–७५ वर्षांपासून प्रारंभ झाला होता.[१३]" डॉ. देशपांडे यांचे हे विधानही पारखून घ्यावे लागेल. कारण चक्रधरांनी महानुभावपंथ प्रसाराचे कार्य ८–९ वर्षे केले असले तरी त्यांच्या काळानंतर पंथाला संघटनात्मक रूप पुढील आचार्यांनी दिले आहे. तसेच या पंथाने पुरस्कृत केलेली तत्त्वे तत्पूर्वी १००–१२५ वर्षांपूर्वीपासून होती; याही विधानाचा अर्थ इतकाच की संन्यास, जीवईश्वरातील द्वैतवाद, अहिंसाधर्म पालन, जातिव्यवस्थांचे उच्चाटण, कर्मकाण्डाचा त्याग ही तत्त्वे बौद्ध, जैन आणि लिंगायत या धर्मांमधून पूर्वीच आलेली होती. बौद्ध व जैन हे वैदिक धर्माविरुद्ध प्रथम बंड पुकारणारे दोन धर्म आहेत. हिंसात्मक व कर्मकाण्डात्मक वैदिक धर्म मान्य नसल्यामुळे गौतमबुद्ध व महावीर यांनी बौद्ध व जैन धर्माची स्थापना केली. आर्यांनी दक्षिणेत वसाहत करण्यापूर्वीच्या आणि नंतरही जैनधर्माचे अनुयायी महाराष्ट्रात आले आणि गुजराथच्या उत्तरेस वस्ती करून राहू लागले. चालुक्यकाळी (इ. स. ५५०–७५३) जैनधर्माचा मांडलिक राजांवर स्वतः हिंदू असूनही प्रभाव पडलेला दिसतो. जैनपंडित साधू व कवी हेही गुजराथेत येऊन स्थायिक झाले होते. त्यांच्या विचारांचा परिणाम पिढ्यानुपिढ्या गुजराथेत असलेला दिसतो. चक्रधरांचा जन्म राजघराण्यात झाला असून ते मूळ गुजराथी आहेत. बौद्ध, लिंगायत किंवा माध्वविचारांपेक्षा जैनधर्म विचारप्रणालीला स्वीकारणारी अशी चक्रधरांची विचारसरणी दिसते. म्हणून जैनांचा विशेष प्रभाव चक्रधरांच्या विचारावर असलेला स्पष्ट होतो.

वारकरी पंथ व महानुभाव पंथ – साम्य

बहुजन समाजाच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी वारकरी व महानुभाव पंथ झटलेले होते. आत्मोद्धाराचे साधन लोकभाषेच्या साह्याने सर्वसाधारण समाजाला उपलब्ध करून देण्यात दोन्ही पंथांचे समान उद्दिष्ट होते. महानुभावांची द्वैतावर, तर वारकऱ्यांची अद्वैतावर निष्ठा असूनही ज्ञानोत्तर भक्तिसाधना हेच आत्मोद्धाराचे अंतिम साध्य दोन्ही पंथांनी मानले. भागवत आणि भगवद्गीता ही दोन्ही पंथांच्या लोकांना निरुपणासाठी महत्त्वपूर्ण वाटली होती. मूळ धर्मग्रंथ एकच. मुक्तीच्या साधनात समानता, सत्संग, गुरुसेवा, नामस्मरण, सगुणोपासना यावर दोन्ही पंथांनी भरच दिला होता. बोलीभाषेच्या संदर्भातही दोन्ही पंथांचे धोरण अधिक उत्कट होते. महानुभाव पंथाने तर मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान दिले, तर वाङ्मयातील विविध प्रकारांची सातत्याने मराठीतून निर्मिती केली होती. तरीही

महानुभावपंथाविषयी कटुता का निर्माण झाली व हळुहळु तो पंथ अप्रिय का ठरला याची कारणमीमांसा अनेकांनी केली आहे ती योग्यच आहे.

ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ

ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ यांच्या संदर्भात विचार करता चक्रधरांनी पुरस्कृत केलेल्या महानुभावपंथात निवृत्तीवर आत्यंतिक भर, विक्षिप्त व कठीण आचारधर्म ! 'स्वदेश, स्वबंधु, स्वग्राम त्याज्य : संबंधियाचा संबंधु तो विशेषतः त्याज्य' अशी एकांगी दृष्टी व 'चित्रीची स्त्री न पहावी' व 'निरसे विरसे अन्ने सेविजिती,' 'मसनीचे वस्त्र घेणे' असा संन्यास मार्ग व आत्यंतिक वैराग्याने आणि आत्मक्लेशाने जीवन कंठण्याचा मार्ग सांप्रदायिकांना क्लेशदायक होणे अशक्य नव्हते. याउलट 'आता गृहादिक आघवे । ते काही नलगे त्यजावे' अशी ज्ञानदेव समज देतात. एक उदार आणि सर्वात्मक दृष्टिकोणामुळे ज्ञानदेवांनी इच्छामरण स्वीकारूनही वारकरी पंथात पोकळी निर्माण झाली, असे दिसत नाही. उलट जोपर्यंत महानुभावांच्या वाङ्मयातून चक्रधरोक्ती व्यक्त होत होती तोपर्यंत ते काही प्रमाणात जिवंत होते; पण हळूहळू काळाबरोबर महानुभाव संघटनेचा आणि वाङ्मयाचा नाही म्हटले तरी संकोच होऊ लागला तो पंधराव्या, सोळाव्या, सतराव्या शतकापर्यंत !

तत्त्वज्ञानाची गुंतागुंत, आचारधर्मातील आत्मक्लेश, आचारधर्म हेच एक कर्मकाण्ड, सांप्रदायिकतेचा वाढता प्रभाव आणि समाजापासून दूर जाण्याची वृत्ती यामुळे सुलभ, प्रवाही, गतिशील, जीवनसन्मुख, समन्वयवादी अशा ज्ञानदेवांच्या वारकरी पंथापुढे महानुभाव पंथ बळ धरू शकत नाही. वाङ्मयातसुद्धा यादव काळात जे महानुभाव वाङ्मयाला रूप होते ते पुढील काळात राहिले नाही, तर अधिकच सांकेतिकता त्यात आली.

'उद्धरेत् आत्मनात्माऽनम्' या भूमिकेतून चक्रधर आणि ज्ञानदेव यांनी सुरू केलेले समाजप्रबोधनाचे कार्य ज्ञानदेवांना समृद्धपणाने करता आले तर चक्रधरांच्या संदर्भात मात्र-शिष्यात् शिष्ये पराजयम्-अशी अवस्था झाली ती त्यांच्या व्यक्तिवादी व कैवलवादी भूमिकेमुळेच ! यादवकाळात वरीलप्रमाणे दोन परस्परविरुद्ध पण अंतिम ध्येय एकच असलेल्या विचारधारा विकसित झाल्या, प्रवाही झाल्या व त्यांनी समाजालाही आपल्यापाठी नेले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जसे लोकमान्य टिळकही समाजाला हवे होते व आगरकरही हवे होते, त्याप्रमाणे यादवकाळात चक्रधर आणि ज्ञानदेव दोघेही हवे होते.

निष्कर्ष

(१) ज्ञानदेव आणि महानुभाव पंथ यांचा विचार करता लोकोद्धाराच्या, ईश्वरभक्तीच्या आणि मोक्षमार्गाच्या वाटेवर एका समांतर निष्ठेने ज्ञानदेव व

महानुभावपंथीय यांनी वाटचाल आरंभिली होती; पण त्यांचे अंतिम रूप तसे राहू शकले नाही.

(२) ज्ञानदेवांचे लोकोत्तरत्व स्वत:सिद्ध असून कोणत्याही पंथाविषयी त्यांनी नाराजी व्यक्त केलेली नाही. कारण त्यांचे मन एका कलावंताचे मत होते व त्यांच्या डोळ्यापुढील मानवजात ही केवळ समकालीन किंवा केवळ भोवतालची होती असे नाही. तर 'वसुधैव कुटुम्बकम्' अशी तत्त्वचिंतकाची भूमिका ज्ञानदेवांच्या वाङ्मयातून प्रतीत होते. या संदर्भात चक्रधरांच्या तत्त्वज्ञानाला परंपरेचा आधार नाही. ज्ञानाचा एका किंवा नामाचा तुका ही परंपरा वारकरी पंथात निर्माण झाली व तत्त्वज्ञानाची जिवंत वाढ व सुसंगती पेशवेकाळापर्यंत टिकून राहिली. चक्रधरांना अभिप्रेत नसलेली आत्यंतिक क्लिष्टता नंतरच्या पंथीयांनी तत्त्वज्ञानाला आणि आचारधर्माला दिली.

(३) ज्या डोळसपणे आणि मानवतेच्या दृष्टिकोणातून चक्रधरांनी पंथाची स्थापना आणि आचारधर्माची संहिता निर्माण केली, त्यातील अचूकता नंतरच्या पंथीयांना लक्षात घेता आली नाही व चक्रधरांचा दृष्टिकोण पेलू शकेल असा द्रष्टा महानुभाव पंथाला मिळाला नाही.

(४) चक्रधरांनी मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान मिळवून दिले. तिची अस्मिता जागवली. पण त्यांच्या शिष्यांनी मात्र भाषा मराठी पण विषय आणि आशयाचे अनुकरण संस्कृत परंपरेने केले. महानुभाव कवितेतील मूर्तिवर्णने लक्षात घेतली तरी ही गोष्ट स्पष्ट होईल.

(५) ज्ञानेश्वरीनंतर महानुभावांची काव्यनिर्मिती धवळ्यांचा अपवाद वगळता झाली आहे, त्यातही ज्ञानेश्वरीशी ओळख असल्याच्या कितीतरी जागा स्पष्ट दाखविता येतात. पण विषयव्याप्तीसाठी विस्तार करीत नाही. जिज्ञासूंनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचा ज्ञानेश्वर विशेषांक बघावा. 'साधु दिसती वेगळाले : परि ते स्वरूपी मिळाले' या लेखात ज्ञानेश्वरीचा दाट परिणाम साती ग्रंथावर कसा पडला आहे हे स्पष्ट केले आहे.

(६) चक्रधर आणि ज्ञानदेव यांचे कार्यकर्तृत्व क्रिया प्रतिक्रियात्मक नसून अंतिम एकाच ध्येयाप्रत जाणारे हे दोन तत्त्वज्ञ होते. त्यातही ज्ञानदेव तत्त्वचिंतक कवी होते. त्यांनी आपापल्या पंथांना केलेले मार्गदर्शन आणि त्यातून त्या पंथांना आलेले स्वरूप वेगळे, स्वतंत्र आहे, भिन्नमार्गी आहे.

---

१. चक्रधर आणि ज्ञानेश्वर १९५० पृष्ठ १५. डॉ. वि. भि. कोलते.

२. श्रीचक्रधर चरित्र १९५२ पृष्ठ १७. डॉ. वि. भि. कोलते

३. रविवारची लोकसत्ता १० फेब्रुवारी १९७४
४. श्री चक्रधरचरित्र–पूर्ववृत्त पृष्ठ ९, १०.
५. नागदेवस्मृति : ८६
६. नागदेवस्मृति : १७३
७. Ethnographical Survey of Bombay 1909 Honograph 131: अनुवाद भास्कर महानुभाव पुणेकर.
८. Prof. W. B. Patwardhan, Wilson Philological Lectures 1917.
९. ज्ञानेश्वर : वाङ्मय आणि कार्य : पृष्ठ : ४६. प्रा. न. र. फाटक.
१०. माझे चिंतन : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे : पृष्ठ ५३.
११. स्मृतिस्थळ : ८३–८७.
१२. केसरी १८९९.
१३. ज्ञानेश्वरदर्शन भाग १, शके १८५६, पृष्ठ १४०.

卐 卐 卐

देव निवृत्ति यांनी धरिले दोन्ही करा । जातो ज्ञानेश्वर बैसावया ॥ १ ॥
नदीचिया माशा घातलें माजवण । तैसें जनवन कालवलें ॥ २ ॥
दाही दिशा धुंद उदयास्तावीण । तैसेंची गगन कालवलें ॥ ३॥
जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥ ४ ॥
ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा । पादपद्मीं ठेवा निरंतर ॥ ५ ॥
तीन वेळां तेव्हां जोडिलें करकमळ । झांकियेले डोळे ज्ञानदेवें ॥ ६ ॥
भीममुद्रा डोळा निरंजन सैदान । झाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव ॥ ७ ॥
नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्त ॥ ८ ॥

ज्ञानदेव व वारकरी संप्रदाय

श्री. भा. पं. बहिरट, पंढरपूर

(१) ज्ञानदेवांच्या चरित्राचे संशोधन करणे महत्त्वाचे आहे. त्यांच्या जीवनात घडलेल्या बाह्य घटना – त्यांचे पूर्वज, त्यांचा जन्मशक, जन्मस्थळ, ग्रंथलेखनाचा कालानुक्रम, समाधिकाल वगैरे गोष्टींची माहिती उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. पण एवढ्यावर संशोधनाची रेषा थांबणे योग्य नाही. ज्ञानदेव हे श्रेष्ठ संत होते. ते पूर्ण ज्ञानी, पूर्ण योगी व पूर्ण भक्त होते. तेव्हा त्यांच्या जीवनातील परतत्त्वस्पर्शी अनुभवाचे स्वरूप कोणते होते याचेही संशोधन अत्यंत महत्त्वाचे आहे. या अंतरंग परिचयावाचून त्यांचे जीवितकार्य किती मोलाचे होते हे समजणार नाही. त्यांच्या जीवनातील या तत्त्वस्पर्शी अनुभवांतूनच त्यांचा वारकरी संप्रदायाशी काय संबंध आहे याची स्पष्टता होऊ शकेल. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातील श्रेष्ठ असा भक्तिसंप्रदाय आहे. ज्ञानदेव हे त्याचे अध्वर्यू आहेत. एकनाथ, नामदेव, तुकारामादि संत ज्ञानदेवांच्या पुढे नतमस्तक होऊन त्यांना माउली म्हणून गौरवितात. लक्षावधी वारकऱ्यांच्या मुखी 'ज्ञानेश्वर माउली' चा नामघोष दुमदुमून राहिला आहे. तेव्हा ज्ञानदेवांचा वारकरी संप्रदायाशी, तिची देवता विठ्ठल हिच्याशी असलेला संबंध वरवरचा आहे की जिव्हाळ्याचा व अत्यंत निकटचा आहे हे समजून घेणे अगत्याचे आहे. या समजण्यामुळे ज्ञानदेवांच्या महान् व उत्तुंग व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडण्याजोगा आहे. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायाच्या मूलभूत गोष्टीवर, त्यांच्या आचारविचारांचा दृढ असा जो पाया तो समजण्यास सहाय्य होणारे आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया' या वचनाची सार्थकताही प्रत्ययास येणारी आहे. वारकरी संप्रदायाशी संबंध ही ज्ञानदेवाच्या जीवनातील प्रधान व महत्त्वाची घटना आहे. तेव्हा तिचे अंतरंग समजून घेण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

(२) नामदेव हे ज्ञानदेवकालीन श्रेष्ठ संत होत. त्यांनी वारकरी संप्रदायाचा हिरीरीने पुरस्कार केला. नामदेवांच्यामुळे ज्ञानदेवांचा वारकरी संप्रदायाशी व भक्तिमार्गाशी संबंध आला. ते मूळचे ज्ञानी व योगी पण नामदेवांच्या संगतीत त्यांना भक्तीची थोरवी लक्षात आली असे मत काही लेखक मांडीत असतात. या

मताचा प्रथम परामर्श घेणे उचित आहे. नामदेवांची जीवनकथा त्यांनीच वर्णिली आहे. त्यावरून त्यांच्या प्राथमिक अवस्थेत असणारी भक्ती संकुचित स्वरूपाची होती. तिचा ते अभिमान बाळगीत होते. संतांच्या मेळाव्यात गोरोबा कुंभारांनी प्रत्येकाची परीक्षा घेतली, तेव्हा नामदेवांचे मडके कच्चे आहे असे त्यांनी ठरविले. पुढे नामदेवांना विसोबा खेचरांनी गुरुपदेश केला. त्यानंतर नामदेवांची भक्ती अधिक सखोल व व्यापक बनली. ' खेचर विसा प्रेमाचा पिसा। तेणे नामा कैसा उपदेशिला ॥ असे नामदेव सांगतात. ' माझे सुख मज दावियेले डोळा । दिधली प्रेमकळा । ज्ञानमुद्रा ॥ ' खेचरांनी नामदेवांना ज्ञानमुद्रेसह प्रेमकळा दान दिली. ही प्रेमकळा खेचरांना ज्ञानदेवाकडून प्राप्त झाली. ' मग म्हणे खेचरु । मज ज्ञान हेचि गुरु । तेणे अगोचरु । नामा केला ॥ ' तेव्हा नामदेवांना ज्ञानदेवाकडूनच परंपरेने उन्नत प्रेमकळा लाभली. ज्ञानदेवांना नामदेवाकडून ती मिळाली असे नव्हे. नामदेव हे ज्ञानदेवाचे प्रशिष्यच ठरतात. ज्ञानदेवांच्या भक्तिविषयक अनुभवांचा अगर विठ्ठलप्रेमाचा उगम अन्यत्र शोधला पाहिजे. तीर्थावळीचे अभंगात ज्ञानदेवांनी नामदेवाच्या भक्तिप्रेमाचा गौरव केला आहे. ' पंढरीरायाचा तू प्रेमभांडारी । आशा पूर्ण करी मज याचकाची ' असे म्हणून ज्ञानदेव नामदेवास भक्तीचे वर्म सांगण्यास विचारतात, याचा अर्थ ज्ञानदेवांना ते माहीत नव्हते असे नव्हे; तर प्रेमळाशी संवादसुखाची रुची घ्यावी व आपल्या आवडत्या गोष्टीविषयी बोलून त्याचा आनंद पुन्हा पुन्हा चाखावा ही त्यांची भूमिका आहे. ' पढियंते सदा तेचि । परि भोगी आर्थी नवी रुची ।' असे ज्ञानदेवांनी अनुभवामृतात म्हटल्याप्रमाणे स्थिती असते. आवडती गोष्ट तीच असली तरी तिचा वरचेवर सुखानुभव घ्यावा ही सहज प्रवृत्ती असते.

(३) पंढरपूरचा विठ्ठल व त्याचा आद्य भक्त पुंडलिक यांचा काल निश्चित नाही स्कंद व पद्मपुराणात पुंडलिकाची कथा आली आहे; पण पुराणरचनेचा काल अनिश्चित व त्यात काही कथा मागाहून समाविष्ट केलेल्या. शंकराचार्यांचे पांडुरंग स्तोत्र आद्य शंकराचार्यांचेच की नंतरच्या, असा संशय. राष्ट्रकूट अविधे याने जयद्विद ब्राह्मणास पांडुरंग पल्लीदान दिल्याचा इ. स. ५१६ च्या ताम्रपटाचे वाचनातच मतभेद असा प्रकार आहे. खुद्द ज्ञानदेव नामदेव यांच्या अभंगावरून विठ्ठलाचे अस्तित्व त्यांच्या म्हणजे तेराव्या शतकाच्या अगोदर अनेक शतके अस्तित्वात असावे असे दिसते. ' हे नोहे आजिकालिचे । युगे अठ्ठाविसाचे ' असे ज्ञानदेव म्हणतात. तर ' युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ' असे नामदेव म्हणतात. याज्ञवल्क्य स्मृतीत (१–९६) युग याचा अर्थ पिढी असा दिला आहे. तो स्वीकारल्यास २८ युगे म्हणजे २८ पिढ्या होतात. २५ वर्षांची पिढी धरल्यास ७०० वर्षे होतात. पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरातील तुळईवरचा श. ११५९ चा शिलालेख, श. ११९५ चा

चौऱ्याऐंशीचा लेख विठ्ठलाची महाराष्ट्रभर व दक्षिणेत ज्ञानदेवपूर्वकालीन झालेल्या प्रसिद्धीची साक्ष देतात. वारीची प्रथाही ज्ञानदेवपूर्वकालीनच होती. ज्ञानदेवांचे वडील वारीस गेल्याचे नामदेव सांगतात. हेब्बळीच्या कानडी शिलालेखात (श. ११७०) वारीचा निर्देश आहे. ज्ञानदेवपूर्वकालीन विठ्ठलदेवता, तिची उपासना, वारी म्ह. नियमित जाऊन दर्शन घेणे वगैरे चालू होते. ज्ञानदेवांनी या मूर्तीत व तिच्या भक्तीत एक निराळाच आशय ओतला. नाथपंथातून योगाच्या जोडीस मिळालेल्या अत्युच्च प्रेमभक्तीच्या स्वानुभूतीवर तो आधारला व त्यांनी पूर्वी चालत आलेला विठ्ठलभक्तीचा गाभारा दैदीप्यमान केला; वारीला व नामस्मरण, संकीर्तन यांनाही अत्यंत उज्ज्वल प्रेमसाधनेचे रूप दिले.

उत्तर हिंदुस्थानातील विद्वान हिंदी लेखकांनी नाथ संप्रदाय म्हणजे केवळ योगसंप्रदाय असे विवेचन केले आहे. ही त्या संप्रदायाची एक बाजू होय. निवृत्तिनाथादि महाराष्ट्रीय संतांनी त्यात नुसती योगसाधना नसून प्रेमभक्ती साधनाही होती अशी साक्ष दिली आहे. निवृत्तिनाथांचा ही परंपरा सांगणारा अभंग महत्त्वाचा आहे.

आदिनाथ उमा बीज प्रगटले । मछिंद्रा लाधले सहजस्थिती ।।
तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्णकृपा केली गहिनीनाथा ।।
वैराग्ये तापला सप्रेमे निवाला । ठेवा जो लाधला शांतिसुख ।।
निर्द्वंद नि:संग विचरता मही । सुखानंद हृदयी हेलावला ।।
निवृत्ति गहिनी कृपा केली पूर्ण । कुल हे पावन कृष्णनामे ।।

या अभंगात ‘ प्रेममुद्रा ’ ‘ सप्रेमे निवाला ’ ‘ कृष्णनामे ’ हे शब्द महत्त्वाचे आहेत. गोरक्षास ‘ प्रेममुद्रा ’ मिळाली तीच पुढे गहिनी व निवृत्तींना व नंतर ज्ञानदेवांना मिळाली. नाथपंथात योगमुद्रेच्या जोडीस ‘ प्रेममुद्रा ’ होती; म्हणजे योगानुभवाच्या प्रवाहाबरोबर प्रेमानुभूतीचा प्रवाह परंपरेने वहात होता; या प्रेमानुभूतीचेच नाव प्रेममुद्रा. या प्रेममुद्रेचा आविष्कारच नामस्मरण. गिरीजेच्या कानात आदिनाथांनी रहस्य सांगितले ते नामच होय हे नामदेवांनीच कथन केले आहे.

जे शंभूनें धरिले मानसी । तेचि उपदेशिले गिरिजेसी ।
नाम बरवे नाम बरवे । निजमानसी धरावे ।।

‘ विठ्ठल ’ म्हणजे ‘ प्रेममुद्रेचा ’ अत्यंत मधुर अनभव, त्याचे सगुण साकार रूप होय हे रहस्य गहिनीनाथांनी निवृत्तीला सांगितले.

निवृत्तीचे गुज विठ्ठल सहज । गयनीराजे मज सांगितले ।।

हेच गुज ज्ञानदेवांना निवृत्तिनाथांकडून मिळाले. हृदयात अनुभवला प्रेमानंद – त्या प्रेमानंदाचे प्रतीक अथवा संकेत विठ्ठल होय. ही खूण ज्ञानदेवांना निवृत्तिनाथाकडून मिळाली. हाच प्रेमानंद चराचरांत व्यापून मूर्तिरूपात उरला आहे.

बापरखुमादेवीवरा आनंद सुखाच्या वोवरा ।
पाहे तंव भरला दशदिशा दुसरा न दिसे सोयरा ।
येणे निवृत्तिराये खुणा दावुनी ।
सकळ आता जोडलासी माहेरा रया ॥
बापरखुमादेवीवरू हृदयीचा जाणुनी ।
अनुभव सौरसु केला ॥

देवतेच्या प्रतिमेचे महत्त्व व उंची तिच्या सांकेतिक पातळीवरून पहाणे इष्ट होय. ही पातळी जितकी उच्च तितकी त्या देवतेची मूर्ती अधिक शक्तिगर्भता, अधिक सामर्थ्यशाली व अधिक प्रेरणासंपन्न असते. ही संपन्नता ज्ञानदेवांची स्वानुभूतीच्या उच्चतम प्रेमभक्तीच्या पातळीवरून ' प्रेममुद्रे ' च्या आधारे, विठ्ठल देवतेस प्राप्त करून दिली. त्यामुळे ही मूर्ती लक्षावधी वारकऱ्यांची व ज्ञानदेवानंतर होऊन गेलेल्या एकनाथ, तुकोबा, निळोबा इ. संतांची प्राणधन होऊन राहिली.

ज्ञानदेवांनी प्रचलित अन्य अन्य देवतांचे निरीक्षण केले. परमेश्वराच्या स्वरूपाचा त्या अंशात्मक देवता होत. त्या विशिष्ट गुणकर्मात्मक होत. त्यांच्या उपासनेने अंशात्मक लाभ होईल; पण पूर्ण लाभ म्हणजे प्रेमभक्ती मिळणार नाही. यासाठी मूळ प्रेमाचीच उपासना व्हावयास पाहिजे हे त्यांनी ज्ञानेश्वरीतील पुढील ओव्यांतून स्पष्ट केले.

आता आणिकही संप्रदाये । परी माते नेणती समवाये ।
जे अग्निइंद्रसूर्य समवाये । म्हणवुनी भजिती ॥
तेही कीर मातेचि होय । का जे आघवे मीचि आहे ।
परी ते भजती उजरी नव्हे । विषम पडे ॥
पाहे पा शाखा पल्लव रुखाचे । हे काय नव्हती एकाचि बीजाचे ।
परी पाणी घेणे मुळाचे । तें मुळीच घापे ॥
का दहाही इंद्रिये आहाती । इये जरी एकाचि देहीचे होती ।
आणि इही सेविले विषय जाती । एकाचि ठाया ॥
तरी करोनि रससोय बरवी । कानी केवी भरावी ।
फुले आणोनी तुरंबावीं । डोळा केवी ॥
तैसा रस तो मुखेचि सेवावा । परिमळ तो घ्राणेचि घ्यावा ।
तैसा मी तो यजावा । मीचि म्हणवुनी ॥ ज्ञा. ९।३४४–४९

सारांश, परमेश्वराच्या मूल स्वरूपात–शुद्ध प्रेमस्वरूपात-त्याची उपासना झाली पाहिजे. या शुद्धप्रेमाचे मूर्त स्वरूप विठ्ठल होय. ज्ञानेश्वरीत सुरुवातीला गणेशाचे वर्णन आले आहे, ते गणेशाच्या उपासनेस्तव नसून साहित्याच्या रूपकात्मक आहे. विठ्ठलाचेच हे एक अंशात्मक रूप होय. पूर्णरूप नव्हे.

इतर पारमार्थिक साधनांची उणीव ही ज्ञानदेवांनी वरील भूमिकेवरूनच दाखविली आहे. ते पूर्ण योगी व पूर्ण ज्ञानी होते. पण पूर्ण भक्तही होते. योगाची अंतिम प्राप्ती समाधी, ज्ञानाचे अंतिम साध्य मोक्ष आहे. पण समाधीचा व मोक्षाचा अनुभव या दोहीत परमात्मप्रेमाच्या पराभक्तीचा–परमप्रेमसुखाचा अनुभव नाही म्हणून या दोन्हीस त्यांनी बाजूस सारले. यज्ञयागादि कर्मकांडासही बाजूस सारले. “ योग याग विधि येणे नोहे सिद्धी । वायाचि उपाधि दंभमर्म ॥” (हरिपाठ) असे ते म्हणतात. त्याचप्रमाणे भक्त हे कैवल्य म्हणजे मोक्ष यासही दूर सारतात. “जया भक्तीची येतुली प्राप्ति । जे कैवल्याही परौते सर म्हणती” (ज्ञा. ९।१९२) असे भक्ताचे वर्णन करताना उद्‌गार काढले आहेत.

ज्ञानदेवांनी ‘प्रेममुद्रे’ च्या भूमिकेतून विठ्ठलाचे रहस्य जाणले. त्या भूमिकेतूनच वारकरी संप्रदायाची वारीची प्रथा ही वारंवार प्रेमानुभूती घेण्याचा मार्ग हे विशद केले. जग हा भ्रम नसून चिद्विलास आहे ही तत्त्वदृष्टी, मुक्ती साध्य नसून ज्ञानोत्तर भक्ती हे जीवनाचे साध्य आहे; यज्ञयाग, तपश्चरणे, क्षुद्रदेवता पूजन ही साधने या साध्यास साधण्यास निरर्थक असून नामस्मरण, भजनकीर्तनादि सुलभ साधनांच्या राजमार्गाने प्रेमभक्ती साध्य होते. त्यास इतर अधिकाराची जरूर नाही. या बोधाची देणगी ज्ञानदेवांनी वारकरी संप्रदायास देऊन संपन्न केले म्हणून ‘ज्ञानदेवे रचिला पाया’ असे तुकोबांनी म्हटले.

卐 卐 卐

' ज्ञानदेवे रचिला पाया '

डॉ. हे. वि. इनामदार, पुणे

वारकरी संप्रदायाचे जे अप्रतिम धर्ममंदिर महाराष्ट्रात उभारण्यात आले, त्याचे मार्मिक वर्णन बहिणाबाईंनी एका अभंगात केले आहे. भागवत–धर्मीय संत-सज्जनांच्या कृपाप्रसादाने या देवालयाची इमारत बांधून पुरी झाली. ज्ञानदेवांनी या मंदिराची पायाभरणी केली. त्यांनीच हे देऊळ उभे केले. नामदेव हे ज्ञानदेवांचे दासानुदास होत. नामदेवांनी या वास्तूचा वाढविस्तार केला. जनार्दनस्वामींचे शिष्योत्तम एकनाथ महाराज यांनी आपल्या मराठी एकादशटीकेचा झेंडा मंदिरावर फडकाविला. आता भक्त–भाविकांनी या मंदिराच्या सभामंडपात निवांतपणे भजन–कीर्तन करावे. संत तुकाराम हे या भक्तिमंदिराचे कळस म्हणून शोभून दिसत आहेत. ज्ञानदेवत्व तुकोबामध्ये जणू कळसास पोहोचले आहे.

प्रस्तुत विषयाची व्याप्ती

' ज्ञानदेवें रचिला पाया ' ही उक्ती सर्वश्रुत आणि लोकमान्य झाली आहे. पण ज्ञानेश्वरांनी ' पाया रचला ' तो कशाचा आणि कशा प्रकारे ते पाहिले पाहिजे. ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला. भरभक्कम आणि खोल अशा पायावर बांधलेली इमारत ऊन्ह खाऊन आणि पावसाचा मारा सोसून जशी वर्षानुवर्षे अभंगपणे उभी राहाते, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांनी दिलेल्या आधारावर भागवत-धर्म–मंदिर शतकानुशतके खंबीरपणे टिकून आहे. परस्परपोषक अशा दोन गोष्टींचे अधिष्ठान त्यांनी या संप्रदायासाठी सिद्ध करून दाखविले. ज्ञानेश्वरांनी भागवत-धर्मास तत्त्वाधार दिला आणि प्रेमाधारही दिला. नुसते तत्त्वज्ञान रुक्ष असते. पंडितांचीही प्रज्ञा ते जिंकून घेते; पण माणसाच्या काळजाला ते स्पर्श करू शकत नाही. नुसते प्रेमही तसेच असमर्थ ठरते; ते माणसाचे अंत:करण ओढून घेते; पण त्यातले भाबडेपण पंथाला दुबळेपण आणते. भोळ्या भक्तीला परंपरेचे बळ लाभू शकत नाही. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी भक्तिपंथाला जसे तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान प्राप्त करून दिले, तसेच प्रेमाचे पाठबळही त्यांनी या पंथाला मिळवून दिले. ज्ञानेश्वरांच्या या दुहेरी कामगिरीचे मर्म शोधणे उपयुक्त ठरेल. त्या दृष्टीने प्रथम

तत्त्वज्ञान या संज्ञेची संकल्पना तपासली पाहिजे. तदनंतर ज्ञानदेवांच्या तत्त्वाधाराची विविधांगे शोधली पाहिजेत. शेवटी त्यांच्या प्रेमाधाराचेही पैलू धुंडाळले पाहिजेत. या अभ्यासातूनच ‘ ज्ञानदेवे रचिला पाया ’ या बहिणाबाईच्या उद्‌गारामागील रहस्य उलगडू शकेल.

तत्त्वज्ञानाची संकल्पना

‘ तत्त्वज्ञान ’ ही मराठीतील संज्ञा इंग्रजीतील ‘ फिलॉसफी ’ या संज्ञेबद्दल रूढ झाली आहे. ‘ फिलॉसफी ’ या शब्दाचा धात्वर्थ ‘ चिकित्सकपणाची आवड ’ असा आहे. ‘ शास्त्रांचे शास्त्र ’ या अर्थाने ‘ फिलॉसफी ’ हा शब्द वापरला जातो. ‘ प्रत्येक बाबतीत जे सत्यस्वरूप असते त्यावर प्रेम करणारा तो तत्त्ववेत्ता होय ’ असे प्लेटो याने आपल्या ‘ रिपब्लिक ’ नामक ग्रंथात म्हटले आहे. आपल्याकडील ‘ तत्त्वज्ञान ’ ही संज्ञा ‘ कोणत्याही वस्तूच्या मुळाशी जाऊन पहाणे ’ हा अर्थ सुचविते. ‘ तत् ’ (= ते) + त्व (= पण) ‘ तत्त्व ’ = ‘ तेपण ’ किंवा ‘ पदार्थाचे आद्य स्वरूप ’ होय. वस्तुमानाचे मूळ शोधणे व त्याचा विकास होऊन पदार्थ कसा बनला, याचे ज्ञान करून घेणे म्हणजे तत्त्वज्ञान अभ्यासणे होय. ‘ जीव, जग व जगदात्मा यांचे स्वरूप व त्यांचे परस्परसंबंध यांचा विचार करणारे शास्त्र ’ हा भारतीयांचा तत्त्वज्ञानविषयक दृष्टिकोण आहे.

धर्म व तत्त्वज्ञान

आपल्याकडे धर्म व तत्त्वज्ञान यांचा निकटचा संबंध मानला आहे. ‘ क्षीणे पुण्ये मर्त्यलोके विशन्ति। ’ (गीता : ९–२१) या न्यायाने पुन्हा जन्म, पुन्हा मरण पत्करून दुःखरूप संसारात गटांगळ्या खाणाऱ्या जीवाला कायमची दुःखनिवृत्ती मिळणे हाच पुरुषार्थ होय. ती दुःखनिवृत्ती मिळविण्याचे साधन म्हणजे तत्त्वज्ञान होय. अर्थातच या विचारसरणीमुळे चेतन व अचेतन या दोन तत्त्वांचे विवेचन करण्याकडे भारतीय विचारवंतांची प्रवृत्ती आहे. ते तत्त्वनिरुपण म्हणजे ‘ तत्त्वज्ञान ’ होय आणि त्या दुःखनिवृत्तीचा उपाय म्हणजे ‘ धर्म ’ होय. या दृष्टिकोणामुळे भारतात धर्म व तत्त्वज्ञान यांचा एकच विचार करण्याकडे शास्त्रांचा कल आहे.

ज्ञानदेव व नामदेव हे यादवकालीन संत होते. यादवकालीन समाजजीवनात धर्म हाच लोकजीवनाचा केंद्रबिंदू होता. कुटुंब, ग्राम, जाती व उपासना–संप्रदाय या सर्व संस्थांच्या प्रामाण्याला धर्माचे अधिष्ठान होते. इह–परत्र–कर्तव्यपूर्ती व धर्माचरण यांचे समीकरणच मानले जात होते. साहित्य, कला, नीती, अर्थव्यवहार यांसारख्या समाजजीवनाच्या काही अंगाप्रमाणे तत्त्वज्ञान हेदेखील धर्म–भावनेशी निगडित होते. ‘ धर्मसारमिदं जगत् ।’ धर्म हे जगताचे सारतत्त्व आहे. ‘ जें धर्मजात आघवें । युगीं युगीं मियांचि रक्षावें ।’ लोकजीवनाचे प्राणतत्त्व असलेला धर्म

लुप्त होऊ नये म्हणून त्याच्या रक्षणाची जबाबदारी परमेश्वराने आपल्या शिरावर घेतली आहे, असे ज्ञानेश्वर सांगतात. (ज्ञानेश्वरी, ४—४८) ज्ञानदेव-नामदेवादी संतांची धर्मकल्पना अध्यात्मनिष्ठ होती. आपल्या पारमार्थिक जीवनाचे तत्त्वज्ञान त्यांनी स्वतःच्या काव्यातून मुखरित केले आहे. "म्हणौनि देवो गोसावी। तो धर्माधर्म भोगवी ॥" देव हाच स्वामी आहे. तो धर्म व अधर्म भोगावयास लावतो. (ज्ञानेश्वरी, १६—३०६) धर्मसत्ता व ईशसत्ता ही दोन्ही एकरूप आहेत अशी दृढ श्रद्धा त्यातून व्यक्त झाली आहे.

अध्यात्मज्ञानाचे अधिष्ठान

महाराष्ट्रातील भागवतधर्माचे जे तत्त्वज्ञान सिद्ध होत गेले, त्याचा उपन्यास ज्ञानदेवांनीच केला आहे. वारकरी संप्रदायातील भोळया भक्तिभावाला ज्ञानेश्वरांनी भरभक्कम बैठक प्राप्त करून दिली आहे. वेदोपनिषदांत अडकून राहिलेली ब्रम्हविद्या त्यांनी जनसामान्यांपर्यंत नेऊन पोहोचविली. महाराष्ट्राच्या माळरानावरच्या झोपडी-झोपडीमध्ये परमार्थाचे पोवाडे त्यामुळे ऐकू येऊ लागले. "सोनार नरहरी न देखे द्वैत। अवघा मूर्तिमंत एकरूप।" अथवा "खटनट यावे शुद्ध होवोनिया जावे। दवंडी पिटी भावे, चोखामेळा॥" असा आत्मविश्वास अठरापगड जातींतील संतसज्जन व्यक्त करू लागले; या सर्वांचे स्फूर्तिस्थान ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयात असलेले जाणवते. "दिसो परतत्त्व डोळा। पाहो सुखाचा सोहळा। रिघो महाबोध सुकाळा—। माजी विश्व॥" (ज्ञानेश्वरी १३-१७३) परब्रह्म सर्वांच्या डोळयांना दिसावे, सुखाचा उत्सव उदयास यावा; आणि सर्व लोकांनी ब्रह्मज्ञानाच्या विपुलतेत प्रवेश करावा, असे ज्ञानेश्वरांचे ईप्सित होते. त्यासाठीच त्यांनी मराठीमध्ये गीताभाष्य सांगून भक्तिपंथाला अध्यात्मविद्येचे तत्त्वज्ञान प्राप्त करून दिले; व अशा प्रकारे भागवतधर्ममंदिराचा पाया रचला.

ज्ञानेश्वर हे मूळचे नाथपंथी होते. पुढे ते भक्तिपंथाला येऊन मिळाले. साहजिकच आपल्याबरोबर त्यांनी नाथ पंथातील उज्ज्वल तत्त्वविचारांचा वारसा भक्तिपंथाला प्राप्त करून दिला. अद्वैतानंद, योगसाधना, शैव-वैष्णव-ऐक्य आणि लोकवाणीचा वापर ही नाथसंप्रदायाची वैशिष्टये ज्ञानेश्वराबरोबरच वारकरी संप्रदायाला लाभली. नाथपंथाने ईश्वराद्वैती किंवा शांभवाद्वैती तत्त्वविचार मांडला होता; आणि शुद्ध योगावर अधिष्ठित असलेला परमार्थमार्ग दाखवून दिला होता. शिवशक्तीच्या या कल्पनेचा विकास ज्ञानेश्वरांच्या आत्मानुभूतीतून आणि साक्षात्कारी वाणीतून होत गेला. गहिनीनाथांच्या कृष्णप्रीतीत अनुस्यूत असलेला भक्तीचा झरा, ज्ञानेश्वरांनी 'बाप रखुमादेवीवरू' च्या भक्तिमध्ये विकसित केला. नाथपंथाकडून

लाभलेला कृष्णभक्तीचा वारसा ज्ञानेश्वरांनी विठ्ठलभक्तीत प्रवर्धित केला. त्यामुळे भागवतधर्माच्या विठ्ठलोपासनेला मोठेच बळ मिळाले.

तीन मतांचे भक्तीत सामरस्य

ज्ञानमार्ग, योगमार्ग आणि कर्ममार्ग हे तीन मार्ग ज्ञानेश्वरांच्या भक्तिपंथाला येऊन मिळाले आहेत. त्या तीन मतांचे भक्तिमतात सामरस्य झाले आहे. ज्ञानेश्वर-प्रणीत भक्तिकल्पना ही ज्ञानोत्तर भक्तीची कल्पना आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान होय. ज्ञान हे भक्तीचे डोळे आहेत; आणि गीता ही ज्ञानामृताची जान्हवी आहे असे ज्ञानेश्वर पुनः पुन्हा सांगतात. भक्तीचे शास्त्र हे 'साच बोलाचें नोहे शास्त्र' असा इशारा ते देतात.

'योगविभवभांडार' म्हणून गौरविलेल्या सहाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी अष्टांगयोगाचे ऐश्वर्य वर्णिले आहे. ज्याला ब्रह्मपद प्राप्तीच्या उच्च स्थितीपर्यंत पोहोचावयाचे असेल, त्याने कर्माचरणापासून आरंभ करून यमनियमादी अष्टांग-योगाच्या पायऱ्यांनी गेले पाहिजे; मग शेवटी ब्रह्मैक्य झाल्यामुळे जेथे साध्य व साधन यातील भेद नाहीसा होतो, अशी 'समाधी'ची स्थिती त्याला प्राप्त होते. (ज्ञानेश्वरी, ५२–६०). नवव्या अध्यायात देखील त्यांनी 'समाधिश्रियेचे आत्मा-नुभवराज्यसुख' कसे प्राप्त होते, ते वर्णिले आहे. (ज्ञानेश्वरी, २१३–२१८.) पण लगेच अष्टांगयोगद्वारा होणाऱ्या 'गहन भजना' पेक्षा नमनमार्गाने करावयाची 'गुरूची भक्ती' त्यांनी अधिक पसंत केली आहे. योगाच्या जटिल मार्गालाही आत्मानुभवाची जोड हवी, असे त्यांना सांगायचे आहे.

ज्ञान व योग यांच्या बरोबरीने ज्ञानेश्वरांनी कर्ममार्गाचेही मार्मिक विवेचन केले आहे. ज्ञानेश्वरांचा कर्मसिद्धांत असा आहे: मुख्य म्हणजे विश्व हेच एक विशाल कर्म आहे. नैष्कर्म्य वेगळे व निष्क्रियता निराळी. नैष्कर्म्यामध्ये अहंकाराचा त्याग अपेक्षित आहे. कर्म हे फलाशारहित बुद्धीने केले पाहिजे. प्रत्येकाला कर्म करण्याचा अधिकार आहे; पण फलाकांक्षेचा अधिकार मात्र नाही. निरिच्छ वृत्तीने आणि ब्रह्मार्पण बुद्धीने कर्म केले पाहिजे. ईश्वरास स्वकर्मकुसुमांनी पूजिले पाहिजे. 'कर्में करावी चांगु, हा निरोप' भगवंतांनी दिला आहे.

अशा रीतीने ज्ञानोपासना, योगसाधना आणि कर्ममग्नता या तिन्ही वाटा भक्तिमताच्या राजबिदीला येऊन मिळतात. भागवतधर्मीय उपासकांना त्यांनी केलेले हे मार्गदर्शन क्रांतदर्शी आहे; पायाभूत आहे.

चिद्विलासवादाची मांडणी

शंकराचार्यांचा मायावाद काहीसा बाजूला सारून ज्ञानेश्वरांनी आपला चिद्विलासवाद ठासून मांडला व त्याद्वारे भागवतधर्माला संजीवक तत्त्वविचाराचा

लाभ करून दिला. ज्ञानेश्वरांनी शांकरमताच्या मायावादाचा क्वचित स्थळी अंगीकार केला आहे, हे खरे आहे. उदाहरणार्थ, " तैसी हे जाण माया । तूं भ्रमत आहासी वायां । शस्त्रें हाणितलिया छाया । जैसी आंगीं न रूपे । "— (ज्ञानेश्वरी, २–१४०), असे ते म्हणतात. पण त्यांचे खरे मत विश्वासकट सर्व आत्माच आहे असे आहे. " हें आंतु बाहिरी मियां कोंदले । जग निखिल माझेंचि ओतलें ।।" असा चिद्विलासवाद त्यांनी मांडला आहे. (ज्ञानेश्वरी ९-३०२) जगताचा निरास करून ब्रह्म पाहावयाचे म्हणजे चंद्राच्या कळा सोलून काढून चंद्रबिंब पाहाण्यासारखे आहे, असे ते सांगतात. ' सर्वं खल्विदं ब्रह्म । ' अशी त्यांची धारणा आहे. जगताला ते मायाकार्य मानीत नाहीत. विश्व हे आत्म्यापासून काही वेगळे आहे असे त्यांना वाटत नाही. ' तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ' असे ते म्हणतात. (अमृतानुभव, ७–१४६.)

ज्ञानेश्वरांचा हा आत्मसत्तावाद व शंकराचार्यांचा जगन्मिथ्यावाद या दोन्ही मतांचे पडसाद ज्ञानदेवकालीन व ज्ञानदेवोत्तरकालीन संतसाहित्यात उमटले आहेत. ' हा जगडंबर पसरला पाल्हाळ । मायामय सकळ स्वप्न सर्व ' असे नामदेव म्हणतात. (नामदेव–गाथा, अ. १७७२.) संसार हा पाण्यावरील बुडबुड्यासारखा किंवा गारुड्याच्या खेळासारखा क्षणभंगुर आहे, असे संत सांगतात, हे मान्य केले पाहिजे. पण प्रश्न आहे तो संतांनी या दोन मतांपैकी कोणत्या मतावर भर दिला आहे ? संतकाव्य बारकाईने तपासले तर संतांनी चिद्विलासवादालाच प्राधान्य दिले आहे असा निर्वाळा देता येतो. तसेच केवळ आध्यात्मिक दृष्ट्या संतांनी मायावाद स्वीकारला असला, तरी सामाजिक दृष्ट्या ते स्फूर्तिवादच पसंत करतात, असे म्हणता येईल. " जगासि गवसणी ब्रह्मरुपे देखिली । ते मी अंतरीं पांगुरलों अंतरामाजी " (सकलसंतगाथा ज्ञानेश्वर अ. ३८०) या ज्ञानेश्वरांच्या मताचाच अनुवाद त्यांच्या प्रभावळीतील संतकवींनी केला आहे. ' अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदले । दुजेंपण गेले निपटोनि ' किंवा ' सर्व हा आकार हरीचे शरीर ।' हे नामदेवांचे म्हणणे म्हणजे ' एतदात्ममिदं सर्वम् ' या उक्तीची अथवा, ' तेथ मी तूं सरे । सेखी भक्त तोही नुरे ' या ज्ञानेश्वरवचनाचा जणू अनुवाद आहे असे जाणवते.

ज्ञानेश्वरांचा नीतिविचार

आपल्या भावार्थदीपिकेत आणि स्फुट अभंगवाणीत ज्ञानेश्वरांनी सदाचाराचे स्वाध्याय सांगितले आहेत. सदाचरण हे परमार्थप्राप्तीचे साधनीभूत अंग आहे, अशी त्यांची दृष्टी आहे. स्वतःला अभिप्रेत असलेल्या ' आदर्श ' मानवाविषयीची आपली कल्पना त्यांनी ज्ञानेश्वरीत तीन ठिकाणी मांडली आहे.

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायात ' उत्तम पुरुषा 'चे निरूपण आले आहे. क्षर व अक्षर पुरुषांहून अगदी वेगळा, श्रेष्ठ, उपाधिरहित व एकाकी असा तो उत्तम

पुरुष आहे. 'मी ब्रह्म आहे' या ज्ञानामुळे 'मी देह आहे' हे अज्ञान नाहीसे होते. पुढे 'मी ब्रह्म आहे' हे ज्ञानही ज्या ठिकाणी नाहीसे होते, ते या उत्तम पुरुषाचे रूप आहे. तेथे द्वैत तर नाहीसे होतेच; पण द्वैतसापेक्ष अद्वैतही शिल्लक उरत नाही. यालाच लौकिकात 'परमात्मा' म्हणतात. पण तेही जीवनदशेत राहूनच. क्षराक्षर पुरुष हे अलीकडचे; पण हा सापेक्ष उत्तम पुरुष पलीकडचा, म्हणून परमात्मा म्हणावयाचा. याचे दर्शन झाल्यावर पाहाणाराच नाहीसा होतो. मग याचे वर्णन कोण करणार? पण वर्णन करता येत नाही, म्हणून तो नाही असे मात्र नाही. सर्व विश्व नाहीसे झाले, तरी हा नाहीसा होत नाही. "जो पूर्णतेचा परिमाणु। पुरुषु गा सर्वोत्तमु।" तो सर्वोत्तम पुरुष पूर्णत्वाचेही परिमाण असतो. (ज्ञानेश्वरी, १५–५४८)

ज्ञानेश्वरीच्या पंधराव्या अध्यायातील हे उत्तम पुरुषाचे लक्षण सर्वस्वी अलौकिक पातळीवर आहे; पण सोळाव्या अध्यायात ज्ञानेश्वरांनी वर्णिलेले दैवी संपत्तीचे लोक मात्र लौकिक जीवनातील त्यांच्या आदर्शत्वाच्या कल्पनेचे नमुने आहेत. ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या सव्वीस दैवी गुणांचे वर्णन ज्ञानेश्वरांनी तेथे केले आहे.

ज्ञानेश्वरीचा अठरावा अध्याय हा कळसाध्याय असून त्यात दिलेली आदर्श मानवाची कल्पनादेखील कळसाप्रमाणे उठावदार आहे.

" चलां कल्पतरूंचे आरव। चेतना चिंतामणीचे गांव।
बोलते जे अर्णव। पीयूषाचे॥
चंद्रमे जे अलांछन। मार्तंड जे तापहीन।
ते सर्वांही सदा सज्जन। सोयरे होतु॥ "

(ज्ञानेश्वरी १८–१७९७, १७९८)

–सदाचारसंपन्न सत्पुरुषांचे ज्ञानेश्वरांनी रेखाटलेलें हे चित्र मुख्यत: पारमार्थिक हेतूने अंकित झालेले असले तरी परिणामत: ते चित्रण व्यावहारिक कर्तव्यनिष्ठेला व सामाजिक नीतिमत्तेला पोषकच ठरेल. स्वधर्माचरण–आर्जव–अहिंसा–अक्रोधादी दैवी गुणांचे परिपालन, देहाची व ऐहिक सुखांविषयीची अनासक्ती या सर्वांतून त्यांनी स्वकालीन समाजासमोर आदर्श आचारसंहिता उभी केली आहे. भूतदया–परोपकारादी नैतिक गुणांची जोपासना करणारा ज्ञानेश्वरांचा हा अध्यात्मवाद खरोखर पुरोगामी होता.

ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका, अमृतानुभव व चांगदेवपासष्टी या लहानमोठ्या प्रबंधांबरोबर अभंगगाथेची स्फुट रचनाही केली. त्यांच्या प्रबंधनिर्मितीमुळे भागवत-

धर्माचे तत्त्वज्ञान तर्कशुद्ध रीतीने व बंदिस्तपणे जसे सांगितलें गेले, तशीच त्या ग्रंथांनी या संप्रदायाला पंडितवर्गांत प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्फुट अभंगरचनेमुळे या पंथाचा तत्त्वविचार सर्वजनसुलभ रीतीने मांडला गेला व संप्रदायास लोकप्रियता लाभली. विरहिणी, गौळणी, भारुडे, कूटे, आख्याने, व्यक्तिचित्रे, प्रसंगवर्णनें इत्यादी लोकप्रिय वाङ्मयप्रकारांतून ज्ञानदेवादी संतांनी रचना केल्यामुळे समाजाच्या विविध थरांत भागवतधर्माचा प्रसार होऊ शकला.

ज्ञानेश्वरांचे काव्यग्रंथ हे आणखी एका दृष्टीने पायाभूत आहेत असे मानले पाहिजे. त्यांच्या ग्रंथातील तत्त्वचिंतन हे प्रतिभाविलासाने मंडित झाले आहे; आणि त्यातील त्यांच्या रससिद्ध काव्यशैलीला तत्त्वविचाराचे वजन लाभले आहे. पांडित्य आणि प्रतिभा यांचा सुसंवाद कसा साधावा हे ज्ञानेश्वरीच्या रूपाने ज्ञानेश्वरांनी दाखवून दिले आहे. तत्त्वचिंतन आणि कल्पनाविलास यांचे सामरस्य येथे झाले आहे.

" वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवे रसिकत्व ।
रसिकत्वीं परतत्त्व-। स्पर्शु जैसा ।।" असे ते म्हणतात.

(ज्ञानेश्वरी, १८-३४७)

प्रेमभक्तीचे अद्वितीय अधिष्ठान

ज्ञानदेवांनी भक्तिपंथाला जो प्रेमाधार दिला आहे तोही खरोखर अपूर्व आहे. आपल्या गीताभाष्यनिरूपणाच्या संदर्भात त्यांनी प्रेमभावनेचा रम्य आविष्कार केला आहे; आणि त्या प्रेमाची सर्वच ठिकाणी भक्तीमध्ये परिणती झाली आहे. भाष्यविषय असलेला गीताग्रंथ, भाष्यमाध्यम झालेली-माय-मराठी भाषा, भाष्यरचनेस स्फूर्ती देणारे स्वतःचे श्रीगुरू, आपली गीता टीका मनःपूर्वक ऐकणारे सज्जन श्रोते; आणि गीतेतील संवादसुखाची राणीव भोगणारे श्रीकृष्णार्जुन या सर्वांविषयीच्या प्रेमभक्तीची विविधांगी बहार ज्ञानेश्वरांनी समरसतेने वर्णिली आहे. हा त्यांच्या प्रतिभेचा स्वतंत्र आविष्कार आहे. त्यांच्या प्रेमभक्तीचे अनेकविध उन्मेष अभ्यसनीय आहेत.

ज्ञानेश्वरांचे गीताप्रेम

पार्थास वत्स करून श्रीकृष्णांनी येथे साऱ्या जगात दुभते उपलब्ध करून दिले आहे,

" हे नित्य नूतन देखिजे । गीतातत्त्व ।। "

(ज्ञानेश्वरी, १-७१)

या अमर्याद गीतार्थाचे आकलन कसे होणार ? सूर्याला कोणी उजळावे ? चिलटाने आकाश आपल्या मुठीत कसे ठेवावे ? गीतेची अशी महती असल्यामुळे ज्ञानेश्वर विनवितात,

" जैसे शारदियेचे चंद्रकळे–। माजी अमृतकण कोंवळे ।
ते वेंचिती मने मवाळें । चकोरतलगें ।।
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणुनियां ।।"

(ज्ञानेश्वरी, १–५६, ५७)

ज्ञानेश्वरांनी घेतलेला मराठीचा कैपक्ष पुढीलांना प्रेरक ठरला. संस्कृताच्या कपाटात बंदिस्त होऊन पडलेली अध्यात्मविद्या, ज्ञानेश्वरांनी मराठीमध्ये गीता-भाष्य लिहून अल्पशिक्षितांना व अशिक्षितांनाही उपलब्ध करून दिली. मराठीच्या नगरीत त्यांनी ब्रह्मविद्येचा सुकाळ केला. येथे संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांना त्यांनी एकाच सिंहासनावर बसवले. " आजी हा आवडतेयांहि सुकाळू जाला । जें गीतार्थु हा आला । मऱ्हाटिया ।"

गुरुभक्तीचे सर्वोत्कृष्ट वस्तुपाठ–म्हणून ज्ञानेश्वरीतील अनेक स्थळे दाखविता येतील. गुरू हा सुखाचा सागर, धैर्याचा डोंगर व प्रेमाचे आगर असतो. गुरुकृपेने साध्या श्वासोच्छवासांनाही प्रबंधाची पदवी प्राप्त होऊ शकते; आणि देशी भाषेच्या क्षोणीमध्ये साहित्यसोनियांच्या खाणी उघडता येतात. गीतेतील तेराव्या अध्यायातल्या सातव्या श्लोकात आलेल्या 'आचार्योपासनम्' या पदावर ज्ञानेश्वरांनी सव्वाशे ओव्यांचे भाष्य केले आहे. चैतन्यरूपी वृक्षातळी गुरुला गाय कल्पून भक्त हा तिचे वासरू बनतो; किंवा गुरुच्या प्रेमरूपी जळात तो मासोळी होतो, अशा अनेक कल्पना उदात्ततेस व पावित्र्यास पोषक ठरल्या, हे ध्यानात घेतले पाहिजे.

ज्ञानेश्वरीतील श्रोतृवंदन–हे तिचे खास असे वैशिष्टय आहे.

श्रोता व वक्ता यांमध्ये सुसंवादरूपी वारा वाहू लागला की, हृदयाकाशात सारस्वताचे मेघ दाटून येतात; पण तोच श्रोता जर दुर्लक्ष करीत असेल तर व्याख्यानास आलेला रंग वितळून जातो. (ज्ञानेश्वरी, ९–२८) ज्ञानेश्वर म्हणतात,

'सहजें तरी अवधारा । वक्तृत्वा अवधानाचा होय चारा ।
तरी दोंदें पेलती अक्षरा । प्रमेयांचीं ।।' (ज्ञाने. ९–२५)

श्रोत्यांच्या कृपादृष्टीच्या ओलाव्याने प्रसन्नतेचे मळे बहरतात. श्रोते हे सुखामृताचे डोहच होत. एवढेच कशाला, या श्रोत्यांसारखी श्रीमंत माहेरे भेटली

तर मनोरथांचेही मनोरथ पुरे होतात. अकराव्या अध्यायाच्या आरंभी ज्ञानेश्वर श्रोत्यांना विनवितात, " हे सारस्वतांचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड । तरी आता अवधानामृते वाड । सिंपोनि की जो ।" वक्ता व श्रोता (अथवा ग्रंथकार व वाचक) यांच्यामध्ये हृदयसंवाद उत्पन्न झाल्यावाचून विषय विवेचनात रंग भरू शकणार नाही, हे ज्ञानेश्वरांनी सांगून ठेवले.

कृष्णार्जुनाचे परस्परांविषयीचे ज्ञानेश्वरांनी वर्णिलेले प्रेम हे ज्ञानेश्वरांच्या प्रतिभाविलासाचा आणि सहृदय व्यक्तित्वाचा सर्वस्वी स्वतंत्र उद्गार आहे.–

' दोन वोठीं एक बोलणें' असावे, तसा कृष्णाचा व अर्जुनाचा संवाद घडला. दोन जवळिकेची सरोवरे उचंबळून यावीत व त्यांची जले परस्परात कालवावीत, तसे कृष्णार्जुनाच्या बाबतीत घडले–

' हृदया हृदय येक जाले । ये हृदयींचे ते हृदयीं घातलें ।।'

(ज्ञाने. १८–१४२१)

तत्त्वनिरूपणास संवादाचा ढाळ कसा द्यावा आणि संवादातून व्यक्तीचे चैतन्यमय व्यक्तिचित्रण कसे करावे, हे ज्ञानेश्वरांनी कृष्णार्जुन–प्रीतीच्या वर्णनातून यथार्थपणे सांगितले आहे.

समारोप

ज्ञानेश्वरांच्या प्रेमभक्तीची ही अनेकविध रूपे न्याहाळली म्हणजे त्यांचीच पुढील उक्ती आठवते,

" एथ चातुर्य शहाणें झालें । प्रमेय रुचीस आलें ।
आणि सौभाग्य पोखलें । सुखाचे एथ ।।
आणि पाहता नावेक । रंगी सुरंगतेची आगळीक ।
गुणां सगुणपणाचे बिक । बहुवस एथ ।। "

(ज्ञानेश्वरी १–३५ व ३८)

या ग्रंथात चतुरता शहाणी झाली आहे; तत्त्वांना गोडी आली आहे; आणि सुखाचे ऐश्वर्य पुष्ट झाले आहे.....क्षणभर विचार केला तर असे दिसून येते की, विविध रंगांमध्ये सुरंगतेची वाढ झाली आहे; व त्यामुळेच सद्गुणांना चांगुलपणाचे विशेष बळ लाभले आहे.

卐 卐 卐

संत ज्ञानेश्वरांचे समकालीन

प्रा. सु. ह. जोशी, शिरूर

संत श्री ज्ञानेश्वरांचे समकालीन हा विषय अभ्यासू जाता, फारच मोठा आढळला. संत श्री ज्ञानेश्वर जसे त्या काळी महान संत साहित्यिक निपजले. तद्वतच त्यांच्या काळात अनेकानेक मोठमोठे संत कवी, लेखक होऊन गेले. तो काळच मोठा भाग्यवान म्हटला पाहिजे. विस्तारभयास्तव येथे केवळ संक्षिप्त नोंदी घेत आहे. वारकरी संप्रदायासह अन्य संप्रदायांतही या काळात मोठमोठी व्यक्तित्वे होऊन गेलेली दिसतात. हा कालखंड म्हणजे श्री ज्ञानेश्वरांच्या पूर्वी काही वर्षे नि समाधीनंतरची काही वर्षे असा धरलेला आहे.

नाथपंथ

प्रथम त्या काळी नाथपंथात होऊन गेलेल्या उल्लेखनीयांचा आढावा घेऊ.

अमरनाथ– अमरनाथ हे गोरक्षनाथांचे शिष्य आणि गहिनीनाथांचे गुरुबंधू होत. निवृत्तिनाथांनी आपल्या गुरूंबरोबरच अमरनाथांचाही सादर उल्लेख केलेला आहे.

निवृत्ति परिवार गुरू गयनी अमर
गोरक्षी कंदर ब्रह्म माझे ॥

अमरनाथांचा अमरनाथ–संवाद नामक मराठी ग्रंथ उपलब्ध आहे. अन्यही ग्रंथ त्यांनी लिहिलेले आहेत.

प्रकाशनाथ– गहिनीनाथांना प्रकाशनाथ नावाचा एक शिष्य होता. या प्रकाशनाथाच्या द्वारा विस्तारलेली परंपराच नाथलीलामृताचा कर्ता आदिनाथ भैरव यांच्यापर्यंतच चालत आली.

सदाशिवनाथ– सत्यामलनाथांनी नोंदविलेल्या श्रीं ज्ञानेश्वरांच्या नऊ शिष्यांत ज्यांचे नाव आले नाही, असे श्रीसदाशिवनाथ नामक श्रीज्ञानेश्वरांचे एक शिष्य होते. या सदाशिवनाथांपासून सदाशिवनाथ–गणेशनाथ–उद्धवनाथ–केशवनाथ–बाळनाथ–दीनानाथ–मयोरेश्वर–जयराम अशी एक परंपरा आहे.

गहिनीनाथ– हे गोरक्षनाथांचे शिष्य नि निवृत्तिनाथांचे गुरू. महाराष्ट्रात नाथसंप्रदायाची परंपरा निर्माण करणारा हा पहिला पुरुष होय. गहिनीनाथांचे गहिनीप्रताप नि गोरक्षगीता हे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत.

याव्यतिरिक्त केवळ उल्लेखासाठी— सोपानदेवांचे शिष्य मुचकुंदानंद (मुकुंदनाथ); ज्ञानेश्वरांचे शिष्य चर्पटनाथ, स्वरूपनाथ आणि विमलानंद; व्यतिरिक्त अदंडीनाथ, विश्वनाथ, चौरंगीनाथ.

महानुभाव संप्रदाय

महानुभावसंप्रदायातील अनेक नरनारीरत्ने या वेळी होऊन गेली. त्यांचा थोडक्यात आढावा असा–

गोविंदप्रभू– महानुभावपंथाचे संस्थापक चक्रधर यांचे हे गुरू होत. महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी एक. महानुभावी लोक गोविंदप्रभूंना ईश्वरी अवतार समजतात.

नागदेवाचार्य– हे महानुभावपंथाचे आद्याचार्य होत. नागदेवाचार्यांचे मराठी भाषेसंबंधीचे कार्य आणि प्रेमही असाधारण होते. चक्रधरस्वामींच्या लीळांचे संकलन करवून नागदेवाचार्यांनी मराठी भाषेला एका अमोल ग्रंथाची देणगी दिली आहे.

बाइदेवबास– नागदेवाचार्यांचे शिष्य नि त्यांच्यामागून संप्रदायाचे आचार्यपद यांनी भूषविले. नित्यदिनी लीळा किंवा पूजावसर नामक ग्रंथात बाइदेवबासाने चक्रधरांच्या दिनचर्येचे सूक्ष्म वर्णन करून आपल्या 'मूर्तिज्ञान' मध्ये त्यांच्या मूर्तीचा गौरव केलेला आहे.

दामोदरपंडित–दामोदरपंडिताचे 'वत्साहरण' हे काव्य भागवताच्या दशमस्कंधातील १२ ते १४ या अध्यायांवर आधारलेले आहे. हे समग्र काव्य म्हणजे दामोदरांच्या कृष्णभक्तीचा उत्कट आविष्कार आहे. दामोदरांचे हे वत्साहरण आद्य महानुभावीय वाङ्मयातील सुप्रसिद्ध साती ग्रंथांत (ग्रंथसप्तकात) स्थान पावले आहे.

महींद्रव्यास (म्हाइंभट्ट)– महींद्रभटाला चक्रधर आणि गोविंदप्रभू या दोघांचाही सहवास लाभला होता. त्यांच्या निर्याणानंतर त्याने त्यांच्या स्मृतींचे संकलन केले. त्यासाठी तो अनेक व्यक्तींना भेटला; त्यासाठी त्याला खूप हिंडावेही लागले. नागदेवाचार्यांचेही साहाय्य त्याने घेतले. चक्रधरांच्या मुखीचे निश्चित शब्द कोणते, हे नागदेवाचार्यांनी त्याला सांगितले. लीळाचरित्राचे पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे दोन विभाग आहेत. या दृष्टीने महींद्रभट हा मराठीचा आद्य संशोधक, संपादक आणि चरित्रकार होता, असे म्हणता येईल. याव्यतिरिक्त स्मृतिस्थळ आणि गोविंद

प्रभुचरित्र या नावाचेही दोन ग्रंथ त्याने लिहिले आहेत. त्याने रचलेल्या दहा आरत्या 'जतीचा दशकू' या नावाने महानुभावपंथात प्रसिद्ध आहेत.

नरेन्द्र– रुक्मिणीस्वयंवराचा कर्ता नरेन्द्र हा मध्ययुगीन मराठी साहित्यातील आद्य कवी ठरतो. हे काव्य अलंकारांची आकर्षकता, कल्पनेचा विलास, रसांचे रंग आणि सौंदर्याची शोभा इत्यादी गुणांमुळे जुन्या मराठीतील एकमेव स्वतंत्र काव्य बनले.

आनेराज व्यास– महींद्रभटाच्या लीळाचरित्रातून सूत्रे ग्रंथित करून यांनी गद्य सूत्रपाठ तयार केला. या सूत्रपाठात चक्रधरांची वचने गोवलेली आहेत.

भास्करभट्ट बोरीकर– महानुभावपंथाचा तिसरा आचार्य नि कवी. त्याचे 'शिशुपालवध' हे काव्य आणि 'उद्धवगीता' हा टीकाग्रंथ हे प्रसिद्ध आहेत. तसेच त्याने संस्कृत पूजावसर, नरविलापस्तोत्र, चालीसाख्यस्तोत्र इ. बारा ग्रंथ रचले आहेत.

केसोबास– यांनी ओवीमय मूर्तिप्रकाश लिहून चक्रधरस्वामींच्या मूर्तीचे वर्णन आणि गुणांचे गायन केले.

महदाइसा– हिने अनेक पंडितांना वादात जिंकले होते. तिच्या चौकसपणामुळेच लीळाचरित्र या चक्रधरांच्या आत्मचरित्रपर ग्रंथाचा बराचसा भाग चक्रधरांच्या तोंडून बाहेर पडला. महदाइसेने धवळे. मातृकीरुक्मिणीस्वयंवर, गर्भकांड-ओव्या अशी तीन प्रकरणे लिहिली आहेत. 'ही म्हातारी माझ्या धर्माची रक्षक आहे,' असे नागदेवाचार्यांनी तिच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत.

महेश्वर पंडित– नागदेवाचार्यांचा पुत्र. याने ऋद्धिपूरवर्णन नामक ग्रंथ लिहिला. व्यतिरिक्त निर्वेदस्तोत्र, संकटस्तोत्र इत्यादी काही थोडीफार स्फुट कविता रचली.

रामेश्वरबास नि परशरामबास– महानुभावीय आचारमालिका आणि विचारमालिका यांच्यामधील विचारांचे संकलन रामेश्वरबास नि परशरामबास यांनी मागाहून केले आहे.

राघोपंडित– यांनी दृष्टांत नि प्रश्नोत्तरी विधायक हे ग्रंथ लिहिले.

यक्षदेव अथवा जाखोबास– आपल्या गुरूच्या आज्ञेवरून यक्षदेव अथवा जाखोबासाने गीतेवरची टीका महाराष्ट्रभाषेत लिहिली.

विश्वनाथ बाळापूरकर– गीतेतील पाच श्लोक निमित्तमात्र घेऊन विश्वनाथ बाळापूरकराने बाराशेहून अधिक ओव्यांचा ज्ञानप्रबोध स्वतंत्रपणे लिहिला. तो साती ग्रंथांपैकी एक आहे.

लक्ष्मेंद्रभट्ट राजूरकर– नागदेवाचार्यांचे शिष्य. यांनी आचारादी नऊ प्रकरणे हा ग्रंथ लिहिला.

नागांबिका– नागांबिकेने आचार–विचारमालिका हा ग्रंथ लिहिला.

वारकरी पंथ

चोखा मेळा– ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा
काय भुललासी वरलिया रंगा ॥

हा प्रसिद्ध अभंग रचणारे चोखामेळा यांना ज्ञानदेवादी संत मंडळात फार मानाचे स्थान होते. चोखोबांच्या पत्नीचे नाव सोयराबाई आणि पुत्राचे कर्ममेळा. चोखोबांना निर्मळा नामक एक बहीण होती. बंका महार हे चोखोबांचे मेहुणे. या सर्वांनी मिळून बरीच अभंगरचना केली आहे. हे सारे कुटुंबच विठ्ठलभक्त होते.

चांगा वटेश्वर– चांगदेवांच्या तत्त्वसार या ग्रंथाची रचना इ. स. १३१२ मध्ये हरिश्चंद्रगडावर (जि. नगर) झाली, असे कळते. ज्ञानेश्वरांनी त्यांना मुक्ताई-कडून उपदेश देवविला.

गोरा कुंभार– ज्ञानेश्वरादी संतमंडळीत हे सर्वांत वडील होते.

राका– गोरोबांप्रमाणेच कुंभारमंडळीत यावेळी राका नामक एक वैष्णववीर प्रसिद्ध होता. पत्नीचे नाव बाका. कन्येचे नाव देऊबाई. हे सर्व कुटुंब अभंगरचना करी.

विसोबा खेचर– संत नामदेवांचे गुरू. त्यांच्या नावावर १०–१२ अभंग उपलब्ध आहेत. अलीकडे विसोबांचा षट्स्थल नावाचा आजवर अज्ञात असलेला ग्रंथ नव्याने उपलब्ध झालेला आहे.

सावता माळी– यांचे स्फुट अभंग गाथ्यात छापलेले आहेत.

बंका महार– यांचे पुष्कळ अभंग गोड आहेत.

नरहरी सोनार– प्रथम कट्टर शिवभक्त पुढे वैष्णव बनले. यांनी बरेच अभंग लिहिले आहेत.

कान्हो पाठक– केंदूरचे राहाणारे. ज्ञानेश्वरांचा यांच्यावर फार लोभ होता. समाधीच्या वेळी आपली सगळी चीजवस्तू त्यांनी कान्हो पाठकांना दिली. त्यांचे काही अभंग आणि गीतासार या नावाचे एक लहानसे प्रकरण उपलब्ध आहे.

सच्चिदानंदबाबा– हे ग्रंथकार म्हणून नव्हे पण ज्ञानेश्वरीचे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी ज्ञानेश्वरविजय नावाचा एक ग्रंथ रचिला असल्याचे उल्लेख सापडतात. त्यांच्या हातचे चार दोन अभंग मात्र म. म. द. वा. पोतदार यांना जगनाडयांच्या वहीत उपलब्ध झाले आहेत.

जोगा परमानंद– बार्शी हे यांचे गाव. यांची पदे, आरत्या, अभंग इ. स्फुट कविता अत्यल्प प्रमाणात उपलब्ध आहे. जोगाचा गुरू परमानंद याचे एक हिंदी पद शिखांच्या ग्रंथसाहेबांत समाविष्ट केलेले आहे.

नामदेव– नामदेवांबद्दल खूपच विस्ताराने लिहिता येईल. नामदेवांनी ज्ञानदेवादी संतांच्या मेळाव्याबरोबर तीर्थयात्रा केली. ज्ञानदेवांच्या समाधीच्या वेळी ते आळंदीस उपस्थित होते. नामदेवांच्या नावावर अडीच सहस्र अभंग आहेत; पण त्यांपैकी केवळ पाचसहाशेच अभंग त्यांचे आहेत. 'आदि, समाधी आणि तीर्थावळी अशा तीन प्रकरणात रचलेले श्री ज्ञानदेवचरित्र नामदेवांनीच लिहिले अशी समजूत आहे.' त्यांवरूनही नामदेवांच्या भक्तिजीवनाचे आणि कवित्वाचे सर्व अनन्यसाधारण विशेष प्रकट होऊ शकतात.

जनाबाई– एक थोर संत कवयित्री. नामयाच्या जनीचे तीनशे अभंग उपलब्ध आहेत. तिच्या हृदयाचे भाव या अभंगातून व्यक्त झालेले आहेत. तिच्या अभंगांची भाषा अगदी सोपी आहे.

निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताई यांच्याबद्दल लिहावे असे नाही, इतके ते प्रसिद्ध आहेत. या सर्वांनी अभंगरचना केलेली आहे. जाता जाता श्यामा कासार यांचाही उल्लेख अवश्य आहे.

अन्य संतकवी

बहिरा जातवेद- भागवताच्या दशम स्कंधावर ओवीबद्ध टीका लिहिली.

जगमित्र नागा– परळी वैद्यनाथ येथील संतकवी.

अज्ञानकवी– याने वरद नागेश नावाचा १८५० ओव्यांचा ग्रंथ लिहिला. तो विवेकसिंधूच्या धर्तीवर असून विवेकसिंधू नि दासबोध यांच्यामधला हा दुवा आहे.

विद्वान

अमलानंद–वाचस्पतिमिश्राच्या भामती नावाच्या ग्रंथावर याने वेदान्त-कल्पतरू नामक टीका लिहिली आहे. याव्यतिरिक्त याचा शास्त्रदर्पण (ब्रह्मसूत्रभाष्य) हा ग्रंथ आहे.

हरिहर- याचा व्यवहारावर एक ग्रंथ आहे. तसेच पारस्कर गृह्यसूत्रावर याची टीका आहे. विज्ञानेश्वराच्या अशौच–दशकावर याची टीका आहे. याने छंदोगपरिशिष्टप्रकाशावर भाष्य लिहिले असावे.

बोपदेव–यादवकालीन विद्वान ग्रंथकार. हेमाद्रीच्या सांगण्यावरून व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन, भागवतावर तीन असे एकंदर सव्वीस ग्रंथ लिहिले. हरिलीलामृत, मुक्ताफल आणि परमहंसप्रिया हे त्याचे तीन ग्रंथ भक्तिरसाचे माहात्म्य विशद करणारे आहेत.

हेमाद्रिपंडित तथा हेमाडपंत– याची ७०० वर्षे कीर्ती गाजत आहे. चतुर्वर्गचिंतामणी हा त्याचा प्रचंड ग्रंथ होय. त्याचे एकूण १४ ग्रंथ आहेत. मोडी लिपी, हेमाडपंती देवळे, मायन्याची पद्धत यांमुळेही तो विख्यात झालेला आहे.

संगीतकार, संगीतशास्त्रज्ञ

पार्श्वदेव– याने लिहिलेल्या संगीतसमयसारामध्ये पुष्कळशा खास मराठी संज्ञा नि प्रचार यांचे वर्णन येते.

शार्ङ्ग देव–संगीतरत्नाकर हा त्याचा विख्यात ग्रंथ उत्तर आणि दक्षिण भारतीय परंपरांमध्ये सारखाच मान्यता पावला. त्याने देशी आणि सामान्य ग्रामस्थांच्या तोंडी असलेल्या साध्या शब्दांनासुद्धा पारिभाषिक संज्ञांची प्रतिष्ठा आणून दिली.

गोपालनायक– मूळ देवगिरीचा पण मलिक काफूर याने याला दिल्लीला नेले. कदंबकम् रागातील तालवर्णम आणि ग्रहस्वरप्रबन्धम् या रचनांचा तो कर्ता आहे.

ज्योतिषशास्त्रज्ञ

महादेव– श्रीपतीच्या रत्नमाला नि जातकपद्धती या दोन ग्रंथांवर त्याची महादेवी नावाची टीका आहे. ज्योतिषशास्त्राच्या इतिहासात याला एक महनीय स्थान प्राप्त झाले आहे.

महादेव–हाही एक ज्योतिषग्रंथकार नि पंडित बोपदेव याचा पुत्र होय. याने ब्रह्मपक्ष आणि आर्यपक्ष यांना अनुसरून कामधेनुहरण नामक एक ग्रंथ रचला. त्यात सारण्या, वर्षगती नि क्षेपक दिलेले आहेत.

महादेव–हाही एक ज्योतिषग्रंथकारच होय. ग्रहसिद्धी नामक एक करणग्रंथ आहे. त्याला महादेवी सारणी असेही म्हणतात. महादेवी सारणीमध्ये मध्यम ग्रह आणि स्पष्ट ग्रह यांचे साधन आहे आणि वर्षगणावरून मध्यमग्रहसाधन करण्यास सारण्या दिल्या आहेत. यामुळे ग्रहगणित फार सोपे होते, असे म्हणतात.

तेजसिंह–तेजसिंहाचा दैवज्ञालंकृती नावाचा एक ताजिक ग्रंथ आहे. परंतु तो महाराष्ट्रीय होता किंवा काय हे निश्चितपणे सांगता येत नाही.

अन्य प्रांतातील ग्रंथकार

गौरन्नमंत्री– याने तेलगू भाषेत लिहिलेल्या नवनाथचरित्रम् नामक काव्यात सारंगधर नामक नाथाची कथा दिलेली आहे.

हरिसिंग– हा मूळचा दाक्षिणात्य पण नंतर नेपाळचा राजा झाला. याने महाराष्ट्रातील तुळजाभवानी नेपाळात नेऊन स्थापिली.

सोमेश्वरदेव– याचे ग्रंथ पुढीलप्रमाणे– (१) सुरथोत्सव (२) रामशतक (३) काव्यादर्श (४) काव्यप्रकाशटीका (५) उल्लासराघव (६) कीर्तिकौमुदी याने प्रशस्तीही लिहिलेल्या आहेत.

शंकरानंद– उत्कृष्ट वेदान्ती, शांकरमताचा प्रचार करण्यासाठी प्रस्थानत्रयीवर दीपिका नामक टीका लिहिलेल्या आहेत. आपल्या आत्मपुराणात उपनिषदांचे सार अनुष्टुभ छंदामध्ये ग्रंथित केलेले आहे. ब्रम्हसूत्रदीपिका अतिशय सुगम, सरल भाषेत आहे. शंकरानंदी ही गीताटीका जिज्ञासूंना उपादेय आहे. कैवल्य, कौषीतकी नृसिंहतापनीय, ब्रम्ह नारायण आदी भिन्न भिन्न उपनिषदांवर दीपिका नामक टीका लघुकाय असूनही नितान्त उपादेय आहे.

जगद्धरभट्ट– काश्मीरमधील एक भक्त कवी. भगवान शंकराचा अनन्य उपासक होता. त्याच्या स्तुतिसुमनांजली नामक ग्रंथात त्रिकदर्शनाचे सुबोध विवेचन आहे.

कुल्लूकभट्ट–मनुस्मृतीवर टीका लिहिणारा प्रसिद्ध पंडित. मन्वर्थमुक्तावली हे टीकेचे नाव. ही अत्यंत सुबोध, मुद्देसूद आहे. मनुस्मृतीचे संपूर्ण विवेचन थोडक्यात. जन्म बंगालमधील नंदनगावी. स्मृतिसागर, श्राद्धसागर, विवादसागर, आशौचसागर हे ग्रंथही त्याचेच आहेत. असे म्हणतात.

नृपती

रामदेवराव, रामचंद्रदेव–देवगिरीच्या यादव राजवंशाचा शेवटचा राजपुरुष. त्याच्या मृत्यूबरोबर हिंदूंचे स्वतंत्र राज्य नष्ट झाले. संत श्रीज्ञानेश्वरांनी त्याच्यासंबंधी गौरवोद्‌गार काढलेले आहेत.

> तेथ यदुवंशविलासु । जो सकळकळानिवासु ।
> न्यायाते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्रु ।।

मुसलमान

अमीर खुश्रू–ख्याल पद्धतीमुळे प्रसिद्ध.

सईद महम्मद–कल्पसमूह हा याचा वैद्यकावरील ग्रंथ. रसप्रक्रियेविषयी यात माहिती आहे.

卐 卐 卐

शब्दमालिका-ज्ञानेश्वरी अथवा भाषारत्नमाळिका

प्रा. ग. ह. खरे, पुणे.

(१) प्रस्तुत हस्तलिखित वाई (सातारा) येथे भीमकुंड आळीत श्री गंगोत्री विठ्ठल मंदिरात ज्या दहा पाच हस्तलिखित व छापील पोथ्या आहेत त्यांत पहावयास मिळाले. त्या मंडळाचे व्यवस्थापक श्री. विष्णु महादेव काळे यांनी नक्कल करून घेण्यासाठी ते माझ्या हवाली केले; एवढेच नव्हे तर ते प्रसिद्ध करण्यास अनुमती दिली याबद्दल आपण त्यांचे आभार मानले पाहिजेत.

(२) हे हस्तलिखित एका कापडाच्या पुठ्ठ्यात शिवून बांधलेले आहे. याची जास्तीत जास्त लांबी-रुंदी २३ सें. मी. व १६ सें. मी. आहे. पोथीपाने केव्हातरी भिजली असता ती वाळवून मग त्यांवर हे प्रकरण लिहिले आहे. कागद पाणचिन्ह-रहित म्हणजे देशी आहे. या हस्तलिखिताची एकंदर १८८ पाने आहेत. त्यांपैकी पहिल्या १७ पानांत तुकाराम–नामदेव यांचे स्फुट अभंग बालबोधीत लिहिले असून पुढली १८ ते १२५ पाने प्रायः कोरी आहेत. प्रायः म्हणण्याचे कारण मधेच दोन पानात तुकाराम व राजाराम या दोघांचे अभंग मोडीत लिहिले आहेत. पुढे १२६ ते १५७ पानापर्यंत उपर्युक्त शब्दमालिका–ज्ञानेश्वरी हे प्रकरण बालबोधीत पाठपोठ लिहिले आहे. १५८ ते १८८ पानें पुनः कोरी सोडलेली आहेत.

(३) प्रत्येक पृष्ठावर सामान्यतः १९ व क्वचित २० ओळी लिहिल्या आहेत. नवीन अध्याय सुरू होताना पहिल्या शब्दाच्या आरंभी ओवीचा आकडा काही अपवाद सोडता घातला आहे. त्यावरून असे वाटते की, प्रथम ओवीचा आकडा, नंतर शब्द व अर्थ दिले असावे. प्रत्येक अध्याय नव्या ओळीने काही अपवाद सोडता सुरू केला आहे. १४४ पानावर द्विरुक्ति झाल्यामुळे १३ ओळी लिहून खोडल्या आहेत. हस्तलिखित सामान्यतः सुरक्षित आहे. केवळ तीन ठिकाणी म्हणजे पत्र १४३, १५५ आणि १५६ (आ) या ठिकाणी एकमेकास चिकटली होती. त्यातील १५५ आ मधील शेवटच्या दोन ओळींचा शेवटचा भाग नीट लागण्यासारखा नाही. बाकी उरलेले सर्व लिखाण स्वच्छ आहे. प्रत्येक ओळीच्या आरंभी दोन उभे दंड दिले आहेत. मधून मधून क्वचित खाडाखोडही केली आहे. दोन तीन ठिकाणी अक्षरांचा अनुक्रम चुकला, तो अचूक समजावा यासाठी

त्यावर आकडे घातले आहेत. हे हस्तलिखित दुसऱ्या कोणत्या तरी हस्तलिखिताची नक्कल आहे. यामुळे कोठे कोठे जेथे मूळ पोथीत शब्द नव्हता किंवा प्रतिकाराला तो लागला नाही त्या ठिकाणी काही जागा मोकळी सोडली आहे.

१२९ आ व १३२ आ या पृष्ठांवर अकारण मोकळी जागा सोडली आहे. अक्षरांचे वळण फार जुने नाही. 'घ' व 'ध', 'ल' व 'ळ' यांमध्ये फार थोडा फरक आहे. यामुळे काही ठिकाणी कोणते अक्षर वाचावयाचे असा प्रश्न पडतो. कधी कधी ओळीच्या शेवटी शब्द अपूर्ण राहिला असल्यासही दोन दंड दिले आहेत. तसेच उ हे अक्षर बहुतेक ठिकाणी ऱ्हस्व लिहिले आहे.

(४) ही शब्दमालिका किंवा भाषारत्नमाळिका नेमकी कोणी तयार केली ह समजत नाही. पण १५७ व्या पानाच्या शेवटी लेखनांती मात्र काल दिला आहे तो असा :— 'शके १७१८ नळनाम संवत्सरे वैशाख वद्य दशमी समाप्तमस्तु.' म्हणजे हे प्रकरण रचून किंवा प्रत करून आजला १८० वर्षे झाली असे म्हणता येईल. याचा रचनाकाल किंवा रचनाकार यांविषयी आज आणखी काही सांगता येत नाही.

(५) रचनाकाराच्या मताने ज्ञानेश्वरीतील अर्थ सांगण्याजोगे जे शब्द किंवा वाक्ये आहेत त्यांचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न हीमध्ये केला आहे. हे करताना ज्या ओवीमध्ये जो शब्द आला आहे तिचा क्रमांकही दिला आहे. पण काही ठिकाणी हा क्रमांक शब्द किंवा वाक्य याच्या आरंभी आणि काही ठिकाणी त्यांच्या शेवटी दिला आहे असे दिसते. अर्थ करीत असताना काही ठिकाणी अमर, रत्न, उत्पल अशा संस्कृत कोशांचा निर्देश करून अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. क्वचित संस्कृत श्लोकही उद्धृत केले आहेत. पण एकंदरीत लेखक व्युत्पन्न नसल्यामुळे या प्रकरणात अनेक ठिकाणी अशुद्धता राहिल्याचे स्पष्ट दिसते.

(६) अशा प्रकारची प्रकरणे आणखी इतर कोठे आहेत का हे पाहण्याचा मी थोडासा यत्न केला. ज्ञानेश्वरीतील शब्दांचे अर्थ सांगणारी काही हस्तलिखिते आपल्या भा. इ. सं. मंडळात आहेत. त्यांच्या तपासणीचे सार असे :—

(अ) क्रमांक २१, २० क हे हस्तलिखित अपूर्ण म्हणजे १ ते १६ अध्यायांपर्यंत आहे. याच्या आरंभी 'ज्ञानेश्वरीचे प्रतिशब्द लिहिले यांवरून पुस्तकातील 'वोवीचा आंख पाहून मनास आणणे' अशी सूचना दिली आहे. यांत शब्दार्थ अध्याय व ओवी यांच्या अनुक्रमाने दिले आहेत.

(आ) क्र. २५, १९८ हे हस्तलिखित अपूर्ण आहे. यात १ ते १४ एवढ्या अध्यायांतील शब्दांचे अर्थ अध्याय व ओवी यांच्या क्रमाने दिले

आहेत. याच्या आरंभी 'पुस्तकपर्यायशब्द ओवी' एवढे सांगून पुढे शब्दांचे अर्थ द्यावयास सुरुवात केली आहे. प्रथम ओवीचा आकडा व नंतर शब्दार्थ दिला आहे. मंडळात असलेल्या हस्तलिखितांत हेच सर्वांत नीटनेटके लिहिलेले असून यातील शब्दसंख्या सर्वाधिक म्हणजे सुमारे २०४० आहे. संपूर्ण हस्तलिखितात आणखी पाच सातशे शब्द सहज असतील.

(इ) क्र. २९,१७५६ हे हस्तलिखित अपूर्ण म्हणजे १ ते ११ व १८ या अध्यायांचे आहे; परंतु याच्या शेवटी 'सके १६८३ व्रीश (वृष) नाम सवछरे वैशाक मासे सुक्ल पक्षे तदिय ३ गुरुवासरे लेखन समाप्त :' असा काल दिला आहे. याच्या आरंभी 'ज्ञानदेवीचे कठीन शब्दाचा शब्दार्थ वोवियाचे आख पाहुन ओळखाव' अशी सूचना दिली आहे. तीप्रमाणे शब्दार्थ अध्याय व ओवी यांच्या क्रमाने दिले आहेत. याचे वैशिष्टच म्हणजे ज्याचा अर्थ द्यावयाचा तो शब्द तांबडचा शाईने व त्याचा अर्थ त्याखाली काळचा शाईने लिहिला आहे. ज्या ठिकाणी अर्थ दिले नाहीत किंवा कदाचित देता आले नाहीत त्या ठिकाणचे शब्द तांबडचा शाईने लिहून त्यांच्या खालच्या जागा मोकळचा सोडल्या आहेत.

(ई) हस्तलिखित क्र. २९,१८७२ क हे अपूर्ण म्हणजे १ ते १६ अध्याया-अखेर आहे. याच्या आरंभी 'ज्ञानदेवि शब्दार्थ वोवीयाचा अंख पाहुन ओळखावा' अशी सूचना दिली आहे. शब्द अध्याय व ओवी यांच्या अनुक्रमाने दिले आहेत.

(उ) क्र. २९,२३६१ हे हस्तलिखित अपूर्ण आहे. यामध्ये अध्याय व ओवी यांच्या क्रमाने शब्दार्थ दिले नसून वर्णानुक्रमाने शब्दार्थ दिले आहेत. या हस्तलिखिताची १ ते ४ आणि १२ ते १७ एवढीच पृष्ठे उपलब्ध आहेत. यात अ–उ, ब, स, एवढे वर्ण आले आहेत; पण हे सर्व वर्ण विशेषत: उ व स हे वर्ण पूर्ण आले आहेत अशी ग्वाही देता येत नाही.

(ऊ) क्र. २९,३३०२ हे हस्तलिखित अपूर्ण म्हणजे एक ते पाचवा अध्याय साधारण अर्धा येथपर्यंतचे आहे. याच्या आरंभी श्रीज्ञानेश्वरिच्या वोवीयांतील शब्दपार्यंय आधि आंक पाहुन त्या वोवीयामध्ये शब्दाचा आर्थ पाहणें अशी सूचना दिली आहे. यातील शब्दार्थ, अध्याय व अध्यायातील ओव्या यांच्या क्रमाने दिले आहेत.

(९) क्र ६७,१८१ या हस्तलिखिताच्या आरंभी 'अथ अमर कोश श्री ज्ञानेश्वरी ।। ककारविल्हे' असे नमूद आहे. यावरून हा कोश अध्याय व ओवी ह्या अनुक्रमाचा नसून ज्ञानेश्वरीतील कठीण शब्द वर्णानुक्रमाने लावून त्यांचे अर्थ देण्याचा येथे प्रयत्न केला आहे. प्रत्येक वर्णातील शब्दांना स्वतंत्र क्रमांक दिले आहेत. यात एकूण ४४९ शब्दांचे अर्थ दिले आहेत.

(७) असे दिसते की, ज्ञानेश्वरीचे हे कोश ओवीक्रम वा ढोबळ वर्णानुक्रम अशा दोन प्रकारांनी केले होते. संस्कृत कोशांत काही अंत्यवर्णाच्या अनुक्रमाने, काही अक्षरसंख्येप्रमाणे किंवा इतर पद्धतींनी केलेले आहेत. हेमचंद्राची देशीनाममाला ढोबळ वर्णानुक्रमाने केलेली आहे. महाराष्ट्रातील सावकारांच्या नामवहीत खतावणीच्या सूचीत ढोबळ वर्णानुक्रम आढळतो. त्याप्रमाणे येथील दोन हस्तलिखितांत ढोबळ वर्णानुक्रम आहे.

(८) वर जी माहिती दिली आहे तीवरून आपणास स्वच्छ दिसून येईल की, भा. इ. सं. मंडळातील ज्ञानेश्वरी शब्दार्थांची जी हस्तलिखिते मी तपासली ती सर्व अपूर्ण असून त्यांपैकी एकाशीही हे हस्तलिखित जुळत नाही. या हस्तलिखितामध्ये संस्कृत कोशांचे आधार घेतले आहेत व काही संस्कृत श्लोक उद्धृत केले आहेत. ही दोन्ही वैशिष्टचे मंडळातील कोणत्याही हस्तलिखितात नाहीत.

(९) या शब्दमाळिकेवर पुणे विद्यापीठातील ज्ञानेश्वर-चर्चा-सत्रात मी एक लेख वाचला असता त्या वेळचे विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी खुलासा केला की, आमच्या विभागात ज्ञानेश्वरीतील शब्दांचे अर्थ सांगणारी मूळ हस्तलिखिते किंवा त्यांच्या प्रती आहेत. पण त्यांपैकी कोणाशीही हे हस्तलिखित जुळणारे नाही.

(१०) औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठात अशा प्रकारचे हस्तलिखित आहे का याची मी तेथे गेलो असता समक्ष चौकशी केली. काही हस्तलिखिते पाहिली. नमुन्याकरता एका हस्तलिखिताचा (=म) काही विशिष्ट भाग माझ्या विनंती वरून माझे मित्र डॉ. यू. म. पठाण यांनी लिहून पाठविला. त्याची तपासणी करता आढळले ते असे: या हस्तलिखितातील काही पाने गहाळ झाली आहेत; वा = (वाई) हस्तलिखिताप्रमाणे म हस्तलिखितात अमरकोशाचा निर्देश आहे. इतर कोशांचा निर्देश मजकडे आलेल्या टिपणात नाही. वा कोशापेक्षा म कोशात काही शब्द अधिक दिले आहेत, तर वा कोशात दिलेले कित्येक शब्द म कोशात नाहीत. काही ठिकाणी वा व म कोशातील अर्थ एकरूप आहेत. उलट काही शब्दांबाबत या दोन कोशांचे अर्थ एकमेकाशी जुळत नाहीत. उदा० जागेश्वरू, भिंगारी, धुंधरु, साइखडे, कोल्हेरीचे, गोरी, सातवेउली, शब्द पहावेत. अध्याय ११ ओवी ५३९

मधील ' वारिके ' याचे सेळीचे वत्स, वाघ्याचा कोटंबा, असे दोन अर्थ वा हस्तलिखितात दिले आहेत. तर म हस्तलिखितात 'सेळीचे वत्स' एवढा एकच अर्थ दिला. तात्पर्य वा व म या दोन हस्तलिखितांत काही साम्य व काही भेद आहे.

(११) ज्ञानेश्वरीत कानडी शब्द आले आहेत याविषयी मतभेद नाही. पण अरबी–फार्सी शब्द आहेत का या प्रश्नाविषयी सामान्य समजूत अशी की, अरबी–फार्सी शब्द ज्ञानेश्वरीत एकही नाही; पण या विधानाविषयी शंका येण्यासारखा एक शब्द ज्ञानेश्वरीत आहे. ज्ञानेश्वरीच्या राजवाडी प्रतीत नवव्या अध्यायातील १७२ व्या ओवीत असिवार हा शब्द आला आहे. ओवी अशी :—

अथवा कोल्हैरिचे असिवार । ना तरि वोडंबरिचे अलंकार ॥
किं गंधर्वनगरिचे आवार । आभासति

या ओवीच्या पहिल्याच चरणातील कोल्हैरिचे असिवार या शब्दांचा अर्थ कुंभाराने केलेले मातीचे घोडेस्वार असा करतात. येथे असिवार याचा घोडेस्वार हा अर्थ अचूक असेल तर त्याच्या व्युत्पत्तीविषयी प्रश्न उत्पन्न होतो. असिवार ह्या शब्दाचा अर्थ तलवारीचा वार असा होईल. तलवारीचा वार पदाती वा घोडेस्वार कोणीही करू शकेल. तो वार करणारास असिवार हा शब्द लावणे कितपत योग्य आहे हा प्रश्न आहे. अरबीमध्ये सवार म्हणजे घोडेस्वार आणि त्याचे बहुवचन अस्वार. या ओवीत असिवार हा शब्द बहुवचनी आला आहे असे दिसते. तेव्हा हा शब्द सध्या तरी अरबी धरावा असे वाटते.

(१२) ज्ञानेश्वरीत असे कित्येक शब्द आहेत की ते नेमके मूलतः कोणत्या भाषेतील आहेत ते सहज समजून येत नाही. यापैकी कोल्हैरि हा एक शब्द. कोल्हैरि याचा अर्थ कुंभार. कुंभाराला संस्कृतमध्ये कुलाल, कुंभकार इत्यादि शब्द आहेत; पण ह्या दोन्ही शब्दापासून कोल्हैरि हा शब्द व्युत्पादता येणार नाही. दुसराच एखादा शब्द त्याच्या मूळाशी असला पाहिजे. हेमचंद्राच्या देशीनाममालेत याशी सदृश व याच अर्थाचा शब्द सापडत नाही; पण तीमध्ये कुल्लरिओ असा एक शब्द असून त्याचा इंग्रजी अर्थ कन्फेक्शनर असा दिला आहे. या अर्थात भाजणे ही क्रिया मुख्य आहे का ? कुंभार मडकी, इतर भांडी, मूर्ती, इत्यादी भाजून काढतो. तेव्हा कुल्लारिओ या शब्दावरून कोल्हेरी हा शब्द झाला असल्यास न कळे.

(१३) हे उघडी पाचवेउली । हे पंचधा आंगि लागली ॥
जीवपंचानना सापडली । हरिणि कुटीं ॥ १३।१०६४
कां आयुष्य जांतिये वेले । सेलिए सातवेउली मिले ॥
तैसे साई दोष सगळे । जोडति तेथे ॥ १६।२५७

वर दिलेल्या दोन ओव्यांत पाचवेउली व सातवेउली असे दोन शब्द आले असून कै. आगाशे, वेलिंगकर इत्यादींनी त्यांचा अर्थ 'पाच व सात नांग्यांची इंगळी' असा केला आहे. पाच किंवा सात फण्यांचा नाग यांचा जसा कल्पनाशक्तीतून जन्म झाला आहे, त्याचप्रमाणे पाच किंवा सात नांग्यांची इंगळी हाही कल्पनाशक्तीचा प्रसव आहे. प्रस्तुतच्या शब्दमाळिकेंत सात वेउली शब्दाचा अर्थ सात कांड्यांची इंगळी असा केला आहे. तो वास्तवाला अधिक जवळचा आहे. विंचवाच्या किंवा इंगळीच्या नांगीच्या पाठीमागे कांडी असतात. पूर्ण वाढ झालेल्या इंगळीला सात कांडी असणे शक्य आहे का ? सात नांग्या असणे अगदीच काल्पनिक वाटते. निसर्गात हातापायांना प्रत्येकी सहा बोटे पहावयास मिळतात. तशी एखादी नांगी अधिक असण्याची शक्यता आहे; पण पाच किंवा सात नांग्यांची इंगळी शक्य दिसत नाही. या बाबतीत मी मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियममधील 'निसर्गेतिहास' विभागाच्या व्यवस्थापकाकडे चौकशी केली असता त्यांनी मला सांगितले की विंचवाला एकापेक्षा अधिक नांग्या अद्याप आढळलेल्या नाहीत. तसेच त्याच्या शेपटीला पाचपेक्षा अधिक कांडी असत नाहीत. नांगी सहावे कांडे धरले तर आणि पोटात एक कांडे धरले तर सात कांडी होऊ शकतील. विंचवाच्या पोटात एकंदर सात कांडी असतात आणि बाहेरची पाच कांडी मिळून बारा कांडी होतात.

(१४) पवनांचा वारिकां वलघे । चाले तरि उदकीं पाऊँ न लगे ।
एणें बहु काइ प्रसंगें । होति सिद्धि ॥ ६, २७०
वारुकां वारुणु वारिजे । जैसे रत्नासि दूषण ठेविजे ॥
ना तरि कन्या पाहुनु ह्मणिजे । मना नैये ॥ ११, ६३२

वर दिलेल्या दोन ओव्यांत वारिक व वारुक असे दोन शब्द आले आहेत. वारिक या शब्दाचे वाहन, न्हावी, घोडा इत्यादी अनेक अर्थ कोशात दिले आहेत. पण या शब्दमाळिकेत ११ व्या अध्यायातील वारुका शब्दाबद्दल वारिके असा पाठ देऊन त्याचे शेळीचे वत्स आणि वाघ्याचा कोटंबा असे दोन अर्थ दिले आहेत. पैकी वाघ्याचा (एक भिक्षापात्र) हा अर्थ येथे बसत नाही. शेळीचे वत्स हा अर्थ येथे बसतो का हे पाहिले पाहिजे.

(१५) परि आता आमुते गोडा करावे ॥
ऐसें तांदुळि काइसेयां विनवावे ॥
साईखेडेनि कां प्रार्थावें । सूत्रधाराते ९,३०
तैसे मनपण जैं मोडे । तैं इंद्रियां आधि चि उबडे ॥
सूत्रेंविण साईखेडें । वा ॐ जैसे ॥ १३, ३०१
जैसा अपमानिला अतिथि । ने सुकृताची संपति ॥
कां साएखेडेयाची गति । सूत्रतंतु ॥ १५, ३३३

आता सूत्रतंतू तूटलेयां । चलू चि ठाके साईखेंडेया ॥
कां प्राणु गेलेया कर्मइंद्रियां । खुंटे गति ॥ १६, १८२
साएखेंडाचे बाउलें । चालवीतेया सूत्राचेनि चाले ॥
तैसा माते दावीति बोलें । स्वामि तो माझा ॥ १८, १७४७

वरील पाच ओव्यांत साइखडे म्हणजे (दोरीच्या योगाने हलविली जाणारी बाहुली) असा अर्थ केला आहे. त्या शब्दाच्या व्युत्पत्तीचा प्रयत्न येथे करीत नाही. ज्ञानेश्वरकाली दोरीने हलविण्याच्या बाहुल्यांचा खेळ फार लोकप्रिय होता एवढेच येथे म्हणता येईल.

(१६) जें कोढियाचें खेवं । जे कालसर्पाचें मार्दवं ॥
गोरिचे स्वभाव । गायन जे ॥ ८, १४६
कां गोरिचिया भूली । मृग व्याधा दीठि न घली ॥
गलु न पाहतां गीली । उंडी मीनु ॥ १३, ७३८
यऱ्हवि गोरी किर गायन गोड । परि साचांचा पारवालीं कीड ॥
आगिचें करणे उघडा । परि जलो ते साच ॥ १६, १२०

वरील तीन ओव्यांपैकी पहिल्या दोन ओव्यात 'गोरी' या शब्दाची षष्ठ्यंत रूपे आली असून तिसऱ्या ओवीत 'गोरी' चे प्रथमांत रूप आले आहे. बहुतेक सर्व अर्थकारांनी गोरी म्हणजे पारध्याचे (हरिणीस भुलविणारे) गायन असा अर्थ केला आहे. हा शब्द संस्कृत दिसत नाही. गोरि किंवा गोरे या शुद्ध कानडी शब्दाला आकर्षित करणे, भुलविणे, (एखाद्या शिक्षित पशुपक्षाच्या सहाय्याने) जाळ्यात पकडणे, असे अर्थ दिले आहेत. हा अर्थ येथे चपखल बसतो. फक्त पारध्याचे हा शब्द येथे घ्यावयाचा नाही.

शब्दमालिका : मूळ पाठ

॥ श्री ॥

(खाली शब्दमालिकेचा मूळ पाठ छापला आहे. त्यात ऱ्हस्व-दीर्घ-अनुस्वारादि मुळाप्रमाणेच ठेवले आहे. मूळ पोथीत कधी कधी नवीन ओळीच्या आरंभी कधी कधी ओवीचा अंक देताना त्या अंकाच्या मागे व पुढे दोन दंड दिले आहेत. मूळ पोथीतच अशा तऱ्हेने विकल्प आहे. छापलेल्या पाठातहि तोच विकल्प उण्या अधिक प्रमाणात राहिला आहे. या दंडाकडे दुर्लक्ष करावे).

॥ श्रीगणपतये नमः ॥ शब्दमालिका ज्ञानेश्वरी ॥ प्रथमोध्याय प्रा. ॥ स्वसंवेद्य आप आपणासि जाणता ॥ ३ ॥ वर्णवपु आकारादीक ॥ ४ ॥ वेव स्वरूप

बरवें ॥ ५ ॥ खेवणें कोंदण ॥ ६ ॥ अंबर वस्त्र सपूर बारीक ॥ ९ ॥ सडका अग्रभाग ॥ १० ॥ षडदर्शनें सौरं च वैष्णवं शाक्तं शैवं वैनायकं तथा ॥ स्कांदं च शक्तिमार्गश्च दर्शनानी शडैव ही ॥ १० ॥ विसंवाद मतांतर ॥ ११ ॥ खंडीत अर्धा ॥ १५ ॥ उन्मेश ज्ञान सुक्ष्मेक्षण बारीक दृष्टी ॥ १७ ॥ कुंभ गंडस्छळ इभ हस्ती ॥ १८ ॥ मकरंदें पुष्परस ॥ २० ॥ आदीबीज ओंकार ॥ २६ ॥ अवगाहनी स्नानी ॥ २७ ॥ अभिलाशिला प्रार्थीला ॥ ३२ ॥ आविष्कारोनि प्रवेशोनी ३३ गुरुवति थोरपण ॥ ३८ ॥ बिक आधिक्य ॥ ४३ ॥ माधवी वासंती माधविल तेत्यमर: ॥ ४३ ॥ अपाडें आधिक्य ५१ निवडलें निघालें ॥ निरवधी नि:सिम अमर्याद नवनीत हें गीता ५२ कणसिलें विचारिलें कढविलें ॥ ५२ ॥ पारंगती पार पावले ५६ तलगें लाहाने ६० अनुराग प्रीती ६१ आथिला भाग्याचा ॥ ६६ ॥ वळुं पाहे बोलों पाहे ॥ ६७ ॥ उपनला उपजला ६९ ॥ आपाड हें आशक्य गीता ७० विवरी विचारी चमत्कारोनी संतोशोनी ॥ ७२ ॥ जया भगवंताचा ७४ कवळावें (१२६आ) आकळावें धवलावें उजळावें स्तुवावें घालावें ७५ सधर समर्थ ७८ आथी अही भारति वाणी ॥ ८१ ॥ दारुयंत्र काष्टपुतळी ॥ ८२ ॥ अलंकारीत शोभविता ॥ ८३ ॥ झडकरी वेगें लवकरी वेगें ॥ ८६ ॥ धर्मालय धर्मगृह व्याजें मिषें ॥९०॥ सादुकला प्रदिप्त जाला ॥ उधवला उसळला ९१ ॥ परीकर प्रखर ॥ अवगमलें भासलें ॥ ९२ गजघटा गजसमुदाय ॥ ९५ कुरुठा केला शाहाणा केला ॥ विक्रांत पराक्रमी १०२ मिति नेणिजे गणना नाही १०७ अडदर भय १०० आराधिलें अनुस्वरले १११ सुभटांशि योध्याशि ११२ पाडे आधिक्यें निरवधी नी:सिम ॥ ११३ ॥ कुळकणी निपुणता ॥ ११६ पन्नासलें रचलें ॥ थेकुलें लाहान थोडें ११७ दुवाड दुस्तर विरिजा साह्य ११९ कीर निश्चय वरिचिलें पाडें ॥ आमुच्या सैन्याहुनि थोडें बेथ दांडगा ९२२ अरणी रक्षणी १२७ तुलग प्रतिध्वनी थांबे बळें १३१ धाकडांसि बळीष्टासी १३२ भोगळ ढोल १३३ विसणैलें वोसणला १५७ (१२७अ) मोकळवादी स्वास्थानत्याग हियें हृदय १७७ आतुर दु:खप्रभाव अशक्तपण वाटिवाविण पुरुषार्थाविण १८७ पाडेंविण योग्यतेविण १८८ सिद्धि मोक्ष १९७ वेंवळ विकळ २०३ आया आकळेन ॥ २२६ ॥ अनकळीत विरुपद्रव सायास न करितां ॥ २२८ ॥ वसौटा वस्तीस्छान ॥ २२३ ॥ किडाळ खोटें ॥ २३९ ॥ अंधकूप निर्जळकूप ॥ २४६ ॥ पारूषती राहाती २५५ आप्लविजे बुडविजे २५८ वानिवसे खेळतां २६१ यसणें येवढें २७० उपहत दैवहत इतिप्रथमोध्याय: ॥ १ ॥ उपनलें उपजलें ३ हालें हाटलें विरमलें विरालें ॥ ६८ ॥ आधीं पहिलें ९ ठावो आश्रय लाटेपणाचा शुरत्वाचा ११ पाडें साम्यें १६ अपाड अघटीत १७ झणें कदापी नको २३ नुपकरे योग्य नव्हे २५ व्याज मीष आथी आहे २८ निकें उत्तम पतन अध:पात ३१ प्रमाद अज्ञान लिंगभेद चिन्हनाश शिष्य गुरू ३५ विरुं विरूद्ध ३९ अहाच सामान्य ४० मान परीमाण ४१ विकरविला विकार न पवे ४३

निरवधी निसिम ४६ सधर आधीक वरपर्यंत ४७ नवनिशंती पाजीविलीं वावसेनि मारुनि ४९ उपपत्ति युक्ति ५३ (१२७ आ)

विरूं विरुद्ध व्याजें विषें आथी आहेत ५६ तिमिरांविरुंद्ध नेत्ररोगव्यात्त ६६ आहाजली भाजली ॥ ६८॥ उज्जीवन भोगसाधन ॥ कारुण्य कपा ६९ उर्मि लहर ७० अनारिसें विपरीत ७१ कळ्दारी कमळी भाजेचिना उतरेचिना जायिना ७२ जैसी आहे तैसी ॥ प्रौढी थोरपण ७३ अवलीळा सहज ७३ द्युती प्रकाश आयति साहीत्य ७९ अचळ पर्वत उन्मेषज्ञान ८२ नाळवावे न बोलवावे ॥ ८३ ॥ हेळावेळा ठेला राहीला ८६ निरवधी निःसिम ८७ विवरित विचारीत ॥ ८८॥ सरोषें सक्रोधें थोकलें गुप्त राहिलें ८९ आहाच वरचेवर ९१ माझारीचि मधेची ॥ शोचुं शोक करूं ९७ ॥ सृजीलें निर्माण केलें ॥ ९८ चिरंतन चिरंजीव ११० व्यामोह दुःख अती अज्ञान ॥ ११२ ॥ आल्पविति बुडविती ॥ १२४ ॥ नांगवेचि सांपडेना १२७ सलील पाणि पय दुध १२८ कीडाल खोटें चोखाळ चांगली बुद्धिमंत सोनार १२९ आयणी सामर्थ्य कडसणी ॥ गुसळणी निर्वाणी सेवटीं १३० घनवट दाणे फळकट (१२८ अ)

कोंडा १३१ निरंसलें दुरजालें १३२ निष्कर्ष सिद्धांत ॥ १३९ ॥ आपजे वाटे १४२ आपैसें सहज १४३ नारोपीं अध्यास घेउ नको लटकी १४६ नाप्लवे बुडिजेना न प्रभवे न उपजे १४९ आप प्राप्त १५० अविप्लुत विकाररहीत १५२ अंतवंत नाशवंत ॥ १५३ ॥ अनन्यूत अखंडीत १५५ ठाकतिना न राहती १५८ अपरीहर परीहार नाही पडीयासे दिसे परपिक्षा दुसऱ्याचि इछा ॥ १७० ॥ आर्ति इछा १७३ उपरति उन्मनि अवस्छा निरवधी अत्यंत निसिम १७९ किडाळ खोटें १८४ सूदलें घातलें १८७ नाडळिजे अडखळेना १९२ म्हणिपे म्हणिजे १९३ पतिकरें अंगीकाते प्रियंवदः प्रितीकार इत्यमरः ॥ अतिप्रिती पडिभरें अंगीकारें आधिक्यें १९४ आडळिजे अटकळीजे १९६ आहाणा दृष्टान्त नाथीलें लटिकें १९७ धाडीलें गमाविलें १९८ अभिशाप निंदा १९९ उपहती पराभव ॥ २०० ॥ अभीभविजे पराभविजे ॥ २०३ ॥ गति दर्येस्तव पजायन २०५ विपायें कदाचित घटे घडे २१० अनकळीत सहज २१३ ॥ रांड बळकट २१५ मदमुखा गजा अशेखां सर्वां ॥ २२८ ॥ (१२८ आ)

कुटी निंदा २१९ लाठेपणें बळकटपणें २२० अनकळीत सहज अनायासें ॥२२३॥ प्लवेंचि नावेनें वीपायें कदाचित् २२४ अमृतें दुधें हेतुक कारणनिमित्यें २३० ॥ सांख्य आत्मानात्मज्ञान मुकुळित संक्षेप २३२ अचुंबीत निश्चित ॥ २३५॥ आकळु न शके स्वाधीन न करी ॥ २३८ ॥ थेकुटी लाहान २४२ लहणें प्राप्य २४३ विकरती विशयाकार २४४ दृष्ट प्राप्त ॥ २४८ ॥ अभिभूत वस्य २५४ धाडिती दवडिती २५६ आदत व्यापिलें २६९ ॥ ठाके राहे अपरीतोषें असंतोषें २७० ॥ सगुण पुर्ण कर्मसेष कर्मसाध्य २७७ ॥ पारंगत प्राप्त सिद्धी २७९ ॥ निरामयाव

निर्विघ्न ॥ २८२ ॥ पारुषेल राहेल २८५ उन्मेषें संतोषें २८९ ॥ विलसे शोभे ॥ २९८ ॥ अनवछिन्न व्यापक ॥ २९९ ॥ नाभिभवे पराभव न पावे ॥ ३०१ ॥ उवाइला हर्षयुक्त ॥ ३०८ ॥ रसहटें रसनिग्रहें ३११ ॥ आया आकारास ॥३१२॥ ताटी कवाड ॥ ३१५ थोंटावलें प्लथ ठाये असमर्थ राहे ॥ ३१८ ॥ संतत स्वाधीन ॥ ३२६ ॥ अप्लविजे बुडवीजे ॥ ३१७ ॥ भवे भोगणें ॥ ३३१ (१२९ अ)

विपायें कदाचित येसणें येवढें ३३५ ॥ निर्भीन अभिन्न ॥ ३४३ कडसणि विचार ॥ ३५० दुरावर्त्ती भोंवरा ३५९ इषत् थोडिही ३६१ अघृती अधैर्य ३६४ पाबळे तुछ पालेवलें पर्णशाला ॥ ३७४ ॥ उवायिला स्तुरविजाला ॥ **इति द्वितीयोध्यायः** ॥ २ ॥

सूतां घालितां ५ येसणी येवढी वारूनि करउनि सूयें घालणें ९ सूयिजे घालिजे ११ नवायि थोरनवल गांवायी वायांची अनुसरलेयां शरण आलेयां ॥१२॥ वोठगावें विस्वासावें ॥ १६ ॥ ध्वनीतें संक्षेपें अवगमितां विचारितां ॥ १७ ॥ मऱ्हाट स्पष्ट २२ आपैतें स्वाधीन २४ टाकावें पावावें मागील धांवत आला ॥ २६ ॥ सवेसा स्वेछा याहला जाला २७ जालें सार्थक २९ अनवसर असमय ३२ ध्वनीत संकेत ३४ उक्त बोलिलों ३६ सांख्य आत्मानात्मविवेक ३७ निर्वाण मोक्षवेळे चित्त शुद्धी समयीं ४० उपास्ति उपासनामार्ग ४१ ॥ उप्लवन उड्डाण अवसरें समइं ४५ कर्महीन नैष्कर्म ४७ व्यसनकार्य ४५ निरार्त्तता इछा नाहीं ॥ ५० ॥ नैष्कर्म ब्रह्म ५१ आपादीलें आरंभिलें ॥५२ सैरा व्यर्थ उकल उमज ५३ सांडी मांडी टाकी करी ॥ ५५ ॥ वोसंडिलें सांडीलें ४८ नटाके नराहे ६० परतंत्रापराधीन ६२ नैष्कर्मे ही व्यापारें ब्रह्मनिष्ट (१२९ आ)

वर्ते ६४ निरोधुनि आवरुनि ६५ फुडें खरें ७३ सामान्यत्व अज्ञानदृष्टी सोय मार्ग ७५ विशेषी जे थोर म्हणती ७७ न संभवे न घडे ७८ हेतु अहंकार २८५ संस्छा प्रकार ८८ विहिला नेमिला साकांक्ष काम्यफलाशा ९१ अहेतुकें निर्हेतुके ९५ परीतोश संतोश ९९ म्हणिये अज्ञेत राहती ॥ १०१ ॥ काढत धांवत १०२ अनार्त्त सुखी निरत अतिरत १०४ सुरीं देविं १०७ आथिलेपणें जालेपणें १११ निजवृत्ती स्वकर्म ११९ विनियोग वांठणि जेथील तेथें ॥ १२४ ॥ नांगवे न संपडे १३४ ॥ प्ररोह उत्पत्ती ॥ १३६ ॥ परात्पर अर्धमात्रा पैल तीर ॥ अक्षर ब्रह्म ब्रह्मबद्ध ब्रह्मरूप ॥ १३७ ॥ (१३० अ)

आर्ती मिती अधिवास राहणें ॥ १३८ ॥ अध्वरा यज्ञा १४४ वोघें प्रवाहें वोसंडावें सांडावें १४६ ॥ नसिपे न लिंपे १५१ अनुसरले प्रवर्तले कैवल्य मोक्ष १५७ वोजे उमजे १६५ बरळ भ्रांत १६८ आथिला संपन्न सविशेष आघवे करावें १७३ खेळतां सहज आदिकरुनि पहिल्यापासुनी १७७ नद उठिजे नद उपिजे १८३ घेपवेना घेइजेना १८५ आपादिजे स्छापिजे १८६ न्यसावि घालावि १८८ शरीर-

परा शरीराधीन ।। १९२ अनुपरोध यथार्थ १९५ अर्थवाद स्तुतीमात्र २०० लाहाती लागती २०४ उधवला अधीक जाला २०८ पंचत्वा मरणा २१० कीर निश्चय अपजेल उपजेल २६४ ठाउवा नव्हे ठाउका नव्हे झाकवलेपणें असावधपणें २२५ सांकड कठीण दुवाड वायिट २२७ अलुकीच आस्छा २२९ उभयतां इहलोकीं परलोकीं २२६ सुयीजती घालिजती २३७ विवसि बाधक २४२ धोंड दुष्ट कोंड उन्मादक दबअघात २४७ थेकुटीं थोडीं वालिदुलि नवानवसांचि २४८ विकें आधिक्यें २४९ घेपें घेणें देणें भोजें स्वइछेनें २५१ साध्वी उत्तम २५२ त्रायसत्ता २५९ आंतौटे आंत आहेत. २६० उलबांचि वरेचि प्ररुद्ध रोधलें २६५ सावावो साह्य २६६ ।। विरजे साह्य २६८ कुरुघर २६९ पारुषेल मोडेल बुद्धिचि जिवोपाधि ।। २७२ पदपिंडाचि जीवपरमात्मैक्य २७६ ।। उन्मेषाचा अवधानाचा ।। इति तृतीयोध्यायः ।। ३ ।। ।। छ ।।

१ तुकलें बरोबर जालें ३ विनोद कौतुक ७ अधिष्ठिला ।। युक्त जाला ।।९।। पीक आधिक्य १० येणेमानें या प्रकारें ११ निरुपम उपमा नाही येकवंकी येकाकार २१५ आवरला स्वाधीन जाला १६ बिवस्वत सूर्य २१ आव्हांटलियां कुमार्गें गेलियां ।। २२ खवणे जैन क्षापणिक २३ आस्छानि सभास्छानी २८ पढियेसी आवडसी ३० अनुसंग विस्वास ३८ सांपुचा सांप्रतचा ।। विसंवाद आविस्वास ।। ३९ ।। येकि हेळा येकायेकी ।। ४४ ।। आजत्व होणें नाही ।। ४५ ।। अव्ययत्व ।। नित्यत्व ५० अभिभव पराभव ५२ अवधी सिमा ५६ अचळ पडदा ६१ आथिले जाले ६२ आयतन घर ६३ पदरभेद ६५ कडसले शुद्ध जाले ७२ संम्यक् बरवें ६९ अर्चा ब्रह्मरूपा ।। ७० ।। जें ब्रह्म ७६ साक्षीभूत प्रकाशक ७९ कडसणीं विचारणें ।।८६।। कुडें खोटें ।। ८८ ।। क्रांतदर्शी दीर्घद्रष्टें ८९ सम्यक संपूर्ण ९० उपयोग फळेंसी १०७ गाभारा मध्य वोगरा भोजनपात्री आरोगितां भक्षीतां ।। ११८ ।। ऐक्य भाव ब्रह्मभाव १२७ ।। युक्ती वज्रासन १२८ ।। (१३१ अ)

विवललें ।। उजेडले संयतीं इंद्रिह निग्रहो विकार कुडे अपादत उघडें ।। १२९।। पलिपली पळों लागलीं ।। १३० ।। निरवडी योग्यता ।। १३६ ।। सादुकपणे पेटविले पणे ।। १४३ ।। कुहाडें कोडें १४९ ।। नीज ब्रह्म १५२ अविशिष्ट शेषो ।। १५३ अमर्त्ये अमधर ।। १५८ ।। नष्काली प्रथम उन्मेष ज्ञान ।। १६९ ।। लाणि सिमा १६६ कुरुठा घर वोलगोनि भजोनि १७४ कडवसा विलासा १७५ ढिसाळथोर १७६ काजळी राख उधवली उडाली १७८ असंघडें अघटीत १८० महातेज स्वरूप १८९ काटालें दुसरे १८९ ।। अचुंबित संपूर्ण १९५ सविया सहज अरोचक प्रिति २०७ आगवे सांपडे २१२ उन्नती अधीक २१३ अयणी इच्छा २१४ अभिनवल प्रकटखेळ २१७ रेखा अक्षरें २५५ आथिलीया जाल्या अवकाशे ।। इति चतुर्थोध्यायः ।। ४ ।। ।। छ ।।

४ येकसरातें अनन्यभक्तातें ५ ध्वनितें संक्षिप्त ७ अचुंबीत संपुर्ण सविया। सहज ८ सांगडें सारिखे ॥ १२ ॥ कुरुठा स्थान १३ चमत्कार अश्चर्य सवेसा स्वइच्छा १६ प्रांजळ सुगम १२ घेतें जालें अंतःकरण ॥ २५ ॥ सांगडे ॥ सारिखें ॥ २६ ॥ संच्छा निर्णय ॥ २८ सम्यक बरवें ॥ २९ ॥ सांख्यास ज्ञानियोगी कर्म ॥ (१३१ आ) योगी गमिजे पाविजे ॥ ३१ ॥ पाहालें उजडलें ३२ ॥ निमथा माथा वहिला ॥ सत्वर ३३ योग कर्मयोग सांडे ॥ होइना सन्यासाचि ज्ञानाचि ॥ ३४ ॥ रोउनियां तद्रुप करून ४२ ॥ अवसरोचित समयोचित ४७ सूतला विणेला ॥ ४८ ॥ अधिष्ठान आत्मा आथी आहे ५० न सिंपे न भिजे ५२ मऱ्हाटें प्रकट ५४ संसारा विस्तार ॥ ५७ ॥ भ्रमहत भ्रांत ६१ धुर पुढे ६३ करितेनविण कतृत्वाभिनिवेशरहित गुरुगम्य तें कर्म ६५ पांग पराधीनत्व ॥६७॥ आकळिता विचारितां घांघुसितां शोधितां ७० निरुतें खरें ७२ कळासला बांधला ७७ नसिंपे न स्पर्शे ७९ सलाः न्युतत्व दळवाड समुदाय ८० पासीं जवळी ॥ ८१ ॥ मूर्तिचेनी मेळें शरीराचेनि योगें ८३ मसैरें आंधारें ॥ ८८ ॥ समता ब्रह्मता ॥ ९४ ॥ गुरु थोर ९९ खेचर अदृश्य संसार लोक १०३ नविकरे विकार होइना १०८ उपाइलें उत्कष्ट ११० आलुकेलें तुपातें कोंडयातें ११३ कायसुख शरीरसुख सारिखें युक्त ११५ मुहुर मधुर ॥ ११६ प्रषाद बोलणें बरळ भ्रम १२१ अंतर आभिप्राय ॥ १२५ विषयी विषयसक्तानी ॥ १२६ नाथिलें नसतें १२८ दुःख विषयसुखांचि ॥ १३२ ॥ (१३२ अ) आंठी ऐक्य १३७ सामरस्याचे ब्रह्माचे ॥ १३८ ॥ अनुकार स्वरूप १४० सात्विक शुद्धसत्व ॥ १४१ रचसीं तन्मय होसी निराळीं निराकारीं १४२ ॥ मुकुळी ठेवी उखा उदय १४३ ॥ उवायिला ॥ अभिप्राय १४६ जियेगांविचें ब्रह्मगाविचें ॥ १४७ भाग द्वैत गेलें निःसंशय सर्वभूतात्मकत्व १४८ ॥ जेथ आत्मस्वरूपीं ॥ १४९ ॥ निर्वाण मोक्ष जें ब्रह्म ॥ १५९ ॥ यकंदरें येकाकार ॥ अध्यासरहित ॥ १६२ पारुषोयियां बाहेरीं जाइना १५३ ॥ व्योमहृदयाकाष गामीये मन करिति हृदयगत ॥ १६१ ॥ स्कंदंश ज्ञाता ॥ १६२ ॥ उवायिले प्रसन्न जाले १६४ विवल विस्तार १६५ ॥ अनुसरा प्रकार ॥ १६६ आथी आहे काही साधनोपाय काल विलंब १६७ ॥ पडिताला पुनरपी १६७ पढीयंतयाचे १७४ आवड त्याचें ॥ १७४ विस्करा विस्मय आकलावा जाणावा ॥ १७५ ध्वनी आंत बालण्यात १७६ विनोद कौतुकें ॥ १७८ उक्त बोलिलें आहे इति **पंचमोध्यायः** ॥ ५ ॥

छ (१३२ आ) आरोगणें जेवणे ॥ ३ तेंचि चवि ॥ ४ आडमुठी ॥ अक्लेश ५ सछेंद अवसरीं मोहे १० आयणिचा तत्त्वनिर्णयाचा ॥ ११ ॥ वैभव भाग्याचे १२ ठाणें स्वरूपप्ररोहं उद्धव १५ ॥ नादिचें श्रवण ॥ सुखाचे बीक ॥ आवडी ॥ १६ ॥ कलंभा झगडा १८ रेखेचि अक्षराचि वाहणी पंक्ति कवित्व रचना ॥ १९ ॥ आविष्करें ॥ पसरुनि २० बुझावि समजिवी २२ ॥ प्रतिपत्ति ग्रंथरचना २५ ॥ वालिफा गवसणी २७ कडसावे सावध करावे ३१ ॥ उपसाहावें लागे क्षमा केली ॥

पाहिजे ३२ ॥ अकलितां जाणतां विपायें प्रयत्नेंविण ॥ ३५ ॥ मातें आहें गुरुकृपा ३८ निसंगाचा विरक्ताचा ॥ ३९ ॥ सिनाने वेगळालें ४० अवकाश भेदें ४३ ॥ रागी असक्त ४४ उद्विजे विरूढे ॥ ४५ ॥ अन्वयाचेनि वंशाचेनि अनुकरें कुलधर्में ४९ पाइक सेवक विचंबे बोळंबे ५० सवा घेतांच सरिसे त्यासारिखें ५१॥ रेखा यथोक्त कर्म ॥ ५३ (१३३ अ) घटे निश्चयें ५४ निमथा माथा सोपाना पायिरीया ५५ ॥ तळवटें खालुन ॥ ५६ अघाडा कडा ५८ चवरें सेवट सांडे ॥ राहे ६१ ॥ निरवधी बहुता ॥ ६८ ॥ व्यामोह महामोह ६९ अवसांत अकस्मात ७२ ॥ चारुस्थळा सत्यमानी ७८ फुटा खरा ७९ अतुडला सांपडला ८० नाथिलें लटिकें ८२ ॥ किड खोटें ८५ वाहणी प्रवाहें कडसणी विचारणा विज्ञानात्मक प्रपंचात्मक ८९ उहीपुही होय नव्हे ९७ उजरी स्वच्छता ॥ ९८ विसुरे भ्रांती भांगारें सोने १०० घापे घा लिजे १०६ ॥ अपरिग्रही जो तिहिं लोकी अंगिकारिला तन्हि परिग्रही. नव्हे तोचि मुक्त १०७ निष्पन्न निस्पृह १११ ॥ वणिज्य व्यापार वेसजेविण कर्मावांचुन ॥ व्यसनावाचुन ॥ ११२ कवणाची निर्गुणाची उसिणें वेस्वंसे जंधान्य जातिस्यात ॥ परिक्रितेषु इत्यूपूलकोषः ॥ ११४ ॥ सत्पळ जवनिक समलस्या ज्जवनिस्यां तिरस्कारिणि सेत्यमरु ११८ ॥ असमायी सामावेंना १२० हातास ॥ नेर्वमषें १२२ त्रिपुटी अपंचरचना १२४ ॥ वालभाचे आवडिचे १२५ कुवांसा आश्रय १३२ अवगे होय १३३ ॥ हवाव शोभा १३४ वाने उमटत नाना प्रकार १३६ विवळले आनंद-युक्त १४५ ॥ (१३३ आ) आतला दडपला १४९ ॥ सोहं ब्रह्माहं १५४ वृंदे समुदाय अडवीं दुर्गमां धारणा सुषुम्नामार्ग सुगम १५८ ॥ अपवर्ग मोक्ष १६० जया स्वरूप १६५ ॥ सावावो आधिक्य १७९ अधिष्ठान ॥ स्वरुपवायें भाग्यें ॥ १८९ उजरी स्वच्छता ॥ २१५ ॥ उवाइला पसरती २१६ ॥ थींवली राहीली घरदुली धांडोळी २१७ वलिवेग २२१ उबारा ॥ स्थिरस्ता २२७ शक्ति वल्लि २३९ ॥ वडवालि ग्रास २३२ आविस पास २४८ ॥ उलिका बोद्धव्य २५५ ॥ भांव शोभा २५७ थावरलें स्छिर जालें २६७ पाखाली शुद्धत्व ॥ २६८ ॥ निडार पक्वदशा २७९ ॥ आलेंच ध्वनि २७२ वारिका वेंग २७६ मोडी आकार २७७ कल्पितें मन २७९ ॥ वेगें खिडकी २८९ विनियोगिली खादली ॥ २८२ ॥ बोने नैवेद्य ॥ २८० आधातुरें अर्धभोजने ॥ २९० स्फुटी खरी २९३ ध्वनियाचें गुढार्थाचें उपलविली उकलिली २९६ खेचर योगी ३०० पाडीं पाठारिसम ३२४ नोकिलि पराभविली ॥ ३२५ निष्कर्ष धांव ३३३ पांग दुर्लभ ॥ ३३६ धारण इच्छा ॥ ३३७ आवडत्याही भलत्याही ३३९ ॥ निवाण कठीण वोवडेविण योग्यतेविण ॥ ३४१ ॥ केणि विक्त ३४२ नियत ॥ (१३४ अ) निरंतर॥ व्यवस्थित निश्चित ३४३ आयणि युक्ति माजिकडें ॥ मधे ३४६ बांद्धोडि आघीन ३४८ ॥ विरोध विघ्न ॥ ३५० मितलांवोलि नेमिलें बोलीं ॥ ३५३ भातें मजुरी

३५४ ।। भडसें आधिक्य ३६२ ।। आढळ साहाय सरतें नाशितें ।। ३६५ ।। विंदान लागे निग्रह होइल ३७२ आर्तिची आपेक्षेचि ३७३ जे ब्रह्म ३७५ पुत्र शोक कामाचा नाश ३७६ ।। हियें हृदय ३९१ ।। नांगवे आटोपेना ।। ३९३ घेपे घेइजे ते ।। ३९६ ।। येकवंकी येकाकरता ।। ४१७ ।। उवावो पसर ।। कावावो सबळता ।। ४३६ ।। अगलग ठेलि दुरि राहिलि ।। ४३७ ।। बोलासेवटील वावे समांजी समुदाय ४४० ।। वेग नोहेचि त्वरा केली नाहीं ४४५ लावां कोंभ ४४७ ।। जागेश्वर आराध्य उन्मेषाची निज ज्ञानाचि ४५८ ।। निरवधी आधिक ४६० ।। दुर्भेद भेदवेना ४६३ रंभेचा गौरव केळिचा खांब ।। ४६६ ।। अडि दुर्घट ४७० प्रणवाचा तुर्येचा ४७२ पानवलें पळे ४७५ ।। धारसां प्रवाहांत ४७९ निर्वाण केवळ कारण मुख्य सिद्ध ।। तत्व ब्रह्म ४८० ।। वेघें जाणावा विषय ४८९ उपनला युक्त जाला ४९० पाल्हैविजेल पेरिजेल ४९१ वडप पडप ४९६ आयणितें मनातें इति शष्टो ध्यायः ।। छ

(१३४ आ) सांति असता ७ ।। आयणी प्रसर १३ ।। विपायिला येकाधा १७ ध्वनि संदेह २१ विंदाणें योग २२ ।। कोडें कौतुकें २४ आदिशुन्याचा मायेचा २७ रूपक दृष्टांत येकतुकें सामान टांक ठसे ।। २९ ।। रोहिणीचे जळ मृगजळ ३० ठी प्रमाण ३१ माजिवडें मधे ।। ३४ ।। नैसर्गीक स्वभाविक ।। ३६ ।। निजतेज स्वरुप अहाच वरचेवर अदिचेनि उत्पत्ती समईं अन्तिप्रलयीं ४३ सांख्याच याविचार ४७ वेखासें विरुद्ध न करी ४९ ।। मुक्तें यथासांग ५० अपवर्ग मोक्ष ।। ५२ विकारलें पसरलें ५३ संभव निर्माण होतांचि ५५ ।। सुघट केवल ६० बाबुळी सेंवाळ ६३ जवनिक पडदा ६८ आया आकारास ६९ आघाडा फाडुनि उभाडा उभड ७० कालकलनेचेनि करणे तुंगे मोटी ७३ वोभणें वेगें वोसणें लांब कडेकेर ७४ सघटी समुदाय ७५ चलिया चांचल्ये मदत्रयाचिया विद्या धन कुल आकलिया प्रसार उदत्राज अधिक्ये ।। ७६ चोढे गर्ता ७८ अवखले खोळबणे ।। ७९ ।। धारस धरण दुवाडा. कठीण ८० ।। बह्मां ब्रह्मांड ८१ न धरती न राहती वोभणे वेगें ८४ दौडी होडीचा कल ८५ (१३५ अ) जाड वल ८६ जरंगा जाळे उदकातील ८७ ।। उधवला वरी येता ८८ वोवलें माखलें ८९ पेटीं सांगडी ।। ९२ ।। ओगवणें स्वेछेने ९३ रागी विषयासक्त ९८ तरांडे तापा ९९ ।। निरुता खरा पानढाळ वोहटल १०१ उपरत परतणे सेलत पोहत थांबे ठावें अनकळित अक्लेश १०२ विपालें थोडे १०३ अवांतर द्वैतपण १०९ आर्त रोगी कडवसें आंधारे ११७ उचंबळला हर्षयुक्त ११९ आवडे भलतसे १२५ कुहरीं दरकुटी १२७ पाडी बरोबर १३० सडिया सडिया निःसंगत्वें १३१ उखा पाहाट वोतपलि दिप्ती साम्याची ब्रह्मप्राप्तीची ।। वाखारी दुकान संसरलेन ज्ञानें राहाटणें १३६ प्रतीत आत्मसाक्षात्कार १२७ वाखारां उदर ।। १४९ उभयता इहलोक परलोक १५४ पाखी पक्षि १५६ सुवावे करावें १६४ अनस्युत अखंडीत आने बोलें आणिकें प्रकारे १६५ वालभ मी विकृति कुबुद्धि १७३

पासवणें बंधन पाश १७७ ॥ नवलपण अणोळघत्त्व ॥ १९० ॥ अनिमेषांचे निमिष-भर विलंब न साहे १९२ झोकरी विसारी १९४ न दाटति स्वाद न घेवे १९५ असलगपंणे ॥ गोडिनें १९९ उगाणें बोलणे २०१ पाहे नातवं प्रवेश ॥ तांची २०२ पडताळा ग्रंथार्थविचार २१० लेसा बर (१३५ आ) वेरिती हवाव बरव इति **सप्तमोध्यायः** ॥ ७ ॥ छ ॥

सोप व्यर्थ ८ मांदोडा मांडव १५ खोंकर फुटकें १६ सपूर बारीक शुन्यचि निराकार १७ विरुळें फाटकीं विज्ञान प्रपंच २२ ढोंढी अकार २४ असमसास असंख्यात २७ पालविये अंकुर शून्य माया २८॥ कारणही साधन चक्रा विचारादिक ३७ आहाच लटिकें ३२ अधिकरुनि अश्रय ॥३५॥ बोरबारा सुख दुःख ३७॥ उपषमि लयाते पाववी ॥३८ किडा डांक साकें हिण ॥ ४७ तोहा अधियज्ञ ॥४९॥ उर्वी पृथ्वी ५० यूक्तिघोषें युक्तिमंत्रें ५३ पितलें ॥ पावलें ५८ जाळिते ज्ञान ५९ आदिची स्वच्छ असतां अतिसरण समयीं ६० ॥ झोल मिथ्या ६१ प्रतितिचा अनुभव माजघरीं मध्यभागी वृत्ति नवचें नोहे चीसे ६३ उभे याजित असतां गहन कठीन ६४ रुळेचीना द्वैत दिसेविना ६७ वाचुन अहंकाररहित विसकुसे अन्यथा होय ७२ जे कमफळ ८० हेचि मद्रुपता ८१ पांडि पर्वत चढे ८४ घोघें सत्वर ९० स्वुसडा सडोक ९१ अव्यंग पूर्ण ९४ अज्ञास्थान द्विदळ ॥ ९१ अचेत जड १०० लाणि सेवद आपणा त्याचा मत्तें ॥ १०५ ॥ (१३६ अ) अभिप्रेत अत्यंत प्रिति ॥ १०६ चुबुकुळले वोढणें ठेलें राहीलें १११ कलासती लागती अनिवृत्ति पथें ॥ सुषुम्नामार्गे ११४ ॥ अर्धबिंब अमात्रा ॥ ११५ समीर वायु १२९ ॥ अनुघडे विकल १२२ उपाइला प्रशस्त १२२ वरिचिल अणखा १३५ येकवंख्या तदात्म्यका हें कोठेंहि हि १३८ सतत निरंतर १४२ भाणें ताट १४३ खिच खिचडा १४७ गोरी पारध्याचें गायन १५ गोरी व्याघ्रें मृगें बधा जावो गोरी तुं पापसहति इति रत्नकोशः ॥१५१॥ भडसें थोरपण १५८॥ विद जाणते १६४ ॥ उपपति वित्पत्ति ॥ १६ इना १८० सूतला निजेला १८९ बहुवसपण २२२ ज्ञातेपण १९७ साता आसतां असतां २०२ अतुवट गुह्य ॥ २०८ माजिवटा मरणसमइं २१० सावावो बळ २१२ उझींतं प्रदिप्तपण २२२ पायतरें पाथरी २२५ सुभरें परिपूर्ण २३३ ॥ घराणि स्छाने घरें २३६ असलग सुगम निवृत्तिवन्हीं निवृत्तिप्राप्य २३९ अडवी आडमार्गी १४१ अखरी लटकें २४३ अंचिरा मार्ग उत्तममार्ग धुम्रमार्ग पातावात २५७ नाप्लवे न सांपडें २६१ ॥ साटी बदला २६२ ॥ काटालां बरोबरी इति **अष्टमोध्यायः** ॥ ८ ॥ छ ॥

(१३६ आ) समाजी सभेमधे ४ सांसीनले पट्टत्रयित ७ पढीयावो आवडी ८ भवादश तुम्हासारिखे तेंसणा तेवढा धुंदुरू काजवा खद्योतो धुंदुरो ज्योतीरागणो रात्रीदीपकः इति रत्नकोशः ॥ ११ ॥ अडे सांटवे पवाड अवकाश १४ गंगावति वनस्पती १६ चावटी वाचाळता १७ वावें अवतार बहूत्वें

अभारश्रम ॥ १८ झटे आघात पढियंता आवडता २० चेपणी आडी २१ वोथी जावें पातळ करावें जयातें ब्रह्मातें २२ शब्दब्रह्म वेद बाजे पलंगी २६ प्रमेय अर्थ २८ सुवावो उत्तम वायु वोळे मेघ ३० सायिख खांबसूत्री ३५ हियें हृदय ४२ नावा नावा घडीघडी कानडे अवघड विज्ञानसी प्रपंचासहित ४६ गाठी आहंकार लादुनी जाळुनि ४९ मोटकें थोडें ५१ वरी आप्त होय ॥ ५५ ॥ गम्य प्राप्य ५८ परीवरी घरा आंत लोह्या सोन्याचा ६२ दुथडी नदी ६६ अव्यक्त इंद्रियांगोचर ॥ वोथेजलें आकारलें ६७ देहातें देहपर्यंत ॥ ६९ ॥ उपपत्ति युक्ति ७२ सांजवेळे सायंकाळ नावेक अमाळसें झांकले भ्रमयुक्त झाला ७८ आविष्करे प्रकटे ७९ अषेषीं कल्पीं ८१ गमति भासती ॥ ८४ ॥ (१३७ अ) विश्वेसीं विश्वेसहित भाव्य अश्रय ८८ ॥ निरुतें खरें ॥ ९२ ॥ कल्पितें मन ऐश्वर्य माया ९३ प्रतिती अनुभव ॥ उद्‌बोधाचें जागृतिचें ॥ १०१ अतिरसी अति उल्लर्त्वि १०२ ढेंढ अवसर अनुधेड फ्रीटे प्रकट होय १०५ उपपत्ति युक्ती निरुति खरी १०६ समवायतंतु तंतुसंयोग ११५ उपरवा श्रम ११६ भ्रमक लोहचुंबक ११९ घनावळी मेघपंक्ति वार्षीये वृष्टीकाळ १२३ पावोनि पासोनि १२७ वीकारीं कार्यीं १३२ ॥ संभुती उत्पत्ती उपपति युक्ती १३७ दंश अभिप्राय १३७ पैसें विचारें १४३ स्छुळदृष्टी प्रपंचात्मक १४७ सुरतरु कल्पवृक्ष १४८ ॥ दुसरा हार १५९ ॥ अप्रमाण प्रमाणातीत १६८ ॥ कैपक्ष पाठीराखा १७२ मोघ वृथा १७३ कोल्हेरिचे अश्वार सोंगाचे राउत ॥ वोंडवरीचे गारुडिचे ॥ १७८ ॥ चीत्तहिन विक्षिप्तचित्त १७६ कपाळे विक्षीप्त चित्तद्वारें ॥ १८२ ॥ अवाळुवें वोष्ठप्रात १८३ त्वगस्ती गवसणी ॥ त्वचा अस्ती भूतोंडी भूतबळी १८६ ॥ वायाणि व्यर्थ हन अणिख ॥ १९१ ॥ परीणामा पुर्णावस्छा १९२॥ कैवल्यातें मोक्षातें निति ज्ञान १९२॥ करण इंद्रियें १९७ नडनाचे मिषें २०२ कडसणी विचार २०६ भोजें प्रितीनें येकवेळ मरणममयी २०७ (१३७ आ) उमरडुनि डावलुनि ॥ २१२ ॥ साविया सहजचि पाष्टाव घेती ॥ स्वाधिन करिती २१९ पन्नासिलि श्रृंगारिली २१४ सुरवाडे स्वाधीनपणे पाणियाडे पाणोथा ॥२३१॥ अथी आहे २३३ ॥ अनवसर समयनोहे २३७ टाकणें जवळ करणे २४० युप पषुबंधन स्तंभ ॥ सुहाडइनः प्रभुर्नपोवाजा सुहडीः पृथीविपतिः ॥ २४३ ॥ पाटव कुशल २६३ ॥ ठायास निश्चयास २६५ ॥ सकळकर्मजात सकळ यज्व सकळ सर्वयज्ञ २७४ वेद्यजें ब्रहम २७८ कुलक्रमप्रवर्तक २७९ विसंगे विश्रांति पावे २८३ नावभरि पळभरी २८९ शरण्य रक्षिता २९४ ॥ अव्यक्त सूक्ष ३६० उपकेरवे स्वार्थकता ॥ ३०८ ॥ कसवटी परीक्षक ३२५ शंबरे जळे अंभोजस्तोयपानियं नीरक्षिरांबु शंबरं इत्यमरः ॥ ३३७ ॥ रागेचे बराबरी खोचे दडपे खोलणिय गमन ३२९ ॥ पाउठी पायरी ३३५ ॥ त्रैधर्म वेदत्रइ ३३५ उखीते आहे तैसें वोपले किकले ३३९ ॥ (१३८ अ) वाहाणी मजकडे १४० अजातपक्षी पर्त्ता जाला नाही १४५ ॥ समवाये सर्वत्र ३७६ करणी इंद्रियें ३६४ श्रिये

अष्टमासिद्धि ३८३ सांडोवा शरीर सांडणें ।। ३९७ निष्कळ शुद्ध ४०५ उगाणिले अर्पिले ४०६ पाहेचा उद्यांचा ४०९ कुरुठा घर ४१५ अवष्टंभें प्रपंच ४२० सेवटली ज्ञानभक्ती ४२२ अभिजात्य उत्तमजात ४३३ काह्या काशास ४४१ भाणे ताट ४५० श्रुताधीत वेदज्ञ ४५३ उपरे अधिक्ये ४५७ अकारण व्यर्थ माझेपणे भजन ४६० ।। नधांपति न घालिजेति ४६४ आपसे आपणाची ४६६ वक्रयाचेनि व्याजे प्रितिचेनि मिषे ४७१ ।। लाणिचे संवगणीचें खागे खले ४७८।। उत्सागी संनिधानें ४८१ वाखतीं घोगती ४८५ ।। समर्थावे प्रतिपादावें ४८९ शरण्यरक्षिता निर्वाण मोक्षदाता ४९६ ।। भरे माप पोरी अंकुर गळतात ५०८ ।। दृष्टादृष्ट इहलोक परलोक ५०९ उवायें व्यापक सांपे आतां ।। ५११ ।। लानी खेद ।। भोजें संतोषे ५१३ ।। गर्हिस अविचार ५१६ अव्यंगपुर्ण ५२९ ।। कडीयाळी जाली **इति नवमोध्यायः** ।। ९ ।। छ ।। छ ।। छ ।।

(१३८ आ) विदग्धा १ आत्मज्ञान व्यक्त वक्ता अरविंद कमल प्रबोध विकाश कर्ता सूर्य ५ भुवना अश्रय ६ सौरस प्रसाद ७ दैविकी स्वामीचि ८ वाचस्पती बृहस्पती ९ पारुषे स्पर्षे ११ केउता काशाचा १२ केउते कसें १४ आथिलें थौरपणें भिंग देणें अभ्रक देणे १५ रजतवणी रुपेयाचे पाणी २१ जलशयन विष्णु जाला २४ ।। सांख्य ज्ञानयोग २५ गंव्हरलें सांगीतलें २८ ।। उपक्रमी आरंभी ३२ मुद्रा लावावया सिद्धांत करावया ३६ शाठी प्रावर्ण ४१ विद्गादा विस्तारा निर्वचन कलेना आयनी आवडी बरोबरी ४६ ।। वडप रोप पडप शोभा ४७ अगण्य अपरमीत ५३ येऊतें कडे ६० विकडी चातुर्य सवडी शेवट ।।६७।। निरुति निश्चय ७० गाभे सूक्ष्म अंकुर ७२ पुढील सोय बाहेरील प्रवृत्ति टाकुनि ७३ बहुडे फिरे ७५ अजत्व जन्मत्व ७८ भाव अभास ८९ कडवसें आंधारें ८४ भावामाजी भुतास ९० भावि स्वरूपीं ९४ मनि माया ९५ ।। व्यावस्छा लोक नव्हे ते दळवाडे समुदाय अचुंबित सगळी होतिं ९७ अध्यक्ष स्वामी १०१

(१३९ अ) मनातें मायेतें ।।१०४।। भावाचेनि अभिप्रायाच्या ।। ११० नाटीं आकारीं सुती प्रवेश १११ खंग न्युनता ११६ उदितें वाढते १२१ माझें आधिक्यें भोजें राज्यें १२३ येरयेरांची भक्तांची १२५ सामरस्याचे येकाकार चतुष्पथ चौहटा १२८ ।। अमोदाचे सुवासाचें १३० अव्यंग संपुर्ण १३२ ।। सेल उत्तम भाग १३३ उपाथिले अकस्मात प्राप्त जालें म्हणियें काम ।।१३६।। उपास्तिची उपासनेचि १३७ । पोषकें साधनें ।। १३८ ।। सांकड दुर्लभत्व ।। १४० आपणपें सगुणावेगळें ।। साजुक सायुज्य १४३।। पोबासाची कापुरांची १४८ वाक्य वीभूती आणि योग १५३।। धात्री धरत्री फुडें खरे १५७।। वोतपलि बाळाकउष्टण १५९।। घारली माजली १६१।। राऊळा घरास स्वामीस १६८ ।। नटकती सफळ जाली नाही १७० श्रुताधी पुढिलें आयिकिलें १७१ आटी यत्न १८० केउतें कैसें आदि शुन्य माया १८१ ।। टाकतें साध्य १८४ शोच्यता आयोग्यता १८५ बापिया चातक

१९१ विवळ सुगम सविस्तर १९६ पाबळया नश्वर तुच्छ १९८ द्रव पातळ बद्ध दाट १९९ से (१३९ आ) वो तत्काळ बळियें बलात्कारें २०३॥ निर्वचना बोलवेना परितोषें संतोषें ॥२०७ पतिकराचीया आंगीकार प्रियं बहुप्रितीकर इत्यमरः॥२१७ कुटिलालक कुरळ केश २३०॥ सावावो साह्यकर्ता २३७॥ वाड थोर २६९ लोथ मोट २७० उत्प्रेक्षा विचार २७२॥ समासांमध्ये आव्ययीभाव तत्पुरुष २ द्विगुण ३ द्वंद्व ४ बहुव्रीही ५ कर्मधा (र) य ६ इति समासषक्टं तन्मधे द्वंद्वो हं २८१ अनुपायिनि अनुसरते २९१॥ फुली बाळपण न जातां ॥३०८॥ सोहाडा शाहाण्या ३०२ ठीखरें ३१० जना वस्तुमात्री आज्ञा ऐश्वर्य पाळिजे फांके ३१२॥ विश्वभावना सौख्यकारण ३१५ वंग कळंक ३२० विबुध ज्ञाते ३२१ राभस्य आविचारित रभसो वेगहर्षय इत्यमरः। ३३२॥ ध्वनला सुचला ३३५ वाझोळे वांझें फळ **इति दशमोध्यायः ॥१०॥**

